सत्यमेव जयते

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2014-2015

सह संचालक, मनपा लेप,उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई

रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी 2014-2015 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

# भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका

## वित्तीय वर्ष 2014-2015 चा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/18/ब/भिवंडी.मनपा/ले.प./2014-15/ 499 Date : 11/07/2019

सह संचालक (मनपालेप)
स्थानिक निधी लेखापरीक्षा
7 वा मजला, रायगड भवन,
नवी मुंबई

प्रति,
मा.आयुक्त,
भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी.

भिवंडी- निजामपूर शहर महानगरपालिका आर्थिक वर्ष 2014-15 या वर्षाचे लेखापरीक्षण श्री. श. ग. लोंढे सहाय्यक संचालक तथा पथक प्रमुख (कालावधी दि.05/04/2018 ते दि.31/05/2018) व श्री. विजय खेडकर, लेखापरीक्षा अधिकारी तथा पथक प्रमुख (कालावधी दि.01/06/2018 ते दिनांक 06/12/2018) पथकांव्दारे दि.05/04/2018 ते दि.06/12/2018 या कालावधीत पूर्ण केले आहे. प्रारुप अहवालाचे श्री. नितिन पाठक, उप संचालक (मनपालेप), उप विभाग - 2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी पुनर्विलोकन केले. सदर प्रारुप अहवालाचे श्री. नितिन पाठक, उपसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी दिनांक 07/06/2019 रोजी आयुक्त, भिवंडी- निजामपूर शहर महानगरपालिका यांचे समवेत चर्चा करुन अंतिमीकरण केले. लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी भिवंडी- निजामपूर शहर महानगरपालिकेचे कामकाज पाहात होते.

| अ.क्र. | नाव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | मा. श्रीम. प्रतिभा विलास पाटील | महापौर | दि.01/03/2014 ते दि.10/12/2014 |
| 2 | मा. श्री. तुषार यशवंत चौधरी | महापौर | दि.11/12/2014 ते दि.31/03/2015 |
| 3 | श्री. जिवन नामदेव सोनवणे | आयुक्त | दि.01/03/2014 ते दि.31/03/2015 |

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ....1

I PART I : भाग १ ....3

मागील लेखा परीक्षण अहवाल ....3

PART II ....11

**कलम ९ अ खालील आक्षेप** ....12

1 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या 2014-15 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प व आर्थिक स्थिती बाबत. 13

2 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका लेखा विभागाकडील लेख्यामधील अनियमितता ....18

3 सन 2014-2015 मधील ठेवी व गुंतवणुकीच्या संदर्भातील माहिती विवरणपत्रामध्ये लेखापरिक्षणास सादर करणेबाबत. ....19

4 13 वा वित्त आयोग प्रभाग समिती क्र.3 च्या कार्यक्षेत्रात वऱ्हाळादेवी माता चौक ते ताडाळी जकात नाक्यापर्यंत सध्या असलेल्या रस्त्याची सुधारणा नस्तीमधील अनियमिततांबाबत... ....20

5 वॉर्ड क्र.54 गैबीनगर येथील औलिया मस्जिदलगत आर.सी.सी.गटार व मस्जिद समोर लायक्राफिनिश पेवर ब्लॉक बसविणे कामातील त्रुटींबाबत. ....22

6 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्वसाधारण व कार्यात्मक अनुदानातून प्रभाग समिती क्र. 3 च्या कार्यक्षेत्रात अंजूरफाटा येथे हरिधरा शॉपिंग सेंटर ते राजीव गांधीनगर पर्यंत सध्या असलेल्या रस्त्याची सुधारणा करणेबाबतच्या नस्तीमधील अनियमितताबाबत ....24

7 प्रभाग निधी अंतर्गत प्रभाग क्र.16 मधील रियाज टेलर ते अशरफिया मदरसा मागील गल्ली व घर नं.1718,1114 पर्यंत सी.सी.गटार व पायवाट तयार करणेबाबतच्या नस्तीमधील अनियमिततांबाबत... ....26

8 जुना आग्रा रोड येथे देवजीनगर ते अंजूर फाटा रस्त्यावरील खडडे, मंजूर वार्षिक निविदा सन 2013-14 मार्फत दुरुस्त करणे या कामातील अनियमितताबाबत ....28

9 सन 2014-2015 या वर्षाकरिता प्रभाग समिती क्र.4 अंतर्गत बोअरवेल निगा व दूरुस्तीकामी सेवा पुरविणे कामातील अनियमितता ....30

10 चविंद्रा डंपिंग ग्राऊंड येथे कचरा लेव्हल करणेकामी चैनवाला बुलडोझर यंत्र भाडयाने पुरविणेबाबत ....32

11 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा गोळा करणे व त्याची वाहतुक करणे या कामासाठी विना निविदा ठेका देणे बाबत. ....34

12 भिवंडी नि.शहर महानगरपालिका मार्केट विभागाकडील दैनिक बाजार फी व स्लॉटर हाऊस फी वसुलीच्या ठेक्यामधील अनियमितता ....35

13 नोंदणीधारक 2415 व्यापाऱ्यांनी सन 2014-15 मध्ये स्थानिक संस्था कर भरणा न केल्याबाबत....38

14 नोंदणीधारक व्यावसायिकांनी सन 2014-15 मध्ये वार्षिक विवरणपत्रे न भरल्याबाबत ....39

15 शिक्षकेतर कर्मचारी यांना माहे फेब्रुवारी 2015 चे वेतन अदा करताना व्यवसाय कराची रक्कम कमी वसुल केलेबाबत. ....41

16 शालेय पोषण आहार योजना वित्तीय वर्ष 2014-15 मधील मे.ऐ.बी.पाटील ॲन्ड सन्स भिवंडी यांचेकडुन आयकराची रक्कम वसुल झालेली नसल्याबाबत. ....42

17 मनपा हद्दीत बगीच्यामध्ये जेष्ठ नागरीकांना बसणेसाठी व्ही.आय.पी. बँचेस बसविणे कामातील अनियमिततेबाबत ....44

18 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीत वृक्षसंवर्धन व जतन अधिनियम 1975 ची अंमलबजावणी मधील अनियमितता. ....47

19 महानगरपालिकेने कर्मचारी आकृतीबंधास शासनाची मंजूरी घेतली नसलेबाबत. ....48

20 मनपा मधील अधिकारी कर्मचारी यांच्या वेतनातून कपात करण्यात येणाऱ्या गटविमा वर्गणीबाबत निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत. ....49

21 खाजगी सुरक्षा अभिकरणाकडून सुरक्षा रक्षक नेममणूकीवर झालेल्या खर्चातील अनिमिततेबाबत. ....51

22 जन्म व मृत्यु प्रमाणपत्र संदर्भातील नोंदवही,साठा नोंदवही व फॉर्म उपलब्ध करुन न दिल्यामुळे या लेख्याशीर्षांतर्गत जमा झालेल्या रक्कमांची पडताळणी न केल्याबाबत ....54

**कलम ९ ब खालील आक्षेप ....56**

23 महानगरपालिकेने ठेकेदाराकडून तसेच अधिकारी कर्मचारी यांच्या वेतनातून कपात करण्यात येणाऱ्या आयकराबाबत निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत. ....57

24 भविष्य निर्वाह निधीमध्ये व DCPS खात्यामध्ये माहे मार्च 2015 अखेर खाते नोंदवही नुसार व बँक स्टेटमेंट शिल्लक रक्कमाबाबत. ....59

25 मालमत्ता कराच्या 3% मनपा विशेष शिक्षण कराची रक्कम आकारणी केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत ....60

26 करमुल्यांकन विभागा मधील मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या प्रकरणातील अनियमिततेबाबत... ....61

27 करमुल्यांकन विभागा मधील शिक्षण उपकर आकारणी मधील अनियमितता ... ....63

28 करमुल्यांकन विभागा अंतर्गत शासकीय मालमत्तांच्या कराच्या थकबाकीबाबत... ....65

29 करमुल्यांकन विभागा मधील मनपा हद्दीतील मोबाईल टॉवरच्या थकबाकीबाबत ... ....66

30 महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रिया तसेच कार्यवाहीमधील अनियमितता ....66

31 वैदयकीय विभागातील दवाखाने तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्याकरीता खरेदी करावयाच्या औषध खरेदीच्या कार्यवाहीमध्ये झालेल्या अनियमितता ....70

32 स्थानिक संस्था कर वसुलीमधील अनियमितताबाबत ....70

33 बिनतारी संदेश यंत्रणा खरेदीवरील निष्फळ खर्च ....73

34 महानगरपालिकेतील प्रींटरसाठी नवीन कॉम्पटेबल टोनर खरेदी करण्या बाबत. ....74

35 प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामी सेवा पुरविणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत........78
36 पाणी पुरवठा विभागांतर्गत सन 2014-15 अखेर बृहन्मुंबई महानगरपालिका व स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि. यांच्या प्रलंबित देयके व विलंब आकाराबाबत. ........84
37 स्टेम वॉटर डिस्टब्युशन ॲण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि. यांच्या गर्व्हनिंग समिती बैठकीमधील झालेल्या ठरावाप्रमाणे पाणी वाटप दराप्रमाणे देयकाची आकारणी न केल्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झालेबाबत. ........86
38 पाणी पुरवठा विभागांतर्गत सन 2014-15 मधील अर्थसंकल्पातील वित्तीय तुटीबाबत तसेच अनधिकृत मालमत्ताधारकांकडून अपेक्षित पाणीपट्टी कराच्या रक्कमांची वसुली न केल्यामुळे महानगरपालिकेचे झालेल्या नुकसानीबाबत........88
39 व-हाळा जलशुध्दीकरण केंद्राकरिता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचिंग पावडर पुरवठयामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत. ........90
40 प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत बोअरवेल निगा व दुरुस्ती कामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत. ........93
41 व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती व देखभालकरिता मजूर सेवा पुरविणे या कामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत. ........97
42 प्रभाग समिती क्र.5 अंतर्गत बोरवेल निगा व दुरुस्ती मधील अनियमितताबाबत. ........100
43 महानगरपालिकेत बालवाडीमध्ये शिकत असलेल्या मुलांना शैक्षणिक साहीत्य् व बालवाडी करीता साहीत्य् पुरविणे बाबत. ........102
44 वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शहरातील बालवाडयामध्ये शिक्षण घेणा-या मुलांना गणवेश खरेदी करुन पुरविण्याबाबत. ........106
45 महिलासाठी क्रिडा साहित्याची खरेदीची रक्कम रु.14,91,007/- ची नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध न झालेबाबत........108
46 वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शहरातील बालवाडयामध्ये शिक्षण घेणा-या मुलांना शाळेचे बुट व पायमोजे खरेदी करुन पुरविण्याबाबत........109
47 आपत्तकालीन परिस्थितीमध्ये रेनकोट खरेदी करताना झालेल्या अनियमितते बाबत........111
48 आपत्तकालीन परिस्थितीमध्ये काम करण्याकरिता आवश्यक साधन सामुग्री खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत. ........113
49 नदियापार येथील खालसा मदरसा रामपाल तबेला जवळ गटार बांधणे या कामातील अनियमितता. ........116
50 प्रभाग क्र.25 गणेश नगर न्हावीपाडा अपार्टमेट,हनुमान सोसायटी,नासीर बिल्डींग जवळ गटार बसविणे. ...118
51 प्रभाग समिती क्र.05 च्या कार्यक्षेत्रातील प्रभागातील 18 अंतर्गत रस्त्यांचे खराब झालेल्या पृष्ठभागाची पॅचवर्क पध्दतीने दुरुस्ती करण्याच्या कामामधील अनियमितता... ........120

52 वॉर्ड क्र.14(ब) येथे उमर मस्जिद पाठीमागे शौचालय बांधणे (6सीट) बाबतच्या कामातील अनियमितताबाबत 123
53 म.न.पा. हददीतील प्रभाग क्र.08 मधील दूसरा निजामपुरा, कुरेशीनगर, बागे फिरदोस मशीदच्या पाठीमागे तासा बावडीजवळ गटार आणि पेवर ब्लॉक लावुन रस्ता बांधणे....126
54 प्रभाग क्र.39 फेणेगांव येथे काकतिया शाळा, साई सर्व्हिस सेंटर लगत सी.सी.गटार व पायवाट तयार करणे कामामधील अनियमितताबाबत....128
55 प्रभाग समिती क्र.3 च्या कार्यक्षेत्रात ओसवालवाडी ते कामतघरपर्यंत रस्त्याची सुधारणा करणे मधील अनियमितताबाबत....130
56 आमदार निधी अंतर्गत भिवंडी मनपा हददीत प्रभाग क्र.7 मध्ये डोलारे पेट्रोलपंप येथे बसस्टॉप उभारणे कामामधील अनियमितताबाबत....133
57 प्रभाग समिती क्र.1 च्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.18 मधील गोपाळनगर कापकणेरी येथील घर नं.401,394/95 जवळ फुटपाथवर लायक्राफिनिश पेवर ब्लॉक बसविणेबाबतच्या कामामधील अनियमितताबाबत (आमदार निधी अंतर्गत)....135
58 प्रभाग क्र.45 ताडाळी येथे विकासशेठ चाळ लगत सी.सी.गटार व पायवाट तयार करणेबाबतच्या कामामधील अनियमितताबाबत....136
59 भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत 18 मुख्य रस्त्यांचे पॅचवर्क पध्दतीने दुरुस्ती करणे कामातील अनियमितता....138
60 महानगरपालिका शाळेतील सन 2014-15 मध्ये विध्यार्थ्यांना गणवेश पुरविणेबाबत अनियमितताबाबत. ..141
61 श्री एन आर बुकना वकील महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने शाळेचे रिट पिटीशन दाखल करणेस्तव रक्कम रु.100000 अदा करणेमधील अनियमितताबाबत....143
62 भिवंडी निजामपूर शिक्षण मंडळ DCPS रोकडवही व बँक पासबुक व सदर रक्कम गुंतविणेतील अनियमिततेबाबत....144
63 नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची कार्यवाही केलेली नसलेबाबत....146
64 वित्तीय वर्ष 2014-15 मधील दर्पन अपसेट यांना दिलेल्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छपाईमधील अनियमिताबाबत. ....147
65 शिक्षण मंडळ येथील प्राथमिक शाळेकरिता लागणा-या वित्तीय वर्ष 2014-15 मधील प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छपाई मधील अनियमिताबाबत....149
66 1 ते 8 वी सहामाही प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका माध्यम मराठी उर्दु,तेलगु, हिन्दी,गुजराती व कन्नड छपाईमधील अनियमिताबाबत....151
67 शालेय पोषण आहार योजना सन 2014-15 मधील अनुदान वाटपातील अनियमितताबाबत. ....153
68 शिक्षण मंडळ महानगरपालिका येथील नवीन शाळा दिनांक 15-08-2014 रोजी उदघाटन दिनी ग्रेनेडाईड प्लेट लावणेबाबतचे देयक अदा करणेमधील अनियमितताबाबत....155

69 दिनांक 15 आगष्ट 2014 स्वतंत्र दिनानिमित्य व दिनांक 26 जानेवारी 2015 प्रजासत्ताक दिनानिमित्य चॉकलेट खरेदी रक्कम रु.141300/- मधील अनियमितताबाबत. ....157

70 अग्निशमन दलातील गणवेश कापड तसेच वस्तु खरेदीबाबत अनियमितता. ....159

71 महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीबाबत. ....160

72 मनपा हददीत बगीच्यामध्ये ठिकठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बेंचेस बसविणेबाबतच्या कामातील अनियमितता ....161

73 मनपाच्या कब्रस्तानामध्ये लाल मातीचा पुरवठा करणे बाबतच्या कामातील अनियमितताबाबत ....163

74 मनपा हददीतील सर्व कब्रस्तानामधील मान्सुनकाळात वाढलेले गवत काढून विल्हेवाट लावणेच्या कामामधील अनियमितताबाबत ....165

75 मनपाच्या क्षेत्रातील धोकादायक झाडे छाटणेच्या कार्यवाहीसाठी साधनसामुग्री खरेदी करणेबाबतच्या कामामधील अनियमितताबाबत ....167

76 महापालिकेच्या वाहनांकरीता लागणारे सुटे भाग खरेदी व दुरुस्ती कामांमधील खर्चातील अनियमितता. ....169

77 वाहन विभागातील वाहन क्र.एम.एच.04 एच 8898 दुरुस्ती मधील अनियमितता ....170

78 अ)शालेय जिल्हास्तरिय क्रिडा स्पर्धा 2014-15 करीता स्पर्धेच्या ठिकाणी मंडप, स्टेज, टेबल खुर्च्या पुरविणे बाबत अनियमितता ब) राज्यस्थरीय बुध्दीबळ स्पर्धा सन 2014-15 करिता टेबल खुर्च्या, साऊंड सिस्टीम गादी सेट व पिण्याचे पाणी पुरविणे बाबत अनियमितता. ....172

79 क्रिडा विभागाकडून संबंधितांना विविध कारणांसाठी देण्यात आलेल्या अग्रीमांचे समायोजन प्रलंबित असल्याबाबत ....174

80 श्री.रविंद्र बुधाजी थोरात,सफाई कामगार यांचे वेतन निश्चितीबाबत. ....175

81 शहरविकास विभागातील अर्थसंकल्पामध्ये दर्शविण्यात आलेल्या खर्चाच्या रक्कमेतील त्रुटीबाबत तसेच निष्कासन कारवाई दरम्यान घेण्यात आलेल्या पोलीस संरक्षणावर करण्यात आलेला खर्चाची पूर्तता न करणेबाबत व लेखापरीक्षण कालावधीमध्ये आवश्यक अभिलेख उपलब्ध करुन न देणेबाबत. ....176

**कलम ९ क खालील आक्षेप ....179**

**------------------- निरंक ------------------- ....180**

**कलम ९ ड खालील आक्षेप ....182**

82 महानगरपालिका मंडई ते वीर तानाजी चोक या रस्त्यावर स्ट्रीट लाईट ,पोल फिटींग व्यवस्था करणे व खराब झालेले पोल काढणे, पोल फिटींग, केबल बदली करणेकामातील अनियमिततेबाबत ....183

83 महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी हायमास्ट बसविणेच्या कामातील अनियमिततेबाबत ....185

84 महानगरपालिकेच्या क्षेत्रातील महानगरपालिकेच्या पथदिव्यांची त्रैवार्षिक निगा व दुरुस्ती सर्व साहित्य, यंत्रसामुग्री व मनुष्यबळासह करणेबाबत अभिलेख सादर करण्याबाबत. ....187

85 जंतुनाशक,दुर्गंधीनाशक व फवारणीनाशक खरेदीतील अनियमिततेबाबत ....189

86 महानगरपालिका हद्दीतील छोटे मोठे नाले पावसाळ्यापूर्वी सफाई करणे कामातील अनियमिततेबाबत ....191

87 प्रभाग समिती क्र. 1 ते 5 च्या कार्यक्षेत्रातील कचरा गोळा करणे व उचलणे तसेच इतर स्वच्छता विषयक कामासाठी डंपर/जेसीबी/घंटागाडी/ट्रक्टर ट्राली पुरविण्याच्या कामातील अनियमितता ............194

88 करमुल्यांकन विभागा कडील मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या थकबाकीबाबत ............201

89 मालमत्ता कर व इतर कर यांचे सुधारित कर निर्धारण झालेले नसल्याने होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत 203

90 सि.टी.एस. क्र.4360ए मौजे निजामपूर येथील आमिर मोहंमद आमिन आबुजी यांच्या सादर केलेल्या विकास कामाच्या प्रस्तावातील अनियमिततेबाबत. ............204

91 विकास योजना आरखडा ( 2003 ते 2023 ) नुसार आरक्षित केलेल्या जागांच्या भूसंपादनाची कार्यवाही केली नसल्याबाबत. ............205

92 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात योग्य ठिकाणांवर एकूण 1225 चौ.फुटाच्या क्षेत्रफळात होर्डींग उभारुन जाहिरात करण्याच्या कार्यवाहीमध्ये झालेल्या अनियमितता ............207

93 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील शिवाजी चौक येथील प्लॉवर बेडवर सुशोभिकरण करुन जाहिरात करणे व कोंबडापाडयाकडे जाणा-या प्लॉवर बेडवर ट्रायव्हिजन लावण्याच्या कार्यवाहीमध्ये झालेल्या अनियमितता ............209

94 शिक्षण मंडळ येथील शालेय पोषण आहार योजनेमधी वित्तीय वर्ष 2014-15 मधील रोखवहीतील अनियमितताबाबत ............211

95 शिक्षण मंडळातील उपप्रमाणके रदद /विरुप न करणेबाबत ............212

96 कार्यालयीन वृत्तपत्रे खरेदी करताना झालेल्या अनियमितते बाबत............213

97 शिक्षण मंडळातील वित्तीय वर्ष 2014-2015 मधील रोखवहीतील अनियमितताबाबत ............214

98 शिक्षण मंडळातील वित्तीय वर्ष 2014-15 मधील अतिरिक्त तेलगु शिक्षकाबाबत व श्री. उपेद्रं लक्ष्मीपती संबारी, प्रशिक्षित पदवीधर यांना समन्वयक तथा सहाय्यक प्रशासनाधिकारी म्हणुन कार्यभार सांभाळणे कामी नियुक्तीबाबत. ............216

99 महानगरपालिका बालवाडीतील मुलांना पौष्टिक आहार म्हणून बिस्कीट खरेदीतील अनियमिततेबाबत ............217

100 महानगरपालिका पूर्व प्राथमिक शाळेतील बालवाडी विद्यार्थ्यांना शाळेचे दप्तर खरेदी करुन पूरविणेत झालेल्या अनियमितते बाबत............219

101 ग्रंथालय विभागातील विविध भाषेची वर्तमानपत्रे, साप्ताहिके मासिके, व दिवळी अंक खरेदी बाबत झालेल्या अनियमितते बाबत ............222

102 महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियमाप्रमाणे वृक्ष प्राधिकरण समिती गठीत केली नसल्याबाबत. ............223

103 पाणीपुरवठा व बांधकाम विभागाने जंगम मालमत्ता नोंदवही न ठेवणे बाबत. ............224

104 दिर्घकाळापासून प्रलंबित अग्रीम 4.51 कोटीचे समायोजन न झाल्याबाबत ............225

105 महापालिकेच्या विविध खात्यातील संगणकीकृत रोखडवही व बँक स्टेटमेंट मधील तफावती बाबत............227

106 मुदतबाह्य व न वटलेल्या धनादेशाची रक्कम मनपा फंडात विलंबाने जमा घेतल्या बाबत. ............229

107 कार्यकंत्राट कराची रक्कम शासनास जमा न केल्याबाबत. ....230
108 मिळकत विभागातील महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तांची विहीत नोंदवहीत नोंदी न केल्याबाबत231
109 आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मंजूर करतांना अतिप्रदान झाल्याबाबत. ....233
110 मनपा कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटीबाबत ....234
111 कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना मंजूर केल्यानंतरच्या वेतननिश्चितीमधील अनियमिततेबाबत ....236
112 निलंबित कर्मचारी, न्यायालयीन प्रविष्ठ प्रकरणे, आश्वासित प्रगती योजना व जातपडताळणी बाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध न केल्या बाबत. ....238
113 महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक जागा/जमिनी यांवर अतिक्रमण होवून कायमस्वरूपी बांधकामे झाली असल्याबाबतची माहिती सादर करण्याबाबत. ....240
114 प्रभाग समिती क्रमांक 5 च्या अतिक्रमण विभागातील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत. ....241
115 प्रभाग समिती क्रमांक 1 च्या अतिक्रमण विभागातील अनधिकृत बांधकाम निष्कासनाच्या अनुषंगाने अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याबाबत. ....244
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....247

**विवरणपत्रे व जोडपत्रे ....248**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | | 47, 48 | | 101 |
| सामान्य प्रशासन | 19, 20 | 80 | | 109, 110, 111, 112 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 4, 5, 6, 7, 8 | 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 59 | | |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | | | | 82, 83, 84 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | 9 | 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 42 | | 103 |
| लेखा विभाग | 1, 2, 3 | 23, 24 | | 104, 105, 106, 107 |
| नगर रचना | | | | 90, 91 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | 13, 14 | 32 | | |
| कर निर्धारण व संकलन | | 25, 26, 27, 28, 29 | | 88, 89 |
| आरोग्य | | 31 | | |
| भूमी व मालमत्ता विभाग | | | | 108 |
| वाहन विभाग | | 76, 77 | | |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | 10, 11 | 30 | | 85, 86, 87 |
| परवाना व मंडई विभाग | 12 | | | 92, 93 |
| सुरक्षा विभाग | 21 | | | |
| अनधिकृत बांधकाम प्रतिबंध विभाग | | 81 | | 113 |
| संगणक किंवा | | 33, 34 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती तंत्रज्ञान | | | | |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | 15, 16 | 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69 | | 94, 95, 96, 97, 98 |
| महिला व बालकल्याण विभाग | | 43, 44, 45, 46 | | 99, 100 |
| क्रिडा विभाग | | 78, 79 | | |
| अग्निशमन विभाग | | 70, 71 | | |
| अतिक्रमण विभाग | | | | 114, 115 |
| उद्यान विभाग | 17, 18 | 72, 73, 74, 75 | | 102 |
| जन्म मृत्यु नोंदणी विभाग | 22 | | | |

# I Part I : भाग १

## *मागील लेखा परीक्षण अहवाल*

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपक्रमांचे वैधानिक लेखापरिक्षण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक स्थानिले-1010/प्र.क्र.26 ब/ विमा प्रशा, दि.31/03/2011 अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचेकडे सोपविण्यात आले आहे. त्यानुसार भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिकेचे सन 2011-2012 पासून लेखापरिक्षण सुरु करण्यात आले आहे. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 10 (4) नुसार लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासून 4 महिन्याच्या आत अहवालातील आक्षेपांची पूर्तता करून पूर्तता अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयास पाठविणे आवश्यक आहे. तथापि 2011-2012 ते 2013-2014 पर्यंतच्या लेखापरीक्षण अहवालातील खालीलप्रमाणे एकुण 428 परिच्छेद प्रलंबित आहेत. स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाच्या अभिप्रायाची/आक्षेपाची पूर्तता दाखविण्यात आलेली नाही.

प्रलंबित परिच्छेद खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | ले.प.वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 1 ते 162 परिच्छेदांमधील बाबी. | 162 |
| 2 | 2012-13 | 1 ते 117 परिच्छेदांमधील बाबी. | 117 |

2013-2014 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेद.

| परिच्छेद क्रमांक | शिर्षक |
|---|---|
| 1 | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वित्तीय स्थितीबाबत. |
| 2 | महानगरपालिका अंतर्गत सर्व शिक्षा अभियान अनुदान व महानगरपालिका फंडामधून केलेल्या शाळेच्या वर्ग खोल्या बांधकामातील अनियमितता. |
| 3 | महानगरपालिका अखत्यारीतील खासदार निधी 2012-13 अंतर्गत केलेल्या विविध प्रकारच्या बांधकामांमधील अनियमितता. |
| 4 | महानगरपालिकेतील नागरी दलित वस्ती पाणिपुरवठा योजनेंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामातील अनियमितता. |
| 5 | रोड फंडातून प्रभाग समिती 4 मधील रस्त्यांची पावसाळ्यापूर्वी दुरुस्ती करणेसाठी केलेल्या कामातील अनियमितता. |
| 6 | सर्व शिक्षा अभियानाच्या अनुदानातून शाळा क्र. 48 फेणे गाव येथे अस्तित्वातील |

| | |
|---|---|
| | इमारतीवर 3 वर्ग खोल्या बांधणे व शाळा क्र. 34 अवचितपाडा येथील अस्तित्वातील इमारतीवर तीन वर्ग खोल्या बांधणे या कामातील अनियमितता. |
| 7 | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्राप्त अनुदानातून काचेरीपाडा येथील शाळा क्र. 70 येथील अस्तित्वातील इमारतीवर 5 वर्ग खोल्या बांधणे कामातील अनियमितता. |
| 8 | सर्वशिक्षा अभियान अंतर्गत प्राप्त अनुदानातून कचेरीपाडा शाळा क्र.70 येथे सहा सीट व चाविंद्र शाळा क्र.46 येथे 6 सिट स्वच्छतागृहे बांधणे कामातील अनियमितता. |
| 9 | आमदार निधी व खासदार निधी अंतर्गत झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न केल्याबाबत. |
| 10 | आमदार व खासदार निधी या शासकीय अनुदानातून केलेल्या कामावरील रुपये 2,70,39,888/- खर्चाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत. |
| 11 | सर्व शिक्षा अभियान व रोड फंड या शासकीय अनुदानातून केलेल्या कामांच्या रु.3,32,60,694 खर्चाचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न करणे बाबत. |
| 12 | सर्वसाधारण रोखवहीतून बांधकाम विभागाने केलेल्या कामावरील रु.14,71,53,606/- खर्चाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत. |
| 13 | सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण 2011 साठी प्राप्त मानधन, प्रशिक्षण भत्त्याच्या वाटपातील अनियमितता. |
| 14 | सार्वत्रिक लोकसंख्या जनगणना 2011 करिता प्राप्त मानधन, प्रशिक्षण भत्त्याच्या वाटपातील अनियमितता. |
| 15 | भारताची जनगणना-2011 प्रभाग समिती 1 मधील घरावर नंबर टाकणे साठी केलेल्या खर्चातील अनियमितता. |
| 16 | कामाच्या ठेकेदारास न.न. 22 द्वारे अंशता प्रदान करणेच्या कार्यपद्धतीबाबत. |
| 17 | लेखा परीक्षणास अभिलेख उपलब्ध करून न दिल्याबाबत. |
| 18 | रोखपालाची रोकड वही व सर्वसाधारण रोखवहीतील तफावतीबाबत. |
| 19 | प्रमाणक क्रमांक 201 ते 212 दिनांक 23.4.2013 नुसार रक्कम रु.3,88,932/- चे अनियमित प्रदानाबाबत. |
| 20 | सर्वसाधारण रोखवहीमध्ये 216 प्रमाणकांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नसून एकाच प्रमाणक क्रमांकाने दोन वेळा प्रदान केलेबाबत. |
| 21 | 2013-14 या आर्थिक वर्षा मधील विविध बँक खात्यावरील शिल्लक रक्कमांचा ताळमेळ न घेतल्याबाबत |
| 22 | बांधकाम/इमारत परवानगी देताना वसुल कामगार कल्याण उपकर रु.2,83,68,088 शासनखाती जमा न करता त्यातील रक्कम रु.1,15,00,000 खर्च करणेच्या अनियमितताबाबत. |
| 23 | आर्थिक व प्रशासकीय मंजुरीनुसार देयकात नमूद लेखाशिर्षातील तरतुदीतून देयके खर्ची न टाकता मुलभूत सुविधा या शासन अनुदानाच्या निधीतून खर्ची टाकणे बाबत. |
| 24 | मुलभूत सुविधा निधी या शासकीय अनुदातून केलेल्या विद्युत पोल बदलणे, हायमास्ट पोल बसविणे, फिटींग बदलणे ई. कामातील अनियमितता. |
| 25 | वार्ड क्र. 57 मधील महावीर कम्पाउंड व इतर ठिकाणी स्ट्रीट लाइट पोल, फिटींगची |

| | |
|---|---|
| | व्यवस्था करणे व खराब पोल, फिटींग, केबल बदली करणे. |
| 26 | आदर्श पार्क शाळा व मैदान या करिता राखीव भूखंडामध्ये कम्पाउंड लायटिंग करिता सोलर एलईडी लाइटची व्यवस्था करणे कामातील अनियमितता. |
| 27 | परशुराम टावरे क्रिडा संकुलातील प्रभाग समिती 4 कार्यालयाचे विद्युतीकरण करणे व ट्रान्सफॉरमरसह सबस्टेशन उभारणे तसेच तरण तलावाचे विद्युतीकरण करणे या कामातील अनियमितता. |
| 28 | प्रभाग क्रमांक 52 मधील मार्कण्डेयनगर परिसरात नव्याने तसेच जुन्या झालेल्या फिटींग व पोल काढुन नविन स्ट्रीटलाईटची व्यवस्था करणेबाबत. |
| 29 | महानगरपालिका कार्यालये,रुग्णालय,नाट्यगृह,कम्युनिटी हॉल येथील जनरेटरची वार्षिक निगा व दुरुस्ती करणे निविदेतील अनियमितता.(2011-12) |
| 30 | भुमिगत गटार योजना फेज-1 च्या कामातील अनियमिततेबाबत. |
| 31 | महानगरपालिका अखत्यारीतील पाणि पुरवठा योजनेंतर्गत ''खासदार निधी 2012-13'' मधून केलेल्या विविध प्रकारच्या कामांमधील अनियमिततेबाबत. |
| 32 | महानगरपालिका अखत्यारीतील पाणि पुरवठा योजनेंतर्गत ''आमदार निधी 2012-13'' मधून केलेल्या विविध प्रकारच्या कामांमधील अनियमिततेबाबत. |
| 33 | महानगरपालिका अखत्यारीतील पाणि पुरवठा योजनेंतर्गत ''मुलभूत सुविधा निधी 2011-12'' मधून केलेल्या विविध प्रकारच्या कामांमधील अनियमिततेबाबत. |
| 34 | एकात्मिक पाणिपुरवठा योजना टप्पा 1अ (25 एमएलडी) मोजमाप पुस्तिकेनुसार 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये केलेल्या खर्चामधील अनियमितता. |
| 35 | पाण्याच्या टँकरसाठी 50 नग के.बी.पाईप खरेदीतील अनियमितता. |
| 36 | वऱ्हालादेवी वॉटर वर्क्स येथील अस्तित्वातील 2 द.ल.लि. जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करणे व वऱ्हालालादेवी वॉटर वर्क्स परिसरातील सम्पची दुरुस्ती करणे या दोन कामातील अनियमितता. |
| 37 | सिव्हरेज व वेस्ट रिमुव्हल नियम 2006 चे नियम 4.1 नुसार जलनिस्सारण कराची आकारणी न करणेच्या अनियमिततेबाबत. |
| 38 | पाणीपुरवठा विभागाने सर्वसाधारण रोखवहीतून खर्च केलेल्या कामातील अनियमितता. |
| 39 | पाणीपुरवठा विभागाने प्रभागांतर्गत बोअरवेल व जलवाहिन्यांची वार्षिक निगा व दुरुस्तीच्या कामावरील केलेल्या खर्चातील अनियमितता. |
| 40 | मुलभूत सुविधा या शासकीय अनुदानातून केलेल्या कामांच्या रु.1,11,49,156 खर्चाचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न करणे बाबत. |
| 41 | दलितवस्ती, दलितवस्ती पाणीपुरवठा व 13 वा वित्त आयोग या शासकीय अनुदानातून केलेल्या कामांच्या रु.6,49,21,786 च्या खर्चाचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न करणे बाबत. |
| 42 | सर्वसाधारण रोखवहीतून पाणीपुरवठा विभागाने केलेल्या कामांच्या रु.2,25,68,804 खर्चाचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न करणे बाबत. |
| 43 | ग्रंथालय विभागातील पुस्तके खरेदीतील अनियमिततेबाबत. |
| 44 | ग्रंथालय विभागातील मिल्लतनगर येथील नविन वाचनालयात नविन पुस्तके खरेदीतील |

| | |
|---|---|
| | अनियमिततेबाबत. |
| 45 | विधी विभागातील अनियमिततेबाबत. |
| 46 | महानगरपालिकेच्या बालवाडीतील मुलांना पौष्टिक आहार म्हणून बिस्कीट खरेदीतील अनियमिततेबाबत. |
| 47 | सर्वसाधारण सभेच्या कामकाजातील अनियमिततेबाबत. |
| 48 | रिक्षाद्वारे दवंडी देण्यातील अनियमिततेबाबत. |
| 49 | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आयकर व व्यवसाय कराच्या रकमाबाबत. |
| 50 | प्रभाग क्रमांक २ शहर विकास विभागाचे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाचे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर न केलेबाबत. |
| 51 | शहर विकास विभागाकडील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे बाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणात तपासणीस उपलब्ध करून न देणेबाबत. |
| 52 | प्रदूषण मंडळास अधिभार खर्चाचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध न केलेबाबत. |
| 53 | महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत अग्निशमन केंद्र् इमारत बांधणे कामासाठी तांत्रिक सल्लागार नियुक्ती कामातील अनियमितता. |
| 54 | मिळकत विभागाकडील लेख्यांचे लेखापरीक्षणात आढळुन आलेल्या अनियमितता. |
| 55 | जन्म-मृत्य विभागाकडील लेखापरीक्षणात आढळुन आलेल्या त्रुटीबाबत. |
| 56 | घनकचरा व्यवस्थापन (आरोग्य) विभागाकडून 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये केलेल्या कामांवरील रक्कम रु. 8,16,42,465/- इतक्या खर्चाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत. |
| 57 | मार्केट विभागाकडील दैनिक फी व स्लॉटर फी वसुली ठेक्यातील अनियमितता. |
| 58 | 2013-14 मध्ये दिलेल्या बांधकाम/इमारत परवानगीवेळी कामगार कल्याण उपकराची पूर्ण रक्कम वसुल न केल्याने रु.3,21,08,990 ची वसुली प्रलंबित राहणेच्या अनियमितेबाबत. |
| 59 | महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम 37(22),37(31),33(6) तसेच तळघर वापर मंजुरीसाठी अधिमुल्य आकारणेची तरतूद नसताना स्थायी समितीच्या मंजुरीने अधिमुल्याचे दर ठरवून वसुली करणे बाबत. |
| 60 | प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत 2013-14 या वर्षाची अनधिकृत बांधकामांची माहिती व त्यावरील अनधिकृत बांधकामे निष्काषित करण्यासाठी केलेल्या खर्चाची माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबत. |
| 61 | वाहन विभागाने म.न.पा.निधी व शासन अनुदानातून केलेल्या खर्चाचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत. |
| 62 | प्रमाणकांच्या रेखांकनात आढळून आलेल्या अनियमितता. |
| 63 | ठेकेदाराच्या प्रदानातून कार्यकंत्राट कर कमी अथवा कपात न करणे बाबत. |
| 64 | ठेकेदाराच्या प्रदानातून विमा व कामगार कल्याण उपकर कपात न करणे. |
| 65 | 2013-14 वर्षातील रक्कम रु. 93,335/- प्रदानाच्या सर्वसाधारण नोंदवहीत नोंदी न घेतल्याबाबत. |
| 66 | सर्वसाधारण रोखवहीतील अनियमित प्रदानांबाबत. |
| 67 | 2013-14 या वित्तीय वर्षात अग्रीमधना पोटी दिलेल्या रक्कमांबाबत. |

| | |
|---|---|
| 68 | अग्रिमाचे नियमबाहय प्रदान व प्रलंबित अग्रीम समायोजनाबाबत. |
| 69 | 2013-14 आर्थिक वर्षातील गुंतवणुकीबाबत. |
| 70 | शिक्षण कर व रोजगार हमी कराच्या रक्कमा शासनखाती जमा करणेबाबत. |
| 71 | ए. सि. पी. कार्यालय ते मंगलबाजार रस्ता रुंदीकरणामधील रोडवर नव्याने विद्यूत पोलची व्यवस्था करणे. |
| 72 | विदयुत विभागाचे निगा व दुरुस्तीचे प्रदानात आढळुन आलेल्या अनियमितताबाबत. |
| 73 | प्रभाग समिती 4 क्षेत्रातील रस्त्यावरील दिवाबत्तीची निगा व दुरुस्तीसाठी त्रिवार्षिक (2011-12 ते 2013-14) निविदेतील अनियमितता. |
| 74 | वॉर्ड क्र.77 साठेनगर स्मशानभूमीच्या जागेतील उद्यानाचे सुशोभीकरण करुन वृध्द नागरीकांना स्टँडर्ड बेंच पुरविणे. |
| 75 | महानगरपालिका अखत्यारीतील आमदार निधी 2012-13 अंतर्गत केलेल्या विविध प्रकारच्या बांधकामांमधील अनियमितता. |
| 76 | अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रविकास कार्यक्रम या शासकीय अनुदानातून केलेल्या कामातील अनियमितताबाबत. |
| 77 | निर्मल अभियान अंतर्गत वार्ड क्र. 50 पाणीपुरवठा स्टाफ क्वार्टर कम्पाउंड येथे 30 सीट शौचालय बांधकाम करणे कामातील अनियमितता. |
| 78 | निर्मल अभियान अंतर्गत वार्ड क्र.68 मधील काथोड शेठ चाळ येथे 40 सीट शौचालय बांधकाम करणे कामातील अनियमितता. |
| 79 | निर्मल अभियान अंतर्गत वार्ड क्र.68 मधील गोकुळ पाटील चाळ येथे 30 सीट शौचालय बांधकाम करणे कामातील अनियमितता. |
| 80 | मालमत्ता कराच्या ३% मनपा विशेष शिक्षण कराची रक्कम आकारणी केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. |
| 81 | कर मुल्यांकन विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततांबाबत. |
| 82 | मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत. |
| 83 | नारपोली-2 मालमत्ता क्र. 1570 श्री.प्रेमचंद मुनिलाल गुप्ता यांचे अंशता तळ मजला, पहिला ते चौथा मजला या रहिवास वापर मालमत्तेवर केलेल्या नवीन कर आकारणीतील अनियमितता. |
| 84 | नारपोली-1 मालमत्ता क्र.458 श्री.आयातुल्लाह अब्दुल जब्बार या वाणिज्य तळ अधिक पहिला ते तिसरा मजला रहिवास अनधिकृत इमारतीवर केलेल्या मालमत्ताकराच्या कर आकारणीतील अनियमितता. |
| 85 | नारपोली-2 येथील मालमत्ता क्र.1031/101 वर केलेल्या मालमत्ता कराच्या आकारणीतील उणीवाबाबत. |
| 86 | गणपती विसर्जनाच्या दिवशी गणेश मंडळांना शाल, श्रीफळ व बुके देवून स्वागत करण्याच्या खर्चाबाबत. |
| 87 | नविन परिभाषित अंशदान योजनेच्या अंमलबजावणीबाबत. |
| 88 | स्थानिक संस्था कर वार्षिक विवरणपत्र सादर न केल्याबाबत. |
| 89 | प्रभाग क्रमांक ५ चे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता. |

| | |
|---|---|
| 90 | गणपती विसर्जनासाठी पोटॅशिअम परमॅग्नेट खरेदीबाबत. |
| 91 | गणपती विसर्जनासाठी नवीन निर्माल्य कलश खरेदी व जुने दुरुस्तीबाबत. |
| 92 | मनपाच्या नविन प्रशासकीय इमारतीकरीता स्टॅबीलायझर खरेदीतील अनियमितता. |
| 93 | महानगरपालिका अखत्यारीतील पाणि पुरवठा योजनेंतर्गत ''आमदार निधी 2013-14'' मधून केलेल्या विविध प्रकारच्या कामांमधील अनियमिततेबाबत. |
| 94 | एकात्मिक पाणीपुरवठा टप्पा-1(25 एमएलडी) कामाचे मक्तेदार श्री.एम.टी.फड यांनी दिलेल्या बँक गॅरंटीचे नुतनीकरण न केलेबाबत. |
| 95 | एकात्मिक पाणी पुरवठा योजना टप्पा 1 कामातील अनियमितता. |
| 96 | महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली अधिकारी / कर्मचारी यांना नियमबाहय आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्याने व चुकीच्या वेतन निश्चितीमुळे झालेल्या जादा प्रदानाबाबत. |
| 97 | महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली अधिकारी/कर्मचारी यांना आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्याने झालेल्या जादा प्रदानाबाबत. |
| 98 | मनपा मार्केट विभागाकडील मालमत्तांच्या भाडे वसुलीबाबत. |
| 99 | महानगरपालिकेच्या वाहनांकरीता लागणारे सुटे भाग खरेदी व दुरुस्ती कामांमधील खर्चातील अनियमितता. |
| 100 | श्री. एल.पी.गायकवाड, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा यांना वाहनभत्त्याचे रु.8,71,666/- चे नियमबाहय प्रदान केल्याबाबत. |
| 101 | क्रिडा विभागाकडून संबंधितांना विविध कारणांसाठी देण्यात आलेल्या रु.2,64,000/-अग्रीमांचे समायोजन प्रलंबित असल्याबाबत. |
| 102 | दलित वस्ती निधीतून हायमास्ट लाईटची व्यवस्था करणे कामातील अनियमितता. |
| 103 | शासकीय अनुदानाच्या रोखवहयांतील शिल्लक अखर्चित अनुदानाबाबत. |
| 104 | लेखा विभागाकडील रोखपालाची रोकडवही तपासणीत आढळून आलेल्या अनियमितताबाबत. |
| 105 | रोखवही व बँकस्क्रोल पडताळणीबाबत. |
| 106 | सर्वसाधारण आर्थिक व्यवहारांसाठी एस्क्रो बँक खात्याचे वापराबाबत. |
| 107 | 2013-14 या वित्तीय वर्षात अग्रीम देण्यापोटी सर्वसाधारण रोखवहीतून काढलेल्या रक्कमांची प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत. |
| 108 | बँक ताळमेळ विवरणपत्र, बँकपासबुक, रोखवही लेखापरीक्षणास उपलब्ध न करणेबाबत. |
| 109 | करमूल्यांकन विभागाकडील अभिलेखे विहित नमुन्यात ठेवणेबाबत. |
| 110 | मालमत्ता हस्तांतरणाबाबत (दिगरबाज प्रकरणे) |
| 111 | कर आकारणी प्रकरणांच्या नोंदी कर आकारणी व मागणी नोंदवहीत केल्या नसलेबाबत. |
| 112 | अकृषिक कराबाबत. |
| 113 | प्रभाग क्रमांक 1 शहर विकास विभागाने अतिक्रमण काढणेबाबतचे अभिलेख उपलब्ध करुन न दिल्याबाबत. |
| 114 | प्रभाग 2 मधील मालमत्ता करवुसलीच्या लेख्यांतील त्रुटीबाबत. |
| 115 | प्रभाग 2 मधील पावती पुस्तके व चलन पुस्तकाबाबत. |
| 116 | प्रभाग 4 मधील मालमत्ता करवुसलीच्या लेख्यांतील त्रुटीबाबत. |

| | |
|---|---|
| 117 | प्रभाग 4 मधील पावती पुस्तकातील अनियमितता व मालमत्ता/पाणपट्टीच्या वसुलीबाबत. |
| 118 | प्रभाग क्रमांक ५ शहर विकास विभागाचे अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम नोंदवही विवरणपत्र ब मध्ये आढळून आलेल्या अनियमितताबाबत. |
| 119 | प्रभाग समिती 1 कडील जमा व खर्चातील अनियमितता. |
| 120 | प्रभाग.1 कडील न वटलेल्या धनादेशांबाबत. |
| 121 | प्रभाग समिती 1 कडील मालमत्ता कर वसुली लेख्यांतील त्रुटीबाबत. |
| 122 | प्रभाग क्रमांक ४ शहर विकास विभाग लेख्यांबाबत. |
| 123 | कर्मचा-याच्या सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत. |
| 124 | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या 2013-14 या अर्थिक वर्षातील माहे फेब्रुवारी 2014 च्या वेतनदेयकातील त्रुटी बाबत. |
| 125 | श्रीमती संगीता वैभव डामसे बालवाडी शिक्षिका यांच्या वेतन निश्चितीबाबत. |
| 126 | सेवापुस्तकातील भविष्य निर्वाह निधी नामनिर्देशन नोंद व जोडपत्र 1 बाबत. |
| 127 | स्वेच्छा सेवानिवत्ती धारकांच्या वारसांना सेवेत सामावुन घेणेबाबत. |
| 128 | सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना भविष्य निर्वाह निधीचे अंतीम प्रदान करतांना व्याजाचे रक्कमेचे अतिप्रदानबाबत. |
| 129 | भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेतील सुरक्षा विभागाने खाजगी सुरक्षा अभिकरणाकडून सुरक्षा रक्षक नेमलेबाबत. |
| 130 | माध्यमिक विद्यालयाकरीता प्रथम सत्र परीक्षेसाठी वर्ष २०१२-१३ मध्ये लागणाऱ्या प्रश्नपत्रिका, पुरवणी व उत्तरपत्रिका छपाई करणेबाबत. |
| 131 | सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वर्गखोल्या बांधकामासाठी प्राप्त निधीत महानगरपालिकेचा स्वहिस्सा जमा न करता देयकांचे प्रदान करणे बाबत. |
| 132 | स्थानिक संस्था कर न वटलेल्या धनादेशांबाबत. |
| 133 | महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीबाबत. |
| 134 | अग्निशमन कर्मचा-यावरील वैद्यकीय खर्चाबाबत. |
| 135 | संगणक खरेदीबाबत मागील लेखापरीक्षणातील आक्षेपाधीन रक्कमांचे अनियमित प्रदानांबाबत. |
| 136 | मनपा मिळकत विभागाकडील लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत. |
| 137 | मनपा मिळकत विभागाकडील माहीती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न दिल्याबाबत. |
| 138 | परवाना विभागाकडील लेखापरीक्षणात आढळुन आलेल्या अनियमितता. |
| 139 | मार्केट विभागाकडील लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध् करुन न दिल्याबाबत. |
| 140 | कै.मीनाताई ठाकरे नाटयगृह विभागाकडील लेखापरीक्षणातील त्रुटीबाबत. |
| 141 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार स्वयंरोजगार लाभार्थी प्रस्तावातील अनियमितताबाबत. |
| 142 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना भौतिक उदिष्ट साध्यतेबाबत व खर्चाबाबत. |
| 143 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार निधी खर्च, शिल्लक रक्कम व व्याजाबाबत. |
| 144 | एकात्मिक पाणी पुरवठा प्रकल्पाचे २५ एम.एल.डी.टप्पा 1 ए अंतर्गत कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या डी आय पाईप साठी उत्पादन शुल्कासह दराने प्रदान केल्यामुळे कंत्राटदारास रु. |

| | |
|---|---|
| | 2.43 कोटीचे अतिरिक्त् प्रदान केल्याबाबत. |
| 145 | 8 मार्च महीला दिन साजरा करणेबाबत खर्चातील अनियमितता. |
| 146 | आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील रु. ६६२२४/- खर्चाची प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबत. |
| 147 | बांधकाम परवानगी क्र.104/2013-14 मध्ये विकास शुल्क व अनुषंगिक रकमांची कमी वसुली केल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत. |
| 148 | प्रभाग समिती क्र.4 अंतर्गत विविध वसुलींसाठी खाजगी वाहने भाडयाने घेतल्यामुळे झालेल्या जादा प्रदानाबाबत. |
| 149 | महानगरपालिका मुख्यलेखापरीक्षकाचे जबाबदारीबाबत. |

उपरोक्त नमुद केलेल्या परिच्छेदांच्या संदर्भात त्या त्या वर्षाच्या प्रथम पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावे.

वरील परिच्छेदांपैकी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 2011-12 व 2012-13 वर्षाच्या पुनर्विलोकन अहवालाकरिता निवडलेल्या परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ले. प. वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1. | 2011-12 | 1, 4, 8, 18, 20, 21, 26, 36, 40, 41, 46, 54, 58, 62, 77, 78, 87, 92, 114, 131, 138, 148 | 22 |
| 2. | 2012-13 | 4, 5, 6, 7, 9, 13, 17, 19, 21, 27, 31, 63, 89, 97, 104, 109 | 16 |

# Part II

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## *1 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या 2014-15 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प व आर्थिक स्थिती बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 20**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमेची सरासरी रु. 218 कोटी 57 लाख या रक्कमे इतके अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असताना रु. 259 कोटी 31 लाखाचे अंदाजपत्रक तयार केले असुन रु. 40 कोटी 73 लाखाची वाढ केली आहे. अर्थसंकल्पात भांडवली खर्चाचा अंदाज एकुण रु. 136 कोटी 24 लाख इतका वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात रु. 30 कोटी 41 लाख खर्च करण्यात आला आहे. प्रत्यक्षात भांडवली खर्च अंदाजाच्या फक्त 22 टक्के खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे. भिवंडी निजामपूर शहर महापालिकेचे 2014-15 या वित्तीय वर्षात ठेवलेले लेखे राष्ट्रीय महापालिका लेखा नियम पुस्तीका (National Municipal Accounts Manual) नुसार व्दिनोंदी लेखा पध्दती (Accrual Based Double Entry Accounting System) प्रमाणे लेखे ठेवलेले नसुन टॅली पध्दतीने लेखे ठेवण्यात आलेले आहेत. प्रत्येक तिमाही नंतर दोन महिन्यांच्या आत त्या तिमाहीचा लेखा परिक्षीत ताळेबंद, जमा व खर्च आणि पैशाचा ओघ (CASH FLOW) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र इंटरनेटवर प्रसिध्द करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेने महानगरपालिकेच्या वित्तिय स्थितीची माहिती नागरिकांना समजून येत नाही.***

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम कलम 95,96,100 अन्वये अनुक्रमे मा.आयुक्त, मा.स्थायी समिती, मा.महासभा अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या 2014-15 या आर्थिक वर्षासाठी आरंभीची शिल्लकेसह रु. 520 कोटी 43 लाख जमेचे (आरंभीची शिल्लक 6 कोटी 8 लाख, महसुली जमा 259 कोटी 31 लाख व भांडवली जमा रु. 255 कोटी 03 लाख ) व रु. 519 कोटी 98 लाख खर्चाचे (महसुली खर्च रु. 384 कोटी 19 लाख व भांडवली खर्च रु.135 कोटी 79 लाख ) अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे.

| अंदाजपत्रक | महसुली जमा | भांडवली जमा | एकूण जमा | महसुली खर्च | भांडवली खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | | 608.44 | | | |
| ’अ‘ | 23986.81 | 16022.06 | 40008.87 | 25216.25 | 2772.47 | 27988.72 |
| ’क‘ | 1507.86 | 7281.02 | 8788.88 | 6624.91 | 8882.24 | 15507.15 |
| ’प‘ | 0 | 2100 | 2100 | 2815.27 | 420.4 | 3235.67 |
| अग्निशमन | 222 | 0 | 222 | 445 | 1080.8 | 1525.8 |
| महिला बाल | 0 | 0 | 0 | 404.13 | 0 | 404.13 |
| अंध अपंग | 0 | 0 | 0 | 146.48 | 0 | 146.48 |
| वृक्ष संवर्धन | 115 | 0 | 115 | 387 | 0 | 387 |
| शिक्षण मंडळ | 100 | 100 | 200 | 2335 | 468.17 | 2803.17 |
| एकुण | 25931.67 | 25503.08 | 51434.75 | 38374.04 | 13624.08 | 51998.12 |
| अखेरची शिल्लक | | | | | | 45.07 |

1. अर्थसंकल्पात महसुली व भांडवली जमेचा अंदाज एकुण रु. 514 कोटी 34 लाख इतका वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात रु. 375 कोटी 45 लाख महसुल जमा झाला आहे. तसेच खर्च बाजुस रु. 519 कोटी 98 लाख महसुली व भांडवली खर्चाचा अंदाज वर्तविण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात महसुली व भांडवली खर्च रु. 289 कोटी 16 लाख करण्यात आला आहे. अंदाजपत्रकाच्या तपासणी अंती असे दिसते की, अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्चाच्या बाबींचा विचार करुन त्यानंतर त्यानुसार जमेच्या रक्कमा अवास्तव वाढविण्यात आल्या आहेत. वरील विवरणपत्राचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की अंदाजपत्रकीय जमा अंदाजाच्या 72.14 % महसुल प्रत्यक्ष जमा झाला आहे व खर्च अंदाजाच्या 55.61 % खर्च वर्ष अखेरीस करण्यात आला आहे. महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण 3 मधील परिच्छेद 30(बी) नुसार नुसार अर्थसंकल्प तयार करताना मागील तीन वर्षाच्या जमा व खर्चाच्या प्रत्यक्ष रकमा, दर व करात करण्यात आलेली वाढ, महानगरपालिकेच्या मालमत्तेत झालेली वाढ वा घट, पालिका हद्दीत जमीन व इमारतीत झालेली वाढ वा घट या अनुषंगाने जमेशी निगडीत खर्चाचे अंदाज वर्तविणेत आलेले नाहीत.

2. महानगरपालिकेचा मागील तीन वर्षाचा महसुली प्रत्यक्ष जमा व खर्च पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | जमा प्रत्यक्ष | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 19562.66 | 24724.5 |
| 2 | 2012-13 | 23586.15 | 30126.57 |
| 3 | 2013-14 | 22425.03 | 29344.67 |
| | एकूण | 65573.84 | 84195.74 |

| | | | |
|---|---|---|---|
| | सरासरी | 21857.95 | 28065.25 |

महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण 3 मधील परिच्छेद 30(बी) नुसार नुसार एकुण खर्चाचे अंदाज हे मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष खर्चाची सरासरी अथवा अर्थसंकल्पीय वर्षाची अंदाजीत जमा या दोहोपैकी जी कमी असेल त्यापेक्षा अधिक असू नयेत. परंतू महानगरपालिकेच्या 2011-12 ते 2013-14 या तीन आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष महसुली जमेची सरासरी रु. 218 कोटी 57 लाख व महसुली खर्चाची सरासरी रु. 280 कोटी 65 लाख आहे. महानगरपालिकेच्या 2014-15 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या महसुली जमेचा अंदाज प्रशासनाने रु. 259 कोटी 31 लाख तयार केला. प्रशासनाने मागील तीन वर्षाची प्रत्यक्ष जमेची सरासरी रु. 218 कोटी 57 लाख या रक्कमे इतके अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक असता रु. 259 कोटी 31 लाखाचे तयार केले असुन रु. 40 कोटी 73 लाखाची वाढ केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 26(3) नुसार करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे व ज्यासाठी ठराविक मागणी असते अशा मार्गाने येणाऱ्या उत्पन्नाचे अंदाज मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष जमेच्या सरासरीपर्यंत मर्यादित असावेत अथवा त्या वर्षाची मागणी अधिक वसुलीयोग्य वाजवी टक्केवारी यापैकी जी कमी असेल तेवढे असणे आवश्यक असता प्रशासनाने त्याप्रमाणे कार्यवाही न करता त्यामध्ये नियमबाह्यरित्या वाढ केल्याचे दिसुन येते.

3. अर्थसंकल्पात भांडवली खर्चाचा अंदाज एकुण रु. 136 कोटी 24 लाख इतका वर्तविण्यात आला होता परंतु प्रत्यक्षात रु. 30 कोटी 41 लाख खर्च करण्यात आला आहे. प्रत्यक्षात भांडवली खर्च अंदाजाच्या फक्त 22 टक्के खर्च झाल्याचे निदर्शनास आले आहे. तर महसुली जमा रक्कम रु. 210 कोटी 10 लाख असताना सन 2014-15 मध्ये महसुली खर्च रक्कम रु. 258 कोटी 75 लाख करण्यात आला आहे. प्रत्यक्ष जमा रकमेपेक्षा 48.65 लाख जास्त खर्च करण्यात आला आहे.

4. सन 2014-15 मध्ये भांडवली जमा प्रत्यक्षात र. रु. 159 कोटी 22 लाख असून एकूण भांडवली खर्च हा भांडवली जमा रक्कमेच्या फक्त 20 टक्के झालेला आहे. म्हणजेच प्राप्त रक्कमेचा महापालिकेकडून पर्याप्त नियोजन न झाल्याने वापर झालेला दिसून येत नाही.

5. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.जीईएन-1093/325/प्र.क्र.24/नवी-32, दि.17/04/1993 व शासन निर्णय क्र.जीईएन-1093/1198/नवी-14 दि.14/07/1993 अन्वये महिला व बाल विकास कल्याण यासाठी अंदाजपत्रकीय रकमेच्या 5% तरतूद करणे आवश्यक आहे. महिला बालकल्याणकारी योजनांसाठी रक्कम रु. 234.64 लाख खर्च करणे आवश्यक होते. तथापि महिला बालकल्याणकारी योजनांसाठी 2016-17 च्या अंदाजपत्रक नुसार 2014-2015 आर्थिक वर्षात महिला बालकल्याणकारी योजनांसाठी रु.175.38 लाख खर्च केला आहे.

6. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण-2010/प्र.क्र.146/2010/न.वि.-6, दि.30.10.2010अन्वये अपंग व्यक्ती (समान संधी,हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम,1995 या कायद्यातील कलम 40 अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगांसाठी अंदाजपत्रकीय रकमेच्या किमान 3% निधी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. अपंगांसाठी रक्कम रु. 140.78 लाख खर्च करणे आवश्यक होते. तथापि अपंग योजनांसाठी 2016-17 च्या अंदाजपत्रक नुसार 2014-2015 आर्थिक वर्षात रक्कम रु. 27.07 लाख खर्च केला आहे.

7. भिवंडी निजामपूर शहर महापालिकेने आर्थिक वर्ष 2014-15 मधील पुढील रोखवहया लेखा

परिक्षणास उपलब्ध केल्या होत्या. 1) सर्वसाधारण नोंदवही, 2) भविष्य निर्वाह निधी. सदर रोखवह्या व इतर लेखे तपासणीनंतर लेखा परिक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे. भिवंडी निजामपूर शहर महापालिकेचे 2014-15 या वित्तीय वर्षात ठेवलेले लेखे राष्ट्रीय महापालिका लेखा नियम पुस्तीका (National Municipal Accounts Manual) नुसार व्दिनोंदी लेखा पध्दती (Accrual Based Double Entry Accounting System) प्रमाणे लेखे ठेवलेले नसुन टॅली पध्दतीने लेखे ठेवण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय लेखासंहीतेच्या प्रकरण 29 मध्ये लेखे बंद करण्याची कार्यपध्दती, प्रकरण 30 मध्ये ताळमेळ ठेवणे व प्रकरण 31 मध्ये वार्षिक लेख्यांबाबतची सविस्तर कार्यपध्दती विषद केलेली आहे. मात्र त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

8 मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण चार-अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे यामधील कलम 60 अ विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे (1) (3) (पाच) नुसार प्रत्येक तिमाही नंतर दोन महिन्यांच्या आत त्या तिमाहीचा लेखा परिक्षीत ताळेबंद, जमा व खर्च आणि पैशाचा ओघ (CASH FLOW) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र इंटरनेटवर प्रसिध्द करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली जात नसलेने महानगरपालिकेच्या वित्तिय स्थितीची माहिती नागरिकांना समजून येत नाही.

9. भिवंडी निजामपूर शहर महापालिकेकडे 3 वर्षापेक्षा अधिक काळासाठी अनामतीपोटी प्रलंबित असलेल्या रक्कमा महापालिकानिधीत जमा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

10. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिचे मार्च 2015 रक्कम रु. 45111443 अग्रीमाचे समायोजन झालेले नाही. सदर अग्रीमांमध्ये मनपा कर्मचारी आगीम रक्कम रू. 24734069 सन 1978-79 पासून, ठेकेदार आगीम रक्कम रू. 9092938.78 सन 1961-62 पासून, भुखंड खरेदी आगीम रक्कम रू. 4040375.83 सन 1972-73 पासून, वाहनचालक अग्रीम रक्कम रू. 121006.70 सन 1984-85 पासून, वकील फी अग्रिम रक्कम रू. 755140 सन 1973-74 पासून, शासकीय कार्यालये अग्रीम रक्कम रू. 1762427.70 सन 1954-55 पासून, औषध खरेदी अग्रीम रक्कम रू. 4605485 सन 1954-55 पासून प्रलंबित असलेल्या रकमांचा समावेश आहे. सदर बाब महापालिकेची आर्थिक स्थिती पाहता गंभीर आहे. प्रलंबित अग्रिम रक्कमेचे समायोजन / वसूल होणे आवश्यक आहे.

11. स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन यांचे नियमित पाणीपुरवठा देयकांमध्ये आकारण्यात आलेले दर गर्व्हनिंग समिती बैठकीमधील झालेल्या ठरावाप्रमाणे आकारणे आवश्यक होते. महानगरपालिकेने पाणीवापराचे योग्य नियोजन करुन स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन इंन्फ्रा.कं.लि. यांनी दिलेल्या पाणीवापर दरातील वजावटीचा फायदा घेतला नाही त्यामुळे सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेस रु.7278171 एवढी जादा रक्कम अदा करावी लागल्याने मनपाचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

12. मनपातील पाणीपट्टी कराची एकूण मागणी रक्कम रु.441058829/-एवढी आहे व वसुली रक्क्म रु.64384893/- एवढी असुन शिल्लक रक्कम रु.376673936/- एवढी आहे. महानगरपालीकेच्या पाणीपट्टी कराची मागणीपेक्षा वसुली केवळ 14.59% असुन ती नगण्य असुन ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. महानगरपालिकेने पाणीपट्टी वसुलीबाबत प्रभावी अंमलबजावणी केली नाही त्यामुळे अपेक्षित पाणीपट्टी वसुली झाली नाही.

13. महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागाची सन 2014-15 मधील प्रत्यक्ष जमा रक्कम रु.7027.63 लक्ष असुन एकुण खर्च रक्कम रु.14786.50 लक्ष आहे. सदर आर्थिक वर्षातील वित्तीय तूट रक्कम रु.7758.87 लक्ष एवढी आहे. महानगरपालिकेस प्रत्यक्ष जमा होणारी रक्कम ही त्यांच्या

एकूण खर्चाच्या 47.53% एवढी नगण्य असुन ही बाब गंभीर आहे.

14. महानगरपालिकेच्या करमुल्यांकन विभागाने सन 2014-15 या आर्थिक वर्षामधील पाणीपट्टी कराच्या एकूण मागणीचा व एकूण वसुलीचा उपलब्ध करुन दिलेल्या तपशीला नुसार महानगरपालिका अंतर्गत एकूण 146363 एवढया मालमत्ता असून एकूण 54686 मालमत्ताधारकांकडे नळ कनेक्शन आहेत. महानगरपालिकेने उर्वरित एकूण 91677 एवढया मालमत्तांधारकांची नोंद पाणीपुरवठा विभागात नसल्यामुळे सदर मालमत्ताधारकांना करण्यात आलेला पाणीपुरवठाप्रमाणे अपेक्षित पाणीपट्टी कराची वसुली होत नसल्यामुळे मनपाचे नुकसान झाले आहे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

15. एस्क्रो खात्यातून खर्च करणे अपेक्षित नसतांना सदर खात्यातून नियमबाहय खर्च करण्यात आला आहे.

16. नविन परिभाषित अंशदान योजनेंतर्गत कर्मचा-याच्या खात्यावर महापालिकेच्या हिश्याच्या अंशदानाच्या रक्कमा जमा करण्यात आलेल्या नाहीत.

17. मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 कलम 106 (3) अन्वये प्रत्येक आर्थिक वर्ष सुरु झालेनंतर शक्य तितक्या लवकर महानगरपालिका लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या मागील आर्थिक वर्षाच्या संपुर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीसमोर सादर करुन वार्षिक लेखे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. तथापि महानगरपालिकेकडे वार्षिक लेखे ठेवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रत्यक्ष आर्थिक स्थितीवर भाष्य करता येत नाही.

18. महानगरपालिके अंतर्गत एकूण 146363 मालमत्ता आहेत. विभागाने एकूण मालमत्तांच्या एक तृतीआंश मालमत्तांवर एकूण 54686 नळ कनेक्शनवर पाणीपट्टी कराची रु. 93917599 एवढी आकारणी केली आहे.मनपाने उर्वरित दोन तृतांश (91677मालमत्ताधारक) मालमत्तांवर पाणीपट्टी कराची आकारणी न केल्यामुळे महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या रु.157409409/- एवढया अंदाजे महसुली उत्पन्नात घट झाली असुन महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

19. आर्थिक वर्ष 2014-15 मध्ये एकुण महसुली जमा रु. 21719.96 लाख पैकी रु. 11616.49 लाख इतकी रक्कम कर्मचा-यांच्या वेतन भत्ते, निवृत्तीवेतन व कुटूंब निवृत्ती वेतन व इतर प्रशासकीय खर्च करण्यात आली आहे. एकुण महसुली जमेच्या 53.48% इतकी रक्कम अस्थापनेवर खर्ची पडली आहे.

20. पुढील विविरण पत्र लेखा परिक्षण अहवालासोबत जोडण्यात आलेली नाहीत.

| अ.क्र. | विवरण पत्र क्र. | तपशिल |
|---|---|---|
| 1 | विवरण पत्र क्र.5(अ) | थकीत कर्ज व आगाऊ रक्कमा दर्शविणारे विवरणपत्र |
| 2 | विवरणपत्र क्र. 5 ( ब ) | शिल्लक आगाऊ रक्कम दर्शविणारे विवरणपत्र |
| 3 | विवरण पत्र क्र. 6 (अ) | प्रलंबित अग्रिम रक्कमा दर्शविणारे विवरणपत्र |
| 4 | विवरण पत्र क्र. 6 (ब) | प्रलंबित अनामत (ठेव) रक्कमा दर्शविणारे विवरणपत्र |
| 5 | विवरण पत्र क्र. 7 | कार्यादेश दिलेल्या परंतु अपूर्ण असलेल्या कामांची यादी |
| 6 | विवरण पत्र क्र. 8 ( अ ) | महानगरपालिकेने गुंतवणूक केलेल्या रकमांचे विवरणपत्र |
| 7 | विवरण पत्र क्र. 8 ( ब ) | महानगरपालिकेने गुंतवणूक केलेल्या रकमांचे विवरणपत्र |

त्याअभावी विषंयाकीत बाबीबाबत लेखापरीक्षणास अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

## *2 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका लेखा विभागाकडील लेख्यामधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 9**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***महापालिकेकडे विविध विभागाकडून जमा होणारा निधी महापालिकेने सर्वसाधारण निधीमध्ये न ठेवता कर्ज निवारण निधी करीता इंडीयन बँकेमध्ये उघडण्यांत आलेल्या एस्क्रो खात्यामध्ये दैनंदीन जमा केला जात आहेत.***

भिवंडी निजामपूर महानगरपालिका क्षेत्रातील लेखा विभागाकडील अभिलेख्यांची तपासणी केले असता तपासणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.45 दि.16/07/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारच्या रोख नोंदवहया ठेवल्या नसुन पुर्ण जमा खर्च संगणकावर नोंदविण्यात आलेला आहे. तसेच याबाबत कोणताही स्थायी अभिलेख प्रमाणित करुन लेखा विभागाकडून ठेवण्यांत येत नाही.

2. महापालिकेकडे विविध विभागाकडून जमा होणारा निधी महापालिकेने सर्वसाधारण निधीमध्ये न ठेवता कर्ज निवारण निधी करीता इंडीयन बँकेमध्ये उघडण्यांत आलेल्या एस्क्रो खात्यामध्ये दैनंदीन जमा केला जात आहेत.

3. दैनंदीन जमा रक्कम सर्वसाधारण खात्यामध्ये न ठेवता एस्क्रो खात्यामध्ये जमा करण्याबाबत विभागाने कोणताही ठराव उपलब्ध् केला नाही. तसेच अशा प्रकारच्या कार्यवाहीसाठी स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली नाही.

4. वित्तीय वर्ष 201-15 मध्ये एकूण रु. 43,04,74,503/- इतकी रक्कम जमा झाली असुन सदर रक्कम एस्क्रो खात्यामध्ये जमा करण्यांत आली असुन महापालिकेच्या दैनंदीन खर्च तसेच कंत्राटदाराची प्रदाने सदर रकमेमधुन भागविण्यांत आली आहेत.

5. महापालिकेने वित्तीय वर्ष 2009-2010 मध्ये एमएमआरडी प्राधिकरणाकडून कर्ज घेण्यात आले

होते. सदर कर्जाची परतफेड करण्यासाठी तसेच व्याज प्रदान करण्यासाठी एस्क्रो खाते उघडण्यात आले होते. तेव्हापासून उपरोक्त् कार्यवाही महापालिकेकडून करण्यात येत आहे.

6. महापालिकेकडून जमा होणा-या रकमा ठेवण्यासाठी बँकाकडून स्पर्धात्म्क स्तरावर स्वारस्यपत्रे अधिक व्याजदर देणा-या बँकेमध्ये खाते उघडून उक्त् रक्क्म जमा करणे अनिवार्य असताना वरील प्रमाणे एस्क्रो खात्यामध्ये रकमा जमा करण्यांत आल्या आहेत.

7. वरील प्रमाणे कार्यवाही केल्याने तसेच एस्क्रो खात्यामधील जमा झालेल्या एकूण रु.43,04,74,503/- इतक्या रकमेवर किमान 6 टक्के दराने महापालिकेचे वार्षिक रु.2,58,28,470/- इतक्या रकमेचे कायम नुकसान झाले आहे.

8. वित्तिय वर्ष 2009-2010 पासुन महापालिकेचे प्रतिवर्षी वरीलप्रमाणे कायम आर्थिक नुकसान होत असुन याबाबत महापालिकेच्या लेखा विभागाकडून लेखापरिक्षणाच्या दिनांकापर्यंत कोणतीही तातडीची उपाय योजना करण्यांत आलेली नाही.

9. महापालिकेचे व्याजाचे नुकसान झाल्याने सदर निधी विकासकामाकडे वळविता आला नाही.

DATVRKM8002 (Ref No : 17, Hmm No : 45)

## *3 सन 2014-2015 मधील ठेवी व गुंतवणुकीच्या संदर्भातील माहिती विवरणपत्रामध्ये लेखापरिक्षणास सादर करणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :01 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***सन 2014-2015 मधील ठेवी व गुंतवणुकीच्या संदर्भातील माहिती विवरणपत्रामध्ये लेखापरिक्षणास सादर करणेबाबत विभागाला कळविणेत आले होते. तथापि गुंतवणुकीच्या संदर्भातील माहिती विवरणपत्रामध्ये सादर केलेली नाही. त्यामुळे सदर अभिलेख्याचे लेखापरिक्षण करता आलेले नाही.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,1949 मधील कलम 92 मधील तरतुदीनुसार नगरपालिका निधीत जमा असलेल्या ज्या शिल्लकी पैशाचा विनियोग या अधिनियमाच्या किंवा त्या अन्वये उभारलेल्या कोणत्याही कर्जाच्या प्रयोजनासाठी ताबडतोब किंवा लवकर करता येणे शक्य नसेल तो पैसा व्याजाने वेळोवेळी अनुसूचीत बँकेत ठेवता येईल किंवा सार्वजनिक कर्जरोख्यात गुंतवता येईल.

तसेच स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने अशा सर्व ठेवी व गुंतवणूका करील आणि आयुक्तास,तशाच मंजूरीने अशा रितीने काढून घेतलेला पैसा किंवा अशा कर्जरोख्यांची विक्री करुन आलेला पैसा पुन्हा ठेव म्हणून ठेवता येईल किंवा पुन्हा गुंतवता येईल.

सन 2014-2015 मधील ठेवी व गुंतवणुकीच्या संदर्भातील माहिती विवरणपत्रामध्ये लेखापरिक्षणास सादर करणेबाबत विभागाला कळविणेत आले होते. तथापि गुंतवणुकीच्या संदर्भातील माहिती विवरणपत्रामध्ये सादर केलेली नाही. त्यामुळे सदर अभिलेख्याचे लेखापरिक्षण करता आलेले नाही.

| महिना | मुदत ठेवीचा दिनांक | मुदतठेव पावती क्रमांक | बँकेचे नांव | ठेवीची रक्कम रु. (कोटीमध्ये) | व्याज दर % | मुदतठेव कालावधी (महिने) | मुदतीपुर्वी नंतर प्राप्त झालेली रक्कम | महिन्यातील व्याज | जादा दराने होणारी रक्कम | तफावतीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-2015 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.134 दिनांक 11/10/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे उपरोक्त आक्षेप कायम ठेवणेत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 128, Hmm No : 134)

## *4 13 वा वित्त आयोग प्रभाग समिती क्र.3 च्या कार्यक्षेत्रात वऱ्हाळादेवी माता चौक ते ताडाळी जकात नाक्यापर्यंत सध्या असलेल्या रस्त्याची सुधारणा नस्तीमधील अनियमिततांबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 13**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 13249481.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13249481.00/-

***रस्त्याच्या सुधारणा कामासाठी महासभेच्या ठरावाची प्रत उपलब्ध् करुन दिलेली नाही, त्रयस्थ् संस्था तपासणी अहवाल प्राप्त् होण्यापूर्वीच संपूर्ण रकमेचे प्रदान केले आहे, वाढीव कामासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतली नाही. कामाची मोजमाप पुस्तिका, निविदा कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध् करुन दिलेले नाहीत.***

सन 2014-15 मधील शहर अभियंता तथा सार्वजनिक बांधकाम विभाग 13 वा वित्त आयोग प्रभाग समिती क्र.3 च्या कार्यक्षेत्रात वऱ्हाळादेवी माता चौक ते ताडाळी जकात नाक्यापर्यंत सध्या असलेल्या रस्त्याची सुधारणा करणे विषयीच्या नस्ती तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबा बत अर्धसमास पत्र क्र .47 दिनांक 18/07/2018 अन्वये विचारणा करता अनुपालन प्राप्त् न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे. कामांचा तपशील खालीलप्रमाणे

ठेकेदाराचे नांव : यु.सी.सी. इन्फ्रास्ट्रक्चर लि. नवी मुंबई

प्रशासकीय मंजूरी : दि.06/08/2014 महासभा- ठराव प्रत उपलब्ध नाही

तांत्रिक मंजूरी : रु.13093310 शहर अभियंता दिनांक 11/08/2014

निविदा : 21/10/2014 पहिली फेरनिविदा सूचना क्र.58/2014-15 दि.21/10/2014

जाहिरात : दै.नवभारत दि.22/10/2014, दै.लोकसत्ता दि.22/10/2014

निविदा स्विकृती : दि.05/11/2014

कार्यादेश : क्र.बांधकाम/3160/2015, दिनांक 02/01/2015 रुपये 11778741

कामाची मुदत : दि.02/01/2015 पासून 1 वर्षापर्यंत, काम पूर्णत्वाचा दि : दाखला उपलब्ध नाही.

मोजमाप पुस्तिका :नस्तीत नमूद केल्यानुसार क्र.220 पृष्ठा क्र.90(मोजमाप पुस्तिका नाही)

प्रत्यक्ष खर्च तपशील : प्रथम व अंतिम धावते देयक (प्रमाणक क्र. व दि. नाही)

रुपये 13249481/- (वजाती सुरक्षा अनामत रु .264989/-, आयकर रुपये 264989/-, व्हॅट रु.529979/-, कार्यकंत्राट कर रुपये 132494/-, विमा रुपये 132494/-) निव्वळ प्रदान रुपये 11924536/-

सदर कामाच्या नस्तीबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. सार्वजनिक बांधकाम नियमावली व स्थायी निर्देश 37 नियम 7 नुसार काम सुरु रणेपुर्वी उपअभियंता,बांधकाम विभाग प्रभाग समिती क्र .3 यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून रक्कम रुपये 13878910/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक आयुक्तांना सादर केले ले आहे. त्यानुसार सदर कामास दि.06/08/2014 रोजीच्या महासभेत प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिल्याचे नमूद केलेले आहे . तथापि महासभेच्या ठरावाची प्रत आढळून आलेली नाही . सदर कामास शहर अभियंता , यांनी रक्कम रुपये 13093310/- ला दि.11/08/2014 रोजी तांत्रिक मान्यता दिले ली आहे. तथापि सदर काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित ठेकेदार मे.यु.सी.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना रक्कम रुपये 13249481/- इतके प्रदान करण्यात आलेले आहे.

2. सदर कामाच्या रकमेचे प्रदान करण्यापूर्वी त्रयस्थ संस्था तपासणी अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच संपूर्ण रकमेचे प्रदान करण्यात आलेले आहे . तसेच सदर काम पूर्णत्वाचा दाखला आढळून आलेला नाही.

3. कामाच्या वाढीव खर्च रु . 156171/- रकमेची प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता आढळून आल्या नाहीत.

4. सार्वजनिक बांधकाम नियमावली प्रकरण 2 सर्वसाधारण नियम 10 नुसार अभिलेख्यामध्ये उपरीलेखन व खाडाखोड निषिध्द असून, सदर नस्तीमध्ये खाडाखोड दिसून आली आहे.

5. कंत्राटदाराबरोबर करारनामा नोंदणीकृत केलेला नाही . तसेच करारनाम्यावर स्वाक्षरीखाली कंपनीचा शिक्का नाही.

6. मालमत्ता रजिस्टर (History Sheet) उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

7. सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम 176 नुसार अंदाजपत्रकीय परिमाण व प्रत्यक्ष केलेल्या कामाचे परिमाणाचे नमुना नंबर 132 मध्ये अहवाल सदर करणे बंधन कारक असतांना देखील सदर अहवाल सादर केल्याचे दिसून आले नाही.

8. सदर कामाची मोजमाप पुस्तिका डीएसआर , निविदा उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

9. सदर कामात डांबर साहित्य साईटवर आणल्याबाबतची रिफायनरी कडील चलने तसेच कामावर आणलेल्या साहित्याची चलने, वाहतुकीची चलने आढळून आली नाहीत.

10. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा ,1952 मधील तरतूदीनुसार ठेकेदाराने कामावरील कर्मचाऱ्यांची नोंदणी करुन त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यांवर वर्गणी जमा करुन , त्याची यादी/तपशील देयकासोबत जोडलेला नाही.

11. ठेकेदाराचे स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्र नाही.

12. अनुसूची ब जोडलेली नाही.

13. ठेकेदाराने वापर केलेल्या साहित्याची यादी नाही तसेच सदर साहित्य तपासणीचा अहवाल जोडलेला नाही.सदर रक्कम रुपये 13249481/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 23, Hmm No : 47)

## *5 वॉर्ड क्र.54 गैबीनगर येथील औलिया मस्जिदलगत आर.सी.सी.गटार व मस्जिद समोर लायक्राफिनिश पेवर ब्लॉक बसविणे कामातील त्रुटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 13**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 305545.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 305545.00/-

***मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन दिले नाही. कामगारांचा शासकीय विमा निधीकडे विमा काढला नाही. वाढीव कामासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेतली नाही. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल, कामावरील साहित्याची चलने आढळून आली नाही. ठेकेदार संस्था नोंदणी प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रे आढळून आली नाहीत.***

सन 2014-15 मधील शहर अभियंता तथा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या खालील कामांच्या देयके व नस्ती तपासल्या असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या असून , अर्धसमास पत्र क्र. 48 दिनांक 25/07/2018 अन्वये विचारणा करुन देखील अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे. कामाचा तपशील खालीलप्रमाणे

अंदाजपत्रकीय रक्कम : रुपये 298525

काम वाटप समिती : जिल्हा उपनिबंधक, ठाणे

ठेकेदार : ओमकार मजुर कामगार सेवा संस्था

कामाची मुदत : कार्यादेशापासून 90 दिवस (दि.13/03/2012 ते दि.12/06/2012)

करारनामा : क्र 705 दिनांक 13/03/2012

कार्यादेश : क्र.प्र.स.क्र.4/टे.क्र.5/4453, दिनांक 13/03/2012

काम पूर्णत्वाचा दिनांक :20/04/2012

रक्कम प्रदान : प्रथम व अंतिम धावते देयक प्रमाणक क्र.3325, दि.12/03/2015

रुपये 305545 (वजाती सुरक्षा अनामत रु. 12222, व्हॅट रु. 12222, आयकर रु. 6294, विमा रु. 3055, कामगार कल्याण उपकर रु. 3055 = निव्वळ प्रदान रु. 268697)

1. नगर विकास विभाग परिपत्रक क्र .जीईन 1009/1357/प्र.क्र.166 दिनांक 03/11/2003 कामाचा व कामावरील कामगारांचा विमा अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% इतकी रक्कम शासकीय विमा निधी कडे जमा करणे आवश्यक असतांना, सदर रक्कम जमा करण्यात आलेली नाही.

2. मालमत्ता रजिस्टर व दरसूची उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

3. नगर परिषद लेखासंहिता 1971 नियम 176 नुसार अंदाजपत्रकीय परिमाण व प्रत्यक्ष केलेल्या कामाचे परिमाणाचे नमुना नंबर 132 मध्ये अहवाल सादर करणे बंधनकारक असतांना देखील सदर अहवाल सादर केल्याचे दिसून आले नाही.

4. सदर कामाची मोजमाप पुस्तिका, डीएसआर उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. तसेच सदर काम सन 2011-12 मध्ये करत असतांना, मात्र अंदाजपत्रक जिल्हा दरसूची सन 2010-11 नुसार दर विचारात घेऊन कामाचे अंदाजपत्रक तयार केल्याचे दिसून येत आहे.

5. सदरच्या कामासाठी रुपये 298585 इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे. तथापि सदर कामाचे प्रदान प्रत्यक्षात रक्कम रुपये 305545 इतक्या रकमेचे करण्यात आलेले आहे. तथापि वाढीव कामासाठी कोणतीही प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता घेण्यात आली नसल्याचे दिसून येत आहे.

6. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र .2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये, कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे . तथापि असा अहवाल आढळून आला नाही.

7. सदर कामाच्या करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार महानगरपालिकेच्या अभियंता यांनी ठेकेदार

संस्थेचे साहित्य तपासलेबाबतची कागदपत्रे आढळून आली नाहीत सदर साहित्य कामावर आणल्या पुष्टयर्थ अधिकृत विक्रेत्याकडील देयके, ठेकेदाराने महानगरपालिकेस सादर केलेली नाहीत.

8. सार्वजनिक बांधकाम नियमावलीमधील परिशिष्ठ 24 नियम क्र.11 नुसार कामाची मोजमापे उप अभियंता यांनी 100% वा कार्यकारी अभियंता यांनी 5% प्रत्यक्ष बाब निहाय तारखेसह तपासणी केल्याचे आढळून आले नाही.

9. कामावर आणलेल्या साहित्याची चलने, प्रयोगशाळा तपासणी अहवाल, आढळून आले नाहीत.

10. निविदा कागदपत्रातील प्रकरण सात मधील अट क्र . अ नुसार निविदा रकमेच्या 5 टक्के सुरक्षा अनामत रक्कम ठेकेदाराने जमा करावयाची आहे . त्यामध्ये करारनामा करतांना सुरुवातीस निविदा रकमेच्या 2 टक्के व त्यानंतर कामाचा दोष दायित्व कालावधी संपल्यानंतर निविदा रकमेच्या 3 टक्के प्रमाणे रक्कम कपात करावयाची आहे . सदरच्या कामासाठी 3 देयकांव्दारे रक्कम रुपये 305545 इतकी रक्कम प्रदान करण्यात आलेली असून, त्यानुसार एकूण रक्कम रुपये 15277 इतकी सुरक्षा अनामत रक्कम वसूल करणे आवश्यक असतांना केवळ रक्कम रुपये 12222 वसल करण्यात आलेली असून, ठेकेदार संस्थेकडून अतिरिक्त रक्कम रुपये 3055 वसूल करण्यात आलेले नाहीत.

11. सदर कामासाठी मे.ओमकार मजूर कामगार सहकारी संस्था, भिवंडी यांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तथापि सदर नस्तीमध्ये संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रे आढळून आलेली नाहीत.

12. सदर कामासाठी जिल्हा उपनिबंधक , ठाणे यांना पत्रव्यवहार करुन , त्यांच्या अधिपत्याखालील मजूर सहकारी संस्थेस काम वाटप करावे अशी विनंती केलेली आहे व त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांच्याकडील पत्र क्र . 6889, दिनांक 09/03/2012 अन्वये सदर कामाचे वाटप मे. ओमकार मजूर कामगार सहकारी संस्था, भिवंडी यांना दिल्याचे दिसून येते. तथापि उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे जिल्हा उपनिबंधक, ठाणे यांचेकडील दि.09/03/2012 चे पत्र आढळून आले नाही.

13. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम क्र .19 नुसार प्रमाणकाव्दारे प्रदान करावयाच्या रकमांमधून केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे आयकर /विमा/कामगार कल्याण उपकर/व्हॅट इ. रकमा कपात करण्यात आलेल्या असून , त्या प्रत्यक्षात शासनाच्या खाती जमा केल्याबाबतची पूरक कागदपत्रे/पोच/चलनाच्या प्रती अभिलेख नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत . त्यामुळे सदर रकमा प्रत्यक्षात शासनास जमा झाल्याची खात्री होऊ शकली नाही. सदर रक्कम रुपये 305545 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 24, Hmm No : 48)

***6 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सर्वसाधारण व कार्यात्मक अनुदानातून प्रभाग समिती क्र. 3 च्या कार्यक्षेत्रात***

## *अंजूरफाटा येथे हरिधरा शॉपिंग सेंटर ते राजीव गांधीनगर पर्यंत सध्या असलेल्या रस्त्याची सुधारणा करणेबाबतच्या नस्तीमधील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 9554602.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9554602.00/-

***कामासाठी निविदा मागविण्यात आल्या परंतू निविदेस पुरेसा अवधी न दिल्यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा होऊ शकला नाही. महासभेच्या ठरावाची प्रत आढळून आली नाही. कामाचे मालमत्ता नोंदवही, मोजमाप पुस्तिका, निविदा कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाही. ठेकेदाराचे स्थानिक संस्था कर प्रमाणपत्र नाही.***

2014-15 मधील शहर अभियंता तथा सार्वजनिक बांधकाम विभाग 13 वा वित्त आयोग प्रभाग समिती क्र. 3 च्या कार्यक्षेत्रात अंजूरफाटा येथे हरिधरा शॉपिंग सेंटर ते राजीव गांधीनगर पर्यंत सध्या असलेल्या रस्त्याची सुधारणा करणेबाबतच्या कामाचे देयक व नस्ती तपासली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत याबाबत अर्धसमास पत्र क्र.49 दिनांक 25/07/2018 अन्वये खुलासा मागवून देखील अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम : रुपये 10591862

प्रशासकीय मान्यता : महासभा ठराव दिनांक 06/08/2014

तांत्रिक मान्यता : शहर अभियंता दिनांक 11/08/2014

निविदा : पहिली निविदा दि.10/09/2014, दूसरी निविदा क्र.58/2014-15

निविदा कालावधी : दि.22/10/2014 ते दि.05/11/2014

जाहिरात : दै.सकाळ दि.23/08/2014,दै.नवभारत दै.सकाळ दि.22/10/2014

निविदा स्विकृती : दि.22/10/2014

करारनामा : दि.02/01/2015

कार्यादेश : क्र.3160/2015, दि.02/01/2015 रुपये 9575043

मुदत : दि.02/01/2015 पासून 1 वर्ष

काम पूर्णत्वाचा दिनांक :उपलब्ध नाही

मोजमाप पुस्तिका : नस्तीत नमुद केल्याप्रमाणे क्र.03 पृष्ठ क्र.45

प्रदानाचा तपशील : पहिले व अंतिम धावते देयक रु.9554602

देयकातील वजाती : आयकर रु.191092, व्हॅट रु.382184, सुरक्षा अनामत रु.191092, विमा रु.95546, कार्य कंत्राट कर रु.95546 निव्वळ प्रदान रक्कम रु.8599142

1. नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम 165 व स्थायी निर्देश 37 नियम 7 नुसार काम सुरु करणेपुर्वी उपअभियंता,बांधकाम विभाग प्रभाग समिती क्र.3 यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून रक्कम रुपये 11227375 इतक्या रकमेचे अंदाजपत्रक आयुक्तांना सादर केलेले आहे. त्यानुसार सदर कामास दि.06/08/2014 रोजीच्या महासभेत प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिल्याचे नमूद केलेले आहे. तथापि महासभेच्या ठरावाची प्रत आढळून आलेली नाही. सदर कामास शहर अभियंता, यांनी रक्कम रुपये 10591862 ला दि.11/08/2014 रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

2. मालमत्ता रजिस्टर (History Sheet) उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

3. सदर कामाची मोजमाप पुस्तिका डीएसआर , निविदा कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

4. ठेकेदाराचे स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्र नाही.

5. शासन निर्णय, सीएसटी/10/2006/प्र.क्र.133/इमारती-2 दिनांक 02/11/2006 नुसार रुपये 50 लाखापेक्षा जास्त किंमतीच्या निविदांच्या प्रथम प्रसिध्दीस 25 दिवसांची मुदत देणे आवश्यक असून व्दितीय सूचनेसाठी 15 दिवसांचा अवधी देणे आवश्यक असतांना देखील प्रथम सूचनेसाठी 21 दिवसांची मूदत देण्यात आलेली आहे. व व्दितीय सूचना न देता. केवळ मे. यु. सी. सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. नवी मुंबई यांची एकमेव निविदा प्राप्त झाली असल्याने, त्यांची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. पर्यायाने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दर प्राप्त होऊ शकले नाहीत.

सदर रक्कम रुपये 9554602 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 25, Hmm No : 49)

## *7 प्रभाग निधी अंतर्गत प्रभाग क्र.16 मधील रियाज टेलर ते अशरफिया मदरसा मागील गल्ली व घर नं.1718,1114 पर्यंत सी.सी.गटार व पायवाट तयार करणेबाबतच्या नस्तीमधील अनियमिततांबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 494543.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 494543.00/-

***निविदा मागवितांना पुरेसा कालावधी दिला गेला नाही पर्यायाने महापालिकेस स्पर्धात्मक दर प्राप्त झाले नाही. कामाची मोजमाप पुस्तिका , मालमत्ता नोदंवही उपलब्ध् करुन दिली नाही. निविदा कागदपत्रावर शहर अभियंता यांची स्वाक्षरी नाही, करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या नाहीत. कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल आढळून आला नाही.***

प्रभाग निधी अंतर्गत प्रभाग क्र.16 मधील रियाज टेलर ते अशरफिया मदरसा मागील गल्ली व घर नं.1718,1114 पर्यंत सी.सी.गटार व पायवाट तयार करणेबाबतच्या कामाची देयके व नस्ती तपासता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत याबाबत अर्धसमास पत्र क्र.50 दिनांक 25/07/2018 अन्वये विचारणा करुन अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे. अंदाजपत्रकीय रक्कम : रुपये 496946

प्रशासकीय मंजूरी : प्रभाग समिती ठराव दि.12/02/2014(प्रत उपलब्ध नाही)

तांत्रिक मान्यता : शहर अभियंता दि.15/02/2014

निविदा : सूचना क्र. 42/2013-14

निविदा कालावधी : दि.28/02/2014 ते दि.06/03/2014

जाहिरात : दै.सकाळ दि.01/03/2014

निविदा स्विकृती : 06/03/2014

कार्यादेश : जा.क्र. 1240/2014, दि. 04/08/2014 रु.496946

कामाची मुदत : दि.04/08/2014 ते दि.05/11/2014

काम पूर्णत्वाचा दिनांक : आढळून आला नाही

प्रदानाचा तपशील : पहिले व अंतिम धावते देयक रुपये 492140

1. सार्वजनिक बांधकाम नियमावली व स्थायी निर्देश 37 नियम 7 नुसार काम सुरु करणेपुर्वी उपअभियंता,बांधकाम विभाग प्रभाग समिती क्र.5 यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून रक्कम रुपये 496940 इतक्या रकमेचे अंदाजपत्रक केलेले आहे. त्यानुसार सदर कामास दि.12/02/2014 रोजीच्या प्रभाग समिती सभेमध्ये प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिल्याचे नमूद केलेले आहे. तथापि प्रभाग समिती सभेच्या ठरावाची प्रत आढळून आलेली नाही. सदर कामास शहर अभियंता, यांनी रक्कम रुपये 496946 ला दि.15/02/2014 रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

2. मालमत्ता रजिस्टर उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

3. सदर कामाची मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन दिली नाही.

4. शासन निर्णय, सीएसटी/10/2006/प्र.क्र.133/इमारती-2 दिनांक 02/11/2006 नुसार रुपये 5 लाखापेक्षा कमी किंमतीच्या निविदांच्या प्रथम प्रसिध्दीस 8 दिवसांची मुदत देणे आवश्यक असून व्दितीय सूचनेसाठी 5 दिवसांचा अवधी देणे आवश्यक असतांना देखील प्रथम सूचनेसाठी 6 दिवसांची मूदत देण्यात आलेली आहे. व व्दितीय सूचना न देता. केवळ मे. बुबेरे ॲण्ड असोसिएटस, भिवंडी यांची निविदा सर्वात कमी दराची प्राप्त झाली असल्याने, त्यांची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे. पर्यायाने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दर प्राप्त होऊ शकले नाहीत.निविदा कागदपत्रांवर( बी-1 ) ठेकेदाराची स्वाक्षरी आहे. तथापि शहर अभियंता यांची स्वाक्षरी नाही.

5. करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेतलेल्या नाहीत.

6. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये , कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही.

7. ठेकेदाराने कामावर आणलेल्या साहित्याची तपासणी महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता यांनी केल्याचा तपासणी अहवाल उपलब्ध नाही. तसेच कामावर साहित्य आणलेबाबतची चलने, वाहतुकीची चलने नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.

सदर रक्कम रुपये 492140 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 26, Hmm No : 50)

## *8 जुना आग्रा रोड येथे देवजीनगर ते अंजूर फाटा रस्त्यावरील खडडे, मंजूर वार्षिक निविदा सन 2013-14 मार्फत दुरुस्त करणे या कामातील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2203345.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2203345.00/-

***सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये, कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. परंतु तपासणी अहवाल नस्तीत जोडलेला नाही. अंदाजपत्रकात Bulk Bitumen, Bituminous Macadum, व Bituminous Carpet अशा तीन बाबींचे Rate Analysis उपलब्ध करून देण्यात आले नाही. कामाची तपासणी/ रेकॉर्डींग दिनांकासहीत केलेली नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. Bulk Bitumen - 01 Metric Ton वापराच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नाहीत. Bulk Bitumen - 01 Metric Ton कामामध्ये वापर झाला नसताना गोषवाऱ्यामध्ये दाखवून प्रती मे. टन रक्कम रु.47223/- प्रमाणे 472223/- चे अतिप्रदान केले आहे. सदरील रक्कम वसूल करून मनपा निधीत जमा करण्यात यावी.***

जुना आग्रा रोड येथे देवजीनगर ते अंजूर फाटा रस्त्यावरील खडडे, मंजूर वार्षिक निविदा सन 2013-14 मार्फत दुरुस्त करणे या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 24990815/- |
| 2. | ठेकेदाराचे नांव | M/s Budhrani Builders Pvt.Ltd.Thane |

| | | |
|---|---|---|
| 3. | प्रशासकीय मंजूरी | वार्षिक निविदा महासभा ठराव क्र.32<br>दि.04/09/2013 रु.24990815/- |
| 4. | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.05/10/2013 |
| 5. | कार्यादेश | क्र.बांध/1765/2013, दि.20/11/2013 |
| 6. | कामाची मुदत | कार्यादेश दिनांकापासून 31/03/2014 पर्यंत |
| 7. | करारनामा | क्र.102 / 2013-14 |
| 8. | काम पूर्णत्वाचा दिनांक | प्रत आढळून आली नाही |
| 9. | प्रत्यक्ष खर्च तपशील | पहिले व अंतिम धावते देयक रु.2203345/- |

जुना आग्रा रोड येथे देवजीनगर ते अंजूर फाटा रस्त्यावरील खडडे, मंजूर वार्षिक निविदा सन 2013-14 मार्फत दुरुस्त करणे या कामाची उपलब्ध करुन दिलेली नस्ती व मोजमाप पुस्तीका यांचे लेखापरीक्षणा दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.108 दि. 05/10/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये , कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. थर्ड पार्टी तपासणी अहवाल दिनांक 11/06/2014 नस्तीबध्द् केलेला असून यामध्ये 1 ते 16 बाबींचा समावेश आहे. परंतु उपरोक्त् कामामध्ये 3 बाबींचा समावेश असून त्याबाबतचा तपासणी अहवाल नस्तीत जोडलेला नाही.

2. वास्तविक अंदाजपत्रक हे संबंधित जिल्हा दरसूची मधील दर विचारात घेवून तयार करणे आवश्यक आहे. जर दरसूचीत दर उपलब्ध नसतीत तर सदर बाबीचे दर पृथ्थकरण करणे आवश्यक आहे. प्रस्तुत ठिकाणी दर पृथ:करण तयार करताना ठेकेदाराने नमुद केलेले दर विचारात घेण्यात आले आहेत व त्यास शहर अभियंता यांनी मंजूरी दिली आहे. वास्तविक बाजारभावाप्रमाणे प्रचलित दर काय होते याबाबतची जाहीर निविदा करून दर मागविणे आवश्यक होते व त्यामधील सर्वात कमी दर विचारात घेवून दर पृथ:करण तयार करणे अभिप्रेत होते. अशी कार्यवाही न करता ठेकेदाराने पुरविलेले दर विचारात घेवून ठेकेदाराचे हित साधणे ही बाब अत्यंत गभीर असून नियमबाहय आहे. अंदाजपत्रकात Bulk Bitumen, Bituminous Macadum, व Bituminous Carpet अशा तीन बाबींचे Rate Analysis आढळून आले नाही. तसेच सदर बाबींचे दर, जिल्हा दरसूचीत उपलब्ध असतांनाही Rate Analysis का केले याची साधार स्पष्टता झाली नाही.

3. मोजमाप पुस्तिकेचे अवलोकन केले असता मोजमाप पुस्तिकेमध्ये संपुर्ण कामाचा कालावधीमध्ये मोजमा पुस्तिकेत कुठेही दिनांकाचा उल्लेख नाही. कामाची तपासणी / रेकॉर्डींग दिनांकासहीत केलेली नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे कामाची प्रगती अथवा कामपूर्ण कधी झाले याबाबत काहीही बोध होत नाही. याचा अर्थ असा होतो की विभागाकडून कामाची गुणवत्तापुर्ण तपासणी झालेली नाही.

4. Bulk Bitumen - 01 Metric Ton वापराच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नाहीत. Bulk Bitumen - 01 Metric Ton कामामध्ये वापर झाला नसताना गोषवाऱ्यामध्ये दाखवून प्रती मे. टन रक्कम रु.47223/- प्रमाणे 472223/-चे अतिप्रदान केले आहे. सदरील रक्कम वसूल करून मनपा निधीत जमा करण्यात यावी.

5. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता (NMAM) नियम क्र.12.82 (डी) खरेदीची बिले उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. Bulk Bitumen - 01 Metric Ton खरेदी केल्याची चलन लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाहीत.

6. राष्ट्रीय लेखा संहितेत निर्देशित केल्यानुसार, प्रमाणकाव्दारे प्रदान करावयाच्या रकमांमधून केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे आयकर/विमा/कामगार कल्याण उपकर/व्हॅट इ. रकमा कपात करुन, त्या प्रत्यक्षात शासनाच्या खाती जमा केल्याबाबतची पूरक कागदपत्रे/पोच/चलनाच्या प्रती अभिलेख नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत. त्यामुळे सदर रकमा प्रत्यक्षात शासनास जमा झाल्याची खात्री होऊ शकली नाही. उपरोक्त् बाबींचा संयुक्तिक खुलासा होईपर्यंत कामावर खर्च झालेली रक्कम रुपये 2203340/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

7. नगरपालीका लेखासंहीता 1971 चे नियम 182 नुसार बांधकाम विभागाने न.नं.139 मध्ये नोंदवही ठेऊन पूर्ण् झालेल्या कामाच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापी विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही त्यामुळे सदर कामाची नोंद न.न.139 मध्ये करण्यात आली नाही.

8. यापुर्वी या रस्ताचे डांबरीकरणाचे काम कधी केले होते, त्याचा दायित्व कालावधी संपला होता काय, याची खात्री विभागाने केल्याचे दिसून आले नाही. रस्ता खडीकरण व डांबरीकरण केले ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे, किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 209 नुसार सार्वजनिक रस्ते सुधारण्यासाठी जागा संपादन केली आहे, किंवा कलम 224 नुसार खाजगी रस्ता चांगला करण्यासाठी महानगरपालिकेने खर्च करुन तो रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून जाहीर केल्याचे अभीलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

DATVRKM8002 (Ref No : 65, Hmm No : 108)

## *9 सन 2014-2015 या वर्षाकरिता प्रभाग समिती क्र.4 अंतर्गत बोअरवेल निगा व दूरुस्तीकामी सेवा पुरविणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 09**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 2060077.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2060077.00/-

***वाहतूक खर्चासाठीचे दर पृथ:करण नस्तीत आढळून आले नसल्याने दर वाजवी असल्याची खात्री करता आली नाही. कामाचे अंदाजपत्रक बनविण्यापूर्वी कामाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेले साहित्य जर सुस्थितीत अथवा वॉरंटी कालावधीतील असल्यास ते पुनश्चः न बदलता काम पूर्ण करता येऊ शकेल काय याचा स्थळ पाहणी अहवाल विभागाने केल्याचे दिसून आले नाही. ठेकेदाराने सदर कामासाठी वापरलेल्या साहित्याची अधिकृत विक्रेत्याकडील खरेदीची बिले, पुरवठा चलने आढळून आली नाहीत.***

सन 2014-2015 या वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.4 अंतर्गत बोअरवेल निगा व दूरुस्तीकामी सेवा पुरविणे कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 2453413/-

शहर अभियंता तांत्रिक मान्यता दि.03/02/14

निविदा रक्कम रु. 2428879/- (1% कमी दराने)

ठेकेदाराचे नाव- मे.बुबेरे ॲण्ड असोसिएटस, भिवंडी

कामावर झालेला खर्च रु. 2060077/-

सन 2014-2015 या वर्षाकरिता प्रभाग समिती क्र.4 अंतर्गत बोअरवेल निगा व दूरुस्तीकामी सेवा पुरविणे सदर कामाची निविदा लेखापरीक्षणा दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 165 दि. 17/11/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1.बोअरवेल निगा व दुरुस्तीचे काम असून या कामासाठी जे साहित्य वापरले आहे ते कोणकोणत्या ठिकाणी वापरले हे नस्तीमध्ये आढळून आले नाही. मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन दिलेली नसल्याने कोणत्या कालावधीत कोणते काम करण्यात आले तसेच त्यासाठी किती परिमाण वापरण्यात आले याबाबत खातरजमा करता आली नाही.

2.बोअरवेल निगा व दुरुस्तीचे काम असून अंदाजपत्रक तयार करतांना कामात मजूर- 06 दर रु. 315/-(प्रति दिवस), फिटर(1st Class) 01- दर रु.399/- (प्रति दिवस) असे कामगार वापरले आहेत. परंतु त्यांचे हजेरीपट तपासणीसाठी उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे सदरचा खर्च तपासणी करता आली नाही.

3.अंदाजपत्रकात कामगार वाहतूक, पाईप टुल्स, इत्यादींची वाहतुकीसाठी रु.262719/- दर्शविले आहे. परंतू प्रत्यक्षात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन 2012-13 दरसूचीतील जनरल नोटस नुसार , दरसूचीत दर्शविलेले दर हे प्रति कामगार दरासहीत असून, त्यासाठी मात्र अंदाजपत्रकात कामगार व फिटर साठी वेगळी बाब दर्शवून स्वतंत्र खर्चाचा अंदाज केला आहे. तसेच सदर वाहतूक खर्चासाठीचे दर पृथ:करण नस्तीत आढळून आले नसल्याने दर वाजवी असल्याची खात्री करता आली नाही.

4.देखभाल दुरुस्तीच्या साहित्याची नोंदवही ठेवली नाही तसेच कामात निघालेले जुने साहित्य भांडार विभागात जमा केलेले नाही. त्यामुळे सदर काम केल्याची खात्री करता आली नाही.

5.ठेकेदाराने नस्तीत नमूद केल्याप्रमाणे अनुक्रमे दि.04/06/14, 05/07/14, 10/07/14, व 19/07/14 रोजी कनिष्ठ अभियंता यांच्या मौखिक आदेशानुसार सदर साहित्याची नोंद भांडार विभागाकडे न करताच परस्पर प्रत्यक्ष साईटवर वापरले आहे. त्यामुळे सदर साहित्य प्रत्यक्षात प्राप्त झाले असल्याबाबत खात्री करता आली नाही.

6.या कामासाठी जे साहित्य वापरले आहे ते कोणकोणत्या ठिकाणी वापरले हे नस्तीमध्ये आढळून आले नाही. मोजमाप पुस्तिकेमध्ये कामाचा दिनांक नमूद केला नसल्याने कोणत्या कालावधीत कोणते काम करण्यात आले याबाबत खातरजमा करता आली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात साहित्य वापरल्याची तपासणी करता आली नाही.

7.कामाचे अंदाजपत्रक बनविण्यापूर्वी कामाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेले साहित्य जर सुस्थितीत अथवा वॉरंटी कालावधीतील असल्यास ते पुनश्च: न बदलता काम पूर्ण करता येऊ शकेल काय याचा स्थळ पाहणी अहवाल विभागाने केल्याचे दिसून आले नाही.

8.ठेकेदाराने सदर कामासाठी वापरलेल्या साहित्याची अधिकृत विक्रेत्याकडील खरेदीची बिले, पुरवठा चलने आढळून आली नाहीत.

9.राज्य कामगार विमा अधिनियम 1948 व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम 1952 मधील तरतूदीनुसार ठेकेदाराने ESIC व EPF च्या कामगार वर्गणीची रक्कम व मालक हिस्सा रक्कम चलनाने संबंधित प्राधिकाऱ्याकडे चलनाने भरणा केल्याबाबत चलनाच्या प्रती , कामगारांची यादी नस्तीसोबत आढळून आली नाही. सदर रक्कम रुपये 2060077/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 69, Hmm No : 165)

## *10 चविंद्रा डंपिंग ग्राऊंड येथे कचरा लेव्हल करणेकामी चैनवाला बुलडोझर यंत्र भाडयाने पुरविणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष : घनकचरा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3511038.00/-

***कंत्राटदाराने दिनांक 04/04/2014 ते 26/05/2014 (53 दिवस) या कालावधीचे काम कार्यादेश नसताना केले असल्याने रु.9699X53 =514047/- इतकी रक्कम आपेक्षाधीन आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. मे. संकल्प***

***यांनी काम केल्याबाबतच्या नोंदवहया व इतर अनुषांगिक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही.***

चविंद्र डंपिंग ग्राऊंड येथे कचरा लेव्हल करणेकामी चैनवाला बुलडोझर यंत्र भाडयाने पुरविणेबाबत निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.
कामाची अंदाजित रक्कम :- रु.9699/- प्रति दिवस
खर्च मंजूरी ठराव व दिनांक :- 20/10/2014
प्रशासकीय मंजुरी दिनांक :- 09/09/2014
निविदा दिनांक :- 18/10/2014
एकूण निविदा :- 05
न्युनतम देकार रु.9699 मे. संकल्प बेरोजगार नागरी सेवा संस्था भिवंडी
कार्यादेश क्र.भिनिशमनपा/आरोग्य/200/1/14 दिनांक 27/05/2014
उपरोक्त निविदा प्रक्रिये अंतर्गत तसेच कार्यवाहीमध्ये खालीलप्रमाणे अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.14 दि14/06/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) कामाचा कालावधी निश्चित करण्यात आला नाही. तसेच अंदाजित रक्कम हि प्रति दिवसाची काढण्यात आली आहे. एकूण कामाच्या कालावधीचा खर्च काढण्यात आला नाही. त्यामुळे अर्थसंकल्पीय तरतूद दिसून येत नाही.

2) प्रस्तावित निविदेसाठी अंदाजित दरनिश्चिती करताना रु.9699/- प्रति दिवस या दराबाबत कोणतेही आधारभूत प्रमाण विचारात घेण्यात आले नाही. तसेच दरनिश्चिती करतांना कोणतेही संख्यात्मक विश्लेषण करण्यात आलेले नाही.

3) सदर निविदा मागविण्यात आल्यावर अभिलेख्यावरुन एकूण 05 निविदाकारांनी निविदा सादर केल्याचे निदर्शनास येते. उपरोक्त 05 निविदाकारांच्या निविदा लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे न्युनतम देकारांची खात्री करता आली नाही.

4) मे. संकल्प बेरोजगार नागरी सेवा संस्था भिवंडी यांनी सादर केलेला देकार रु.9699/- प्रति दिवस याची बाजारभाव अथवा अन्य कोणत्याही दरांशी तुलनात्मक पडताळणी केल्याचे आढळून आले नाही.

5) मे. संकल्प बेरोजगार नागरी सेवा संस्था भिवंडी यांना कार्यादेश दिनांक 27/05/2014 रोजी निर्गमित करण्यात आला असून संबंधित अभिलेख्याची पडताळणी करता कंत्राटदाराने सदर काम दि.04/04/2014 पासून सुरु केले आहे. त्यामुळे कंत्राटदाराने दिनांक 04/04/2014 ते 26/05/2014 (53 दिवस) या कालावधीचे काम कार्यादेश नसताना केले असल्याने रु.9699X53 =514047/- इतकी रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

6) मे. संकल्प बेरोजगार नागरी सेवा संस्था भिवंडी यांनी खालील कालावधीमध्ये काम केल्याचे दिसून येते.
1) दि.04/04/2014 ते दि.13/07/2014 (101 दिवस)

2) दि.14/07/2014 ते दि.28/01/2015 (199 दिवस)
3) दि.29/01/2015 ते दि.31/03/2015 ( 62 दिवस)
उपरोक्त कालावधीमध्ये मे. संकल्प यांनी काम केल्याबाबतच्या नोंदवहया व इतर अनुषांगिक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही. त्यामुळे एकूण 362 दिवसांसाठी सदर कामावर खर्च झालेली रु.3511038/- इतकी रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DMEMRMM6801 (Ref No : 12, Hmm No : 14)

## *11 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा गोळा करणे व त्याची वाहतुक करणे या कामासाठी विना निविदा ठेका देणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : घनकचरा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 138679032.00/-

***कचरा उचलण्यासाठी मे.भुमिका यांच्या व्यतीरीक्त अन्य मक्तेदाराच्या बाबतीत निविदा प्रकीया न राबवता मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या दराने विना निविदा कचरा उचलण्याचे काम करण्यात आले. साधारणतः 2014 पासून लेखापरीक्षण दिनांका पर्यंत 4 वर्ष होऊनही उपरोक्त विषयासंदर्भातील निविदा धारक अंतिम झालेला नाही. यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नाही. निविदा प्रकीया राबविण्यात अत्यंत विलंब झालेला दिसून येतो.***

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापना कामी मे. भुमिका ट्रान्सपोर्ट, जे.व्ही.मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु सदर ठेकेदार यांची घनकचरा व्यवस्थापनाचे काम योग्य प्रकारे व समाधान कारकरित्या होत नसल्याने मा. स्थायी समितीने ठराव क्र.11,दि.6/01/2014 अन्वये कंपनीचा ठेका रद्द केला आहे. सदर ठेकेदार यांनी दि.09/04/2014 पासून 100 टक्के शहर क्षेत्रातील कचरा गोळा करणेचे काम बंद केल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र.11 व 12 नुसार दि.06/01/2014 नुसार सदर ठेकेदार यांचा ठेका रद्द करुन कचरा गोळा करणे व त्याची वहातुक करणे करिता पर्यायी व्यवस्थेसाठी साधन सामग्री उपलब्ध होणे कामी मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार 1) मे. अप्रांजित मागासवर्गीय सुशिक्षीत बेरोजगार नागरी सेवा संस्था, भिवंडी यांना जेसीबी(कैचीवाला), डंपर जेसीबी सोबत व डंपर म्यॅनुअल 2) मे.संकल्प सुशिक्षीत बेरोजगार सेवा संस्था, भिवंडी यांना मजुर, डंपर साठी, मजुर घंटागाडी साठी व घंटागाडी (टाटा एस)

यांची न्युनतम दराची निविदा स्विकृत होवून मा.स्थायी समितीने मंजुरी दिले नुसार त्यांच्या संविदा मान्य होवून मे. अप्राजित मागासवर्गीय सुशिक्षीत बेरोजगार, भिवंडी यांना जा.क्र.भिनिशमनपा./आरोग्य/485/2014, दि.21/06/2014 व मे.संकल्प सुशिक्षीत बेरोजगार नागरी सेवा संस्था,भिवंडी जा.क्र. भिनिशमनपा./आरोग्य/486/14, दि.21/06/2014 नुसार कार्यादेश दिलेले आहेत. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत निविदा नस्ती तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.16 दि. 21/06/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1.ठेकेदारास केलेल्या कामाचे देयक अदा करणे करीता विभाग प्रमुखांच्या नावे अग्रिम रक्कम मंजुर करण्यात येवून त्यानंतर त्या व्यक्ती संस्था हयांचेकडून दररोज कामे करुन घेऊन त्यांना मंजुर केलेल्या अग्रीम रक्कमेतुन रोखीने रक्कम अदा केलेल्या संदर्भातील अग्रीम समायोजन नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात यावी.

2.कचरा उचलण्यासाठी मे.भुमिका यांच्या व्यतीरीक्त अन्य मक्तेदाराच्या बाबतीत निविदा प्रकीया न राबवता मा.स्थायी समितीने मंजुर केलेल्या दराने विना निविदा कचरा उचलण्याचे काम करण्यात आले. याबाबत खुलासा करण्यात यावा.

3.साधारणत: 2014 पासून लेखापरीक्षण दिनांका पर्यंत 4 वर्ष होऊनही उपरोक्त विषयासंदर्भातील निविदा धारक अंतिम झालेला नाही. यामुळे महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झालेला नाही. निविदा प्रकीया राबविण्यात अत्यंत विलंब झालेला दिसून येतो. या बाबत समर्पक खुलासा करण्यात यावा.

4.मे.अप्राजित मागासवर्गीय सुशिक्षीत बेरोजगार, भिवंडी व मे.संकल्प सुशिक्षीत बेरोजगार नागरी सेवा संस्था,भिवंडी यांचे जेसीबी, डंपर, मजूर इ.चे दर मंजूर करुन मा.स्थायी समितीची संविदासाठी मंजुरी दिली. तथापि संविदा कार्यवाही पुर्ण होण्या अगोदर तातडीचे कारण दाखवून विभागाने कार्यादेश निर्गमित केले. तथापि त्यांनी कार्यादेश स्वीकारुन त्यांनी करारनामा केला नाही. तसेच जेसीबी, डंपर, मजूर पुरविले नसतांना निविदा अटी शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही केली नाही. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत झालेला खर्च रककम रुपये 13,86,79,032/- उपरोक्त बाबीचा संयुक्तीक खुलासा होईपर्यंत आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 70, Hmm No : 16)

## *12 भिवंडी नि.शहर महानगरपालिका मार्केट विभागाकडील दैनिक बाजार फी व स्लॉटर हाऊस फी वसुलीच्या ठेक्यामधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : मार्केट महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 18100151.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 18100151.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 64878.00/-

***निविदा प्रक्रिया करण्यासाठी ठरविण्यात आलेली दैनिक बाजार फी अंदाजित रक्कम हि मागील वर्षाच्या ठेक्याच्या रकमेमध्ये 10 टक्के वाढ करुन ठरविण्यात आली आहे. रु.1,29,90,230/- व जनावरांची स्लॉटर फी रु.28,75,000/- अशी एकुण रु.1,50,65,230/- इतकी रक्कम कशाप्रकारे ठरविण्यात आली मागील 3 वर्षाच्या जमा रकमांचा आढावा घेवून रक्कम ठरविणे आवश्यक असताना वरीलप्रमाणे सदर रक्कम ठरविली असल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. कराराच्या अटी शर्तीनुसार कंत्राटरार सदर रकमेच्या 20 टक्के दराने दंडास पात्र ठरतो. त्यामुळे कंत्राटदाराकडून रु.30,16,700/- इतक्या रकमेच्या वार्षिक 20 टक्के दराने रु.50287/- इतकी रक्कम विलंब आकार वसुल करण्यात यावे. कंत्राटाची किंमत रु.1,81,00,151/- वर एकुण रु.17600/- इतके मुद्रांकशुल्क आकारणे होते. करीता रु.14600/- इतकी रक्कम वसुलपात्र आहे.***

भिवंडी निजामपूर महापालिका क्षेत्रामधील मार्केट विभागाकडून दैनिक बाजार फी व स्लॉटर हाऊस फी वसुलीचा वित्तिय वर्ष 2014-2015 या कालावधीत ठेका देण्यात आला होता . सदर कंत्राटासाठी मागविण्यात आलेल्या निविदांचा तपशिल खालिल प्रमाणे आहे.

| क्र. | नाव | तपशिल |
|---|---|---|
| 1. | कामाचे नाव | मार्केट विभागाकडील दैनिक बाजार फी व स्लॉटर हाऊस फी वसुलीचा ठेका |
| 2. | अंदाजित रक्कम | रु.1,50,65,230/- |
| 3. | इसारा रक्कम | रु.1,50,06,523/- |
| 4. | कामाची मुदत | 1) वर्ष |
| 5. | निविदा उघडयाचा दिनांक | दि.21/11/2014 ते दि.29/11/2014 |
| 6. | निविदा उघडण्याचा दिनांक | दि.29/11/2014 |
| 7. | एकुण निविदाकार | 04 |
| 8. | कार्यादेश | क्र.भिनिशमनपा/मार्केट/283/2014 दि.29/12/20144 |

उपरोक्त कार्यवाहीमध्ये खालिलप्रमाणे अनियमितता झाल्या आहेत . सदर निविदेअंतर्गत खालिल निविदाकारांना आपले देकार सादर केले होते.

1) मे.नवसंजीवन सामाजिक प्रतिष्ठान रु.1,70,00,786/-
2) मे.श्री. शरद रोकडे रु.1,71,00,000/-

3) मे.योगेश ठक्क्र रु.1,66,,00,000/-

4) मे.श्री बाबुभाई पटेल रु.1,81,00,151/-

उपरोक्त कंत्राटदारांपैकी मे .श्री. बाबुभाई पटेल यांनी उच्चतम देकार सादर केला असल्याने त्यांना दिनांक 29/12/2014 च्या कार्यादेशाने दि .01/01/2015 ते दि.31/12/2015 या कालावधीसाठी कंत्राट देण्यात आले. सदरील कामाची नस्ती तपासणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 46 दि.16/07/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही . त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) उपरोक्त निविदा प्रक्रिया करण्यासाठी ठरविण्यात आलेली दैनिक बाजार फी अंदाजित रक्क्म हि मागील वर्षाच्या ठेक्याच्या रकमेमध्ये 10 टक्के वाढ करुन ठरविण्यात आली आहे . रु.1,29,90,230/- व जनावरांची स्लॉटर फी रु .28,75,000/- अशी एकुण रु .1,50,65,230/- इतकी रक्क्म कशाप्रकारे ठरविण्यात आली मागील 3 वर्षाच्या जमा रकमांचा आढावा घेवून रक्क्म ठरविणे आवश्यक असताना वरीलप्रमाणे सदर रक्क्म ठरविली असल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

2) निविदाकारांचा अनुभव तसेच त्या वर्षाच्या उलाढालीची कागदपत्रे निविदा नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.

3) निविदा प्रक्रिया राबविण्यापुर्वी महापालिका परिक्षेत्रामध्ये किती हातगाडी ठेला लावून व्यवसाय करणारे व्यवसायिक कोणताही सर्वे महापालिकेकडून करण्यात आलेला नाही.

4) कंत्राटदाराबरोबर करण्यात आलेला कररनामा रु .2000/- च्या मुद्रांक शुल्कावर करण्यांत आले आहे. कंत्राटाची किंमत रु .1,81,00,151/- वर एकुण रु .17600/- इतके मुद्रांक शुल्क् आकारणे आवश्यक होते. त्यामुळे रु.14600/- इतकी रक्क्म वसुलपात्र आहे.

5) फेरीवाले तसेच फळ विक्रेते यांच्याकडून बाजार फी वसुलीबाबतच्या दरांबाबतचा ठराव स्थायी समितीने क्र.29 दिनांक 28/07/2004 रोजी केला असुन सदर ठरावाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही . सदर ठराव 10 वर्षापेक्षा जुन्या कालावधीचा असुन त्यामध्ये कोणतीही सुधारणा महापालिकेकडून करण्यांत आलेली नाही.

6) कंत्राटदार मे. बाबुभाई पटेल यांच्याबरोबर दिनांक 01/01/2015 ते दिनांक 31/12/22015 या कालावधीकरीता कंत्राट करार करण्यांत आला होता . मे.बाबुभाई पटेल यांनी ठरलेल्या करारानुसार व्दिमासिक हप्त्याची रक्क्म रु .30,16,700/- इतकी रक्क्म आगावु भरणा करणे आवश्यक होते . परंतु लेखाविभागाच्या अभिलेख्याची पडताळणी करता सदर रक्कम मार्च 2015 अखेरपर्यंत लखा विभागाकडे जमा झाली नसल्याचे आढळून आले आहे . त्यानुसार कराराच्या अटी शर्तीनुसार कंत्राटरार सदर रकमेच्या 20 टक्के दराने दंडास पात्र ठरतो. त्यामुळे कंत्राटदाराकडून रु.30,16,700/- इतक्या रकमेच्या वार्षिक 20 टक्के दराने रु.50287/- इतकी रक्क्म विलंब आकार वसुल करण्यात यावे.

7) महापालिका ठराव क्र .29 मध्ये नमुद केलेल्या दरांच्या अनुषंगाने बाजार फी व स्लॉटर फी वसुली कंत्राटदाराकडून करण्यात आलेली असुन सदर दरांनुसार वसुली झाली असल्यास उक्त दरांमध्ये कंत्राटदारास प्रदान करावयाचे रकमेचे प्रमाण ठरविण्यात आले नस ल्याने कंत्राटदार महापालिकेस कशाप्रकारे भरणा करणार हे स्प्ष्ट होत नसल्याने निविदा प्रक्रिया संशयास्पद वाटते . त्यामुळे उपरोक्त अनियमिततांबाबत योग्य खुलासा होईपर्यंत कंत्राटाची संपुर्ण रु .1,81,00,151/- इतकी रक्क्म आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

### ***13 नोंदणीधारक 2415 व्यापाऱ्यांनी सन 2014-15 मध्ये स्थानिक संस्था कर भरणा न केल्याबाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 12075000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 12075000.00/-

***एकूण सहा सर्कलमध्ये एकूण 11480 नोंदणीधारक व्यावसायिक असून, त्यापैकी 9065 नोंदणीधारक व्यावसायिकांनी अनुज्ञेय असणाऱ्या स्थानिक संस्था कराची रक्कम महानगरपालिकेस भरणा केली आहे. व सुमारे 2415 व्यापाऱ्यांनी 2014-15 मध्ये स्थानिक संस्था कराची रक्कम मनपास भरणा केलेली नाही. अशा कर भरणा न करणाऱ्या व्यापाऱ्यांवर मनपाच्या वतीने कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही. 2415 नोंदणीधारक व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कर न भरल्यामुळे, महानगरपालिकेच्या एकूण कर स्वरुपात मिळणाऱ्या रकमेचा महसूल कमी प्रमाणात जमा झालेला आहे. पर्यायाने महानगरपालिकेस सदर कर स्वरुपातुन मिळणाऱ्या महसूलातुन मनपा हददीतील विकास कामासाठी निधी पुरविता आला नाही.***

भिवंडी महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाच्या 2014-15 च्या लेखापरिक्षणात पुढील अनियमितता आढळून आल्या आहेत.

मनपा हददीत एकूण सहा सर्कलमध्ये एकूण 11480 नोंदणीधारक व्यावसायिक असून, त्यापैकी 9065 नोंदणीधारक व्यावसायिकांनी अनुज्ञेय असणाऱ्या स्थानिक संस्था कराची रक्कम महानगरपालिकेस भरणा केली आहे. व सुमारे 2415 व्यापाऱ्यांनी 2014-15 मध्ये स्थानिक संस्था कराची रक्कम मनपास भरणा केलेली नाही. अशा कर भरणा न करणाऱ्या व्यापाऱ्यांवर मनपाच्या वतीने कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

विभागाने पुरविलेल्या माहितीनुसार मनपा हददीतील सर्कलनिहाय नोंदणी केलेल्या व्यापारी व त्यातील कर भरणा केलेल्या व कर भरणा न केलेल्या व्यापाऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सर्कल क्रमांक | नोंदणीधारक व्यापारी संख्या | कर भरणा केलेल्या व्यापारी संख्या | कर भरणा न केलेल्या व्यापारी संख्या |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | झोन 1 | 1765 | 1232 | 533 |
| 2 | झोन 2 | 1919 | 1771 | 148 |
| 3 | झोन 3 | 2311 | 1789 | 522 |
| 4 | झोन 4 | 2506 | 1861 | 645 |
| 5 | झोन 5 | 2419 | 1871 | 548 |
| 6 | झोन 6 | 560 | 541 | 19 |
| | एकूण | 11480 | 9065 | 2415 |

स्थानिक संस्था कर हा महानगरपालिकेच्या प्रमुख आर्थिक स्त्रोत असून, वरील प्रमाणे 2415 नोंदणीधारक व्यापाऱ्यांनी स्थानिक संस्था कर न भरल्यामुळे, महानगरपालिकेच्या एकूण कर स्वरुपात मिळणाऱ्या रकमेचा महसूल कमी प्रमाणात जमा झालेला आहे. पर्यायाने महानगरपालिकेस सदर कर स्वरुपातुन मिळणाऱ्या महसूलातुन मनपा हददीतील विकास कामासाठी निधी पुरविता आला नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियम क्र.48(2) नुसार प्रत्येक व्यावसायिकाचे म्हणणे ऐकून घेण्याची वाजवी संधी देऊन रु.5000/- पेक्षा अधिक नाही इतक्या रकमेचा दंड आकारणी करण्याची तरतूद असून त्यानुसार कर भरणा न केलेल्या व्यापाऱ्यांकडून रुपये 5000/- प्रमाणे रुपये 12075000/- दंड वसूल न केल्याने महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.82 दि.05/09/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त झाले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 27, Hmm No : 82)

## *14 नोंदणीधारक व्यावसायिकांनी सन 2014-15 मध्ये वार्षिक विवरणपत्रे न भरल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 73940000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 73940000.00/-

***मनपा हददीतील सुमारे 7394 नोंदणीकृत व्यावसायिकांनी वार्षिक विवरणपत्रे सादर केली नाहीत अशा वार्षिक विवरणपत्रे सादर न करणाऱ्या व्यावसायिकांवर मनपाच्या वतीने कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही***

भिवंडी महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाच्या 2014-15 च्या लेखापरिक्षणात पुढील अनियमितता आढळून आल्या आहेत. मनपा हददीत एकूण सहा सर्कलमध्ये एकूण 11480 नोंदणीधारक व्यावसायिकांनी असून, मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियम क्र.29 नुसार त्यापैकी 4086 नोंदणीधारक व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कराचे वार्षिक विवरणपत्र महानगरपालिकेस सादर केले आहे. व 7394 व्यापाऱ्यांनी 2014-15 मध्ये स्थानिक संस्था कराचे वार्षिक विवरणपत्र महानगरपालिकेस सादर केले नाही. अशा वार्षिक विवरणपत्र सादर न करणाऱ्या व्यापाऱ्यांवर मनपाच्या वतीने कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच अशा प्रकारे 7394 व्यापाऱ्यांनी वार्षिक विवरणपत्रे सादर न केल्यामुळे महापालिकेस कर निर्धारण करता आले नाही.विभागाने पुरविलेल्या माहितीनुसार मनपा हददीतील सर्कलनिहाय नोंदणी केलेल्या व्यावसायिक व त्यातील कर भरणा केलेल्या व कर भरणा न केलेल्या व्यावसायिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | एकूण सर्कल क्रमांक | नोंदणीधारक व्यावसायिक संख्या | कर भरणा केलेल्या व्यावसायिक संख्या | कर भरणा न केलेल्या व्यावसायिक संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | झोन 1 ते 6 | 11480 | 4086 | 7394 |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2010 मधील नियम क्र.48(2)(ख) नुसार वार्षिक विवरणपत्रे सादर न केल्यास रुपये 10000/- इतक्या दंडाची तरतूद असून, अशा प्रकारे वार्षिक विवरणपत्रे न भरलेल्या व्यावसायिकांकडून प्रत्येकी रु.10000/- प्रमाणे रुपये 73940000/- दंड वसूल न केल्याने महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.83 दि.05/09/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त झाले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 28, Hmm No : 83)

### *15 शिक्षकेतर कर्मचारी यांना माहे फेब्रुवारी 2015 चे वेतन अदा करताना व्यवसाय कराची रक्कम कमी वसुल केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : प्राथमिक शिक्षण विभा महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 700.00/-

***महाराष्ट्र शासन राजपत्र दि. 05 मे 2006 नुसार रु. 10,000/- पेक्षा जास्त वेतन घेणा-या कर्मचा-यांच्या वेतनातून वार्षिक रु.2500/- इतकी रक्कम व्यवसाय कर म्हणून कपात करणे आवश्यक आहे. सदर कपात मासिक हफत्याने मासिक वेतनातून करावयाची आहे. मार्च ते जानेवारी महिन्याच्या वेतनातून रु.200/- व पुढील महिना माहे फेब्रुवारी महिन्याच्या वेतनातून रु.300/- या प्रमाणे संपूर्ण वर्षात रु.2500/- अशी करावयाची आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

महाराष्ट्र शासन राजपत्र दि. 05मे 2006 नुसार रु. 10,000/-पेक्षा जास्त वेतन घेणा-या कर्मचा-यांच्या वेतनातून वार्षिक रु.2500/-इतकी रक्कम व्यवसाय कर म्हणून कपात करणे आवश्यक आहे. सदर कपात मासिक हफत्याने मासिक वेतनातून करावयाची आहे. मार्च ते जानेवारी महिन्याच्या वेतनातून रु.200/- व पुढील महिना माहे फेब्रुवारी महिन्याच्या वेतनातून रु.300/- या प्रमाणे संपूर्ण वर्षात रु.2500/- अशी करावयाची आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे वेतन देयकाची लेखापरीक्षणा दरम्यान पडताळणी केली असता खालील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनातून प्रत्येकी 200/- प्रमाणे माहे फेब्रुवारी महिन्यात व्यवसाय कराची रु. 1200/- प्रमाणे कपात करण्यात आली आहे. माहे फेब्रुवारी महिन्याच्या वेतन देयकातून रु.300/- इतकी व्यवसाय कराची कपात करणे आवश्यक असताना ती रु. 200/- दराने केली असल्याने एकूण 7 कर्मचा-यांच्या वेतनातून व्यवसाय कराची एकूण 700/- इतकी कमी कपात केली आहे.

| अ.क्र. | नाव | मुळ वेतन | स्थुल वेतन | वसुल केलेले व्यवसाय कर | वसुल करावयाचा व्यवसाय कर | तफावत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सोमनाथ आर.माडेकर | 15880 | 37638 | 200 | 300 | 100 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| 2 | विठ्ठल एम.बिरारी | 10130 | 24585 | 200 | 300 | 100 |
| 3 | दत्तात्रय एल.पाटील | 10130 | 24585 | 200 | 300 | 100 |
| 4 | हेमा ऐ. केणे | 10130 | 24585 | 200 | 300 | 100 |
| 5 | सुधाकर एस.कदम | 10839 | 24585 | 200 | 300 | 100 |
| 6 | भोदराज खेडकर | 10839 | 24585 | 200 | 300 | 100 |
| 7 | बाळकृष्ण पाटील | 10839 | 24585 | 200 | 300 | 100 |
| | | | एकुण | 1200 | 2100 | 700 |

सदरच्या देयकातील एकूण 7 कर्मचा-यांची प्रत्येकी रु. 100/- या प्रमाणे व्यवसाय कराची एकूण रक्कम रु. 700/- इतकी वसूल करून शासन खाती भरणा केलेली नाही व तसे अनुपालन चलनासह लेखापरीक्षणास सादर केलेले नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.64 दि.24/08/2018 विभागास निर्गमित करण्यात आला होता. विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

DATSLMM7301 (Ref No : 51, Hmm No : 64)

### *16 शालेय पोषण आहार योजना वित्तीय वर्ष 2014-15 मधील मे.ओ.बी.पाटील ॲन्ड सन्स भिवंडी यांचेकडुन आयकराची रक्कम वसुल झालेली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4474377.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4474377.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 93088.00/-

***मा.उच्च न्यायालयाचे अंतिम आदेश होईपर्यंत कोणत्याही महानगरपालिका क्षेत्रातील शाळामध्ये पुर्विच्याच कार्यपध्दतीनुसार यापुर्वी नियुक्त केलेल्या यंत्रणामार्फत आहार शिजवुन देण्यांत यावा. असे आदेश आहेत त्यानुसार कार्यालयाचे आदेश क्र.250/13-06-2014 अन्वये नवीन निविदा न काढता पुर्वीच्याच यंत्रणाला मुदतवाढ दिलेली आहे. तथापि सदर आदेशाच्या दोन्ही प्रती नस्तीमध्ये दिसुन येत ना ही. तिन्ही पुरवठादारानी धनादेश स्विकारतानां मुदांक स्टॅम्पवर स्वाक्षरी केलेली नाही. मुद्रांकशुल्क रक्कम रु.3600/- वर करारनामा केलेला नाही. मुद्रांक शुल्काची रक्कम रु.3600/- शासन जमा करण्यांत यावी. आयकर अधिनियम 1961 कमल 194(सी) नुसार 2% प्रमाणे तीन्ही पुरवठादार यांचेकडुन रक्कम रु.89488/- सबंधिताकडून वसुल करण्यांत यावीत.***

शिक्षण विभागातील शालेय पोषण आहार योजना सन 2014-15 मधील अनुदान वाटपाच्या नस्तीची व देयकाची तपासणी केली असता मे.ऐ.बी.पाटील ॲन्ड सन्स भिवंडी माहे एप्रिल 2014 ते सप्टेंबर 2014 या कालावधीत शाळेना अन्न शिजवुन देणेचे अनुदान अदा करणे बाबत रक्कम रु.44,74,377/- धनादेश क्र.282859 दिनांक 15-11-2014 ला अदा केलेला आहे. त्याचा प्रमाणक क्र.10 दिनांक 15-11-2014 आहे. सभापती व प्रशासन अधिकारी यांची दिनांक15-11-2014 ची मान्यता आहे.

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.114 दिनांक 06/10/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय देणेत येत आहे.

1) शाळा निहाय पटसंख्येची पडताळणी शालेय वार्ड समिती भिवंडी यांचेकडुन पटसंख्या ही मुख्याध्यापक यांनी पाठविलेल्या पटसंख्येसोबत पडताळुन त्याबाबतचे प्रमाणपत्र प्रशासन अधिकारी यांचेकडे पाठवतील. त्यानंतर त्याचे प्रदान करणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) मा.उच्च न्यायालयाचे अंतिम आदेश होईपर्यंत कोणत्याही महानगरपालिका क्षेत्रातील शाळामध्ये कार्यपध्दतीनुसार यापुर्वी नियुक्त केलेल्या यंत्रणामार्फत आहार शिजवुन देण्यांत यावा. असे आदेश आहेत त्यानुसार कार्यालयाचे आदेश क्र.250/13-06-2014 अन्वये नवीन निविदा न काढता पुर्वीच्याच यंत्रणाला मुदतवाढ दिलेली आहे. तथापि सदर आदेशाच्या दोन्ही प्रती नस्तीमध्ये दिसुन येत नाही. सदर आदेशाच्या प्रती पडताळणी पथकास सादर केलेल्या नाही.

3) संबधित मक्तेदार यांनी धनादेश स्विकारतानां मुदांक स्टॅम्पवर स्वाक्षरी केलेली नाही. सदरची बाब गंभीर स्वरुपाची आहे.

4) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार सबंधित पुरवठादार यांनी रक्कम रु. 3600/- मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला नाही. रक्कम 3600/- वसुल करुन शासन जमा करण्यांत यावी.

5) आयकर अधिनियम 1961 कमल 194(सी) नुसार 2% प्रमाणे संबधित मक्तेदार यांचेकडुन रक्कम रु.89488/- सबंधिताकडून वसुल करण्यांत यावीत.

FDSJRDM6801 (Ref No : 85, Hmm No : 114)

## *17 मनपा हद्दीत बगीच्यामध्ये जेष्ठ नागरीकांना बसणेसाठी व्ही.आय.पी. बँचेस बसविणे कामातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष :उद्यान महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 450000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 45000.00/-

***शासन निर्णय उद्योग,उर्जा व कामगार विभाग दि.2/01/1992 नुसार महाराष्ट्र राज्यातील लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सदर साहीत्य महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांचेकडून खरेदी करणे आवश्यक असतांना जाहिरातीव्दारे निविदा मागवून मे बुबेरे अँन्ड् असोशिएट, सौदागर मोहल्ला भिवंडी यांच्याकडून बँचेसची खरेदी करण्यात आलेली आहे. हे शासन आदेशाचे उल्लंघन झालेले आहे.***

उद्यान विभागाच्या सन 2014-15 च्या लेखापरिक्षणात मनपाच्या प्रभाग क्रमांक 10(ब) बंदर मोहल्ला येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या महिला व जेष्ठ नागरीकांना बसणेसाठी व्ही.आय.पी. बँचेस बसविणे बाबतच्या कामात पुढील अनियमितता आढळून आल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | कामाचा तपशिल | मनपाच्या प्रभाग क्रमांक 10(ब) बंदर मोहल्ला येथे नव्याने तयार करण्यात आलेल्या महिला व जेष्ठ नागरीकांना बसणेसाठी व्ही.आय.पी. बँचेस बसविणे. |
| 2. | कामाचे नाव | बंदर मोहल्ला येथील उद्यानात महिला व जेष्ठ् नागरीकांना बसणेसाठी व्ही.आय.पी. बँचेस बसविणे. |
| 3. | ठेकेदाराचे नाव | बुबेरे अँन्ड असोशिएट, सौदागर मोहल्ला भिवंडी |
| 4. | प्रशासकीय मंजुरी | मा.आयुक्त् सो दि.03/07/2014 |
| 5. | तांत्रिक मंजुरी | शहर अभियंता दि.03/07/2014 |
| 6. | निविदा कालावधी | 22/7/2014 ते 11/08/2014 |
| 7. | जाहिरात | दैनिक जनादेश दि.22/7/2014 |
| 8. | निविदा उघडल्याचा दिनांक | 11/08/2014 |
| 9. | कार्यादेश | उद्यान/669/दि.25/03/2015 |
| 10. | कामाची मुदत | 60 दिवस |
| 11. | करारनामा | दि.10/03/2015 |
| 12. | काम पुर्णत्वाचा दिनांक | उपलब्ध नाही |
| 13. | मोजमाप पुस्तिका | उपलब्ध करुन दिली नाही |

1.या कामासाठीचे प्राकलन, अंदाजपत्रक तसेच उद्यान विभागाने ज्या ठिकाणी महानगरपालिका निधी खर्च केला आहे, अशा सर्व मालमत्ता या महानगरपालिकेच्या / उद्यानाच्या मालकीची असल्याचे सिध्द करणारे दस्तऐवज लेखा परीक्षणास अप्राप्त आहे.

2.मनपा हद्दीत एकुण 43 उद्याने असून, त्यामध्ये बँचेस बसविण्यासाठी महाराष्ट्र राज्य लघुउदयोग विकास महामंडळ यांचेकडील 2013-14 च्या दरसुचीतील दरानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले

आहे. शासन निर्णय उद्योग,उर्जा व कामगार विभाग दि.2/01/1992 नुसार महाराष्ट्र राज्यातील लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सदर साहीत्य महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांचेकडून खरेदी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने शासनाच्या धोरणानुसार सदर खरेदी बाबतची मागणी महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांचकडे करणे आवश्यक होते. याबाबत त्यांचे पुरवठा करण्यास असमर्थ असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन खरेदी करणे आवश्यक होते. याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही. केवळ लघुउद्योग विकास महामंडळ यांनी केलेल्या दरनिश्चिती नुसार जाहिरातीव्दारे निविदा मागवून मे बुबेरे अँन्ड असोशिएट, सौदागर मोहल्ला भिवंडी यांच्याकडून बँचेसची खरेदी करण्यात आलेली आहे. हे शासन आदेशाचे उल्लंघन असून याबाबत योग्यतो खुलासा करण्यात आलेला नाही.

3.कामपुर्णत्वाचा दाखला नस्तीमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे काम पुर्ण झाल्याची खात्री करता आली नाही.

4.स्विकृत निविदाकारास वाटाघाटीसाठी बोलविले असता त्यांनी अर्धा टक्क्या पर्यंत कमी दराने पुरवठा करण्याचे मान्य केलेले आहे. तरीही महापालिकेकडे निविदेमधे दिलेल्या रकमेची बिलामध्ये मागणी केलेली आहे. नस्तीमध्ये अदा केलेले देयक नसल्यामुळे याबाबत खात्री करता आली नाही.

5.ठेकेदाराने टॅक्स इन्वाइस सादर न करता केवल लेटरहेड वर कामाच्या रकमेची मागणी केल्याचे दिसून आले असून त्या आधारे प्रत्यक्ष प्रदान झाले किंवा कसे. तसेच केव्हा प्रदान झाले याबाबतचे प्रमाणके उपलब्ध करुन न दिल्याने तपासणी करता आली नाही.

6.सदर खरेदीच्या नस्तीमधील करारनाम्यातील अट क्र.8 नुसार नियोजित कामाच्या ठिकाणाचे पुर्वस्थितीचे छायाचित्र तसेच कामपुर्णत्वाचे छायाचित्र ठेकेदाराने सादर करणे बंधनकारक केलेले आहे. याबाबत कामपुर्णत्वाचे छायाचित्र नस्तीमध्ये नाहीत. त्यामुळे काम पुर्ण झाल्याची खात्री करता आली नाही.

7.करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार सदर कामाचे साहित्य शहर अभियंता, उद्यान अधिक्षक यानी तपासल्यानंतर वापरावयाचे असल्याने याबाबतचे तपासणी प्रमाणपत्र नस्तीमध्ये आढळून आले नाही.तसेच उपरोक्त बँचेस तांत्रिक निकषाप्रमाणे प्राप्त झाल्याचा तपासणी अहवाल नस्तीमध्ये नाही.

8.सदर कामाचा कालावधी निविदा सुचनेत 60 दिवस, करारनामा व कार्यादेशामध्ये 15 दिवस नमुद केलेला आहे. या तफावतीमुळे प्रत्यक्ष काम कधी पुर्ण केले. याबाबत खात्री होत नाही.

याबाबत संबंधित विभागास अर्धसमास क्रमांक 94 दि.18/09/2018 निर्गमित केला असून याबाबतचे अनुपालन अप्राप्त आहे.

DATSLMM7301 (Ref No : 58, Hmm No : 94)

## *18 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हददीत वृक्षसंवर्धन व जतन अधिनियम 1975 ची अंमलबजावणी मधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :उद्यान विभाग महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र ( नागरी क्षेत्र) झाडांचे सरंक्षण व जतन अधिनियम 1975 व नियम 2009 मधील दिलेल्या मानकाप्रमाणे झाडे लावणे व जतन करणे आवश्यक असतांना, झाडांचा बॅकलॉग भरुन काढणेसाठी वृक्ष प्राधिकरणाने कोणतेही नियोजन केलेले नाही. लागवड केलेल्या झाडांपैकी किती झाडे जिवंत आहेत याबाबतची माहिती ठेवली जात नाही. मनपा भिवंडी निजामपूर शहर येथील उदयान विभागाने वृक्ष गणना केली नाही. तीन वर्षा पेक्षा जास्त कालावधीच्या अनामत रक्कमा जप्त करणे व जप्त केलेल्या अनामत रक्कमा परत करण्यापूर्वी सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक असताना, तशी कार्यवाही केली जात नाही. वृक्ष प्राधिकरणाचा निधी स्वतंत्र खात्यामध्ये ठेवणे आवश्यक असतांना वृक्ष प्राधिकरण निधीचे स्वतंत्र खाते ठेवले नाही.***

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उदयान विभागातील वृक्ष प्राधिकरण विभागाने लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिलेली माहिती व अभिलेख्यांचे लेखापरीक्षणा दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.138 दि. 16/10/2018अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. उदयान विभागाने 2013-14 व 2014-15 या दोन वर्षामध्ये एकूण 9522 झाडे लागवड केल्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली आहे परंतु वृक्ष लागवडी पैकी किती वृक्ष जिवंत आहेत याबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यामुळे लागवडीपैकी जिवंत असलेल्या वृक्षांची खात्री करणे गरजेचे असतांना अशी खात्री केली जात नसल्याचे दिसून येते.

2. अधिनियमातील कलम 7 (ख) अन्वयें वृक्ष प्राधिकरणाने डिसेंबर 1996 पूर्वी एकदा आणि त्यानंतर प्रत्येक पाच वर्षातून एकदा अधिकार क्षेत्रातील सर्व जमिनीवरील विदयमान झांडांची गणना करणे व त्याची माहिती कलम 7 (बी) प्रपत्र- ए मध्ये ठेवावयाची आहे. तथापि, मनपा भिवंडी निजामपूर शहर येथील उदयान विभागाने वृक्ष गणना केली नाही. 1996 नतरच्या वृक्ष गणनेबाबतची माहिती उपलब्ध झाली नाही.

3. महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम 1975 कलम 11 अन्वयें नागरी क्षेत्रातील झाडे जतन करणेसाठी जमीनीचा मालक व भोगवटादार जबाबदार राहील व त्याने 3 वर्ष दर सहा महिन्यांनी झाडे जतन केली असल्याचा अहवाल वृक्ष प्राधिकरणास दयावा अशी तरतूद असून

त्यासाठी प्रतिवृक्ष निर्धारित केलेली रु. 5000 सुरक्षा अनामत घेण्यात येते. 2014-15 मध्ये वृक्ष जतन करणेच्या हमीपोटी सुरक्षा अनामत रु.315000 जमा झालेली आहे. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम 190 (3) अन्वयें तीन वर्षापेक्षा जास्त पडून राहिलेल्या ठेवी महसुलात जमा करणे आवश्यक आहे. विभागाने उपलब्ध करुन दिलेली सुरक्षा अनामत नोंदवही तपासली असता उदयान विभागाने 3 वर्षापेक्षा जास्त कालावधी पर्यंत पडून असलेल्या ठेवी व्यपगत न करता संबंधित भोगवटादारास परत केलेल्या आहेत. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 मधील नियमानुसार 3 वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या व्यपगत करण्यात आलेल्या ठेवीं परत करणेसाठी सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणे आवश्यकं आहे. परंतु मनपातील वृक्ष प्राधिकरणाने अशी कोणतीही मान्यता न घेता भोगवटादारास ठेवीच्या रक्कमा परत केलेल्या आहेत. नियमातील उक्त तरतुदीनुसार 2013 पर्यंतच्या सर्व ठेवी LAPSE व्यपगत करुन मनपा महसुलात जमा करणे आवश्यक आहे.

4. अधिनियमातील कलम 15 अन्वये प्राधिकरणाचा विशेष निधी असेल त्यास (वृक्ष प्राधिकरण निधी) असे संबोधण्यात येईल सदर निधीमध्ये स्थानिक प्राधिकरणाने बसविलेला कर व प्राधिकरणाने वसुल केलेल्या रक्कमांचा समावेश असेल. सदर निधी राष्ट्रीयकृत बँकेतील स्वतंत्र खात्यात ठेवणे आवश्यक आहे. परंतु भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेतील वृक्ष प्राधिकरणाचे नांवे स्वतंत्र खाते ठेवलेले नाही. त्यामुळे वृक्ष प्राधिकरण निधीत जमा झालेला महसुल व खर्च याची माहिती उपलब्ध झाली नाही. तरी नियमातील तरतुदीनुसार स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये प्राधिकरणाकडे जमा झालेल्या ठेवी व इतर महसुलाच्या रक्कमा जमा करणे आवश्यक आहे.

5. नियम क्र.7(च) अन्वये फुले, फळे, भाज्या, झाडे किंवा रोपे यांची प्रदर्शने (वर्षातुन किमान एकदा) आयोजित करणे व अशी प्रदर्शने आयोजित करण्यासाठी खाजगी व सार्वजनिक संस्थाना सहाय्य करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची प्रदर्शने उद्यान विभागाने आयोजित केलेली नाहीत.

6. नियम क्र.8(3) (ख) अन्वये झाड तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा अहवाल वृक्ष प्राधिकरणाने महानगरपालिकेस 6 महिन्यातुन एकदा सादर करणे आवश्यक आहे. उद्यान विभागाने याबाबतचा अहवाल महानगरपालिकेस सादर केलेले नाहीत.

DATVRKM8002 (Ref No : 64, Hmm No : 138)

## *19 महानगरपालिकेने कर्मचारी आकृतीबंधास शासनाची मंजूरी घेतली नसलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :आस्थापना महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कर्मचारी आकृतीबंधास शासन मंजूरी घेतलेली नाही.***

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 29, नियम, उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश , कलम 457 (3) नुसार नगरपालिका अधिकारी कर्मचारी (अ) ज्या जागेवर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये विहित असेल त्या जागेसाठी आवश्यक असलेली अर्हता आणि त्या जागेवर नेमणूक करण्याची पध्दती (ब) अन्य जागेवर नेमणूक करण्याची पध्दती ठरविण्याबाबत नियम करण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत व सदर नियमास कलम 455 अन्वये शासनाची मंजूरी घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार 2014-2015 या आर्थिक वर्षात एकूण 4361 कर्मचा-यांची पदे असुन त्यापैकी 557 पदे रिक्त आहेत व 3844 पदे कार्यरत आहेत. त्याप्रमाणे कर्मचारी अर्हता व त्या जागेवर नेमणूक करण्याची पध्दती यास महानगरपालिकेने शासन मंजुरी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 51 (1 ते 3) प्रमाणे महानगरपालिकेने आकृतीबंध मंजूरीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे, तरी सदरील बाबतीचा प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने खातर जमा करता आली नाही. सदरील बाबतीत विभागाला अर्धसमास क्र.125 दि.10/10/2015 अन्वये कळविले असता विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 68, Hmm No : 125)

## *20 मनपा मधील अधिकारी कर्मचारी यांच्या वेतनातून कपात करण्यात येणाऱ्या गटविमा वर्गणीबाबत निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : गटविमा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 263683.00/-

***महानगरपालिकेने अधिकारी कर्मचारी यांचे गटविमा वर्गणी भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांचे कार्यालयात विहित वेळेमध्ये भरली नाही त्यामुळे मनापाचे रक्कम रु.124763/- व रु.138920/- एवढे नुकसान झाले. सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. महानगरपालिकेमधून सन 2002 ते 2013 या कालावधीमध्ये एकूण 58 अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त व एकूण 72 अधिकारी/कर्मचारी मृत पावले आहेत. संबंधित अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या वारसांना गटविमा वर्गणी व गटविम्याचे लाभ देणे प्रलंबित असून ही बाब गंभीर आहे.***

महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनातून खालीलप्रमाणे गटविमा वर्गणी कपात करण्यात येत असुन सदर रक्कम भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांच्याकडे मास्टर पॉलिसी क्र.GSLI/77659 या खात्यामध्ये जमा करण्यात येते. कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतर अथवा त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसांना गटविम्याची रक्कम खालीलप्रमाणे प्राप्त होते.

| अ.क्र. | वर्ग | गटविमा वर्गणी | मृत्युनंतर प्राप्त होणारी रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | I | 90 | 90000 |
| 2. | II | 60 | 60000 |
| 3. | III | 30 | 30000 |
| 4. | IV | 20 | 20000 |

महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या नियमित वेतनामधून सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये गटविमा या शिर्षाखाली एकूण रक्कम रु.1252718/- एवढी रक्कम कपात करुन भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांच्याकडे मास्टर पॉलिसी क्र.GSLI/77659 या खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे. याबाबतची धारिका तपासली असता निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास क्र.156 दि.29/10/2018 रोजी देण्यात आले तथापि विभागाने याबाबत लेखापरीक्षण कालावधी पर्यंत अनुपालन दिले नाहीत याबाबत लेखापरीक्षण पथकाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या नियमित वेतनामधून सन 2014-15 या आर्थिक वर्षामध्ये कपात करण्यात आलेला गटविमा भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांच्याकडे वेळेमध्ये भरणा करण्यात आला नाही. त्यामुळे मनपास भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांचे दि.11/10/2018 च्या पत्रान्वये 9.5% दंड आकारण्यात आला आहे. महानगरपालिकेवर लेखापरिक्षणाच्या दिनांका अखेर रक्कम रु.124763/- एवढा विलंब आकार प्रलंबित असुन ही बाब गंभीर आहे. महानगरपालिकेने अधिकारी कर्मचारी यांचे गटविमा वर्गणी भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांचे कार्यालयात विहित वेळेमध्ये भरली नाही त्यामुळे मनापाचे रक्कम रु.124763/- एवढे नुकसान झाले. सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2) महानगरपालिकेने यापूर्वी देखील गटविमा वर्गणी भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांच्याकडे उशिरा भरल्यामुळे मनपाने धनादेश क्र.77862 दि.1/8/2012 रक्कम रु.138920/- नुसार यापूर्वी देखील विलंब आकार भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांचेकडे जमा केला आहे. नियमानुसार विलंब आकाराची रक्कम महानगरपालिकेच्या कोणत्याही खात्यामधून अदा करणे योग्य नाही तथापि सदरची रक्कम कोणत्या खात्यामधून अदा केली याबाबतचा तपशील विभागाने उपलब्ध करुन दिला नाही त्यामुळे विलंब आकाराची रक्कम कोणत्या खात्यामधून दिली याबाबत भाष्य करता आले नाही. सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3) महानगरपालिकेमधून सन 2002 ते 2013 या कालावधीमध्ये एकूण 58 अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त व एकूण 72 अधिकारी/कर्मचारी मृत पावले आहेत. संबंधित अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या वारसांना गटविमा वर्गणी व गटविम्याचे लाभ देणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत

महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीचा तपशील व सद्यस्थिती उपलब्ध करुन दिली नाही. वास्तविक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे व त्यांच्या वारसांना गटविमा वर्गणी व गटविम्याचे लाभ विहित वेळेत देणे बंधनकारक असताना मनपाने याबाबत आवश्यक ती कार्यवाही केली नाही ही बाब अयोग्य आहे.

4) मनपाने अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन देयकातून कपात करण्यात आलेल्या गटविमा वर्गणीचा ताळमेळ भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांच्याबरोबर घेतला नाही त्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनातून अचूक गटविमा वर्गणी कपात केल्याची खात्री करता आली नाही.
महानगरपालिकेने अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनातून अचूक गटविमा वर्गणी कपात करुन विहित मुदतीमध्ये भारतीय आयुर्विमा महामंडळ ठाणे यांच्याकडे मास्टर खात्यामध्ये जमा करणेबाबतची प्रभावी अमंलबजावणी करणे आवश्यक असून याचा मनपाने गांभिर्याने विचार करणे आवश्यक आहे.

DPSMAWM7701 (Ref No : 110, Hmm No : 156)

## *21 खाजगी सुरक्षा अभिकरणाकडून सुरक्षा रक्षक नेममणूकीवर झालेल्या खर्चातील अनिमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : सुरक्षा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 11370157.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 11370157.00/-

***शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र.एसजीए-1506/प्र.क्र.92/काम-5, दिनांक 8 नोव्हेंबर 2006 अन्वये, शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षक नेमणे आवश्यक असतांनादेखील खाजगी सुरक्षा एजन्सीकडून सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत. सदर खाजगी सुरक्षा रक्षकांकडून सुरक्षा रक्षक नेमतांना सदर कामाचे तुकडीकरण करुन निविदा प्रक्रीया टाळून , केवळ दरपत्रके मागवुन कार्यादेश देण्यात आलेले आहेत हे नियमबाहय आहे. Maharashtra Security Guards (Regulation of Employment and Welfare) Act,1981 मधील तरतूदीनुसार कंत्राटदाराने त्याच्या आस्थापनेवर नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांच्या वतीने भविष्य निर्वाह निधी,सानुग्रह अनुदान,उपदान, रजा वेतन व इतर अशी एकूण 46.75 टक्के Levy रकमा संबंधित कार्यालयाकडे जमा केल्याची खात्री न करता, मनपाने संबंधित कंत्राटदारांना रक्कम रुपये 11370157 चे प्रदान केलेले आहे.***

मनपाच्या सुरक्षा विभागातील अभिलेखे तपासले असता , सन 2014-15 मध्ये मनपाच्या हददीत

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

विविध ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीज कडून सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले असून त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | खाजगी एजन्सीचे नांव | कार्यादेश क्र. व दिनांक | करार नामा क्र.व दिनांक | नेमलेले सुरक्षा रक्षक | अदा करण्यात आलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गुरु सिक्युरिटी सर्व्हिसेस, ठाणे | 26 दि. 5/7/13 | ---- | 05 | 2109479 | 5/7/13 पासून 1 वर्षासाठी |
| | | 70 दि. 1/4/14 | ---- | 05 | | 1/4/14 ते 30/6/14 |
| | | 16 दि. 19/5/14 | ---- | 02 | | 20/5/14 ते 30/6/14 |
| | | 32 दि. 5/7/14 | ---- | 12 | | 1/7/14 ते निविदा प्रक्रीया होईपर्यंत |
| | | 115 दि. 31/1/15 | 815 दि.31/1/15 | 13 | | 1/2/15 ते पुढील आदेशापर्यंत |
| 2 | कॅप्टन सिक्युरिटी सर्व्हिसेस, ठाणे | 28 दि. 5/7/13 | ---- | 09 | 4212066 | 1/7/13 पासून 1 वर्षासाठी |
| | | 09 दि. 10/4/14 | ---- | 08 | | लोकसभा 2014 निवडणूक कामासाठी |
| | | 33 दि. 5/7/14 | ---- | 09 | | 1/7/14 ते निविदा प्रक्रीया होईपर्यंत |
| 3 | ओम फॅसिलिटी सर्व्हिसेस, कल्याण | 27 दि. 5/7/13 | ---- | 05 | 2814212 | 6/7/13 पासून 1 वर्षासाठी |
| | | 38 दि. 24/9/13 | ---- | 02 | | 27/9/13 पासून 1 वर्षासाठी |
| | | 69 दि. 1/4/14 | ---- | 24 | | 1/4/14 ते 30/6/14 |
| | | 31 दि. 5/7/14 | ---- | 31 | | 1/7/14 ते निविदा प्रक्रीया होईपर्यंत |
| | | 48 दि. 1/8/14 | 203 / 1/8/14 | 19 | | 28/2/14 ते 31/8/14 |
| | | 49 दि. 1/8/14 | 201 / 1/8/14 | 19 | | 28/2/14 ते 31/8/14 |
| | | 64 दि. 28/8/14 | ---- | 19 | | 1/9/14 ते पुढील आदेशा पर्यंत |
| | | 65 दि. 28/8/14 | ---- | 19 | | 1/9/14 ते पुढील आदेशा पर्यंत |
| 4 | संजय भगवान | 46 दि. 1/8/14 | ---- | 19 | 1489600 | 2/8/14 पासून 30 दिवसांसाठी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भोईर, भिवंडी | 47 दि. 1/8/14 | ---- | 19 | | 2/8/14 पासून 30 दिवसांसाठी |
| | | 62 दि. 28/8/14 | 202 / 1/8/14 | 19 | | 1/9/14 पासून 30 दिवसांसाठी |
| | | 63 दि. 28/8/14 | ---- | 19 | | 1/9/14 पासून 30 दिवसांसाठी |
| 5 | मकरंद श्रीधर फडके | 48 दि. 1/8/14 | ---- | 19 | 744800 | 2/8/14 पासून 30 दिवसांसाठी |
| | | 49 दि. 1/8/14 | ---- | 19 | | 2/8/14 पासून 30 दिवसांसाठी |
| | | 64 दि. 28/8/14 | ---- | 19 | | 1/9/14 पासून 30 दिवसांसाठी |
| | | 65 दि. 28/8/14 | ---- | 19 | | 1/9/14 पासून 30 दिवसांसाठी |
| | | | | एकूण | 11370157 | |

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ,1949 मधील अनुसूची-ड प्रकरण पाच नुसार रुपये दोन लाखापेक्षा अधिक रकमेच्या कामासाठी निविदा मागविणे आवश्यक आहे . तथापि मनपाच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमणेसाठी विभागाने दरपत्रकाव्दारे खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीज कडून सुरक्षा रक्षक नेमून रक्कम रुपये 11370157/- चे प्रदान केलेले आहे. सदर कामाची निविदा मागविणे आवश्यक असतांना , सदर कामाचे तुकडीकरण करुन दरपत्रकाव्दारे सुरक्षा रक्षकांची नेमणूक केलेली असून , महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ,1949 मधील अनुसूची-ड प्रकरण पाच मधील नियमाचे उल्लंघन झाले आहे.

2. शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र.एसजीए-1506/प्र.क्र.92/काम-5, दिनांक 8 नोव्हेंबर 2006 अन्वये, सरकारी , निमसरकारी क्षेत्रे /उपक्रम , शासकीय मंडळे ,महामंडळे / महानगरपालिका / स्थानिक स्वराज्य् संस्था, शासकीय कार्यालये इत्यादींना ज्या ज्या वेळी सुरक्षा अधिकारी, सुरक्षा रक्षक यांची आवश्यकता असेल त्या त्या वेळी संबंधित उपक्रम /संस्था इत्यादींना खाजगी अभिकरणाकडून सुरक्षा अधिकारी / सुरक्षा रक्षक याची मागणी न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा अधिकारी/ सुरक्षा रक्षक यांची मागणी करणे आवश्यक असून त्यातुन संबंधित आस्थापनांनी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी तसेच शासनाच्या सुरक्षा मंडळाव्यतिरिक्त खाजगी सुरक्षा अभिकरणाकडून सुरक्षा रक्षक नेमल्यास त्या संस्थामधील संबंधित जबाबदार अधिकारी हा दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील. तथापि महानगरपालिकेने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षक न नेमता खाजगी सुरक्षा एजन्सीकडून सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत. त्यामुळे नियमांचे पालन झालेले नाही.

3. सन 2014-15 मध्ये खाजगी सुरक्षा मंडळास रक्कम रुपये 11370157/- इतके प्रदान करण्यात आले आहे . Maharashtra Security Guards (Regulation of Employment & Welfare) Act, 1981 मधील तरतूदीनुसार कंत्राटदाराने त्याच्या आस्थापनेवर नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांच्या वतीने भविष्य निर्वाह निधी , सानुग्रह अनुदान, उपदान, रजा वेतन व इतर अशी एकूण 46.75 टक्के Levy रकमा संबंधित कार्यालयाकडे जमा केल्याबाबतची कागदपत्रे मागणी करुन विभागाने उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे लेखापरिक्षणात याबाबत खात्री करता आली नाही.

याबाबत अर्धसमास पत्र क्र .78 दि.5/9/18, क्र.57 दि.8/8/18 व क्र.144 दि.23/10/18 अन्वये खुलासा मागवून त्याचे अनुपालन विभागाचे पत्र क्र .सु.वि./93/2018 दि.11/12/2018 विचारात घेता, सदर अनुपालन समाधानकारक नसल्याने व अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने रक्कम रु . 11370157/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 72, Hmm No : 78)

## *22 जन्म व मृत्यु प्रमाणपत्र संदर्भातील नोंदवही,साठा नोंदवही व फॉर्म उपलब्ध करुन न दिल्यामुळे या लेख्याशीर्षांतर्गत जमा झालेल्या रक्कमांची पडताळणी न केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : जन्म व मृत्यु महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 523598.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 523598.00/-

***महानगरपालिकेस जन्म-मृत्यु या लेखाशीर्षांतर्गत एकूण रक्कम रु.523598/- एवढी रक्कम प्राप्त झाली तथापि विभागाने जन्म-मृत्यु प्रमाणपत्रासाठी किती अर्ज आले व किती प्रमाणपत्र वाटप केले याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे जन्म-मृत्यु या लेखाशीर्षांतर्गत एकूण रक्कम रु.523598/- एवढी रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. महानगरपालिकेने जन्म-मृत्यु प्रमाणपत्रांसाठी फी वाढीबाबत मनपा स्थायी समितीस प्रस्ताव पाठविला होता. याबाबत विभागाने आवश्यक प्रयत्न केले नाहीत त्यामुळे महानगरपालिकेस प्राप्त होणा-या उत्पन्नाध्ये अपेक्षित वाढ झाली नाही.***

आर्थिक वर्ष सन 2014-15 मधील जन्म मृत्यु विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास क्र.97 दि.27/09/2018 रोजी देण्यात आले तथापि सदर अर्धसमासाचे अनुपालन विभागाने लेखापरीक्षण पथकास दिले नाही याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात

येत आहे.

1) महानगरपालिकेने जन्म मृत्यु प्रमाणपत्रांसाठी मनपा स्थायी समिती ठराव क्र.318 दि.26/01/2000 पासुन रु.10/- एवढी फी निश्चित केली होती. सदर फी वाढीबाबत विभागाने स्थायी समितीस प्रस्ताव पाठविला होता. याबाबत विभागाने आवश्यक प्रयत्न केले नाहीत त्यामुळे महानगरपालिकेस प्राप्त होणा-या उत्पन्नाध्ये अपेक्षित वाढ झाली नाही.

2) महानगरपालिकेस लेखा शाखेतील उपलब्ध माहितीनुसार जन्म मृत्यु या लेखाशीर्षांतर्गत एकूण रक्कम रु.523598/- एवढी रक्कम प्राप्त झाली तथापि विभागाने जन्म मृत्यु नोंदीबाबतची अद्यायावत नोंदवही उपलब्ध करुन दिली नाही तसेच जन्म मृत्यु प्रमाणपत्रासाठी किती अर्ज आले व किती प्रमाणपत्र वाटप केले याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष विभागास जन्म मृत्यु प्रमाणपत्रासाठी किती फॉर्म प्राप्त झाले व त्याप्रमाणे मनपास प्रत्यक्ष किती रक्कम जमा झाली याबाबत अभिप्राय नोंदवता आले नाही त्यामुळे जन्म मृत्यु या लेखाशीर्षांतर्गत एकूण रक्कम रु.523598/- एवढी रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) जन्म मृत्यु प्रमाणपत्रासाठी देण्यात येणाऱ्या पावती पुस्तकांची व मनपास जमा करण्यात आलेल्या रकमांच्या चलनाबाबतची साठा नोंदवही उपलब्ध करुन न दिल्यामुळे जन्म मृत्यु प्रमाणपत्रासाठी किती पावती पुस्तके व चलने वापरण्यात आले याबाबत अभिप्राय नोंदवता आले नाही.

DPSMAWM7701 (Ref No : 109, Hmm No : 97)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## *23 महानगरपालिकेने ठेकेदाराकडून तसेच अधिकारी कर्मचारी यांच्या वेतनातून कपात करण्यात येणाऱ्या आयकराबाबत निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष : ठेकेदारांचे प्रदान महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 227732.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 227732.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 227732.00/-

***महानगरपालिकेने ठेकेदार यांनी सादर केलेल्या देयकातून व कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनामधून कपात करण्यात आलेल्या टॅक्सचे अचूक तिमाही विवरणपत्र विहित मुदतीमध्ये आयकर विभागास सादर केले नाही त्यामुळे मनपास चारही त्रैमासिक कालावधीमध्ये आयकरविभागाच्या नोटीस प्राप्त झाल्या असुन महानगरपालिकेचे एकूण रक्कम रु.227732 एवढे मोठे नुकसान झाले आहे.***

महानगरपालिकेमध्ये मोठया प्रमाणात ठेकेदार व मनपा मधील अधिकारी कर्मचारी यांच्या देयकांचे प्रदान केले जाते कंत्राटदार व ठेकेदार यांनी सादर केलेल्या देयकातून व कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनामधून नियमानुसार टॅक्स कपात करण्यात येतो व सदर टॅक्स कपात केल्यानंतर प्रत्येक त्रैमासिक विवरणपत्र आयकर विभागास सादर करण्यात येते याबाबत आस्थापना शाखा (वेतन देयके ) व लेखाशाखेस अर्धसमास क्र.145 व 146 दि.23/10/2018 अन्वये आक्षेप नोंदविण्यात आले होते तथापि लेखापरीक्षण कालावधीपर्यंत सदर आक्षेपांचे अनुपालन संबंधित विभागाने दिले नाही. याबाबत लेखापरीक्षण पथक आपले अभिप्राय खालील प्रमाणे नोंदवित आहे.

महानगरपालिकेस आर्थिक वर्ष सन 2014-15 या वर्षातील ठेकेदारांच्या देयकातून केलेल्या आयकर कपातीबाबत आयकरविभागाच्या चारही त्रैमासिक कालावधीमध्ये नोटीसा प्राप्त झाल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | त्रैमासिक कालावधी | कमी कपात करण्यात आलेला टॅक्स(short Deduction) | मनपास भरावे लागणाऱ्या व्याजाचा तपशील (I.T.Justication Report Sr.No. 3(b)+4(a)+5(a)+6) |
|---|---|---|---|
| 1. | पहिली तिमाही | 90523.28 | 41807.00 |
| 2. | दुसरी तिमाही | 35642.00 | 26138.00 |
| 3. | तिसरी तिमाही | 29.14 | 8727.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 4. | चौथी तिमाही | 8790.48 | 16075.00 |
| एकूण | | 134984.90 | 92747.00 |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन व्हावे याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

1.महानगरपालिकेने विहित मुदतीमध्ये चारही अचूक तिमाही विवरणपत्र आयकर विभागास सादर केले नाही त्यामुळे मनपास चारही त्रैमासिक कालावधीमध्ये आयकरविभागाच्या नोटीस प्राप्त झाल्या असुन ही बाब गंभीर आहे.

2.ठेकेदारांकडून एकूण रक्कम रु.134984.90 एवढा टॅक्स कमी कापल्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे. सदर कमी कपात करण्यात आलेला टॅक्स वसुल करण्यासाठी मनपाने लेखापरीक्षण दिनांकापर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही ही बाब गंभीर असून सदरची रक्कम संबंधित ठेकेदाराकडून दंडव्याज रक्कम रु.38691/- यासह वसूल करण्यात यावी.

3.महानगरपालिकेने ठेकेदाराच्या देयकातून उशिराने टॅक्स कपात केल्यामुळे रक्कम रु. 24888/- एवढे व्याज भरावे लागले तरी देयकातून उशिराने टॅक्स कपात का केला? याबाबतची माहिती सादर केली नाही त्यामुळे यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांकडून सदरची रक्कम वसुल करावी.

4.महानगरपालिकेने त्रैमासिक विवरणपत्र आयकर विभागास उशिराने भरल्यामुळे रक्क्म रु.20200/- एवढी रक्कम दंड अदा करावा लागला त्यामुळे यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांकडून सदरची रक्कम वसुल करावी.

5.मनपाने टॅक्स या महत्वाच्या विषयावर दुर्लक्ष केल्यामुळे शासनाचे तसेच महानगरपालिकेचे एकूण रक्कम रु.227732/- एवढे मोठे नुकसान झाले आहे.

6.महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनातून सन 2014-15 मध्ये एकूण रक्कम रु.658214/- एवढा आयकर कपात करण्यात आला आहे. कर्मचारी व अधिकारी यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेला व्यवसायकर पुढील महिन्याच्या 10 तारखेस शासनास करणे आवश्य आहे तथापि मनपाने माहे ऑक्टोंबर-14,नोव्हेंबर-14 व डिसेंबर-14 मधील आयकर 1 महिन्याच्या विलंबाने जमा केला आहे त्यामुळे विभागाने शासन अधिसूचना पीएफटी-2011/एडीएम-29/ एनटीएफ दि.13/7/2011 प्रमाणे कार्यवाही केली नाही.

7. महानगरपालिकेतील ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन 2014-15 आयकर कपात करण्यात आला आहे. अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वार्षिक उप्तन्न दर्शविणारे विवरणपत्र(ज्या विवरणपत्राच्या आधारावर आयकर कपात करण्यात येतो) व त्यांनी सादर केलेली बचतीची मुळ कागदपत्रे लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे कपात करण्यात आलेला आयकर अचूक असल्याबाबत खात्री करण्यात आली नाही.

8.आर्थिक वर्ष सन 2014-15 मध्ये मनपाने आयकर विभागास त्रैमासिक विवरणपत्र (Quaterly Return) 24Q सादर केले नाही सदर त्रैमासिक विवरणपत्र आयकर विभागास सादर करणे आवश्यक आहे.

## *24 भविष्य निर्वाह निधीमध्ये व DCPS खात्यामध्ये माहे मार्च 2015 अखेर खाते नोंदवही नुसार व बँक स्टेटमेंट शिल्लक रक्कमाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतील कर्मचा- यांची भनिनि मधील सन 2014-15 मध्ये बँकेमध्ये गुंतवणूक केलेल्या रकमेची व DCPS खात्यामधील सुरुवातीची शिल्लक व अखेरची शिल्लक रक्कम याबाबतची माहीती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.***

भिवंडी महानगरपालिका लेखा विभागामार्फत ठेवण्यात आलेल्या भविष्य निर्वाह निधी व DCPS रकमांची डे-बुकातील शिल्लक व कर्मचा-यांचे भ.नि.नि. व DCPS खात्या मधील शिल्लक रकमेची खालील तक्त्यात माहिती सादर करणे बाबत कळविले असता विभागाने भविष्य निर्वाह निधीची गुंतवणूक केलेल्या रकमेची माहिती व DCPS रकमेची सुरुवातीची, अखेरची शिल्लक रकमेची माहीती लेखापरिक्षणास सादर केलेली नाही.

| सन 2013-14 ओपनींग बॅलन्स | सन 2014-15 क्लोजिंग बॅलन्स | दि.31/3//2015 रोजीची गुंतविण्यात आलेली रक्कम (सन 2014-15 मधील बँकेचे नांव/ खाते क्रमांक/ दिनांक व रक्कम) | | सन 2013-14 ओपनींग बॅलन्स खाते नोंदवही नुसार दि.31/03/2015 रोजीची शिल्लक | सन 2014-15 क्लोजिंग बॅलन्स | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| बँक खाते नुसार स्टेटमेंट नुसार शिल्लक बँकेचे नांव/ खाते क्रमांक/दिनांक | | | | | | |
| | | | | | | |

| रोखवही दिनांक 31/3/2014 | सुरुवातीची शिल्लक दिनांक | दिनांक 31/3/2015 ची शिल्लक | बॅक स्टेटमेंट दि.31/3/2014 ची शिल्लक | बॅक स्टेटमेंट दि.31/3/2014 | फरक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ची शिल्लक | 01/04/2014 | | | | | |
| | | | | | | |

विभागाने सादर केलेल्या अनुपालनामध्ये भविष्य निर्वाह निधीची सन 2013-14 ची सुरुवातीची शिल्लक बँक खातेनुसार रु.10996889 आहे. व सन 2014-15 ची अखेरची शिल्ल्क रु.11262475 व खाते नोंदवही नुसार सुरुवातीची शिल्लक रक्कम रु.10997176.56 व सन 2014-15 ची अखेरची शिल्लक 15794444.56 अशी असल्याचे नमुद केलेले आहे. अनुपालनामध्ये तफावती बाबत बँक चार्जेस जमा न घेतल्याने तफावत दिसून येत असल्याचे नमुद केलेले आहे. प्रत्यक्षात ताळमेळ घेऊन अनुपालन लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेले नाही. DCPS रकमेची उपरोक्त तक्त्याप्रमाणे माहिती सादर करणे बाबात विभागाने विलंबाने सादर केलेल्या विवरणपत्रानुसार DCPS ची गुंतवणुक केलेली रक्कम रु.18852000 अशी असल्याने नमुद केलेले आहे. परंतु इतर रकमेची (तक्त्यानुसार) माहिती लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

DATSLMM7301 (Ref No : 114, Hmm No : 153)

## *25 मालमत्ता कराच्या 3% मनपा विशेष शिक्षण कराची रक्कम आकारणी केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : करमुल्यांकन महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 53428595.00/-

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातिल कलम 148 - अन्वये विशेष शिक्षण उपकराची रक्कम भिवंडी निजामपूर महानगरपालिका क्षेत्रांत करयोग्य मूल्य रकमेवर मंजूर दरानुसार वसूल न करता मालमत्ता करावर केली जात नसल्याने महानगरपलिकेचे रक्कम रु.53428595/- इतक्या रकमेचे आर्थिक नुकसान झाले आहे.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातिल कलम 148 - अन्वये शिक्षण उपकराची रक्कम महानगरपालिका निश्चित करेल त्याप्रमाणे करयोग्य मूल्याच्या किंवा भांडवली मुल्याच्या 5% पेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम शिक्षण उपकर बसवू शकेल. परंतु भिवंडी-निजामपुर शहर महानगरपालिका कर मुल्यांकन विभागाच्या लेखा परिक्षणात करांची आकारणी प्रकरणे तपासता त्यात असे दिसून येते

की करयोग्य मूल्य रकमेच्या 26% मालमत्ता कराची रक्कम आकारण्यात येते व् सदर 26% मालमत्ता कर रकमेच्या 3% विशेष शिक्षण कर (मनपा शिक्षण उपकर) आकारणी करुन वसूल केला जात आहे. करयोग्य मूल्य रकमेवर मंजूर दरानुसार विशेष शिक्षण उपकराची रक्कम वसूल केली जात नसल्याने महानगरपलिकेचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

करमुल्यांकन विभागाने सादर केलेल्या वर्ष 2014 - 2015 या वर्षाचे कर मागणी वसूली थकबाकी विवरणपत्रात मालमत्ता कर मागणी थकबाकी रक्कम रु.416096276/- व चालू मागणी रक्कम रु.210775672/- अशी एकूण रक्कम 626871948/- असून विशेष शिक्षण उपकराची थकबाकीसह एकूण मागणी रक्कम रु.18902784/- इतकी आहे. खाली दर्शविल्याप्रमाणे वर्ष 2014 - 2015 मध्ये रक्कम रु. 53428595/- चे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

एकूण मालमत्ता कराची मागणी रक्कम,करयोग्य रकमेच्या 26% = 626871948/-

म्हणून 100% करयोग्य रक्कम = 100*626871948/26= 2411045950/-

महाराष्ट्र मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार विशेष शिक्षण कर मागणी रक्कम,100% करयोग्य रकमेवर 2411045950*3%=72331379/-

प्रत्यक्षात विशेष शिक्षण कराची थकबाकीसह मागणी रक्कम रु.18902784/-

वसूलपात्र शिक्षण कर फरक रक्कम रु.72331379 - 18902784 = 53428595/-

तरी वरीलप्रमाणे विशेष शिक्षण कराची फरक रक्कम रु.53428595/- वर्ष 2010-2011 ते 2014-2015 मधील फरक रकमेसह वसूल करून लेखापरीक्षणास अवगत करावे.

याबाबत अर्धसमास क्र. 27 दिनांक 28/06/2018 रोजी निर्गमित केला असता विभागाचे उतर प्राप्त झाले नाही.

वसूलपात्र रक्कम रु. 53428595/-

DATPKCM7101 (Ref No : 8, Hmm No : 28)

## *26 करमुल्यांकन विभागा मधील मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या प्रकरणातील अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 23278.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 23278.00/-

***महापालिकेने ठरावाव्दारे नवीन मालमत्तांच्या कर आकारणी मध्ये दि.28/01/2015 पासून सुधारणा केलेली असतांना, विहीत निश्चित दरापेक्षा कमी रक्कमेच्या दराने कर आकारणी केल्यामुळे रुपये 23278/- इतके महापालिकेचे नुकसान झाले आहे.***

भिवंडी-निजामपुर महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या करमुल्यांकन विभागा मधील मालमत्ता व पाणीपट्टी कराची वर्ष 2014-2015 मधील निवडक महीना (मार्च 2015) खालील नवीन मालमत्ता कर आकारणी नस्तीच्या तपासणीत , महानगरपालिकेने ठरावाव्दारे दिनांक 28/01/15 पासून दरात सुधारणा केलेली आहे तथापि विहीत निश्चित दरापेक्षा कमी रक्कमेच्या दराने कर आकारणी झाल्यामुळे महापालिकेचे खालीलप्रमाणे रक्कम रुपये 23278/- इतके आर्थिक नुकसान झालेले आहे.

| अ.क्र | मालमत्ता धारकाचे नाव | मालमत्ता क्र. | मागणी नोटीस आदेश क्र. व दि. | आदेशातील झोन क्र. आकारणी दर | | चटई क्षेत्र चौ.फुट | आदेशा तील वापर व मालमत्ता प्रकार | प्रत्यक्ष झोन चा भाडे पट्टी दर | वसूल करणे आवश्यक असलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अब्दुल बासित जब्बार खान | 1450 | 4653 20/3/15 | 02 | 1.03 | 1170 | औदयोगिक | 1.81 | 3925/- |
| 2 | अब्दुल बासित जब्बार खान | 1449 | 4652 20/3/15 | 02 | 1.03 | 945 | औद्योगिक | 1.81 | 3171/- |
| ३ | फहाद तालिब बुबेरे | 743 | 4907 31/3/15 | 02 | 1.60 | 12994 | रहिवास | 1.75 | 12879/- |
| ४ | फहाद तालिब बुबेरे | 743 | 4907 31/3/15 | 02 | 1.30 | 4331 | रहिवास | 1.45 | 3303/- |

या प्रमाणे इतर प्रकरणात देखील अनियमितता झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा प्रकरणांचा आढावा घेऊन त्यामध्ये अनियमितता झाली आहे काय याची खात्री करुन,अनियमितता दूर करावी असे अर्धसमास क्र . 33 दिनांक 05/07/2018 अन्वये कळवूनही अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे. सदरची रक्कम रुपये 23278 वसूल करण्यात यावी.

DGPSAAM7402 (Ref No : 19, Hmm No : 33)

## *27 करमुल्यांकन विभागा मधील शिक्षण उपकर आकारणी मधील अनियमितता ...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : मनपा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2288.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2288.00/-

***करमुल्यांकन विभागा मधील शिक्षण उपकर आकारणी मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 148-अ अन्वये, विशेष शिक्षण कर हा करयोग्य मुल्यावर 3% आकारणी करणे आवश्यक असतांना, मालमत्ता कराच्या रकमेवर 3% आकारण्यात आल्यामुळे अशा कर आकारणीच्या चुकीच्या पध्दतीमुळे महानगरपालिकेचे रुपये 2288/- नुकसान झाले आहे.***

करमुल्यांकन विभागा मधील मालमत्ता हस्तांतरण प्रकरणामध्ये (दिगरबाद) वर्ष 2014-15 मधील खालीलप्रमाणे विशेष शिक्षण उपकर कमी वसुली झाल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 148-अ अन्वये शिक्षण उपकराची रक्कम महानगरपालिका निश्चित करील त्याप्रमाणे करयोग्य मूल्याच्या किंवा भांडवली मुल्याच्या 5% हून अधिक नसेल एवढी रक्कम शिक्षण उपकर बसवू शकेल. तथापि कर मुल्यांकन विभागांत तपासणी करतांना असे आढळून आले आहे कि , करयोग्य मूल्याच्या 26% इतकी मालमत्ता कराची रक्कम आकारण्यात येते व सदर 26% मालमत्ता करा च्या रकमेवर 3% विशेष शिक्षण कर आकारण्यात येतो. वास्तविकत: विशेष शिक्षण कर हा करयोग्य मूल्यावर 3% आकारणी करणे आवश्यक असून अश्या कर आकारणीच्या चुकीच्या पध्दतीमुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

| अ.क्र. | मालमत्ताधारकाचे नाव | मालामत्ता क्र. | करयोग्य मूल्य | मालमत्ता कर | वसूल केलेला विशेष शिक्षण उपकर | वसुली करणे आवश्यक असलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नारायणलाल चौथाराम सुथार | 282/3/1 नारपोली | 7759 | 2017 | 61 | 233/- |
| 2 | अनिल सुरेश चौधरी | 76/0 टेमघर | 583 | 152 | 5 | 18/- |
| 3 | नरेश दत्तात्रय पाटील, | 307 ब्राम्हण | 9033 | 2349 | 70 | 271/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | निकिता नरेश पाटील | आळी | | | | |
| 4 | अहमद आली खान किताबुल्ला | 413/1 कणेरी | 2333 | 607 | 18 | 70/- |
| 5 | अशोककुमार लहरीलालजी दीडवानिया | 282/3/1 नारपोली 2 | 4562 | 1186 | 36 | 137/- |
| 6 | राजशेखर भूमय्या अल्ले | 42/18 फेणे | 3969 | 1032 | 31 | 119/- |
| 7 | मोहम्मद शारीक अहमदखान, मोहम्मद सारीब शकील अहमदखान | 2385/ नागाव 1 | 3596 | 935 | 28 | 108/- |
| 8 | इफ्फत जहा मोहम्मद आजाद शैख | 1426 निजाम पुरा 4था मोहल्ला | 6793 | 1766 | 53 | 204/- |
| 9 | परवीन शकील अहमद मोमिन | 1426 निजामपुरा 4 था मोहल्ला | 9473 | 2463 | 74 | 284/- |
| 10 | कौसर परवीन शहाबुद्दीन खान | 1426 निजामपुरा 4 था मोहल्ला | 9590 | 2493 | 75 | 288/- |
| 11 | नजमा बानो अनसार अहमद मनसुरी | 1426 निजामपुरा 4 था मोहल्ला | 5912 | 1537 | 46 | 177/- |
| 12 | मोहम्मद रशीद मोहम्मद ताहीर अनसारी | 792/चाविंद्रा | 3694 | 960 | 29 | 111/- |
| 13 | शकीला बानो मोहम्मद हदीस चौधरी | 1365/ 4 था मोहल्ला | 3499 | 910 | 27 | 105/- |
| 14 | मोहम्मद हनीफ मोहम्मद अय्युब मोमिन | 1953/नागाव 2 | 4082 | 1061 | 32 | 122/- |
| 15 | भीमसेन गणपत सूर्यराव | 351/5 कासार | 1350 | 351 | 11 | 41 |

या प्रमाणे इतर प्रकरणात देखील अनियमितता झाली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा प्रकरणांचा आढावा घेऊन त्यामध्ये अनियमितता झाली आहे काय याची खात्री करुन,अनियमितता दूर करावी असे अर्धसमास पत्र क्रमांक 34 दिनांक 05/07/2018 अन्वये कळवूनही अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे. सदर रक्कम रुपये 2288/- वसुल करण्यात यावी.

DGPSAAM7402 (Ref No : 20, Hmm No : 34)

## *28 करमुल्यांकन विभागा अंतर्गत शासकीय मालमत्तांच्या कराच्या थकबाकीबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : कर महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2489128.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2489128.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 कलम 139(1)(अ) नुसार महानगरपालिका हददीत असणा-या शासकीय मालमत्तांची थकबाकी रुपये 2489128 वसूलीसाठी महानगरपालिकेकडून कोणतेही प्रयत्न् न केल्यामुळे कमी महसूल प्राप्त् झालेबाबत..***

भिवंडी निजामपुर महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या करमुल्यांकन विभागातील शासकीय मालमत्ता कराच्या नस्तीची तपासणी करता , महानगरपालिकेच्या हददीत एकूण 72 शासकीय मालमत्ता असून, अशा शासकीय मालमत्तांची मोठया प्रमाणावर कराची थकबाकी दिसून आली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ,1949 कलम 139 (1)(अ) नुसार जागा प्रत्यक्ष (शासनाकडून) किंवा महानगरपालिकेकडून धारण केल्या असतील तर त्यांच्या प्रत्यक्ष भोगवटादाराकडून मिळकत कर वसूल करण्यात येईल अशी तरतूद आहे.

सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार शासकीय मालमत्तांची कराची थक बाकी रक्कम रुपये 2489128/- (रुपये चोवीस लाख एकोणनव्वद हजार एकशे अठठावीस फक्त् ) थकीत आहेत. तरी सदर थकबाकी वसूल करण्यासाठी काय प्रयत्न् केले ? याबाबत अर्धसमास क्र .37 दिनांक 13/07/2017 अन्वये विचारणा करुन देखील अनुपालन प्राप्त् झाले नाही . त्यामुळे अशा मा लमत्ता कराच्या थकबाकी वसुलीबाबत महापालिकेची उदासिनता दिसून आली आहे . अश्या प्रकारच्या थकबाकीमुळे महानगरपालिकेचे दरवर्षी आर्थिक नुकसान होत असून , पर्यायाने महसूलात घट होत आहे . सदर बाबतीत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम (1)(अ) नुसार कार्यवाही महानगरपालिकेकडून झालेली नाही . याबाबत अर्धसमास पत्र क्र .38 दि.13/07/2018 अन्वये विचारणा करुन अनुपालन प्राप्त झाले नाही सबब परिच्छेद कायम करण्यात येत आहे . सदर रक्कम रुपये 2489128/- वसूल करण्यात यावी.

DGPSAAM7402 (Ref No : 21, Hmm No : 37)

## *29 करमुल्यांकन विभागा मधील मनपा हद्दीतील मोबाईल टॉवरच्या थकबाकीबाबत ...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : कर महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 28755838.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 28755838.00/-

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 कलम 139(1)(अ) नुसार महानगरपालिका हददीत असणा-या मोबाईल टॉवरची थकबाकी रुपये 28755838 वसूलीसाठी महानगरपालिके कोणतेही प्रयत्न न केल्यामुळे कमी महसूल प्राप्त झालेबाबत..***

भिवंडी-निजामपुर महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या करमुल्यांकन विभागामधील मोबाईल टॉवरच्या नस्तींची तपासणी करता , महानगरपालिकेच्या हद्दीत असणाऱ्या अश्या मोबाईल टॉवरची मोठ्या प्रमाणावर कराची थकबाकी दिसून आली.

सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार मोबाईल टॉवरची कराची थकबाकी रक्कम रुपये 28755838 ( रुपये दोन कोटी सत्त्याऐंशी लाख पंचावन्न हजार आठशे अडोतीस ) थकीत आहेत. तरी सदर थकबाकी वसूल करण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून आले नाही अश्या प्रकारच्या थकबाकी मुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. सदर बाबतीत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 139 (1)(अ) नुसार कार्यवाही महानगरपालिकेकडून झालेली नाही. या संदर्भात अर्धसमास क्रमांक 38 दिनांक 13/07/2018 अन्वये अनुपालन प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे . सदर रक्कम रु.28755838 वसूल करण्यात यावी.

DGPSAAM7402 (Ref No : 22, Hmm No : 38)

## *30 महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रिया तसेच कार्यवाहीमधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : घनकचरा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 105000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 105000000.00/-

***घनकचरा व्यवस्थापन विभागाने केलेल्या खर्चाच्या परीगणनेनुसार घनकच-याच्या विल्हेवाटीसाठी मासिक खर्च रु.91,67,500/- नुसार होत असून वार्षिक खर्च रु.2,36,10,000/- इतका होत आहे. मे.भुमिका यांच्या ठेक्यानुसार रु.357225/प्रति दिन अंदाजित किमान खर्च असून वार्षिक खर्च रु.12.86 कोटी इतका खर्च वाढला आहे. त्यामुळे वाढीव रु.10.50 कोटी च्या समर्थनार्थ कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही. सदरील रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.***

महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | निविदा प्रसिध्दी दिनांक | 20/10/2011 |
| 2 | निविदा कालावधी | 20/10/2011 ते 14/11/2011 |
| 3 | निविदा प्राप्त | 02 |
| 4 | फेर निविदा | 29/11/2011 |
| 5 | प्राप्त निविदा | 02 |

उपरोक्त निविदा कालावधीमध्ये एकूण 02 निविदा प्राप्त झाल्या.

1) मे.भुमिका ट्रान्सपोर्ट,मुंबई - दर रु.1440/टन

2) मे.ए टू झेड इंफ्रास्ट्रक्चर, हरयाना - दर रु.1528/टन

या पैकी न्युनतम देकार सादर करणा-या मे.भुमिका यांचेबरोबर दिनांक 1/12/2011 रोजी दरांच्या वाटाघाटी करुन त्यांनी रु.1299/टन हा दर निश्चित केला. व महापालिकेने स्थायी समिती ठराव क्र.13 दिनांक 16/12/2011 मध्ये मान्यता दिल्यानुसार तसेच महापालिकेने केलेल्या ठरावानुसार मे.भुमिका यांना जा.क्र.आरोग्य/694/12 दिनांक 24/01/2012 अन्वये तीन वर्षाच्या कालावधीसाठी कार्यादेश निर्गमित करण्यात आले. सदर कालावधी दिनांक 24/01/2012 ते 23/01/2015 असा होता.

कंत्राटाच्या कालावधीमध्ये कंत्राटदाराने कामे योग्य प्रकारे व समाधानकारकरीत्या केली नसल्याने स्थायी समितीने ठराव क्र.11 दिनांक 06/01/2014 नुसार कंत्राटदाराचे कंत्राट दिनांक 09/04/2014 पासून रदद केले. घनकचरा विल्हेवाट ही संवेदनशील व तातडीने करावयाची कार्यवाही असल्याने तदनंतरच्या काळामध्ये महापालिकेने स्थानिक पुरवठादारांकडून डंपर, मजूर, जेसीबी इ. उपलब्ध करुन घनकचरा विल्हेवाटीची कार्यवाही सुरु केली.

सदर कार्यवाहीमध्ये खालीलप्रमाणे झालेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.15 दि.14/06/2018

अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) घनकचरा व्यवस्थापन विभागाने केलेल्या खर्चाच्या परीगणनेनुसार घनकच-याच्या विल्हेवाटीसाठी मासिक खर्च रु. 91,67,500/- नुसार होत असून वार्षिक खर्च रु.2,36,10,000/- इतका होत आहे. मे.भुमिका यांच्या ठेक्यानुसार रु.357225/प्रति दिन अंदाजित किमान खर्च असून वार्षिक खर्च रु.12.86 कोटी इतका खर्च वाढला आहे. त्यामुळे वाढीव रु.10.50 कोटी च्या समर्थनार्थ कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही. सदरील रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2) मे.भुमिका ट्रान्सपोर्ट यांनी सफाईचे काम बंद केल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून साधनसामुग्री उपलब्धतेसाठी निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये न्युनतम देकार खालीलप्रमाणे प्राप्त झाले होते.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | बाबीचा तपशील | प्रति दिवस प्रति नग दर |
|---|---|---|---|
| 1 | श्री.अनिरुध्द बेरोजगार नागरी सेवा संस्था, भिवंडी | मजूर | रु.297/- |
| 2 | मे.अप्रांजित मागासवर्गीय सुक्षिशित बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था | डंपर | रु.2567/- |
| 3 | मे.अप्रांजित मागासवर्गीय सुक्षिशित बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था | जेसीबी (कैचीवाले) | रु.6750/- |
| 4 | मे.अप्रांजित मागासवर्गीय सुक्षिशित बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था | पोकलेन | रु.20700/- |
| 5 | श्री.अनिरुध्द बेरोजगार नागरी सेवा संस्था, भिवंडी | टाटा एसीई | रु.1152/- |

उपरोक्त मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये एकूण किती निविदाकारांनी भाग घेतला होता तसेच त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद दोन्ही निविदाकारांच्या दरांची न्युनता पडताळणी करणे शक्य नाही. तसेच मे.अप्रांजित मागासवर्गीय सुक्षिशित बेरोजगार नागरी सेवा सहकारी संस्था यांनी पोकलेनसाठी रु.21000/- प्रति दिवस असा दर सादर केला होता. वाटाघाटी करुन सदर दर रु.20700/- प्रति दिवस असा देकार दिला आहे. परंतू मजिप्राची दरसूची 2012चे अवलोकन करता पोकलेनचे दर रु.20000/- इतका होतो. त्यामुळे 8 तांसांचं दर रु.20000/-होतो. परीणामी 8 तासांचा दर रु.20000/- इतका होतो.त्यामुळे वाटाघाटीनंतर स्विकृत केलेले रु.20700/- प्रति दिवस हा दर रु.700/- इतका जास्त आहे याची खातरजमा विभागाकडून करण्यात आली नाही.

3) मे. भुमिका यांनी कंत्राट कालावधीमध्ये खालीलप्रमाणे साधन सामुग्री पुरविण्याचे मान्य केले होते.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

| अ.क्र. | साधन सामुग्री | एकूण नग |
|---|---|---|
| 1 | घंटागाडया | 76 |
| 2 | कॉम्पॅक्टर 6 क्यु.मी. | 5 |
| 3 | कॉम्पॅक्टर 14 क्यु.मी. | 5 |
| 4 | डंपर प्लेसर | 4 |
| 5 | डी.पी.बिन्स 4.5 क्यु.मी. | 50 |
| 6 | कॉम्पॅक्टर बिन्स 1100 लीटर | 120 |
| 7 | जे.सी.बी. | 1 |
| 8 | डंपर | 4 |
| 9 | कॉम्पॅक्टर 22 क्यु.मी. | 1 |

परंतू मे.भुमिका ट्रान्सपोर्ट यांचे कंत्राट रदद करण्यात आल्यानंतर महापालिकेने एकूण 5 प्रभागामध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे साधनसामुग्री उपलब्ध करण्यासाठी कंत्राटदार नेमले आहेत.

| | प्रभाग समिती 1 | प्रभाग समिती 2 | प्रभाग समिती 3 | प्रभाग समिती 4 | प्रभाग समिती 5 | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मजूर | 42 | 0 | 0 | 0 | 0 | 42 |
| जेसीबी | 03 | 04 | 04 | 04 | 05 | 20 |
| डंपर | 18 | 24 | 14 | 13 | 21 | 90 |
| घंटागाडया | 19 | 20 | 16 | 18 | 32 | 105 |
| ट्रक्टर ट्रॉली | 0 | 05 | 0 | 01 | 01 | 07 |

उपरोक्त साधनसामुग्री करीता कंत्राट करताना कोणत्याही निविदा प्रक्रियेचा अंवलंब केला गेला नाही. तसेच पुर्वीच्या कंत्राटाच्या तुलनेत फार मोठया प्रमाणावर साधनसामुग्री वापरली गेली आहे. त्यामुळे महापालिकेचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

4) मे.भुमिका ट्रान्सपोर्ट यांना देण्यात आलेले कंत्राट हे घनकचरा वजनावर विल्हेवाटीचे परीमाण होते. सदर कंत्राट रद्द करण्यात आल्यावर घेण्यात आलेल्या घंटागाडया व डंपर यांना वजन बंधनकारक न करता केवळ फे-यांवर देयकांची परीगणना करुन देयके प्रदान करण्यात आलेली आहे.

DMEMRMM6801 (Ref No : 13, Hmm No : 15)

## *31 वैदयकीय विभागातील दवाखाने तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्याकरीता खरेदी करावयाच्या औषध खरेदीच्या कार्यवाहीमध्ये झालेल्या अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : वैद्यकीय महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***वैदयकीय विभागाने वित्तिय वर्ष 2014-2015 या वर्षामध्ये एकूण 12.05 लाख इतक्या रकमेची औषधे खरेदी केली आहे. सदर औषधे खरेदी करता दोनदा दरपत्रके तसेच एकदा स्थानिक निविदा मागविण्यात आल्या आहेत. दरपत्रके मागविताना आवश्यक असलेले औषधांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी दवाखाने तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्याकडून कोणतेही मागणीपत्र घेण्यात आले नाही.***

महापालिकेच्या वैदयकीय आरोग्य विभागांतर्गत वित्तिय वर्ष 2014-2015 मध्ये दवाखाने व प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्याकरीता करण्यात आलेल्या औषधे व तत्सम बाबींच्या खरेदीच्या कार्यवाही मध्ये खालीलप्रमाणे अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.36 दि12/07/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता या बाबबतचे अनुपालन पत्र क्र.1186/18 दि.04/04/2018 रोजी विभागाकडून प्राप्त झाले असून त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

**1)** वैदयकीय विभागाने वित्तिय वर्ष **2014-2015** या वर्षामध्ये एकूण **12.05** लाख इतक्या रकमेची औषधे खरेदी केली आहे**.** सदर औषधे खरेदी करता दोनदा दरपत्रके तसेच एकदा स्थानिक निविदा मागविण्यात आल्या आहेत**.**

**2)** दरपत्रके मागविताना आवश्यक असलेले औषधांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी दवाखाने तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्याकडून कोणतेही मागणीपत्र घेण्यात आले नाही**.**

**3)** दरपत्रके संगणकीय प्रणालीवर प्रसिध्द केल्याचे तसेच वृत्तपत्रांमध्ये जाहिराती देण्यात आल्याचे अभिलेख आढळून आले नाहीत**.** तसेच दरपत्रके स्थानिक सूचना फलकांवर लावण्यात आल्याबाबत कोणतीही छायाचित्रे अभिलेखात आढळून आली नाहीत**.**

DMEMRMM6801 (Ref No : 16, Hmm No : 36)

## *32 स्थानिक संस्था कर वसुलीमधील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 309720487.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 309720487.00/-

***स्थानिक संस्था कराचे अंदाजपत्रकात दाखविलेले उद्दीष्ट व प्रत्यक्षात वसुली यात तफावत आहे. प्राप्त झालेल्या सर्व वार्षिक विवरणपत्रांची तपासणी विभागाने केली नाही. महापालिकेने प्राधिकृत केलेल्या बँकेत परस्पर कराच्या रकमा भरणा केल्या जातात. परंतु त्यांचा ताळमेळ घेतला नाही. त्यामुळे विभागाने केलेली वसुली आणि लेखा शाखेकडे जमा असणारी रक्कम यात एकूण तफावत रु.1516487/- इतकी आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीचे तुलनेत स्थानिक संस्था कर उत्पन्न 2014-15 मध्ये रु.30.82 कोटी रुपयाने कमी झाले आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीसाठी शास्त्रोक्त पध्दतीचा वापर न करणे, कर निर्धारण प्रकरणांचे अंतिम निर्धारण न करणे, थकबाकीदार करदात्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही न करणे, या बाबीमुळे अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा प्रत्यक्षात उत्पन्नात रु.30.82 कोटी चे नुकसान झाले आहे.***

1. स्थानिक संस्था कर विभागाने, महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 2 (ग)- एकुण 11 बँकांना महापालिकेचे वतीने स्थानिक संस्था कराची रक्कम स्वीकारण्यासाठी प्राधिकृत केले आहे. लेखापरीक्षण काळात या कराची वसुली प्राधिकृत बँकाव्दारे केली आहे. नोंदणी फीची रक्कम पावती पुस्तकाव्दारे वसुल केली आहे.

2. महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम 3 व 9 नुसार नोंदणी प्रमाणपत्र असल्या शिवाय व्यापारी संस्थेस कोणताही व्यवसाय करता येत नसून, सन 2014-15 पर्यंत नोंदणी झालेल्या व्यापारी संस्था 11480 आहेत. महानगरपालिका क्षेत्रात व्यापा-यांची नोंदणी करण्यासाठी विभागातील उपलब्ध कर्मचारी वर्गाकडून सर्वेक्षण करण्यात येऊन त्यानुसार व्यापारी संस्थांची नोंदणी करण्यात आलेली असून, सर्वेक्षण अहवाल कार्यालयास सादर केला, त्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. महानगरपालिकेच्या परवाना विभागाकडून विविध प्रकारच्या व्यवसायांसाठी परवाने देण्यात येतात. तथापि परवाना विभागासोबत योग्य तो समन्वय साधुन स्थानिक संस्था कर वसुली धारकांची संख्या निश्चित केल्याचे दिसून येत नाही. म्हणजेच ज्या व्यापारी संस्थांना महानगरपालिकेच्या परवाना विभागाकडून , परवाने देण्यात आलेले आहेत त्या व्यापारी संस्थांची नोंदणी झाल्याचे तपासुन पाहता आले नाही. तसेच मनपा क्षेत्रात मोठयाप्रमाणात मालाची आयात करणारे व्यावसायिक जसे बांधकाम व्यावसायिक, सोन्याचा व्यापार करणारे व्यावसायिक, पेट्रोल पंप्स , पॉवर लुम्स, औदयोगिक परवाने धारक, वाहनांचे सुटे भाग, बिल्डींग व मटेरीअल, गोडाऊन यांची वर्गवारी निहाय नोंदणी बाबतची सांख्यिकी माहिती विभागाकडे उपलब्ध झाली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचा मुख्य उत्पन्न देणाऱ्या स्त्रोताकडून क्षमते इतके उत्पन्न निर्माण करण्यासाठी आवश्यक सांख्यिकी माहिती नसल्यामुळे विभागाला अपेक्षित उत्पन्न मिळु शकलेले नाही.

3. अंदाजपत्रक करतांना विभागाने पाठविलेल्या माहितीचे आधारावर संभाव्य वसुलीची रक्कम

ठरविण्यांत येते. स्थानिक संस्था कर विभागाचा वसुलीचा अंदाज पाहता तो ढोबळ मानाने केल्याचे दिसून येते. 2014-15 मध्ये रक्कम रु.180 कोटीचे उददीष्ट असतांना प्रत्यक्ष वसुली रु.149.17 कोटी झाली. वसुलपात्र व्यापारी संस्थांची रक्कम अंदाजपत्रक तयार करतांना जमेस धरली नसल्याने अंदाज चुकीचे केले गेले. त्याचा परिणाम विभागाचे वसुलीवर झाला आहे. अंदाजपत्रकीय तरतूदीच्या तुलनेत प्रत्यक्ष स्थानिक संस्था कर उत्पन्न हे 2014-15 मध्ये रू.30.82 कोटीने कमी झाले आहे.
अंदाजपत्रकीय तरतूदीसाठी शास्त्रोक्त पध्दतीचा वापर केलेला नाही, कर दात्याचे लेख्यांची तपासणी अंती निर्धारण अंतीम न करणे, अशा प्रशासकीय त्रुटी व वित्तीय नियोजना अभावी महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नाचे या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकीय तरतदीच्या तुलनेत रू.30.82 कोटीचा कमी महसूल प्राप्त झालेला आहे.

4. महानगरपालिकेने वार्षिक विवरणपत्र तपासण्यासाठी सन 2014-15 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या विक्रीकर विभागातून सेवानिवृत्त झालेल्या 01 कर्मचा-याची मानधनावर तात्पुरती नियुक्ती केली आहे. 2014-15 मध्ये एकुण 4086 व्यावसायिकांकडून वार्षिक विवरणपत्रे विभागास प्राप्त झाली आहेत. त्यापैकी केवळ 09 विवरणपत्रांचे निर्धारण केले आहे. प्राप्त झालेल्या सर्व विवरणपत्रांचे निर्धारण न केल्याने तसेच मोठया उलाढालीच्या व्यावसायिकांचे निर्धारण प्रलंबित ठेवल्यामुळे प्रलंबित असलेल्या कराची रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झाली नाही व त्यातुन महापालिकेच्या महसुलात मोठी घट/अपेक्षीत वाढ झाली नाही.

5. स्थानिक संस्था कर विभागाचे काम 06 सर्कलमार्फत केले जाते. महानगरपालिकेने आकारणी करुन दिलेल्या कराचा भरणा खातेदार महानगरपालिकेने प्राधिकृत केलेल्या एकुण 11 बँकेत परस्पर करतात. बँका प्राप्त होणा-या तीन चलनांच्या प्रतीपैकी एक प्रत स्वत: कडे ठेवून एक प्रत व्यापारी संस्थेस व एक प्रत स्थानिक संस्था कर विभागास पाठवितात. विभागाला प्राप्त झालेल्या चलनाच्या प्रतीनुसार वसुलीची नोंद विभागाच्या संगणकात व संबंधीत नोंदवही, P रजिस्टरमध्ये केली जाते. दिवसभरात प्राधिकृत बँकानी वसुल केलेल्या रकमेचे विवरणपत्र विभागास पाठविले जाते. विवरणपत्र प्राप्त झाल्यानंतर विभाग प्रत्येक तारखेस प्राधिकृत बँकेने वसुल केलेल्या रकमेची नोंद एका नोंदवहीत घेवून एकत्रिकरण केले जाते. विभागाने प्राधिकृत बँकेमार्फत केलेल्या वसुलीचे एकत्रित चलन करुन लेखा विभागास पाठविलेले नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या लेख्यात रोजच्या वसुलीची नोंद झाली नाही.
स्थानिक संस्था कर विभागाने प्राधिकृत केलेल्या 11 बँकेच्या खाती जमा असलेली रक्कम लेखापरीक्षणाचे वेळी विभागाने मासिक विवरणपत्रानुसार दर्शविलेली या कराच्या वसुलीची एकुण रक्कम आणि महानगरपालिकेच्या रोखवहीत घेतलेली एकुण कर वसुलीची रक्कम यात तफावत असल्याचे दिसून आले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | स्थानिक संस्था कर विभागाने दाखविलेली वसुलीची रक्कम रु. | लेखा विभागाने दाखविलेली वसुलीची रक्कम रु. | तफावत रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | 2014-15 | 1493312487 | 1491796000 | 1516487 |

एकुण तफावतीची रक्कम रु. 1516487 आहे. ही रक्कम महानगरपालिकेच्या निधीमध्ये कमी असल्याचे दिसून येते. माहे मार्च अखेर प्राधिकृत बँकेकडे किती शिल्लक रक्कम राहिली याचा

ताळमेळ (Reconciliation) स्थानिक संस्था कर विभागाने, लेखा विभागाने घेतलेला नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.95 दि.19/09/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे. सदर रक्कम रुपये 309720487 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. (रु.1516487 + रु. 308204000 )

DGPSAAM7402 (Ref No : 29, Hmm No : 95)

## *33 बिनतारी संदेश यंत्रणा खरेदीवरील निष्फळ खर्च*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : संगणक निगा व संगणक स महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1085180.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1336516.00/-

***महानगरपालिकेने बिनतारी यंत्रणा खरेदी करण्यापूर्वी त्याचे अचूक अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तथापि आवश्यकता नसतांना बिनतारी यंत्रणेचे एकुण 97 नग खरेदी केले व बिनतारी संदेश यंत्रणेचे एकुण 54 नग बंद ठेवले त्यामुळे 54 नग खरेदीसाठी करण्यात आलेला रक्कम रु.1085180 एवढा खर्च निष्फळ झाला.***

महानगरपालिकेने अत्यावश्यक विभागाकरीता बिनतारी संदेश यंत्रणा (युएचएफ) मे. आर्या ओम्नीटॉक वायरलेस सोल्युशन प्रा.लि.नवी मुंबई यांचेकडून कार्यादेश क्रमांक संगणक टे. क्र.6/86 दि.8/8/2012 व संगणक टे.क्र.6/278 दि.15/2/2013 अन्वये बिनतारी संदेश यंत्रणा म्हणजे 57-नग वॉकीटॉकी व 40 नग बेससेट खरेदी केले होते. त्यापैकी महानगरपालिकेने दि.1/08/2014 पासून बिनतारी संदेश यंत्रणेचे 54 नग (38 वॉकी टॉकी व 16 बेससेट) बंद केल्यामुळे सदर खरेदीचा खर्च निष्फळ झाला. यासंदर्भात लेखापरिक्षण विभागाने अर्धसमास क्र.90 दि.18/9/2018 रोजी दिला होता तथापि सदर अर्धसमासाचे विहित कालावधीत अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. महानगरपालिकेने बिनतारी यंत्रणा खरेदी करण्यापुर्वी त्याचे अचुक अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तथापि आवश्यकता नसतांना बिनतारी यंत्रणेचे एकुण 97 नग खरेदी केले व वरील प्रमाणे बिनतारी संदेश यंत्रणेचे एकुण 54 नग साधारणत: दिड वर्षातच कोणत्याही तांत्रिक कारणाशिवाय बंद केले. त्यामुळे 54 नग खरेदीसाठी करण्यात आलेला रक्कम रु.1085180 एवढा खर्च निष्फळ झाला.

| Sr. | Details | Unit rate | Qty. | Amt. |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | kenwood make Tk 480 Handheld Trunk Radio in 806 to 870 Mhz band with battery adapter & charger | 18710 | 38 | 710980 |
| 2. | kenwood make Tk 480 vehicle mounted Franking Radio in 806 to 870 Mhz band with vehicle mount antenna & cable | 20711 | 8 | 165688 |
| 3. | kenwood make Tk 980 Base staion franking radio in 800 Mhz band with power supply cable & GP antenna | 26064 | 8 | 208512 |
| | एकुण | | 54 | 1085180 |

2. केंद्रीय सतर्कता आयोग परिपत्रक क्र. 4(3)/2007क्र.005/सिआरडी/012 दि. 3 मार्च 2007 अन्वये कामाच्या निविदा काढताना कामामध्ये अंतर्भूत बाबीच्या अनुषंगाने विविध ठोक वितरकाकडून दर पत्रक मागविणे व दरपत्रकाच्या अनुषंगाने प्रचलित बाजारभावाची प्रत्यक्ष खात्री करून दरपृथ:करण तपासणी अंती संबधित सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेऊन अशा बाबी पूर्वगणनपत्रकात समविष्ट केल्याशिवाय पूर्वगणनापत्रक सक्षम अधिकाऱ्याच्या तांत्रिक/प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करू नये. तसेच निविदा प्रक्रिया राबवू नये. अशी नियमात तरतुद आहे. तथापि सदर खरेदीची धारीका उपलब्ध करुन न दिल्यामुळे बिनतारी संदेश यंत्रणा खरेदी प्रकीया नियमानुसार झाल्याबाबत खात्री करता आलेली नाही.

3. बिनतारी संदेश यंत्रणा खरेदीसाठीची तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेच्या सक्षम अधिका-याच्या प्रती लेखापरिक्षणास उपलब्ध् करुन न दिल्यामुळे सदर यंत्रणा खरेदीपूर्वी नियमानुसार सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यता घेतली किंवा नाही याबाबत भाष्य करता आले नाही.

DPSMAWM7701 (Ref No : 30, Hmm No : 30)

## ***34 महानगरपालिकेतील प्रींटरसाठी नवीन कॉम्पटेबल टोनर खरेदी करण्या बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष : संगणक साहित्य खरेदी महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

गुंतलेली रक्कम रु. 908280.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 908280.00/-

अंतिम अमान्य रक्कम रु. 908280.00/-

***महानगरपालिकेने कॉम्पिटेबल टोनर खरेदी करतांना शासन निर्णयानुसार पुनर्प्रत्ययी आदेश देतांना पालन करावयाच्या मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी केली नाही. तसेच मालाच्या दर्जाविषयी त्रयस्थ संस्थाकडून प्रमाणपत्रे, पूर्वतपसणी, पुरवठापूर्व तपासणी केल्याचे आढळून आले नाही. निविदा सुचनामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे अनामत रक्कम देयकातुन कपात केल्या बाबतचे अभिलेख उपलब्ध करुन न दिल्यामुळे अनामत रक्कम देयकातुन वसूल केल्या बाबतची खात्री करता आली नाही. महानगरपालिकेने टोनर रिफीलींग करण्याएवजी कॉम्पिटेबल टोनर खरेदी केल्यामुळे महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.***

कामाचे नाव:- महानगरपालिकेतील प्रींटरसाठी नवीन कॉम्पिटेबल टोनर खरेदी करण्याबाबत.

लेखाशिर्ष:- संगणक निगा व संगणक साहित्य् खरेदी

अंदाजपत्रकीय तरतुद :- 1,40,00,000/-

प्रशासकीय मान्यता ठराव क्र. नाही दि. 15/3/2013

अंदाजपत्रकीय रक्कम :- 18,22,200/-

निविदा रक्क्म :- 18,22,200/-

अनामत रक्क्म :- 36444/- रोख व बिलातून 36444/-

इसा-याची रक्क्म :- 18222/-

एकुण प्राप्त् निविदा :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | प्राप्त् दर |
|---|---|---|
| 1 | ओमनी टेक | अंदाजपत्रकापेक्षा 3% कमी |
| 2 | झेब्रा टेक | अंदाजपत्रकापेक्षा 4% जास्त् |
| 3 | एक्सेल टेक | अंदाजपत्रकापेक्षा 0.05% कमी |

न्युनतम निविदादार व दर - ओमनी टेक

मा.आयुक्तांची मंजुरी :- दि.15/05/2013

स्थायी समिती मान्यता :- दि.21/06/2013

करारनामा क्र. 139/2013 दिनांक 5/06/2013

कार्यादेश क्र. 58, दिनांक 7/06/2013

कामाची मुदत :- 12 महीने

कामावर एकुण झालेला खर्च:- 908280/-

प्रमाणक क्रमांक 577 दिनांक:-7/01/2015

महानगरपालिकेने प्रमाणक क्रमांक 3630/30/03/2015 ACT/3638/7/2/2015 अन्वये मे.ओमनी टेक

सोल्युशन्स यांचेकडून 88A या प्रिंटरसाठी एकुण 200 नग कॉम्पिटेबल टोनर रक्कम रुपये 4 लक्ष् एवढे खरेदी केले याबाबत संगणक विभागास अर्धसमास पत्र क्र.91दि.18/9/2018 अन्वये विचारणा करण्यात आली होती तथापि अद्याप पर्यंत संबंधित विभागाकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही यासंदर्भामध्ये खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1. महानगरपालिकेने रुपये 3194650/- एवढया रकमेचे एच.पी.कंपनीचे टोनर यापूर्वी खरेदी केल्याचे नमुद असून सदरचे टोनर पुन्हा रिफीलींग करुन वापरणे योग्य् झाले असते. मात्र ही बाब वेळीच माहीत नसल्याने वापर झालेले टोनर भांडारगृहात जमा केल्याने पुन्हा वापर केल्यास योग्य् रिझल्ट मिळणार नसल्याचे दि.23/1/2013 रोजीच्या टिप्पणी मध्ये नमुद केले आहे. वास्तविक नव्याने खरेदी केलेले टोनर हे वापरण्यास योग्य् नसल्याबाबत संबंधीत कंपनाचे पत्र संगणक विभागाने घेणे आवश्य्क होते. तथापि कोणताही तांत्रिक सल्ला न घेता कॉम्पटेबल टोनर खरेदीसाठी प्रस्तावित केले. ही बाब नियमास धरुन नाही.

2. संगणक विभागाने 88A चे 200 नग टोनर आवश्य्क असल्याबाबतचे संबंधित विभागांचे मागणीपत्र धारिकेसोबत संलग्न् केले नाही. त्यामुळे विभागाने आवश्यकता तथा मागणी नसताना सदरचे टोनर खरेदी केले आहे.

3. संगणक विभागाने खरेदी केलेले एकूण 389 कॉम्पिटेबल टोनर हे कॉम्पिटेबलच आहेत या बाबतचा तांत्रिक निरीक्षण अहवाल असलेले अभिलेखे धारीकेमध्ये आढळून आले नाही. त्यामुळे प्राप्त् झालेले टोनर हे कॉम्पटेबल असल्याबाबत खात्री करता आली नाही. म.शा.उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भांखस 1088/ (2512)/उद्योग-6 दि.02/01/1992 मधील 8.4 नुसार चिन्हांकित (BIS इ.) नसलेल्या वस्तुंची खरेदी करताना खरेदीदार विभाग स्वतःच एखाद्या वस्तुच्या दर्जाविषयी तपासणी करु शकत नसेल अशा वेळी मालाच्या दर्जाविषयी त्रयस्थ संस्थाकडून प्रमाणपत्रे, पूर्वतपसणी, पुरवठापूर्व तपासणी करुन घेणे बंधनकारक आहे. याकरिता निविदा काढताना वस्तूची तपासणी ज्या संस्थेद्वारे करावयाची आहे त्या त्रयस्थ संस्थेचे नाव यांचा उल्लेख संबंधित खरेदी अधिका-याने करणे आवश्यक आहे. तथापि महानगरपालिकेने कॉम्पिटेबल टोनर खरेदी करतांना मालाच्या दर्जाविषयी त्रयस्थ संस्थाकडून प्रमाणपत्रे, पुर्वतपसणी, पुरवठापुर्व तपासणी केल्याचे आढळून आले नाही.

4. महानगरपालिकेस मे.ओम्नी टेक सोल्युशन्स् यांनी खालील प्रमाणे सन 2014-15 मध्ये कॉम्पटेबल टोनर चा पुरवठा केलेला आहे.

| अ.क्र | कॉम्प्याटॅबल टोनर चा प्रकार | नग | दर | कार्यादेश क्र. | प्रमाणक क्र. व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 12A<br>36A<br>88A<br>P500 | 54<br>06<br>48<br>12 | 2000<br>2000<br>2000<br>290 | 286<br>दि.1/1/2014 | 269 दि.19/8/2014 | 238140 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | MT661<br>FRANKING | 12<br>03 | 430<br>4500 | | | |
| 2 | 12A | 54 | 2000 | 392<br>दि.25/2/2014 | 267<br>दि.19/8/2014 | 108000 |
| 3 | 88A | 200 | 2000 | 417<br>दि.3/3/2014 | 577<br>दि.7/01/2015 | 400000 |
| | एकूण | 389 | - | - | - | 746140 |

महानगरपालिकेने वरील तक्त्यामधील नमुद एकूण 389 कॉम्पिटेबल टोनर खरेदी केले आहे. विभागाने स्टॉक रजिष्टर उपलब्ध न करुन दिल्यामुळे एकूण 389 टोनर प्राप्त झाल्याबाबत खात्री करता आली नाही. तसेच सदर टोनर कोणत्या विभागास वाटप केले याबाबत देखील खात्री करता आली नाही. तसेच महानगरपालिकेतील इतर विभागांचे मागणीपत्र व त्यांनी जुने टोनर संगणक विभागास जमा केले बाबतची नोंद असलेले अभिलेख संगणक विभागाने उपलब्ध् करुन न दिल्यामुळे जुन्या टोनरच्या विल्हेवाटी बाबत अभिप्राय नोंदविता आले नाही.

5. करारनाम्या मध्ये पुरवठादाराच्या देयकातुन 5% सुरक्षा ठेव रक्क्म कापुन घेतली जाईल असे नमुद आहे. त्यापैकी निविदा भरताना रक्क्म रु.18222/-D.D. स्वरुपात उर्वरित 4% रक्क्म बिलाची रक्क्म प्रदान करताना कपात करणे बाबत नमुद आहे. तथापि नमुना 22 बिलाची पहाणी केली असता 2% सुरक्षा ठेव देयकातून कपात करणेत आली असून उर्वरीत 2% एवढी सुरक्षाठेव कमी कपात करण्यात आलेली आहे ही बाब नियमबाहय आहे. निविदा सुचनांमध्ये अनामत रक्कम बिलातून 36444/- कपात केल्या बाबतचे अभिलेख उपलब्ध करुन न दिल्यामुळे. अनामत रक्कम देयकातुन वसूल केल्याबाबत खात्री करता आली नाही.

6. महानगरपालिकेने सन 2013-14 व 2014-15 मध्ये खालील प्रमाणे वेगवेगळया प्रकारचे कॉम्पिटेबल टोनर खरेदी केलेले आहेत.

| अ.क्र. | टोनरचा प्रकार | खरेदी केलेले नग | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1) | 12A | 216 | 2000 | 432000 |
| 2) | 36A | 12 | 2000 | 24000 |
| 3) | 88A | 401 | 2000 | 802000 |
| 4) | P-500 | 24 | 290 | 6960 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5) | MT661 | 24 | 430 | 10320 |
| 6) | FRANKING | 6 | 4500 | 27000 |
| 7) | 78A | 172 | 2200 | 378400 |
| 8) | 16A | 60 | 3500 | 210000 |
| 9) 49A | 49A | 60 | 2100 | 126000 |
| | एकूण | 975 | | 2016680 |

उपरोक्त् तक्त्याचे अवलोकन करावे. महानगरपालिकेने वेगवेगळया प्रकारचे एकुण 975 कॉम्पिटेबल टोनर खरेदी केले असून त्यासाठी एकुण रक्कम रुपये 20,16,680/-एवढा खर्च केला आहे. टोनर रिफीलींगसाठी अंदाजित रक्कम रुपये 200/- एवढा खर्च येत असून त्याचा सेवा संविधा करार करून संबंधित कंपनीकडून टोनर रिफीलींग करणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने एकुण 975 कॉम्पिटेबल टोनर खरेदी केल्यामुळे महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

7. महानगरपालिकेने टोनर खरेदी करण्यापुर्वी अचुक वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागवून संपुर्ण वर्षासाठी कॉम्पीटेबल टोनर खरेदी केल्याचे नमुद आहे. तथापि महाराष्ट्र शासनाकडून ई-गव्हर्नस अंतर्गत 24 नग प्रिंटर पुरविल्यामुळे नव्याने 88A चे 200 नग व 78A चे 100 नग जादा खरेदीबाबतचे प्रयोजनाबाबत अभिप्राय नोंदविता आले नाही. संबंधित विभागांची मागणी नसताना खरेदी करणे ही बाब नियमास धरुन नाही.

8. मेसर्स ओमनी टेक या कंपनी बरोबर करण्यात आलेल्या कराराची मुदत दि.06/06/2014 रोजी संपली असून कोणतीही कारण मिमांसा न देता पुन्हा खरेदीसाठी मुदतवाढ दिली आहे. महानगरपालिकेने महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भारवस 1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय मुंबई-क दिनांक 2/1/1992 च्या शासन निर्णयातील 8.3 (ह) मधील पुनर्प्रत्यची आदेश बाबत मार्गदर्शक तत्वाचे पालन केले नाही त्यामुळे महानगरपालिकेने शासन निर्णयाचे पालन न करता खेरेदीस मुदत वाढ दिली ही बाब नियमास धरुन नाही.

DPSMAWM7701 (Ref No : 32, Hmm No : 32)

## *35 प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामी सेवा पुरविणे या कामात झालेल्या अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 16**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा निगा व दु महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2490306.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1060467.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 473403.00/-

***महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागाअंतर्गत प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत पाईप लाईन निगा व दुरुस्तीसाठी सन 2014-15 करिता सेवा पुरविण्यासंदर्भात कामाचे निरिक्षण करणे व अभिलेख जतन करणे ही ठेकेदाराची जबाबदारी आहे. त्यासाठी महानगरपालिकेने ठेकेदारास रु.129780 एवढे जादा प्रदान केल्यामुळे मनपाचे नुकसान झाले आहे. तसेच कंत्राटदाराने अंदाजपत्रकीय वस्तुंच्या संख्येपेक्षा जादा वस्तुंचा वापर केल्याने मनपास रु.181065 एवढी जादा रक्कम दिल्यामुळे मनपाचे नुकसान झाले आहे. कंत्राटदाराने कामगारांचा ईपीएफ काढला नाही त्यामुळे कंत्राटदाराकडून रु132558/- एवढी रक्कम वसूलपात्र ठरविण्यात आली आहे.***

कामाचे नाव:- प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत पाईप लाईन निगा व दुरुस्तीकामी सन 2014-15

करीता सेवा पुरविणे

प्रशासकीय मान्यता ठराव क्र. नाही दि.15/01/2014

अंदाजपत्रकीय रक्कम :- 24,90,306

तांत्रिक मान्यता :- vide item no.154 of 2013-14 date 03/02/2014

निविदा रक्कम :- 24,90,306 निविदापत्र किंमत :- 5,000/-

अनामत रक्कम :- 49,806 रोख व 49,806/- बिलातून

एकुण प्राप्त् निविदा :- 10/02/2014 -पुण्यनगरी मागणी 041/03/2014

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1 | निखिल इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकापेक्षा 3% कमी |
| 2 | सुभाष कंन्सट्रक्शन | अंदाजपत्रकापेक्षा 4% जास्त |
| 3 | विश्व उद्योग म.का.संस्था | अंदाजपत्रकापेक्षा 0.05% कमी |

न्युनतम निविदादार व दर -निखिल इंटरप्रायझेस- 3% कमी

कार्यादेश क्र. व दिनांक :- भिनिशमपा/पापुवि/जा.क्र.305/2014 दिनांक 31/05/2014

कामावर एकुण झालेला खर्च :- 23,62,317/-

पाणी पुरवठा विभागातील प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत पाईप लाईन निगा व दुरुस्तीसाठी सन 2014-15 करिता सेवा पुरविण्यासंदर्भात अर्धसमास पत्र क्र.74 दि.5/9/2018 रोजी देण्यात आले तथापि

अद्यापपर्यंत सदर अर्धसमासाचे अनुपालन लेखापरीक्षण पथकास प्राप्त झाले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

1. सदर कामासाठी दि.05/03/2014 रोजी निविदा उघडण्यात आल्या परंतू निविदाकार यांचेकडून स्विकारलेला निविदेचा लिफाफा क्र. 2 धारिकेत आढळून येत नाही. धारिकेमध्ये सुभाष कन्स्ट्रक्शन यांची कागदपत्रे वगळता दोन निविदाकारांचे कागदपत्र उपलब्ध् नाही. त्यामुळे निविदा प्रक्रिया नियमानुसार व स्पर्धात्मक असल्याबाबत खात्री करता आली नाही.

2. अंदाजपत्रकातील बाब क्र. 2 मध्ये अभिलेख जतन करणे व साईट व्हीझीट करणे या बाबी नोंदविल्या आहेत. वास्तविक बाब क्र. 2 मध्ये नमुद काम पुर्ण करणे हे ठेकेदाराचे कर्तव्य आहे. आपल्या कामाचे निरिक्षण करणे व अभिलेख जतन करणे ही ठेकेदाराची जबाबदारी आहे. त्यासाठी महानगरपालिकेने मोबदला देणे संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे अंदाजपत्रकातील बाब क्र.2 वर ठेकेदारास प्रदान केलेले रक्कम रु.129780/- एवढे मनपाचे नुकसान झाले असून सदरची रक्कम रु.129780/- ठेकेदाराकडून वसूल करण्यात यावी.

3. प्रभाग समिती क्रमांक 3 मधील निगा व दुरुस्ती कामासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील बाबींच्या रकमांमध्ये व ज्या आधारे अंदाजपत्रक तयार केले महाराष्ट्र जीवन प्राधीकरण (MJP) मधील दरांमध्ये खालील प्रमाणे तफावत आढळली आहे.

| अ.क्र. | मोजमाप पुस्तकेतील बाब क्र. व पृष्ठ क्र. | प्रत्यक्ष वापरण्यात आलेल्या वस्तुंचे प्रमाण | जिल्हादर सुचीदराच्या (MJP) 10% पेक्षा जादा दराने आकारण्यात आलेल्या दरातील फरक | महानगरपालिकेने जादा अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | बाब क्र.8 व पृष्ठ क्र.90 ते 104 | 150mm-24 | 42.18 | 1012.32 |
| 2 | बाब क्र.13 | 30 | 440.00 | 13200.00 |
| | | | एकूण | 14212.32 |

उपरोक्त तक्त्यामधील बाबींचे अंदाजपत्रकीय दर हे महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांनी ठरविलेल्या दरांचा आधार घेऊन तयार करण्यात आल्याचे कामाचे अंदाजत्रकामध्ये नमुद करण्यांत आले असून सदर तांत्रिक प्रस्तावास कार्यकारी अभियंता यांची दिनांक 03/02/2014 रोजी मंजुरी मिळालेली आहे. तथापि उपरोक्त नमुद वस्तुंचे दर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन 2012-13 मधील दर 10% पेक्षा जादा दराने असल्याने वर नमुद रक्कम रुपये 14212.32 बाबत विभागास कारणमिमांसा विचारण्यात आली होती तथापि अनुपालन अप्राप्त असल्यामुळे अंदाजपत्रक अचूक असल्याबाबत खात्री करता आली नाही.

4. अंदाजपत्रकामध्ये बाब क्र.2,5,9,13 मधील(I) व (II) मध्ये घेण्यात आलेल्या दरासमोर R.A.(Rate analysis) नमुद केले आहे. तथापि सदर R.A. मंजुर केल्याबाबत सक्षम अधिका-याचे मंजुरी घेतल्याचे नोंद व कागदपत्रे धारिकेत आढळून आले नाही. त्यामुळे सदर बाबीचे दर वस्तुनिष्ठ तथा वाजवी असल्याची खात्री करता आली नाही.

5. सार्वजनिक बांधकाम नियम 227(अ)(1) अन्वये कार्यकारी अभियंत्यांना वरीष्ठ प्राधिका-याकडून मंजुर करण्यात आलेल्या नेहमीच्या निविदांमध्ये त्यांनी स्वत: किंवा त्यांच्या अधिनस्त अधिका-यांनी तरतुद न केलेल्या कामाच्या अतिरीक्त बाबी संबंधात प्रत्येकी रुपये 10 हजार पर्यंत मंजुरीचे अधिकार आहेत.

जर एखाद्या एकमेव अतिरीक्त कामाचा खर्च रुपये 10 हजार पेक्षा अधिक किंवा त्यासाठी योजलेला दर हा विभागीय अनुसुचीत अगोरदच मंजुर करण्यांत आलेल्या दरांपेक्षा तो अधिक असेल तर अशा दरांसाठी अधिक्षक अभियंत्यांची पुर्व मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

अतिरीक्त् कामाचा / कामांचा जादा खर्च हा अगोदर करण्यात आलेल्या कामाच्या इतर निश्चितपणे होणा-या बचतीतुन भागविण्यात येतो, तेव्हा अतिरीक्त् कामाच्या दरांच्या यादीमध्ये संबंधीत बचतीचा विनिर्देश करण्यात यावा. परंतु काम पुर्णत्वाचे प्रतीवृत्ताची छाननी केली असता (नमुना 132) प्रतीवृत्तावर बचतीचा विनिर्देश केला नाही. तसेच तफावतीची तुलना करुन कमी व जादा रकमेसाठीचे स्पष्टीकरण नमुद केले नाही. (मनपा लेखासंहीता नियम 176)

बी-1 प्रकारच्या निविदेमध्ये मूळ अंदाजपत्रकात कोणतेही बदल करणे अपरिहार्य असल्यास सक्षम प्राधिका-याची लेखी पूर्वमंजुरी आवश्यक आहे. (महाराष्ट् सार्वजनिक बांधकाम नियम 228 अन्वये)

अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या वस्तु तथा बाबींपेक्षा जादा वस्तुंचा वापर करण्यात आला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

तक्ता- अ

| अ.क्र. | वस्तुचा तपशिल | अंदाजपत्रकात नमुद संख्या | मोजमाप पुस्तकेतील प्रत्यक्ष नोंदी | अंदाजपत्रकातील नोंदीपेक्षा जादा वापरलेल्या वस्तुंची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | बाब क्र.1 (i) लेबर | 2496 | 2508 | 10 |
| | (ii) फीटर | 624 | 642 | 18 |
| | (iii) वेल्डर | 30 | 33 | 03 |
| 2 | बाब क्र.4 | 07 | 8.24 | 1.24 |
| 3 | बाब क्र.5 | 250 | 328 | 78 |
| 4 | बाब क्र.6 | 125 | 148 | 23 |
| 5 | बाब क्र.7 | 10 | 12 | 02 |
| 6 | बाब क्र.10 (i) 80 mm | 50 | 81 | 31 |
| | (ii) 100 mm | 50 | 76 | 26 |
| | (iii) 150mm | 50 | 56 | 06 |
| 7 | बाब क्र.12 (i) 80 mm | 06 | 10 | 04 |

तक्ता-ब

| अ.क्र. | अंदाजपत्रकापेक्षा जादा वापरलेल्या वस्तुंचा तपशील | | | मनपाने दिलेली जादा रक्क्म |
|---|---|---|---|---|
| | तपशील | संख्या | दर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | बाब क्र.1<br>(i) लेबर<br>(ii) फीटर<br>(iii) वेल्डर | <br>10<br>18<br>3 | <br>315<br>399<br>483 | <br>3150.00<br>7182.00<br>1449.00 |
| 2. | बाब क्र.4 | 1.24 | 4955.50 | 6144.82 |
| 3. | बाब क्र.5 | 78.00 | 1210.00 | 94380.00 |
| 4. | बाब क्र.6 | 23.00 | 104.00 | 2392.00 |
| 5. | बाब क्र.7 | 2.00 | 1447.95 | 2895.90 |
| 6. | बाब क्र.10<br>(i) 80 mm<br>(ii) 100 mm<br>(iii) 150mm | <br>31<br>26<br>6 | <br>823.20<br>883.00<br>1587.60 | <br>25519.20<br>22958.00<br>9525.60 |
| 7. | बाब क्र.12<br>(i) 80mm | <br>4.00 | <br>1367.10 | <br>5468.40 |
| | | | एकूण | 181064.92 |

वरील तक्त-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय वस्तुंच्या संख्येपेक्षा जादा वस्तुंचा वापर केल्याने मनपास तक्ता-ब प्रमाणे जादा रुपये 181064.92 एवढी रक्कम द्यावी लागली असून त्यास सक्षम अधिका-याची मंजुरी घेतल्याचे आढळून येत नाही. सदर जादा वस्तुंच्या वापराबाबत महानगरपालिकेने कारणमिमांसा न दिल्यामुळे सदरची रक्कम रु.181065/- एवढी रक्कम ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

6. मोजमाप पुस्तीकेमध्ये सदर कामासाठी बाब क्र.1 बाबत खालील प्रमाणे तपशील नोंदविला आहे

| अ. क्र. | तपशील | एकुण तास | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | लेबर | 2508 | 315 | 790020 |
| 2 | फिटर | 642 | 399 | 256158 |
| 3 | वेूल्डर | 33 | 483 | 14289 |
| | | | एकुण | 1060467 |

उपरोक्त् तक्त्यातील तपशीलामध्ये सदर कामासाठी वापरण्यात आलेले लेबर, फीटर व वेल्डर यांचे हजेरीपट धारिकेसोबत न दिल्याने त्यांना प्रदान करण्यात आलेल्या रक्कम रुपये 1060467/- बाबत अभिप्राय नोंदविता आले नाही त्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

7. निविदेमध्ये नमुद कामावर वापरण्यात येणा-या कामगारांना अदा केलेल्या रकमेवर 12.50% दराने कर्मचारी निर्वाह निधी (EPF) कपात करुन कंत्राटदाराने सदर रक्कम कर्मचारी निर्वाह निधी (EPF) मध्ये जमा केल्याबाबतची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध् झाली नाही त्यामुळे कंत्राटदाराने कामगारांचा ईपीएफ काढल्याबाबतची खात्री करता आली नाही. कंत्राटदाराकडून रक्कम रु132558/- एवढी रक्कम वसूल करण्यात यावी.

8. कंत्राटदाराच्या धावते देयक क्र. 1,2 मधुन अनुक्रमे रु.5611/- व रु.7669/- एवढी रक्क्म विमा या लेखाशिर्षाखाली कपात केली आहे. कंत्राटी कामाची देय रक्क्म कंत्राटदारास प्रदान करण्याची तातडीची आवश्यकता भासल्यास कंत्राटी कामाच्या मुल्याच्या सरासरी अंदाजे रु.1/-(प्रति शेकडा) या दराने प्रदान करण्याबाबत नियमात तरतुद आहे. तथापि सदरची रक्क्म विमा कार्यालयास भरल्याबाबतचे चलन धारिकेत नमुद नाही. त्यामुळे कंत्राटदाराने नियमाप्रमाणे कामाचा व कामगारांचा विमा उतरविल्या बाबत खातरजमा करता आली नाही. नियमानुसार ठेकेदाराने कामाचा व कामगारांचा विमा उतरविला नाही ही बाब नियमबाहृय आहे.

9. कार्यादेशामध्ये सदर कामाची मुदत दि.31.03.2015 रोजी पर्यंत असल्याबाबत नमुद असुन कंत्राटदारास कार्यालयाचे पत्र क्र.भनिशमपा/पा.पु.वि./20/2015 दि.01/04/2015 अन्वये दि.1/4/2015 ते 30/05/2015 या दोन महिन्यांकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. कंत्राटदाराने सदरचे काम कार्यादेशाप्रमाणे 31/03/2015 या मुदतीत करणे आवश्यक होते. अन्यथा करारनाम्यातील अटीनुसार प्रतिदिन रु.500/- प्रमाणे दंडाची वसुली करणे आवश्यक होते. कंत्राटदाराने करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन केले आहे. महानगरपालिकेने करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटदाराकडून मुदतवाढीची सबळ कारण मिमांसा घेऊन दंडाची वसूली करुन कंत्राटदारास मुदतवाढ देणे आवश्यक होते. तथापि महानगरपालिकेने दंड व कारणाशिवाय मुदतवाढ दिली आहे. याबाबत विभागाने संयुक्तीक खुलासा सादर न केल्यामुळे कंत्राटदाराकडून रक्कम रु.30000/- एवढा दंड वसूल करण्यात यावा.

10. निविदेमध्ये नमुद केल्या प्रमाणे कंत्राटदाराच्या बिलातून रक्क्म रु.49806/- एवढी अनामत रक्कम कपात करणे आवश्यक होते.तथापि अनामत रक्क्म देयकातुन वसुल करून जमा केलेबाबतचे अभिलेख धारिकेत उपलब्ध् नसल्याने महानगरपालिकेने ठेकेदाराकडून नियमानुसार अनामत रक्क्म रु.49806/- वसूल केली नाही ही बाब नियमबाहृय आहे.

11. विभागाने कामाचा करारनामा क्र.34/सन 2014-15 दि.30.05.2015 अन्वये रक्कम रु. 1600/- स्टॅम्प पेपरवर केला आहे. सदर करारनाम्यात खालील प्रमाणे त्रुटी आहेत.

अ)सदर करारनाम्यामध्ये काम किती दिवसात पूर्ण करावयाचे आहे ते निरंक ठेवले असून विहित कालावधीत काम पूर्ण न केल्यास प्रतिदिन रु. 500/- एवढया दंडाची तरतूद नोंदविण्यात आली आहे.नियमाप्रमाणे कामाची मुदत करारनाम्यामध्ये देणे आवश्यक आहे.

आ)करारनाम्यातील अट क्र.4 मध्ये एकूण निविदा रक्कम नोंदविण्यात आली नाही.

इ) कार्यकारी अभियंता उपअभियंता कनिष्ठ अभियंता यांनी तपासणी न करताच कंत्राटदाराने कामाचे साहित्य् वापरले आहे. तसेच साहित्य् वापरावयासाठीचा कार्यकारी अभियंता यांचा कोणताही लेखी अहवाल अभिलेख धारिकेत आढळून आला नाही. त्यामुळे करारनाम्यातील अट क्र.5 चे पालन झाले नाही. तसेच कंत्राटदाराने आणलेले साहीत्य अधिकृत विक्रेत्यांकडून खरेदी केल्या बाबतची खात्री चलनावरुन करता आली नाही. साहित्याची चलने/बिल कॅश/टॅक्स् इनव्हाईस विहित नमुन्यात नाही ही बाब नियमबाहृय आहे.

ई)करारनाम्यातील अट क्र.6 मध्ये नमुद केल्यानुसार वारंवारिते प्रमाणे साहित्याच्या व निविदेतील बाबींच्या चाचण्या मान्यता प्राप्त् गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेतून केल्या नाहित. महानगरपालिकेने याबाबत खातर जमा न करता संबंधित ठेकेदारास रक्क्म अदा केली असून ही बाब नियमबाहय आहे.

12. धारिकेतील टिपणीमध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका क्र.35 मध्ये सदर कामाच्या 3 रे धावते देयक रक्कम रु.637284/- नोंद पृ.क्र. 90 ते 96 वर केली आहे सदर नोंदी सार्वजनिक

बांधकाम पुस्तिकेतील निर्देशाप्रमाणे विहीत नियमानुसार प्रत्येक देयकाच्या नोंदी सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेतील निर्देशाप्रमाणे मोजमाप पुस्तिकेत घेणे आवश्यक आहे तथापि तसे केल्याचे दिसुन येत नाही.

13. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहीता 1971 चे नियम 142,150 नुसार पाणी पुरवठा विभागाने नमुना 109 मध्ये प्राप्त् साहित्याची साठा नोदवही ठेवलेली नाही. त्यामुळे कंत्राटदाराने प्र.स.क्र.3 मधील निगा व दुरुस्ती काम करित असताना खरेदी केलेल्या वस्तुंची जमा नोंद व वाटपाची पडताळणी करता आली नाही.

14. प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत पाईप लाईन निगा व दुरुस्ती कामाचा काम पुर्णत्वाचा दाखला धारिकेमध्ये नाही. तसेच धारिकेमध्ये सदर कामाचे पूर्वीचे व काम पूर्ण झाल्यानंतरचे छायाचित्र उपलब्ध् नाही त्यामुळे कंत्राटदाराने पाईप लाईन निगा व दुरुस्ती संदर्भातील काय कामकाज केले याबाबत खात्री करता आली नाही.

15. धारिकेमधील विषय प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत पाईप लाईन निगा व दुरुस्ती आहे तथापि कंत्राटदाराचे दि.19/03/2015 रोजीच्या पत्रामध्ये जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती कामी कामगार सेवा पुरविण्याचे कामाच्या वर्कऑर्डर दि.01/04/2015 रोजी संपत आल्याचे नमुद असुन सदर संदर्भ या पत्रामध्ये टाकण्याचे प्रयोजन समजून आले नाही.

16. महानगरपालिकेने एकाच कामासाठी अनेक मोजमाप पुस्तीका वापरण्यासंदर्भात कारणमिमांसा दिली नाही. त्यामुळे एकाच कामासाठी अनेक मोजमाप पुस्तीका वापरण्यासंदर्भात प्रयोजन समजून येत नाही. तसेच धारिकेमध्ये कंत्राटदाराचे सर्व धावते देयक नस्तीबध्द करणे आवश्यक आहे तथापि धारिकेमध्ये कंत्राटदाराचे 3 रे, 4थे व अंतिम देयक धारिकेमध्ये नाही, ही बाब गंभीर आहे.

DPSMAWM7701 (Ref No : 33, Hmm No : 33)

## *36 पाणी पुरवठा विभागांतर्गत सन 2014-15 अखेर बृहन्मुंबई महानगरपालिका व स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि. यांच्या प्रलंबित देयके व विलंब आकाराबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष : बृहन्मुंबई महानगरपाल महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 118741380.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 118741380.00/-

***महानगरपालिकेस बृहन्मुंबई महानगरपालिका व स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन यांचे कडून नियमित पाणीपुरवठा करण्यात येतो त्याबदल्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका व स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन यांचेकडून दरमहा देयक आकारण्यात येते. सदर देयकांपैकी मार्च-2015 अखेर पाणीवापर देयक रु.336889990 अदा करण्याचे प्रलंबित राहिले आहे. त्यामुळे महानगरपालिकेस मोठया प्रमाणात विलंब आकार रु.118741380 अदा करावा***

***लागला असुन महानगरपालिकेचे मोठे नुकसान झाले आहे.***

महानगरपालिकेस बृहन्मुंबई महानगरपालिका व स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन यांचेकडून नियमित पाणीपुरवठा करण्यात येतो त्याबदल्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका व स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन दरमहा देयक आकारते सदर देयकांची तपासणी करण्यात आली असुन यासंदर्भामध्ये पाणी पुरवठा विभागास अर्धसमास पत्र क्र.54 दि.30/07/2018 व अर्धसमास पत्र क्र.149 दि.23/10/2018 रोजी देण्यात आले होते तथापि संबंधित विभागाने सदर अर्धसमासांचे अनुपालन सादर केले नाही. पाणी पुरवठा देयकांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पाणी पुरवठा करणाऱ्या संस्थेचे नांव | मार्च-2015 अखेर प्रलंबित देयकाची रक्कम (रुपयात) | उशिराने देयक अदा केल्यामुळे मनपाने अदा केलेला विलंब आकार रक्कम (रुपयात) |
|---|---|---|---|
| 1. | बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई | 10078614/- | 444281/- |
| 2. | स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि.भिवंडी | 326811376/- | 118297099/- |
| एकूण | | 336889990/- | 118741380/- |

वरिल तक्त्याचे अवलोकन व्हावे बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई व स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि.भिवंडी यांचे माहे मार्च-2015 अखेर एकूण रु.336889990/- (सदर रक्कमेध्ये विलंब आकाराची रक्कम समाविष्ट आहे) एवढे देयक प्रलंबित असून थकित आहे. महानगरपालिकेने पाणी पुरवठादेयक विहित मुदतीमध्ये न भरल्यामुळे मनपास रु.118741380/- एवढा विलंब आकार भरावा लागला ही बाब गंभीर असून याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

1) महानगरपालिकेने पाणी पुरवठा देयक विहित मुदतीमध्ये न भरल्यामुळे मनपास रु.118741380/- एवढा विलंब आकार भरावा लागला ही बाब गंभीर आहे. पाणीपुरवठा देयकावरील विलंब आकार भरण्याबाबत नियमात तरतूद नाही तरी सदर विलंब आकार कशाच्या आधारे व कोणत्या निधीतून अदा करण्यात आला याबाबतचा तपशील उपलब्ध् करुन दिला नाही, ही बाब गंभीर आहे.

2) महानगरपालिकेने संबंधित कंपनीचे पाणीपुरवठा देयक एकूण रु.336889990/- एवढी रक्कम प्रलंबित ठेवली असून सदर प्रलंबित रक्कम प्रदान करण्यासंदर्भात मनपाने कोणतीही ठोस उपाययोजना व आवश्यक प्रयत्न केले नाहीत तसेच पाणीपुरवठा देयकाचे विहित मुदतीमध्ये प्रदान करणे आवश्यक असताना पाणीपुरवठा विभागाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही. महानगरपालिकेचे नुकसान टाळण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने विहित मुदतीमध्ये पाणीवापर देयकांचे प्रदान करणे आवश्यक असुन त्यावर प्रभावी अमलबजावणी करणे आवश्यक आहे.

## *37 स्टेम वॉटर डिस्टब्युशन अ‍ॅण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि. यांच्या गर्व्हनिंग समिती बैठकीमधील झालेल्या ठरावाप्रमाणे पाणी वाटप दराप्रमाणे देयकाची आकारणी न केल्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष : बृहन्मुंबई महानगरपाल महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 7278171.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7278171.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1211942.00/-

***स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन यांचे नियमित पाणीपुरवठा देयकांमध्ये आकारण्यात आलेले दर गर्व्हनिंग समिती बैठकीमधील झालेल्या ठरावाप्रमाणे आकारणे आवश्यक आहे. तथापि स्टेम वॉटर डिस्टब्युशन अ‍ॅण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि. यांच्या गर्व्हनिंग समितीने आकारलेले दर देयकामध्ये नसल्यामुळे तसेच महानगरपालिकेने पाणीवापराचे योग्य नियोजन करुन स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन इंन्फ्रा.कं.लि. यांनी दिलेल्या पाणीवापर दरातील वजावटीचा फायदा घेतला नाही त्यामुळे महानगरपालिकेस रु.7278171 एवढी जादा रक्कम अदा करावी लागल्याने मनपाचे मोठे नुकसान झाले.***

स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन यांचे नियमित पाणीपुरवठा देयकांमध्ये आकारण्यात आलेले दर गर्व्हनिंग समिती बैठकीमधील झालेल्या ठरावाप्रमाणे आकारणे आवश्यक आहे. तथापि स्टेम वॉटर डिस्टब्युशन अ‍ॅण्ड इन्फ्रा कंपनी प्रा.लि. यांच्या गर्व्हनिंग समिती बैठक क्र.6 दि.30.3.2015 रोजी संपन्न झाली सदर बैठकीमधील विषय क्र. 2 पाणी वाटप दरामध्ये सुधारणा करणे याबाबत ठराव करण्यात आला असुन सदर ठरावामध्ये पाणीवाटप दरामध्ये दि.1/1/2015 पासुन सुधारणा करण्यात आली असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पाणीपट्टीचा चालू दर (1.4.2013) रु./प्र.द.ल.लि. | वजावट (रु.) | वजावटीनंतरचा दर (रु.) | दि.1.1.2015 पासुनचा दर (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1. | 5500.00 | 300.00 | 5200.00 | 6200.00 |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन व्हावे याबाबत पाणीपुरवठा विभागास अर्धसमास पत्र क्र.150 दि.23/10/2018 रोजी देण्यात आले तथापि याबाबत कोणतेही अनुपालन उपलब्ध् झाले नाही त्यामुळे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

1. महानगरपालिकेस वर नमुद तक्त्याप्रमाणे दि.1.4.2013 पासुन पाणीवाटप दरामधील मुळ

दरातून वजावट केल्यानंतर रु.5200/- प्रमाणे देयकात अकारणी करणे आवश्यक होते. तथापि मनपाच्या माहे एप्रिल-2014 ते डिसेंबर-2014 मधील देयकाची तपासणी केली असता पाणीवापराचे दर रु.5500/- दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेस रु.300/- एवढी रक्कम जादा अदा करावी लागली असुन मनपास खालीलप्रमाणे नुकसान झाले आहे.

| अ.क्र. | माहे एप्रिल-2014 ते डिसेंबर-2014 या कालावधीत वापर केलेल्या पाण्याचे परिमाण (द.ल.लि.) | पाणीवाटपाच्या दरातील फरक (5500-5200) | महानगरपालिकेने जादा दराने रक्कम अदा केल्यामुळे झालेले नुकसान(रु.) |
|---|---|---|---|
| 1. | 20220.761 | 300/- | 6066228.30 |

महानगरपालिकेने पाणीवापराचे योग्य नियोजन करुन स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन इंन्फ्रा.कं.लि. यांनी दिलेल्या पाणीवापर दरातील वजावटीचा फायदा घेतला नाही त्यामुळे महानगरपालिकेचे वर नमुद केल्याप्रमाणे रु.6066228.30 एवढया रक्कमेचे नुकसान झाले.

2. गर्व्हनिंग समिती बैठकीमधील झालेल्या ठरावाप्रमाणे दि.1.1.2015 पासुन पाणीवापर दरामध्ये सुधारणा करण्यात आली असुन पाणीवापराचा सुधारित दर रक्कम रु.6200/- करण्यात आला आहे. याबाबत माहे जानेवारी-2015 मधील देयकाची आकारणी 6200/- प्रमाणे करण्यात आली असुन माहे फेब्रुवारी-2015 व मार्च-2015 मधील देयकाची तपासणी केली असता स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन इंन्फ्रा.कं.लि. यांनी गर्व्हनिंग समिती बैठकीमधील कोणताही ठराव नसताना महानगरपालिकेच्या देयकामध्ये रक्कम रु.6500/-एवढा जादा दराने आकारणी केली त्यामुळे मनपाचे खालीलप्रमाणे नुकसान झाले आहे.

| अ.क्र. | माहे फेब्रुवारी-2015 ते मार्च-2015 या कालावधीत वापर केलेल्या पाण्याचे परिमाण (द.ल.लि.) | पाणीवाटपाच्या दरातील फरक (6500-6200) | महानगरपालिकेने जादा दराने रक्कम अदा केल्यामुळे झालेले नुकसान(रु.) |
|---|---|---|---|
| 1. | 4039.808 | 300/- | 1211942.40 |

स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन इंन्फ्रा.कं.लि. यांनी कोणताही ठराव नसताना माहे फेब्रुवारी-2015 व मार्च-2015 मधील देयकाची आकारणी रु.6500/-या दराने केल्यामुळे महानगरपालिकेचे रु.1211942.40 एवढया रकमेचे नुकसान झाले आहे. वरिल प्रमाणे देयके प्राप्त झाल्यानंतर सदर देयकांची तपासणी करुन संबंधित विभागाने निदर्शनास आलेली त्रुटी स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन इंन्फ्रा.कं.लि. यांना कळविल्या नाहीत. त्यामुळे मनपाचे नुकसान झाले सदरचे जादा प्रदान रक्कम रु.1211942.40 एवढी रक्कम स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन इंन्फ्रा.कं.लि यांचे कडून वसुल करण्यात यावी.

DPSMAWM7701 (Ref No : 35, Hmm No : 35)

## *38 पाणी पुरवठा विभागांतर्गत सन 2014-15 मधील अर्थसंकल्पातील वित्तीय तुटीबाबत तसेच अनधिकृत मालमत्ताधारकांकडून अपेक्षित पाणीपट्टी कराच्या रक्कमांची वसुली न केल्यामुळे महानगरपालिकेचे झालेल्या नुकसानीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभागांतर महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 534083345.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 376673936.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 157409409.00/-

***महानगरपालिके अंतर्गत एकूण 146363 मालमत्ता आहेत. विभागाने एकूण मालमत्तांच्या एक तृतीआंश मालमत्तांवर एकूण 54686 नळ कनेक्शनवर पाणीपट्टी कराची रु. 93917599 एवढी आकारणी केली आहे.मनपाने उर्वरित दोन तृतांश (91677 मालमत्ताधारक) मालमत्तांवर पाणीपट्टी कराची आकारणी न केल्यामुळे महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या रु.157409409/- एवढया अंदाजे महसुली उत्पन्नात घट झाली असुन महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. महानगरपालीकेच्या पाणीपट्टी कराच्या एकूण मागणीपेक्षा वसुली केवळ 14.59% असुन ती नगण्य आहे. महानगरपालिकेने पाणीपट्टी वसुलीबाबत प्रभावी अंमलबजावणी केली नाही त्यामुळे अपेक्षित पाणीपट्टी वसुली झाली नाही ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.***

महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाचे सन 2014-15 रोजीचे अर्थसंकल्पाबाबत अर्धसमास क्र.151 दि.23/10/2018 रोजी देण्यात आले होते तथापि याबाबत कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या सन 2014-15 रोजीचे अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता मनपाची आर्थिक स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एकूण खर्च | रक्कम रु.(लाखात) | प्रत्यक्ष प्राप्ती | रक्कम रु.(लाखात) |
|---|---|---|---|---|
| (अ) | महसुली खर्च (Revenue Expenditure) | 6179.50 | महसुली जमा (Revenue Receipt)मनपाचे भाग भांडवल वजा जाता | 715.61 |
| (ब) | भांडवली खर्च (Capital Expenditure) | 8607.00 | भांडवली जमा (Capital Receipt) | 6312.02 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण | | 14786.50 | | 7027.63 |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन व्हावे तक्त्यामधील प्रत्यक्ष प्राप्ती मध्ये मनपामधील अ अर्थसंकल्पामधील वर्ग केलेल्या रक्कमेचा समावेश करण्यात आला नाही. फक्त पाणीपुरवठा विभागांतर्गत प्राप्त होणाऱ्या रकमांचा समावेश यामध्ये करण्यात आला आहे. महानगरपालिकेतील पाणीपुरवठा विभागाची सन 2014-15 मधील प्रत्यक्ष जमा रक्कम रु.7027.63 लक्ष असुन एकुण खर्च रक्कम रु.14786.50 लक्ष आहे. सदर आर्थिक वर्षातील वित्तीय तूट रक्कम रु.7758.87 लक्ष एवढी आहे. महानगरपालिकेस प्रत्यक्ष जमा होणारी रक्कम ही त्यांच्या एकूण खर्चाच्या 47.53% एवढी नगण्य असुन ही बाब गंभीर आहे.

महानगरपालिकेच्या करमुल्यांकन विभागाने सन 2014-15 या आर्थिक वर्षामधील पाणीपट्टी कराच्या एकूण मागणीचा व एकूण वसुलीचा तपशील उपलब्ध्‍करुन दिला असून सदरचा तपशील खालीलप्रमाणे.

महानगरपालिका अंतर्गत एकूण 146363 एवढया मालमत्ता असून एकूण 54686 मालमत्ताधारकांकडे नळ कनेक्शन आहेत. महानगरपालिकेने उर्वरित एकूण 91677 एवढया मालमत्तांधारकांची नोंद पाणीपुरवठा विभागात नसल्यामुळे सदर मालमत्ताधारकांना करण्यात आलेला पाणीपुरवठा ही त्यामुळे अपेक्षित पाणीपट्टी कराची वसुली होत नसल्यामुळे मनपाचे नुकसान झाले आहे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

पाणीपट्टी कराची सन 2014-15 अखेरची माहिती

| अ.क्र. | कराचा तपशील | मागणी (रु.) | वसुल (रु.) | शिल्लक (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1. | मागील वर्षाची पाणीपट्टी | 347141230 | 28505429 | 318635801 |
| 2. | चालू वर्षाची पाणीपट्टी | 93917599 | 35879464 | 58038135 |
| एकूण | | 441058829 | 64384893 | 376673936 |

वरिल तक्त्याचे अवलोकन व्हावे याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहे.

1) मनपातील पाणीपट्टी कराची एकूण मागणी रक्कम रु.441058829/-एवढी आहे व वसुली रक्कम रु.64384893/- एवढी असुन शिल्लक रक्कम रु.376673936/- एवढी आहे. महानगरपालीकेच्या पाणीपट्टी कराची मागणीपेक्षा वसुली केवळ 14.59% असुन ती नगण्य असुन ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. महानगरपालिकेने पाणीपट्टी वसुलीबाबत प्रभावी अंमलबजावणी केली नाही त्यामुळे अपेक्षित पाणीपट्टी वसुली झाली नाही.

2) महानगरपालिके अंतर्गत एकूण 146363 मालमत्ता आहेत. विभागाने एकूण मालमत्तांच्या एक तृतीआंश मालमत्तांवर एकूण 54686 नळ कनेक्शनवर पाणीपट्टी कराची रु.93917599 एवढी आकारणी केली आहे. मनपाने उर्वरित दोन तृतांश (91677 मालमत्ताधारक) मालमत्तांवर पाणीपट्टी कराची आकारणी न केल्यामुळे महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या रु.157409409/- एवढया अंदाजे महसुली उत्पन्नात घट झाली असुन महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. महानगरपालिकेने एकूण 91677 मालमत्ता धारकांना भूतलक्षी प्रभावाने नळ कनेक्शन देऊन रक्कम रु.157409409/- वसुल करावे. .

3) महानगरपालिकेने कोणत्या भागामध्ये किती पाणीपुरवठा केला याबाबतचे अभिलेख उपलब्ध्‍करुन दिले नाहीत त्यामुळे अधिकृत, अनधिकृत व बेकायदेशीर नळजोड संख्येबाबत भाष्य करता आले नाही.

4) मनपा हद्दीतील घरगुती व औद्योगिक वापरासाठी मिटरची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असुन याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील संबंधित विभागाने उपलब्ध्‍करुन दिला नाही त्यामुळे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व पाणीपट्टी कराच्या रक्कमध्ये असमतोल आहे. तसेच पाणीपुरठयासाठी

मिटरचा वापर केल्यास जेवढे पाणी वापरले जाईल तेवढेच बिलाची आकारणी होईल व त्यामुळे मनपाच्या पाणीपट्टी मागणी व वसुली मध्ये निश्चित वाढ होईल. पाणीपट्टी करामध्ये समतोल साधता येईल.
5) पाणीपट्टी कराची 100% वसुली केल्यास महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल यासाठी महानगरपालिकेने प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

DPSMAWM7701 (Ref No : 36, Hmm No : 36)

## *39 व-हाळा जलशुध्दीकरण केंद्राकरिता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचिंग पावडर पुरवठयामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा पाणी शुध महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 192090.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 192090.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 25590.00/-

***जलशुध्दीकरण प्रकल्पामधील पाणी शुध्द करण्यापूर्वी महानगरपालिकेने पाण्याची तपासणी अधिकृत प्रयोगशाळेतुन केली नाही तसेच जलशुध्दीकरणासाठी ॲलमचा वापर करण्यापूर्वी पाण्याची गढूळता किती आहे याबाबत केमिस्टचा JAR Test Report न पहाता पावसाळयामधील दिवसात कमी व थंडी व उन्हाळयांच्या दिवसामध्ये जादा ॲलमचा वापर केल्याचे आढळून आले आहे सदरची बाब ही नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोणातून अयोग्य आहे. जलशुध्दीकरणासाठी वापरावयाचे ॲलम पुरवठादाराने 94 दिवस विलंबाने पुरवठा केल्यामुळे पुरवठादाराकडून रक्कम रु.23500 एवढा विलंब आकार महानगरपालिकेने वसूल केला नाही सदरचा विलंब आकार पुरवठादाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.***

1.कामाचे नाव:- व-हाळा जलशुध्दीकरण केंद्राकरिता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचिंग पावडर पुरवठयाबाबत.
2.लेखाशिर्ष:- पाणी पुरवठा पाणी शुध्दीकरण रसायन खरेदी
3.अंदाजपत्रकीय तरतुद :- 25 लक्ष
4.प्रशासकीय मान्यता :- दि.15/01/2014
5.अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.1159500/-
6.निविदा रक्कम:- रु.1159500/-
7.अनामत रक्कम :- रोख- रु.23190/- देयकातून- रु.23190/-

8.इसा-याची रक्कम़ :- रु.11515/-

9.एकुण प्राप्त निविदा व दर :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | प्राप्त् दर |
|---|---|---|
| 1. | रविराज केमिकल्स | रु.11.50 प्र.किलो ॲलम |
| | | रु.34.00 प्र.किलो ब्लिचिंग |

10.मा.आयुक्तांची मंजुरी :- 15/01/2014

11.करारनामा दिनांक :- 594/145-2014-15 दिनांक 11/06/2014

12.कार्यादेश क्र. व दिनांक :-भिनिशमपा/पापुवि/जा.क्र.1333/2014 दिनांक 10/09/2014

13.कामाची मुदत :- 365 दिवस अन्यथा 250/- प्रती दिन दंड

व-हाळा जलशुध्दीकरण केंद्राकरिता फस्ट ग्रेड ॲलम व ब्लिचिंग पावडर पुरवठयाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.139 दि.19/10/2018 रोजी देण्यात आले तथापि सदर अर्धसमासाचे अनुपालन अद्याप पर्यंत प्राप्त झाले नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे नोंदवित आहे.

1) ॲलम व ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करतांना उत्पादक कंपनीकडून दर मागविण्यात आले नाही. त्यामुळे अचुक दरांच्या आधारे अंदाजपत्रक तयार करण्यात आले नाही.

2) महानगरपालिकेने ॲलम उत्पादक कंपनीकडून खरेदी न करता केमिकल्स व पेस्टीसाईड व इतर मटेरिअल विक्री करणा-या दुकानदाराकडून खरेदी केले आहे. त्यामुळे उत्पादक कंपनीच्या मालाचा दर्जा व दरांचा फायदा मनपास घेता आला नाही.

3) धारिकेमध्ये निविदा उघडण्याच्या उपस्थिती कागदपत्र, छाननी पत्रक, निविदा सुचना यावर क्रमांक व दिनांक नाही. सदर उपस्थिती पत्रावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी सदस्य यांची स्वाक्षरी नाही. तरी याबाबत विभागाने आपले अभिप्राय नोंदविले नाहित त्यामुळे निविदा प्रक्रिया राबविण्याताना नियमानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

4) सदर कामाचा दोष निवारण दायित्व कालावधी पूर्ण होईपर्यंत निविदा रक्कमेच्या 2% रक्कम देयकातून कपात करुन अतिरिक्त अनामत म्हणून ठेवणेबाबत करारनाम्यातील अट आहे. तथापि धारिकेमध्ये रक्कम रु.23190/- एवढी अतिरिक्त अनामत कपात केल्याबाबतचे अभिलेख नसल्याने महानगरपालिकेने करारातील अटींचे पालन केले नाही.

5) जलशुध्दीकरण प्रकल्पामधील पाणी शुध्द करण्यापूर्वी पाण्याची तपासणी केल्याबाबतचा अधिकृत प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल धारीकेमध्ये तसेच जलशुध्दीकरण केंद्रामध्ये आढळून आला नाही. पाणी तपासणी केलेला अधिकृत प्रयोगशाळेचा अहवाल आवश्यक आहे. महानगरपालिकेने पाण्याचा तपासणी अहवाल न पाहता पाणी शुध्दीकरण कऱणे हि बाब आरोग्याच्या दृष्टीने योग्य नसुन गंभीर आहे.

6) जलशुध्दीकरणासाठी ॲलमचा वापर करण्यापूर्वी पाण्याची गढूळता किती आहे याबाबत केमिस्टचा JAR Test Report आढळून आला नाही. JAR Test Report अनुसार पाणी शुध्दीकरणाचा डोस

ठरतो तथापि मनपाने तसे न करता पावसाळयामधील दिवसात कमी व थंडी व उन्हाळयांच्या दिवसामध्ये जादा ॲलमचा वापर केल्याचे आढळून आले असुन ते खालील प्रमाणे.

| अ.क्र. | कालावधी | ॲलम वापराचे प्रमाण | JAR Test Report |
|---|---|---|---|
| 1 | 15/06/2014 ते 18/11/2014 | 180kg p/day | नाही |
| 2 | 5/02/2014 ते 1/04/2015 | 220kg p/day | नाही |

JAR Test प्रमाणे पाण्याच्या गढूळतेची तपासणी करुन ॲलमचा वापर केल्यास आवश्यकतेप्रमाणे ॲलमचा वापर होईल व ॲलमची अनावश्यक खरेदी टाळता येईल. तसेच सदर वापरावर तांत्रिक सुपरव्हायझरचे देखील नियंत्रण महापालिकेने ठेवले नाही त्यामुळे ॲलम वापरावर कोणतेही नियंत्रण नाही ही बाब गंभीर आहे.

7) विभागातील साठा रजिष्टर, कार्यादेश, चलनाच्या प्रतीची तपासणी केली त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी दिसून आल्या.

अ) कार्यादेश क्र.371 दि.12/06/2014 नुसार 20220 kg एवढे ॲलमची मागणी केली त्याप्रमाणे पुरवठादाराने चलन क्र.1) RC/S/120/2014 दि.13/06/2014 प्रमाण 10000 kg व चलन क्र.2) RC/S/162/2014 प्रमाणे 10000kg पुरवठा केले असून परंतु देयक सादर करताना प्रमाणक क्र.242/दि.7/07/2014 नुसार 20220 kg रु.9.50 प्रमाणे रु.192090/- देयक आकारले आहे. त्यामुळे 220 kg X 9.50 =2090 एवढे जादा रु. पुरवठादाराकडून वसूल करावे

ब) साठा रजिष्टर, चलनातील व प्रत्यक्ष वजन यामधील नोंदीमध्ये तफावत असुन ती खालील प्रमाणे.

| अ.क्र. | चलन क्रमांक व दिनांक | चलना प्रमाणे (kg.) | साठा रजि. ( kg.) | प्रत्यक्ष वजन(kg.) | तफावत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | RC/S/120/2014 दि.13/06/2014 | 10000 kg. | 10000 kg. | 10080 kg. | 80 kg. |
| 2 | RC/ S/162/2014 दि.7/7/2014 | 10000 kg. | 10000 kg. | 10140 kg. | 140 kg. |

वरीलप्रमाणे भांडार विभागाने स्टॉक रजिष्टर मध्ये 220kg ॲलम प्रत्यक्ष वजनापेक्षा कमी नोंदविले आहे. वास्तविक प्रत्यक्ष वजना प्रमाणे चलनामधील नोंदी व देयकाच्या नोंदी तपासणे भांडार विभागाची जबाबदारी आहे. तथापि सदरची जबाबदारी भांडार विभागाने पार पाडली नाही ही बाब गंभीर आहे.

क) करारपत्रामध्ये ॲलम पुरवठयास विलंब झाल्यास प्रती दिन रु. 250/- एवढा दंड आकारणी करणे बाबत अट आहे. तथापि त्यामध्ये किती दिवसामध्ये पुरवठा करावा याबाबत नमूद नाही याबाबत विभागाने कोणतेही अभिप्राय नोंदविले नाहीत. त्यामुळे खालील कार्यदेशाची पहाणी केल्यास ॲलम पुरवठयास खालील प्रमाणे विलंब झाला आहे.

| अ.क्र. | कार्यादेश क्र. व दिनांक | चलन क्र.व दिनांक | विलंबाचे दिवस |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | ॲलम 1333/10191/2014 | RC/5/330/2014 at. 5/12/2014 | 17 |
| 2 | ॲलम 1436/20/09/2014 | RC/5/437/2014 at. 5/12/2014 | 77 |
| | | एकूण | 94 |

वरील प्रमाणे एकुण 94 दिवस विलंबाने माल पुरवठा केल्यामुळे कंत्राटदाराकडून एकुण 94X250=23500/- एवढा दंड वसुल करण्यात यावा. महानगरपालिकेने ॲलम खरेदी व त्याच्या वापरावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असून त्यामुळे ॲलमची अनावश्यक खरेदी व त्याचा आवश्यकतेनुसार वापर करणे शक्य होईल.

DPSMAWM7701 (Ref No : 37, Hmm No : 139)

## *40 प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत बोअरवेल निगा व दुरुस्ती कामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष : पाणीपुरवठा निगा व दु महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2454726.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2454726.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 272886.00/-

***प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत बोअरवेल निगा व दुरुस्तीचे काम करण्यासाठी मजुर व साहित्य यांच्या वाहतुकीचा खर्च करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची आहे. तरी providing Transportation arrangenment या शीर्षातर्गत रु.239142/- एवढया रकमेचे ठेकेदारास प्रत्यक्ष प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे सदर बाबीवरील खर्चाची जबाबदारी कंत्राटदाराची असताना त्यास रक्कम रु.239142/- एवढी रक्कम दिल्याने मनपाचे नुकसान झाले असून सदरची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे. कंत्राटदाराने ठरवून दिलेल्या मुदतीमध्ये काम पूर्ण करणे ही त्याची प्राथमिक जबाबदारी आहे. तथापि कोणताही कारणमिमांसा न देता कामास मुदत वाढ दिली त्यामुळे करारनाम्यातील अटीनुसार कामास झालेल्या विलंबावर दंड लावणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे रु.15000/- एवढा दंड कंत्राटदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.***

कामाचे नाव : प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत बोअरवेल निगा व दुरुस्ती.

लेखाशिर्ष: कुपनलिका दुरुस्ती महसुली/ भांडवली-महसुली

अंदाजपत्रकीय तरतुद: रू.1,50,000,00/-

कामाची आवश्यकता: नगरसेवक व नागरीकांच्या तक्रारी वारंवार

अंदाजपत्रकीय रक्क्म : रू. 2445170/-

तांत्रिक मान्यता: vide item no.159 of 2013-14 dt.3/02/2014

निविदा रक्कम: रू. 2454726/-

अनामत रक्कम : रोख रु.49094/-, बिलातून रु.49094/- व EMD इसारा-245447

प्राप्त निविदा व दर: 1) दिलीप बी. धुमाल : अंदाजपत्रकापेक्षा 1% जास्त

2) हिंदुस्थान इंटरप्रायझेस : अंदाजपत्रकापेक्षा 1% कमी

3) बुबेरे ॲन्ड् असोसिएट्स : अंदाजपत्रकापेक्षा 0% जास्त

न्युनतम निविदाकार व दर: हिंदुस्थान इंटरप्रायझेस अंदाजपत्रकापेक्षा 1% कमी

मा.आयुक्तांची मंजुरी: दि.15/01/2014.

करारनामा दिनांक : क्र.44/सन 2014-15 दि.2/06/2014

कार्यादेश क्रमांक: भिनिशमनपा/पापुवि/जा.क्र.314/2014 दि.2/06/2014

कामाची मुदत : 303 दिवस 31-03-2015

काम पुर्ण झाल्याचा दिनांक : धारिकेमध्ये नमूद नाही.

मोजमाप पुस्तक क्र.व दिनांक: 3/page no.92-94,44/53-54,3/96-100,56/29-30

प्रमाणक क्र.व दिनांक: $1^{st}$-282244/- 3/92-94

$2^{nd}$-170485/- 44/53-54

$3^{rd}$-830452/- 3/96-100

$4^{th}$ & last 989260/156-32 to 41

कामाचा व कामगारांचा विमा पॉलिसी: 7/1/2015 ते 16/01/2015.

प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत बोअरवेल निगा व दुरुस्ती कामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत संबंधित विभागास अर्धसमास पत्र क्र .140 दिनांक 19/10/2018 रोजी देण्यात आले परंतू सदर अर्धसमासाचे अनुपालन अद्यापपर्यंत न दिल्यामुळे लेखापरीक्षण पथक आपले अभिप्राय खालीलप्रमाणे देत आहे.

1. तांत्रिक मंजुरीतील बाब क्र.2 मध्ये pick-up,Tempo, Three wheel साठी नमूद केलेले दर तपासणीसाठी R.A.sheet उपलब्ध् करुन दिले नाही तसेच बाब क्र.39 ते 43 MJP Elect.यांच्या दरसुची DSR उपलब्ध करुन दिले नाहीत त्यामुळे मोजमाप पुस्तिका व देयकांमध्ये सदर बाबींसाठी नोंदविलेल्या दराची पडताळणी व भाष्य करता आले नाही . सदर काम करण्यासाठी मजुर व साहित्य यांच्या वाहतुकीचा खर्च करण्याची जबाबदारी ही ठेकेदाराची आहे. तरी तांत्रिक मंजुरी मधील बाब क्र.2 मध्ये providing Transportation arragnment या शीर्षांतर्गत रु.262719.60/- एवढे अंदाजपत्रकात दर्शविण्यात आले असून मोजमाप पुस्तिकेमधील व देयकातील नोंदीप्रमाणे 284x842.05 = 239142/- एवढया रक्कमेचे प्रत्यक्ष प्रदान करण्यात आले आहे . त्यामुळे सदर बाबीवरील खर्चाची जबाबदारी

कंत्राटदाराची असताना त्यास रक्कम रु.239142/- एवढी रक्कम दिल्याने मनपाचे नुकसान झाले आहे. तरी झालेले जादा प्रदान रु.239142/- कंत्राटदाराकडून वसुल करण्यात यावे.

2. व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती व देखभाल करिता मजूर सेवा पुरविणे या कामासाठी 3 फिटर(1st class) यांना 333=00 प्रमाणे मोबदला दिला आहे. तथापि सदर कामासाठी एका फिटरला 399/- प्रमाणे मोबदला दिला आहे. त्यामुळे सदर कामासाठी फिटर यांना रु.66/-( 399-333 ) एवढी रक्कम जादा दिली असून एकुण 284 दिवसांसाठी 66x284=18744/- एवढे जादा प्रदान केल्यामुळे मनपाचे नुकसान झाले आहे. तरी झालेले जादा प्रदान रु .18744/- कंत्राटदाराकडून वसुल करण्यात यावे.

3. करारनाम्यातील अट क्र.3 मध्ये तसेच कार्यादेशामध्ये कामाची मुदत दि .30/04/2015 रोजी संपत असल्याचे नमुद आहे. तरी देखील निविदा मंजुरीची कार्यवाही चालू आहे या कारणावर मुदतवाढ देणे योग्य नाही मुदतवाढीस सबळ कारणमिमांसा आवश्यक आहे. तथापि विभागाने तसे न करता मुदतवाढ दिली. वास्तविक कंत्राटदाराने ठरवून दिलेल्या मुदतीमध्ये काम पूर्ण करणे ही त्याची प्राथमिक जबाबदारी आहे . तथापि कोणताही कारणमिमांसा न देता कामास मुदत वाढ दिली त्यामुळे करारनाम्यातील अटीनुसार कामास झालेल्या विलंबावर दंड लावणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे 30 दिवसांना रु.500/- प्रमाणे रु.15000/- एवढा दंड कंत्राटदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

4. करारनाम्यातील अट क्र.8 मध्ये नमूद केल्यानुसार कामाचा दोष निवारण दायित्व् कालावधी पूर्ण होईपर्यंत निविदा रकमेचा 3% रक्क्म अतिरिक्त अनामत कपात करण्यात यावी असे नमूद आहे. तथापि धारिकेमध्ये अतिरिक्त अनामत रक्कम रु.73642/- एवढी रक्कम कपात केलेबाबतचे अभिलेख उपलब्ध् नाही. त्यामुळे महानगरपालिकेने करारनाम्यामधील अटीनुसार कार्यवाही केली नाही.

5. कामाचे अंदाजपत्रक पूर्ण वर्षाचा अंदाज घेऊन तयार केले जाते. तथापि मोजमाप पुस्तिकेतील नोंदीचे अवलोकन केले असता एकुण 4 रनिंग बिलापैकी 4 थ्या व अंतिम देयकामध्ये साहित्याचा जास्तीत जास्त् वापर केल्याचे दिसत आहे. सदर बाब खालील उदाहरणावरुन अधिक स्पष्ट होईल.

| अ.क्र. | बाब क्र. व तपशिल | वापरलेले साहित्य् | | | रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अंदाज पत्रकाप्रमाणे | मागिल | चालु( ४ थे व अंतिम) | दर | मागिल | चालू |
| 1. | 4GI Union | 200 | 6 | 150 | 107.80 | 6816.80 | 16170 |
| 2. | 5 मधील iii) 15mm | 1000 | 0 | 900 | 100.80 | - | 90720 |
| 3. | 8 water tank assembly | 100 | 6 | 85 | 565 | 510.00 | 48025 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4. | 9 G.I.assembly | 100 | 5 | 85 | 1720 | 8600.00 | 146200 |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता महानगरपालिकेने प्रभागामधील कामाचे कोणतेही नियोजन न करता केवळ अर्थसंकल्पीय तरतूद खर्ची पडावी या उद्देशाने 4 थे व अंतिम देयकाची अदायगी केली आहे.

6. कंत्राटदारकास त्यांनी केलेल्या कामाचे देयक अदा करण्यापूर्वी कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ् अभियंता यांनी केलेल्या कामाच्या तपासणीचा अहवाल धारिकेत उपलब्ध् नाही. सदर स्थळ पाहणी निरिक्षण व तपासणी अहवाल व कामापूर्वीचे व कामानंतरची छायाचित्र विभागाने उपलब्ध् करुन दिली नाहीत त्यामुळे कामाच्या देयकाचे प्रदान स्थळ पाहणी निरिक्षण व तपासणी अहवाल याची पडताळणी न करता अदा करण्यात आले ही बाब नियमबाह्य आहे.

7. कंत्राटदाराने कामाचे साहित्य् कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ् अभियंता यांनी तपासल्यानंतरच वापरावयाचे आहे याबाबतचे कोणतेही अभिलेख विभागाने मागणी करुनही उपलब्ध करुन दिले नाही त्यामुळे कंत्राटदाराच्या कामाबाबत व वापरण्यात आलेल्या साहित्याच्या दर्जाबाबत खात्री तथा भाष्य करता आले नाही . तसेच सदर खरेदी केलेल्या साहित्याचे अधिकृत विक्रेत्यांकडील देयक(बिल) सादर केल्याबाबतचे अभिलेख धारिकेत नसल्यामुळे कामासाठी वापरात आणलेल साहित्य अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी केल्याची खातरजमा करता आली नाही प्रस्तुतची बाब ही नियमबाह्य आहे.

8. बोअरवेल निगा व दुरुस्ती कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य् व केलेल्या कामाच्या चाचण्या मान्यताप्राप्त् गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेतून केल्याबाबतचे अभिलेख धारिकेमध्ये नसल्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत भाष्य करता आले नाही.

9. सदर काम पूर्ण करण्यासाठी 6 लेबर व 1 फिटर दर्शविलेले आहे. परंतु सदर 6 लेबर व 1 फिटर यांना अदा केलेल्या वेतनाचे वेतनपट, हजेरीपट लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत. त्यामुळे त्यांना अदा केलेले वेतन शासनाच्या किमान वेतन कायद्याप्रमाणे प्रदान केले असल्याची खात्री करता आली नाही.

10. प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत बोअरवेल निगा व दुरुस्ती करणेकामी खाजगी ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या कामगारांचे उपस्थिती पत्रक धारिकेत उपलब्ध् नाही. त्यामुळे कंत्राटदाराने देयकात नमुद केलेले कामगार , त्यांचे दिवस व त्यांना अदा केलेला मोबदला तपासता आला नाही व त्यावर भाष्य करता आले नाही.

11. निविदेमध्ये नमुद कर्मचा री प्रत्य्क्ष कोणत्या कामासाठी नियुक्त् करणार आहेत व सदर कर्मचारी
काय काम करणार आहेत. याबाबतची तपाशीलवार माहिती धारिकेमध्ये नमुद नाही त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांनी ठरविल्याप्रमाणे काम केले किंवा नाही याबाबत भाष्य करता येत नाही.

12. धारिकेमधील उपलब्ध् अभिलेखानुसार सदरचे काम हिंदुस्थान एंटरप्रायझेस यांना दिले आहे.

तथापि करारनाम्यामध्ये बुबरे ॲन्ड् असोशिएट्स भिवंडी यांची निविदा अंदाज पत्रकीय दरापेक्षा 1% कमी दराची असल्याने सदर कामासाठी उभयंतामध्ये करारनामा केल्याबाबत नमूद आहे.
तरी करारनाम्यामध्ये असलेल्या दोन्ही कंत्राटदारांच्या नावाबाबत विभागाने आपला संयुक्तिक खुलासा सादर केला नाही त्यामुळे करारनामा चुकीच्या ठेकेदाराबरोबर करणे ही बाब गंभीर आहे.

13. बोअरवेल निगा व दुरुस्तीचे काम केव्हा पूर्ण झाले याबाबतचे अभिलेख धारिकेत उपलब्ध नाही. विभागाने काम पूर्णत्वाचा दाखला लेखापरीक्षण विभागास उपलब्ध् करुन दिला नाही त्यामुळे काम पूर्णत्वाच्या दाखल्याशिवाय अंतिम देयकाचे प्रदान करणे ही बाब नियमास धरुन नाही.

DPSMAWM7701 (Ref No : 38, Hmm No : 140)

## *41 व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती व देखभालकरिता मजूर सेवा पुरविणे या कामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 13**

*लेखा शीर्ष : व-हाळा तलाव जलशुध्द महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 1744335.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1744335.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 349518.00/-

***व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती व देखभाल करीता मे.निखिल इंटरप्रायझेस, ठाणे यांनी मंजुर सेवा पुरविले असुन ठेकेदाराने सेवा कर विभागास 12.36% प्रमाणे रक्कम रु.190679/- एवढा सेवाकर जमा केला नाही त्यामुळे सदरची रक्कम वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. तसचे महानगरपालिकेने कामगार विम्याअंतर्गत रक्कम रु.15427/- कपात केले परंतू सदरची रक्कम विमा संचालनालय येथे नियमानुसार जमा केली नाही. ठेकेदाराने कामावर वापरण्यात येणा-या कामगारांना अदा केलेल्या रकमेवर 12.50% दराने कर्मचारी निर्वाह निधी (EPF) कपात करुन सदर रक्कम कर्मचारी निर्वाह निधी (EPF) मध्ये जमा केली नाही त्यामुळे सदरची रक्कम रु.156634/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.***

1.कामाचे नाव : व-हाळा तलाव जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती देखभाल करीता मजूर सेवा पुरविणे.
2.लेखाशिर्ष: व-हाळा तलाव जलशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती व देखभाल .
3.अंदाजपत्रकीय तरतुद: रू.20.00 लक्ष
4.प्रशासकीय मान्यता ठराव: नमूद नाही
5. अंदाजपत्रकीय रक्कम : रू.1744135/-

6.तांत्रिक मान्यता: 128/13.01.2014

7.निविदा रक्कम: रू.1744335/-

8. अनामत रक्कम : रोख- रु.34886/-, देयकातुन- रु.34886/-

9. प्राप्त निविदा व दर: 1)विश्व् उद्योग म.का.स.संस्था : अंदाजपत्रकापेक्षा 0.05% कमी

2)सुभाष कंस्ट्रकशन : अंदाजपत्रकापेक्षा 4% जास्त

3)निखिल एंटरप्रायझेस : अंदाजपत्रकापेक्षा 3% कमी

10. न्युनतम निविदाकार व दर: निखिल एंटरप्रायझेस अंदाजपत्रकापेक्षा 3% कमी

11. मा.आयुक्तांची मंजुरी: दि. 22.05.2014, 2.01.2014

12. करारनामा दिनांक : 35/2014-15 दि.30.05.2014, 800/-stamp duty

13. कार्यादेश क्रमांक: भिनिशमनपा/पा.पु.वि./जा.क्र.313/2014 दि.02.06.2014.

14. कामाची मुदत : 1 वर्ष अन्यथा दंड प्रतिदिन 500/- मुदतवाढीसाठी 30 दिवस अगोदर अर्ज

15. काम पुर्ण झाल्याचा दिनांक : धारिकेमध्ये नमूद नाही.

16. मोजमाप पुस्तक क्र.व दिनांक: 1)3/95-291519 2)44/55-56-282773

3)167/79-554354 4)156/42-43-41406417.

17. कामावर एकुण झालेला खर्च: रु.1542710/-

18. कामाचा व कामगारांचा विमा पॉलिसी क्र. : 9916418716.

व-हाळादेवी जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती व देखभालकरिता मजूर सेवा पुरविणे या कामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत संबंधित विभागास अर्धसमास पत्र क्र.141 दिनांक 19/10/2018 रोजी देण्यात आले परंतू सदर अर्धसमासाचे अनुपालन अद्यापपर्यंत न दिल्यामुळे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देत आहे.

1) व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती व देखभाल करीता मे.निखिल एंटरप्रायझेस, ठाणे यांनी मंजूर सेवा पुरविले असुन सदर कामाच्या देयकांची तपासणी केली असता देयकामध्ये 12.36% एवढा सेवा कर संबंधित ठेकेदाराने सेवा कर विभागास जमा करणे आवश्यक आहे. कंत्राटदारास मनपाने एकूण रक्कम रु.1542710/- एवढी रक्कम अदा केली असून सदर रकमेवर 12.36% प्रमाणे रक्कम रु.190679/- एवढा सेवाकर जमा केल्याबाबतचे अभिलेख उपलब्ध न झाल्यामुळे सदरची रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावी.

2) कंत्राटदाराने नियमाप्रमाणे कामाचा व कामगारांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि देयकातून 1% कामगार विमा या लेखाशीर्षांतर्गत कपात करण्यात आली असून सदरची रक्कम विमा संचालनालय येथे जमा करण्याबाबतचे अभिलेख उपलब्ध नसल्यामुळे कामाचा व कामगारांचा विमा उतरविल्याबाबतची खातरजमा करता आली नाही. महानगरपालिकेने कामगार विम्याअंतर्गत रक्कम रु.15427/- कपात केले परंतू सदरची रक्कम विमा संचालनालय येथे नियमानुसार जमा केली नाही.

3) निविदेमध्ये नमुद कामावर वापरण्यात येणा-या कामगारांना अदा केलेल्या रकमेवर 12.50% दराने कर्मचारी निर्वाह निधी (EPF) कपात करुन कंत्राटदाराने सदर रक्कम कर्मचारी निर्वाह निधी (EPF) मध्ये जमा केल्याबाबतची चलने धारिकेत उपलब्ध नसल्यामुळे त्यांना अदा केलेल्या रक्कम रु.1253070 वर 12.50% दराने रक्कम रु.156633.75/- एवढी रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावी. तसचे कामगारांचा बोनस व ई.एस.आय.ची रक्कम कपात करुन संबंधित संस्थेस जमा व लाभार्थ्यांना अदा केल्याबाबतचे अभिलेख नसल्यामुळे याबाबत भाष्य करता आले नाही.

4) मोजमाप पुस्तक क्र.156 पृ.क्र.42-43 मध्ये लेबर पुरवठयाचे माहे एप्रिल-2015 मध्ये 12X30=367 प्रमाणे देयक तयार केले आहे. तथापि 12X30=360 एवढा श्रमदिन येत असून 7X315=2205 एवढे जादा वेतन दिले असून ते वसूल करणे आवश्यक आहे. तसेच Fitter यांना एप्रिल-15 मध्ये 3X30 days=88 दर्शविले आहेत. तथापि 3X30=90 अपेक्षित असून 2 श्रमदिनाप्रमाणे 333 नुसार 666.00 एवढी रक्कम कमी दिली आहे. वास्तविक केलेल्या कामाप्रमाणे व दराप्रमाणे देयक तयार करुन तपासुन ते देयक अदा करणे आवश्यक आहे. तथापि चुकीच्या आकारणी नुसार व देयकाची तपासणी न करता रक्कमेचे प्रदान करण्यात आले आहे.

5) निविदेमध्ये दिलेल्या सुचनेनुसार बिलातून 2% सुरक्षा अनामत कपात करणेबाबत नमूद आहे. त्यानुसार कंत्राटदाराकडून रु.34887/- एवढी सुरक्षा अनामत रक्कम देयकातून वसूल केली नाही. त्यामुळे करारनाम्यामधील अटींचे पालन केले नाही.

6) करारनाम्यातील अट क्र.8 मध्ये कामाचा दोष निवारण दायित्व कालावधी पूर्ण होईपर्यंत निविदा रक्कमेच्या 3% रक्कमेप्रमाणे रु.52330/- एवढी रक्कम देयकातुन कपात करुन मनपाकडे अतिरिक्त अनामत म्हणून ठेवण्यात आली नाही. त्यामुळे महानगरपालिकेने करारनाम्यातील अटींचे पालन केले नाही.

7) काम पूर्ण झाल्याचा दिनांक संबंधीत कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी कामाचे अंतिम देयकासोबत प्रमाणित करावयाचा आहे तथापि कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी कामाचे अंतिम देयकासोबत काम पूर्ण झाल्याबाबत प्रमाणित केले नाही सदर कामाचे अंतिम देयक अदा करताना काम पूर्णत्वाचा दाखला आवश्यक असताना महानगरपालीकेने नियमानुसार काम केले नाही.

8) कामाचा कालावधी आदेश मिळाल्यापासून 1वर्ष म्हणजेच दि.31/03/2015 पर्यंत आहे. काम विहीत मुदतीत पूर्ण न केल्यास प्रतिदिन रु.500/- एवढा दंड कंत्राटदार यांचेकडून आकारण्यात येईल अशी अट करारनाम्यामध्ये नमूद आहे. तथापि कंत्राटदाराकडून कोणतेही समर्पक कारणमिमांसा न देता मुदतवाढ दिली याबाबतचे विभागाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय लेखा परिक्षण शाखेस दिले नाही. त्यांमुळे सदर कामाची निविदा मंजुरीची कार्यवाही सुरु असून त्यास १ महिन्याचा अवधी लागणार असल्यामुळे ठेकेदारास मुदतवाढ देणे ही बाब नियमानुसार योग्य नाही.

9) जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती कामासाठी खाजगी ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या कामगारांचे उपस्थिती पत्रक धारिकेत उपलब्ध नाही. त्यामुळे कंत्राटदाराने देयकात नमुद केलेले कामगार, त्यांचे दिवस व त्यांना अदा केलेला मोबदला तपासता आला नाही व त्यामुळे कामगारांना अदा करण्यात आलेला मोबदला रक्कम रु.1253070/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

10) सदर काम पूर्ण करण्यासाठी मजूर सेवा पुरवठा करण्यात आली आहे. सदर मजूरांना अदा केलेले वेतनासंदर्भामध्ये माहिती मागविण्यात आली होती तथापि विभागाने कोणतीही माहिती सादर केली नाही त्यामुळे सदर मजूरांना अदा केलेले वेतन हे शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार अदा केले किंवा नाही याबाबत भाष्य करता आले नाही.

11) जलशुध्दीकरण केंद्राकरीता कर्मचारी अपुरे असल्यामुळे जलशुध्दीकरण केंद्र चालवणे अडचण निर्माण असल्याचे नमुद केले आहे. त्यासाठी एका शिफ्टमध्ये ४ कामगार व ३ फिटर म्हणजे एकुण कामगार-१२ व फिटर-३ जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरुस्ती व देखभाल कामे खाजगी ठेकेदारामार्फत करण्यासाठी निविदा मागविण्यात आली आहे. वास्तविक एवढया कर्मचा-यांची खरच गरज आहे काय? याबाबतचा सक्षम अधिका-याचा स्थळ पाहणी निरिक्षण अहवाल धारिकेत नमुद नाही त्यामुळे कामासाठी एवढया मजूरांची आवश्यकता असल्याबाबत भाष्य करता येत नाही.

12) निविदेमध्ये नमुद कर्मचारी प्रत्यक्ष कोणत्या कामासाठी नियुक्त करणार आहेत व सदर कर्मचारी काय काम करणार आहेत. याबाबतची तपाशीलवार माहिती धारिकेमध्ये नमुद नाही त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांनी ठरविल्याप्रमाणे काम केले किंवा नाही याबाबत भाष्य करता येत नाही.

13) मनपा लेखा संहिता 1971 चे नियम 174(3) प्रमाणे कामाचे मुल्याचे 9/10 इतकी देयके मिळतील व उर्वरित देयक काम पूर्ण झाल्यानंतर समाप्ती पत्रावर लिहून घेणा-याची मंजुरी झाल्यावर मिळेल असा नियम आहे. तथापि कंत्राटदाराने जेवढे देयक सादर केले त्यामधुन कोणतीही रक्कम राखून न ठेवता व काम पूर्णत्वाच्या समाप्ती पत्र लिहून न घेता संबंधितास सर्व रक्कम अदा केली. त्यामुळे नियमाचे पालन न करता रक्कम अदा केली आहे.

DPSMAWM7701 (Ref No : 39, Hmm No : 141)

## *42 प्रभाग समिती क्र.5 अंतर्गत बोरवेल निगा व दुरुस्ती मधील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : मनपा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1275122.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1275122.00/-

***ठेकेदाराने कामावर आणलेल्या साहित्याची तपासणी महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता यांनी केल्याचा तपासणी अहवाल उपलब्ध नाही. तसेच कामावर साहित्य आणलेबाबतची चलने वाहतुकीची चलने नस्तीमध्ये आढळून आली नाहीत. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम क्र.19 नुसार प्रमाणकाद्वारे प्रदान करावयाच्या रक्कमामधून केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे आयकर/ विमा/ कामगार कल्याण उपकर/व्हॅट इ.रकमा कपात करण्यात आलेल्या असुन,त्या प्रत्यक्षात शासनाच्या खाती जमा केल्याबाबतची पूरक कागदपत्रे/ पोच/ चलनाच्या प्रती अभिलेख नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत.***

पाणीपुरवठा विभागातीत वित्तीय वर्ष 2014-15 मधील प्रभाग समिती क्र.5 अंतर्गत बोरवेल निगा व दुरुस्ती बाबतची निविदा नस्ती तपासली असता कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | प्रभाग समिती क्र.5 अंतर्गत बोरवेल निगा व दुरुस्ती बाबत |
| जाहिरात व प्रसिध्दी | निविदा सुचना क्र.9/2013-15 नुसार दिनांक 20/02/2014 रोजीच्या पुण्यनगरी या वृत्तपत्रात जाहिरात दिली आहे. दिनांक 04/03/14 रोजी ई |

| | |
|---|---|
| | निविदा मागविण्यांत आल्या होत्या. |
| प्रशासकिय मान्यता | मा.आयुक्त यांची दिनांक 15/01/2014 ची प्रशासकिय मान्यता आहे. |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता यांची इटम क्र.161 सन 2013-14 दिनांक 03/02/2014 ची मान्यता आहे. |
| लेखाशिर्ष | कुपनलिका दुरुस्ती खर्च |
| अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष | 2014-15 1.50 कोटी |
| पुरवठादाराचे नांव | दिलिप बी धुमाळ |
| कार्यादेश क्र.व दिनांक | उप आयुक्त यांचे कार्यादेश जा.क्र.402 दिनांक 16-06-2014 |
| कामाचा कालावधी | दिनांक 16-06-2014 ते दिनांक 31-03-2015 |
| खर्चाची रक्कम रुपये | 1275122 |
| काम पुर्ण दिनांक | 30/04/2015 |
| अंदाजपत्रकिय रक्कम | 2452521 |

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.158 दिनांक 02/11/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय देणेत येत आहे.

1)शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.8.1.2007 नुसार बांधकाम साहित्य वापरण्यापुर्वी अशा साहित्याचे प्रयोगशाळा चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे परंतु असे अहवाल नस्ती सोबत नाहीत. त्यामुळे वापरण्यात आलेले साहित्य योग्य गुणवत्तेचे वापरण्यात आल्याची व त्यानुसार प्रदान केल्याची लेखापरीक्षणामध्ये खात्री करता आली नाही.

2)ठेकेदाराने कामावर आणलेल्या साहित्याची तपासणी महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता यांनी केल्याचा तपासणी अहवाल उपलब्ध नाही. तसेच कामावर साहित्य आणलेबाबतची चलने वाहतुकीची चलने नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.

3)प्रत्येक वर्षी प्रभागसमिती निहाय बोअरवेल निगा व दुरुस्तीचा व जलवाहिन्या निगा व दुरुस्तीचा वार्षिक ठेका देण्यात येतो.2013-14 मध्ये खर्च सदर कामांचे करारनामे पाहता त्यामध्ये दोष दायित्व कालावधी एक वर्ष नमूद केला आहे. पुढील वर्षात निगा व दुरुस्तीचे अंदाजपत्रक बनविताना मागील वर्षात दुरुस्त बोअरवेल व जलवाहिन्यांची (ज्यांचा दोष दायित्व कालावधी शिल्लक आहे अशा संख्या कमी करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आली नाही. परिणामी मागील वर्षात केलेल्या कामाचा दोष दायित्व कालावधी शिल्लक असताना त्याच कामासाठी पुन्हा खर्च करावा लागतो. प्रतिवर्षी नवीन दरसूचीनुसार अंदाजपत्रके तयार करणेत येत असल्याने प्रतीवर्षी सदर खर्च वाढत आहे.

4)कामासाठी आवश्यक लेबर, फिटर,डीवाटरिंग,सि.सि.करणे,दैनदिन अहवाल,वाहतूक व्यवस्था,विविध साहित्य पुरविणे व बसविणे या बाबींचा समावेश आहे.तथापि पुरविलेले साहित्याचा तपशील,दररोज उपस्थित लेबर व फिटर याबाबतचा तपशील/नोंदवही तपासणीस उपलब्ध झाला नाही.त्यामुळे कामावर केलेला खर्च योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

5)महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम क्र.19 नुसार प्रमाणकाद्वारे प्रदान करावयाच्या रक्कमामधून केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे आयकर/विमा/कामगार कल्याण उपकर/व्हॅट इ.रकमा कपात करण्यात आलेल्या असुन,त्या प्रत्यक्षात शासनाच्या खाती जमा केल्याबाबतची पूरक कागदपत्रे/पोच/चलनाच्या प्रती अभिलेख नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत.

FDSJRDM6801 (Ref No : 106, Hmm No : 158)

## *43 महानगरपालिकेत बालवाडीमध्ये शिकत असलेल्या मुलांना शैक्षणिक साहीत्य् व बालवाडी करीता साहीत्य् पुरविणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : शैक्षणिक साहित्य व ब महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 512469.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 512469.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 35755.00/-

***मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरवठा करणेसाठी पुरवठा करावयाच्या लेखन साहित्याच्या बाजारातील दरांची पडताळणी करुन यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर निविदा मागविणे***

***आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहेत. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही. महानगरपालिकेने हजेरीपटानुसार खरेदी न करता एकुण 100 ते 125 एवढया जादा विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य खरेदी केले त्यामुळे मनपास रक्कम रु.25255 एवढी जादा रक्कम अदा करावी लागली. शैक्षणिक साहित्यामध्ये तक्ते खरेदी करताना सारखीच माजमापे व एकाच दर्जाच्या तक्त्यांची खरेदी वेगवेगळया दराने केल्यामुळे रक्कम रु.10500 एवढी जादा रक्कम मनपाने कंत्राटदारास अदा केली.***

प्रशासकीय मान्यता :- मा.महासभा ठराव क्रं. दि.26/06/2013
अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.6,05,040/-
निविदा मंजूरी :- मा.महासभा /स्थायी समिती ठराव क्रं. 45 दि.03/10/2013
करारनामा क्रं. :- 984 सन 2013-14
कार्यादेश क्रमांक :- भिशमनपा/मवबाकवि/135/2014 दि.05/03/2014
निविदा रक्कम :- रु.5,12,469/-
कंत्राटदाराचे नांव :- ओम साई एंटरप्रायझेस कल्याण.
कामाची मुदत :- 60 दिवस

महिला व बाल कल्याण विभागातील मनपा बालवाडीत शिकत असलेल्या मुलांना शैक्षणिक साहित्य व बालावाडी करीता साहित्य पुरविणेबाबत झालेल्या त्रुटींबाबत लेखापरिक्षण विभागाने अर्धसमास क्र.67 दि.28/8/2018 रोजी अन्वये खुलासा मागविण्यात आला असून अनुपालन प्राप्त झाले नाही. त्यामुळे खालील अभिप्राय देण्यात येत आहे.

1. मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरवठा करणेसाठी पुरवठा करावयाच्या लेखन साहित्याच्या बाजारातील दरांची पडताळणी करून यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहेत. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

2. महिला व बाल समिती गठित नसल्याबाबत दि.20/06/2013 रोजीच्या टिप्पणीत नमुद आहे. त्यामुळे महिला व बाल कल्याण समिती नसतांना ठराव क्र.3 दि. 30/08/2013 व मा.महासभा ठराव क्र.45 दि.03/10/2013 प्रमाणे मान्यता घेणे हे नियमास धरुन नाही तसेच सदर ठरावांवर सक्षम अधिका-यांच्या स्वाक्ष-या नाहित. त्यामुळे ठरावाच्या सत्यतेबाबत खात्री देता येत नाही.

3. महानगरपालिकेतील बालवाडीमध्ये शिकत असलेल्या मुलांना शैक्षणिक साहित्य व बालवाडी करीता साहित्य मिळण्याबाबत. कोणत्याही बालवाडीने लेखी मागणीपत्र विद्यार्थ्यांच्या हजेरी पत्रकाच्या आधारावर तयार केल्याबाबतचे अभिलेख धारीकेत उपलब्ध नाही. त्यामुळे लेखी मागणीपत्र न घेता खरेदी करणे हे नियमास धरुन नाही.

4. निविदेमध्ये 1210 बालवाडीतील विद्यार्थ्यांना शाळेचे शैक्षणिक साहित्य पुरविणे असे नमुद आहे. तथापि पुराव्या दाखल हजर विद्यार्थीची संख्या हजेरीपट उपलब्ध नाही. त्यामुळे प्रत्यक्ष किती विद्यार्थ्यी शाळेमध्ये हजर आहेत याबाबत स्पष्टता होऊ शकली नाही.

5. मा.उपआयुक्त (मुख्यालय) यांचे दालनात दि.13/01/2014 रोजी सायं 5.00 वाजता निविदा उघडल्याबाबत लिफाफा 1 चे छाननीचा तक्ता जोडला आहे. विक्रिकराचा दाखला, आयकर प्रमाणपत्र, व दुकाने संस्था अधिनियम 1961 नियम-6 मधील रकाने रिकामे ठेवले असुन त्यावर व निविदा पाकिटावर खरेदी समिती मधील सदस्यांच्या स्वाक्ष-या नाहीत त्यामुळे निविदा उघडल्यानंतरची प्रक्रिया नियमानुसार पूर्ण करण्यात आली नाही.

6. शैक्षणिक साहित्य पुरविण्यासाठी ओमसाई एंटरप्रायझेस कल्याण यांची निविदा स्विकारली आहे. त्यांच्या लिफाफा -2 मधील दरांमध्ये खाडा खोड असुन यामध्ये खालील प्रमाणे तफावत दिसत असुन ही बाब गंभीर आहे.

(तक्ता - अ)

| अ.क्र. | तपशील | अंदाजपत्रकातील दर | निविदेतील दर | पुरवठा केलेले चार्ट | वाटाघाटीत मंजुर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ABCDचार्ट (21इंचX27इंच) | 80 | 78 | 50 | 76 |
| 2 | अ.आ.इ.ई. चार्ट (21इंचX27इंच) | 80 | 35 | 50 | 34 |
| 3 | पक्षांचे चित्र (21इंचX27इंच) | 80 | 78 | 50 | 76 |
| 4 | प्राण्यांचे चित्र (21इंचX27इंच) | 80 | 78 | 50 | 76 |
| 5 | फळांचे चित्र (21इंचX27इंच) | 80 | 78 | 50 | 76 |
| 6 | फुलांचे चित्र (21इंचX27इंच) | 80 | 78 | 50 | 76 |

वर नमुद तक्त्याचे अवलोकन व्हावे अ.क्र.1, 3 ते 6(21इंचX27इंच) या सर्वांचे अंदाजपत्रकीय दर 80 असुन निविदेतील दर 78 आहे. तथापि अ.आ.इ.ई. चार्ट (21इंचX27इंच) याचा अंदाजपत्रकीय दर अ.क्र.1, 3 ते 6 प्रमाणे रु.80/- असुन वाटाघाटीमध्ये नमुद केलेला दर 34/- रुपये आहे. सर्व तक्ते एकसारखे असुन वाटाघाटीमध्ये निविदाकाराने सदरच्या दराप्रमाणेच अ.क्र.1, 3 ते 6 प्रमाणे दर देणे आवश्यक होते तथापि याबाबत मनपाने संबंधित पुरवठादारासोबत वाटाघाटीमध्ये कोणतीही चर्चा न केल्यामुळे मनपाचे खालील प्रमाणे नुकसान झाले आहे. एकुण 300 तक्त्यांसाठी प्रत्यक्ष जादा अदा कलेल्या रकमेचा तपशील खालीलप्रमाण आहे.

(तक्ता - ब)

| अ.क्र. | एकुण तक्ते | तक्त्यांसाठी प्रत्यक्ष अदा केलेली रक्कम | तक्ता अ मधील वाटाघाटी दरा प्रमाणे द्यावयाची रक्कम | मनपाचे झालेले नुकसान [(3)-(4)] |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 300 | 20700 | 10200 | 10500 |

वरिल (तक्ता - ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे मनपाने जादा अदा केलेले रक्कम रु.10500/- एवढी रक्कम स्टेशनरी पुरवठादाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.

7. महानगरपालिकेने वर्तमानपत्रामध्ये 1210 मुलांना शैक्षणिक साहित्य व बालवाडी करिता साहित्य मिळणेबाबत जाहिरात दिली आहे. तथापि प्रत्यक्षात 1310 व 1335 एवढया जादा विद्यार्थ्यांसाठी
खरेदी केली आहे. त्यामुळे मनपाचे खालील प्रमाणे नुकसान झाले आहे.

तक्ता-(क)

| अ.क्र. (1) | तपशिल (2) | नग (3) | प्रत्येकी दर (4) | प्रत्य्ाक्ष अदा केलेले देयक (5) | जाहीरातीत नमुद मुलांच्या संख्ये नुसार अदा करावयाची रक्कम | | | मनपाचे झालेले नुकसान [(5)-(8)] (9) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुले (6) | दर (7) | रक्कम (8) | |
| 1 | शाळेची पाटी | 1310 | 47 | 61500 | 1210 | 47 | 56870 | 4630 |
| 2 | वन,टु,थ्री, फोर इंग्रजी अंक पुस्तक | 1335 | 46 | 61410 | 1210 | 46 | 55660 | 5750 |
| 3 | अ,आ,इ,ई मराठी पुस्तक | 1335 | 39 | 52065 | 1210 | 39 | 47190 | 4875 |
| 4 | ABCDचे पुस्तक | 1335 | 39 | 52065 | 1210 | 39 | 47190 | 4875 |
| 5 | उजळणी पुस्तक | 1335 | 41 | 54735 | 1210 | 41 | 49610 | 5125 |
| जादा वाटपाबाबत एकुण वसुलपात्र रक्कम | | | | | | | | 25255 |

महानगरपालिकेने निविदेतील जाहिरातीमध्ये 1210 विद्यार्थी दर्शविले आहेत. वास्तविक सर्व

बालवाडयांकडून त्यांच्या हजेरीपटावरील प्रत्यक्ष संख्येवरुन वस्तुंची लेखी मागणी घेतल्याचे अभिलेख धारिकेत आढळले नाहीत. त्यामुळे जाहिरातीत नमुद केल्यानुसार 1210 विद्यार्थांसाठीच वस्तु खरेदी करणे आवश्यक होते. परंतु मनपाने चुकीच्या अंदाजपत्रकानुसार 1310 व 1335 विद्यार्थांच्या संख्येनुसार वस्तु खरेदी केल्यामुळे मनपास रु.25255/- एवढे जादा प्रदान केल्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झाले याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

8. बालवाडीतील मुलांना सन 2010-11 मध्ये रक्कम रुपये 8,01,820/-एवढया रकमेचे साहीत्य खरेदी केल्याचे नमुद आहे. तथापि सदर साहीत्य सन 2012-13, 2013-14 मध्ये वापरण्यासाठी योग्य असल्याबाबतची खात्री करता आली नाही. तसेच कोणत्याही बालवाडीची लेखी मागणी नसतांना रुपये 5,12,469/- एवढया रकमेची नव्याने खरेदी करण्याचे प्रयोजन समजुन येत नाही. मे.ओम साई इंटरप्रायेझेस यांनी शालेय साहीत्य पुरवठा केल्याचे नमुद आहे.तथापि त्यांचे चलनासोबत शैक्षणिक साहीत्या बरोबर शालेचे गणवेश, दप्त्रा, बुट, पायमोजे पुरविण्याचे काम समाधान कारकरित्या पुर्ण केल्याचा दाखला दिनांक 14/07/2014 रोजी धारिकेत सोबत जोडण्यात आला आहे ही बाब गंभीर आहे.

9. निविदा समितीने पात्र ठरविलेल्या निविदाकारांचा तुलनात्मक तक्ता तसेच वाटाघाटीसाठी बोलविण्या बाबतच्या टिप्पणी व तौलनिक तक्त्यावर सर्व समिती सदस्यांच्या स्वाक्ष-या नाहीत. तसेच संबंधीत पुरवठादाराने सरसकट 2% दर कमी करण्याबाबत त्यांच्या दि. 05/02/2014 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि लाकडी फळयावरची पट्टीचा निवेदातील दर 160/- रुपये आहे. त्यावर 2 टक्के म्हणजे रु.3.20 वजा केल्या नंतर रु.157/- एवढी रक्कम न दर्शविता 147/- दर्शविली आहे. त्यामुळे तौलनिक तक्त्याची तपासणी तथा पडताळणी सक्षम अधिका-यांनी न करताच सदर योजनेचा प्रस्ताव व त्यावरील खर्च केल्याचे निदर्शनास येत आहे.

10. धारिके सोबत साठा रजिष्टर व वाटप रजिष्टर न दिल्यामुळे प्राप्त वस्तु व त्यांचे वाटप याबाबत लेखापरीक्षणास अभिप्राय नोंदविता आले नाही.

DPSMAWM7701 (Ref No : 31, Hmm No : 31)

## *44 वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शहरातील बालवाडयामध्ये शिक्षण घेणा-या मुलांना गणवेश खरेदी करुन पुरविण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : महिला व बालकल्याण मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 850716.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 850716.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 50536.00/-

***उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस 1088/(2512)/उद्योग6 दि.2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.4 परिशिष्ट 8 मधील नामनिर्देशित संस्थांकडून गणवेशांचा नमूना तपासणी करुन घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. तांत्रिक निकष वस्तुची खरेदी करताना ठरवलेले नाही.त्यामुळे वस्तु खरेदीचा उददेश सफल होत नाही. विक्रीकराची रक्कम देयकातुन वसुल केलेली नाही. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.42536 मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी. माल प्राप्त् 20-05-2015 ला झाला. मालप्राप्त 16 दिवसांने उशीर झाला असल्याने करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार प्रतीदीन 500 रुपये प्रमाणे 8000 रुपये मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावे.***

वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शहरातील बालवाडयामध्ये शिक्षण घेणा-या मुलांना गणवेश खरेदी करुन पुरविण्याबाबतची निविदा नस्ती तपासली असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

कामाचे नांव-वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शहरातील बालवाडयामध्ये शिक्षण घेणा-या मुलांना गणवेश खरेदी करुन पुरविण्याबाबत.

जाहिरात व प्रसिध्दी- ई-निविदा मनपाच्या संकेतस्थळावर दि.06-01-2014 पासून उपलब्ध आहे.

निविदा विक्री दिनांक- 06-01-2014 ते 27-01-2014

निविदा उघडण्याचा दिनांक- 04-02-2014

प्रशासकिय मान्यता- 04-03-2014

स्थायी समितीची मान्यता- महासभा ठराव क्र.48 दि.03-10-2013

लेखाशिर्ष- महिला व बालकल्याण

अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष- रु.1 ,72,00,000/- सन 2014-15

पुरवठादाराचे नांव-ओम साई इंटरप्राईज

कार्यादेश क्र.व दिनांक-निरंक दि.05-03-2014

कामाचा कालावधी-दि.05-03-2014 ते 04-05-2014

प्रमाणक क्रमांक व दिनांक-1963 दिनांक 20-09-2014

खर्चाची रक्कम रुपये-रु.8,50,716/-

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील दस्ताएवजाची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.62 दिनांक 24-08-2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1. सन 2013-14 पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीबाबत शासन निर्णय दिनांक 02-01-1992 मधील परिशिष्ट-5.अ.2 नुसार शासनाच्या अंगीकृत व्यसाय /घरमाग/यंत्रमाग/महाटेन्स महाराष्ट राज्य वस्त्र उदयोंग महामंडळ यांचेकडे पत्र पाठवुन वस्तु खरेदीची प्रक्रिया पुर्ण करणे किंवा ना हरकरत प्रमाणपत्र प्राप्त करुन निविदा निविदा प्रक्रीया पुर्ण करणे आवश्यक होते.
2. निविदा काढण्यापुर्वी अंदाजपत्रकिय रक्कम (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजारातुन दरपत्रक मागवून त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे वाजवी दराची खात्री करता आलेली नाही.
3. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस 1088/2512/उद्योग 6 दि. 2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.4 परिशिष्ट 8 मधील नामनिर्देशित संस्थांकडून गणवेशांचा नमूना तपासणी करुन घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.
4. साठा रजिष्टरवरुन मार्च 2014 ला गणवेशाचा साठा किती शिल्लक होता. तसेच वाटप केलेला साठा व मार्च 2015 अखेर शिल्लक साठा याची माहीती विवरणपत्रामध्ये भरुन साठा रजिष्टर लेखापरिक्षणास तपासणी करीता उपलब्ध करुन दिलेले नाही.
5. तांत्रिक निकष वस्तुची खरेदी करताना ठरवलेले नाही. त्यामुळे वस्तु खरेदीचा उददेश सफल होत नाही.
6. महाराष्ट् विक्रीकर ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी इन गुडस इंव्हालंट इन एक्झुकीशन ऑप वर्क कंट्राट कायदा 1985 नुसार नोंदनीकृत असल्यास 2 टक्के कर कपात करणे आवश्य्क आहे. नसल्यास 5 टक्के कंट्राटकर कपात करावा असे निर्देश आहेत. त्यानुसार विक्रीकराची रक्कम देयकातुन वसुल केलेली नाही. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.42536 मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी
7. माल प्राप्त् 20-05-2015 ला झाला. मालप्राप्त 16 दिवसांने उशीर झाला असल्याने करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार प्रतीदीन 500 रुपये प्रमाणे 8000 रुपये मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावे.

FDSJRDM6801 (Ref No : 43, Hmm No : 62)

## *45 महिलासाठी क्रिडा साहित्याची खरेदीची रक्कम रु.14,91,007/- ची नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध न झालेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष : मनपा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1491007.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1491007.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7106.00/-

| |
|---|
| ***महिलासाठी क्रिडा साहित्याची खरेदीची रक्कम रु.14,91,007/- ची नस्ती महिला व बाल कल्याण विभाग तसेच बांधकाम विभाग व प्रभाग समिती क्र. 5 तसेच लेखा विभागाकडुन तपासणीसाठी लेखा परिक्षणास उपलब्ध झालेली नाही.*** |

1. महिलासाठी क्रिडा साहित्याची खरेदीची रक्कम रु.14,91,007/- ची नस्ती महिला व बाल कल्याण भाग तसेच बांधकाम विभाग व प्रभाग समिती क्र. 5 तसेच लेखा विभागाकडुन तपासणीसाठी लेखा परिक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे सदर नस्तीचे लेखा परिक्षण झालेले नाही.
2. उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.121 दिनांक 09/10//2018 बाबत विभागाने त्यांचे पत्र क्र.भिनिशमनपा/158/दिनांक 26/10/2018 नुसार खुलासा सादर केलेला आहे. कचरनाथ मेकस यांची रक्कम रु.14,91,007/- नस्ती बांधकाम विभागामध्ये आहे. खुलासा समर्पक नसल्यामुळे वरील आक्षेप कायम ठेवणेत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 100, Hmm No : 121)

## *46 वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शहरातील बालवाडयामध्ये शिक्षण घेणा-या मुलांना शाळेचे बुट व पायमोजे खरेदी करुन पुरविण्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : मनपा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 436331.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 436331.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 29817.00/-

| |
|---|
| ***सन 2014-2015 या कालावधीत मुलांना शाळेचे बुट खरेदी बाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 2/01/1992 मधील परिशिष्ट-5(अ) (1त्र) नुसार लिडकॉम/मराठवाडा चर्मोदयोग महामंडळ (सिरॉम) किंवा संत रोहिदास चर्मोदयोग विकास महामंडळ मर्यादित लिडकॉम विक्री केंद्र यांचेकडे पत्र पाठवुन वस्तु खरेदीची प्रक्रिया पुर्ण करणे किंवा ना हरकरत प्रमाणपत्र प्राप्त करुन निविदा निविदा प्रक्रीया पुर्ण करणे आवश्यक होते.*** |

***माल प्राप्त् 20/05/2015 ला झाला 16 दिवसांने उशीर झाला असल्याने करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार प्रतीदीन 500 रुपये प्रमाणे 8000/- रुपये मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावे. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.21817/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी.***

वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शहरातील बालवाडयामध्ये शिक्षण घेणा-या मुलांना शाळेचे बुट व पायमोजे खरेदी करून पुरविण्याबाबतची निविदा नस्ती तपासली असता कामाचा तपशिल खालील प्रमाण आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या शहरातील बालवाडयामध्ये शिक्षण घेणा-या मुलांना शाळेचे बुट व पायमोजे खरेदी करुन पुरविण्याबाबत |
| जाहिरात व प्रसिध्दी | दिनांक 4 जानेवारी 2014 रोजी स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात दिली आहे. |
| निविदा विक्री दिनांक | 04/01/2014 ते 12/01/2014 |
| निविदा उघडुण्याचा दिनांक | 13/01/2014 |
| स्थायी समितीची मान्यता | पिठासन अधिकारी (महासभेचा ठराव) 69,70,71दिनांक 13/02/2014 चा आहे. |
| लेखाशिर्ष | महिला व बालकल्याण |
| अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष | रु.1,76,97,455/- सन 2014-15 |
| पुरवठादाराचे नांव | ओम साई इंटरप्राईज |
| कार्यादेश क्र.व दिनांक | जा.क्र.भिनिमनपा/मवबाकसवि/137/2014 दि.05/03/2014 |
| कामाचा कालावधी | दि.05-03-2014 ते 04-05-2014 |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 2794/19-11-2014 |
| खर्चाची रक्कम रुपये | रु.436331/- |

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.63 दिनांक 24/08/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता याबाबत विभागाने त्यांचे पत्र क्र.भिनिशमनपा/150 दिनांक 26/10/2018 नुसार खुलासा सादर केलेला नाही. खुलासा समर्पक नसल्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय देणेत येत आहे.

1.सन 2014-2015 या कालावधीत मुलांना शाळेचे बुट खरेदी बाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 2/01/1992 मधील परिशिष्ट-5(अ) (1त्र) नुसार लिडकॉम/मराठवाडा चर्मोदयोग महामंडळ (सिरॉम) किंवा संत रोहिदास चर्मोदयोग विकास महामंडळ मर्यादित लिडकॉम विक्री केंद्र यांचेकडे पत्र पाठवुन वस्तु खरेदीची प्रक्रिया पुर्ण करणे किंवा ना हरकरत प्रमाणपत्र प्राप्त करुन निविदा निविदा प्रक्रीया पुर्ण करणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2. निविदा काढण्यापुवी बाजारमुल्य काढलेले नाही. बाजारातुन दरपत्रके मागवून त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे वाजवी दराची खात्री करता आलेली नाही.

3.पुरवठादारानी पुरविलेले शाळेचे बुट व पायमोजे याची गुणवत्ता व दर्जा शासनाच्या मानकानुसार असलेला दिसुन येत नाही.

4.विक्रीकराची रक्कम देयकातुन वसुल केलेली नाही. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.21817/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी.

5.माल प्राप्त दिनांक 20/05/2015 रोजी म्हणजेच झाला 16 दिवसांने उशीरा प्राप्त झाला असल्याने करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार प्रतीदीन 500 रुपये प्रमाणे 8000/- रुपये मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावे.

FDSJRDM6801 (Ref No : 101, Hmm No : 63)

## *47 आपत्तकालीन परिस्थितीमध्ये रेनकोट खरेदी करताना झालेल्या अनियमितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष :आपत्तकालीन परिस्थिती शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 152000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 152000.00/-

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

वसूलपात्र रक्कम रु. 1800.00/-

***आपत्तकालीन परिस्थितीमध्ये रेनकोट खरेदी करताना विभागाने मागणीपत्र न घेता रेनकोट खरेदी केले ही बाब नियमबाह्य आहे. पुरवठादाराने कार्यादेश दिनांकापासून 9 दिवसांच्या विलंबाने रेनकोटचा पुरवठा केला आहे. त्यामुळे पुरवठादाराकडून 200X9=1800/- एवढा दंड वसुल करणे आवश्यक आहे. विभागाने डिलेव्हरी चलन न घेता साठा रजिस्टरमध्ये नोंदी घेणे हे नियमास धरुन नाही. विभागाने खरेदी केलेले 95 रेनकोट उत्पादक कंपनी अथवा घाऊक बाजारपेठेतून खरेदी केले नाही त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झाले.***

1.कामाचे नाव:- आपत्तकालीन परिस्थितीमध्ये करावा लागणारा खर्च

2.लेखाशिर्ष:- आपत्तकालीन परिस्थितीमध्ये करावा लागणारा खर्च

3.अंदाजपत्रकीय तरतुद :- रु.50 लक्ष

4.कामाची आवश्यकता :- मागणी नाही

5.अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.152000

6.दरपत्रक रक्कम :- रु.152000

7.एकुण प्राप्त्ाक दरपत्रकदार व द्वर

| अ.क्र. | दरपत्रकदाराचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1. | मे.ओम साई ट्रेडर्स वाणी आळी भिवंडी | प्रती नग-1685/- |
| 2. | मे.साईबाबा ट्रेडर्स ब्राम्हण आळी,भिवंडी | प्रती नग-1589/- |
| 3. | मे.लिना एम.मुंढे नवभारत शाळा भिवंडी | प्रती नग-1600/- |
| | | |

8.न्युनतम दरपत्रकदार व दर :– मे.साईबाबा ट्रेडर्स ब्राम्हण आळी,भिवंडी, रु.1589/-

9.कार्यादेश क्र. व दिनांक :- भिनिशमपा/पापुवि/जा.क्र.1333/2014 दिनांक 10/09/2014

वरिलप्रमाणे आपत्तकालीन परिस्थितीमध्ये रेनकोट खरेदी करताना झालेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्र.148 दिनांक 23/10/2018 देण्यात आले होते तथापि विभागाने विहित कालावधीत अनुपालन सादर केले नाही त्यामुळे याबाबत लेखापरीक्षण पथक आपले अभिप्राय खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

1)महानगरपालिकेने यापूर्वी खालील प्रमाणे रेनकोट खरेदी केले आहेत.

| अ.क्र. | पुरवठा दाराचे नाव | दिनांक | नग |
|---|---|---|---|
| 1 | स्नेहल डेकोरेटर | 20/09/2009 | 50 |
| 2 | स्नेहल डेकोरेटर | 25/08/2010 | 80 |
| 3 | मे.साईबाबा ट्रेडर्स ब्राम्हण आळी,भिवंडी | 22/09/2014 | 95 |
| | | एकूण | 225 |

वरील रेनकोट पैकी किती वाटप केले? व शिल्लक किती याबाबत विभागाने माहिती दिली नाही त्यामुळे यापूर्वी

संबंधित विभागाकडे किती रेनकोट शिल्लक होते याबाबत भाष्य करता आले नाही.

2) विभागाने रेनकोट पावसाळयापूर्वी खरेदी करणे आवश्यक होते तथापि विभागाने रेनकोट माहे सप्टेंबर-2014 अखेर खरेदी करण्याचे प्रयोजन समजून येत नाही. तसेचे रेनकोट खरेदीपूर्वी त्याचे मागणीपत्रकही धारिकेत उपलब्ध नाही त्यामुळे विभागाने मागणीपत्र न घेता रेनकोट खरेदी केले ही बाब नियमबाह्य आहे.

3) विभागाच्या साठा रजिष्टर मध्ये दि.22/09/2014 रोजी मे. साईबाबा यांनी 95 नग पुरविल्याची नोंद आहे. तथापि त्यावर चलनाचा तपशिल उपलब्ध नाही त्यामुळे नोंदी कशाच्या आधारे घेतल्या याबाबत बोध होत नाही. तरी विभागाने डिलेव्हरी चलन न घेता साठा रजिस्टरमध्ये नोंदी घेणे हे नियमास धरुन नाही.

4) आपत्तकालीन विभागामध्ये प्रभाग समिती कार्यालयासह कार्यरत कर्मचा-यांची सन 2014-15 मधील व त्यापुर्वीची हजर संख्या (हजेरीपटासह) विभागाने उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे प्रत्यक्ष हजर कर्मचाऱ्यांच्या आधारावर रेनकोट खरेदी करण्यात आले नाही ही बाब नियमबाह्य आहे.

5) विभागाने खरेदी केलेले 95 रेनकोट उत्पादक कंपनी अथवा घाऊक बाजारपेठेतून खरेदी करणे आवश्यक होते. मोठया प्रमाणावर वस्तु खरेदी करताना उत्पादक कंपनी अथवा घाऊक बाजारपेठेतून खरेदी केल्यास महानगरपालिकेचे होणारे नुकसान झाले नसते.

6) करारनाम्यामध्ये रेनकोट खरेदी बाबत कामाची मुदत दिली नसून प्रति दिवस दंड रु.200/- मात्र दंडाची आकारणी केली जाईल असे नमुद आहे. पुरवठादारास दि.12/09/2014 रोजी कार्यादेश दिला आहे. तथापि पुरवठादाराने प्रत्यक्ष मालाचा पुरवठा चलन धारिकेत उपलब्ध नाही. परंतु साठा रजिष्ट्रर नोंदवहीमध्ये दि.22/09/2014 रोजी प्राप्त झाल्याची नोंद आहे. त्यामुळे पुरवठादाराने कार्यादेश दिनांकापासून 9 दिवसांच्या विलंबाने पुरवठा केला आहे. त्यामुळे पुरवठादाराकडून 200X9=1800/-एवढा दंड वसुल करण्यात यावा.

7) धारीकेमध्ये पुरवठा केलेल्या रेनकोटच्या दर्जाचा तपासणी अहवाल उपलब्ध नसल्यामुळे मनपाने मागणी केलेले रेनकोट त्याच दर्जाचे आहेत याबाबत अभिप्राय नोंदविता आले नाही.

8) खरेदी केलेले 95 रेनकोट कर्मचा-यांना वाटपाबाबतची नोंद साठा रजिष्ट्रमध्ये नाही. त्यामुळे रेनकोट वाटपाबाबत भाष्य करता आले नाही.

DPSMAWM7701 (Ref No : 40, Hmm No : 148)

## *48 आपत्तकालीन परिस्थितीमध्ये काम करण्याकरिता आवश्यक साधन सामुग्री खरेदीमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 9**

*लेखा शीर्ष :आपत्तकालीन परिस्थिती शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 997110.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 997110.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 15500.00/-

***महानगरपालिकेने शासन निर्णयानुसार आपत्तकालीन परिस्थितीमध्ये काम करण्यासाठी साधनसामुग्री खरेदी या कामाची ई- निविदा केली नाही तसेच निविदा तीन स्थानिक प्रसिध्द वर्तमानपत्रामध्ये जाहिरात न देता दैनिक सागर या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली त्यामुळे निविदेस आवश्यक प्रसिध्दी मिळाली नाही त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराच्या निविदांचा लाभ घेता आला नाही. कंत्राटदाराने सदर साधनसामुग्री कार्यादेश मिळाल्यापासुन 31 दिवसाच्या विलंबाने पुरवठा केली आहे. त्यामुळे पुरवठादाराकडून 15500/- एवढा विलंब आकार वसूल करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने शासकीय दरकरारानुसार नामनिर्देशित शासकिय कंत्राटदाराकडून साधनसामुग्री खरेदी करण्यात आली नाही त्यामुळे विभागाने शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली नाही.***

कामाचे नाव :- आपत्तकालीन परिस्थितीमध्ये काम करण्यासाठी साधनसामुग्री खरेदी करणेबाबत.
लेखाशिर्ष :- आपत्तकालीन परिस्थितीमध्ये करावा लागणारा खर्च
अंदाजपत्रकीय तरतुद :- 50 लक्ष
प्रशासकीय मान्यता ठराव :- 24/03/2014
अंदाजपत्रकीय रक्कम :- 9,97,110/-
निविदा रक्कम :- 9,97,110/-
अनामत रक्कम :- 9,500/-
एकुण प्राप्त् निविदाकार व दर :-

| अ.क्र. | निविदादाराचे नाव | प्राप्त दर |
|---|---|---|
| 1. | मे.साईबाबा ट्रेडर्स ,भिवंडी | अंदाजपत्रकापेक्षा कमी |
| 2. | मे.सिध्दी ऑटोगॅरेज भिवंडी | अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| 3. | मे.श्री मोटर्स गॅरेज,भिवंडी | अंदाजपत्रकापेक्षा जास्त |

न्युनतम निविदादार व दर - मे.साईबाबा ट्रेडर्स ,भिवंडी, रु.989285/-
कार्यादेश क्र. व दिनांक :- भिनिशमपा/आव्यवि/जा.क्र.79/2014 दिनांक 27/06/2014
कामाची मुदत :- नमूद नाही
प्रमाणक क्र.व दिनांक :- 29 दि.27/08/2014.

वरिलप्रमाणे आपत्तकालीन परिस्थितीमध्ये काम करण्यासाठी साधनसामुग्री खरेदीची धारिका तपासली सदर धारिका तपासताना काही त्रुटी निदर्शनास आल्या त्याबाबत अर्धसमास क्र .152 दि.23/10/2018 रोजी आक्षेप नोंदविण्यात आले तथापि विभागा ने त्याचे अनुपालन विहित मुदतीमध्ये दिले नाही याबाबत लेखापरीक्षण पथक आपले अभिप्राय खालीलप्रमाणे देत आहे.

1. महाराष्ट्र शासन निर्णय क्र .प्र.2012/प्र.क्र.111/आव्यप्र.-1,मंत्रालय,मुंबई,दि.4/2/2013, मधील अटी व शर्तीप्रमाणे शासकीय दरकरारानुसार नामनिर्देशित शासकिय कंत्राटदाराकडून साधनसामुग्री खरेदी करण्यात आली नाही त्यामुळे विभागाने शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली नाही.

2. महानगरपालिकेने शासन निर्णयानुसार सदर कामाची ई -निविदा केली नाही तसेच निविदा

तीन स्थानिक प्रसिध्द वर्तमानपत्रामध्ये जाहिरात न देता दैनिक सागर या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली त्यामुळे निविदेस आवश्यक प्रसिध्दी मिळाली नाही त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराच्या निविदांचा लाभ घेता आला नाही.

3. करारनाम्यामध्ये साधनसामुग्री पुरवठयाबाबत कोणतीही कामाची मुदत दिली नाही तथापि माल मुदतीत पुरवठा न केल्यास 5 लक्ष पर्यंत प्रती दिवशी रु.250/- व 5 ते 25 लक्ष पर्यंत रु.500/- प्रमाणे प्रती दिन दंड नमूद केला आहे कंत्राटदाराने कार्यादेश मिळाल्यापासुन 31 दिवसाच्या विलंबाने पुरवठा केला आहे. त्यामुळे पुरवठादाराकडून 15500/- एवढा वसूल करणे आवश्यक आहे.

4. महाराष्ट्र शासन निर्णय क्र .प्र.2012/प्र.क्र.111/आव्यप्र.-1,मंत्रालय,मुंबई,दि.4/2/2013, अन्वये आपत्ती व्यवस्थापन क्रेंद्रांना प्रत्येकी 5000000/- निधीचे वितरण करणेबाबतच्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार आज अखेर साधनसामुग्रीवर आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे बळकटीकरण, प्रशिक्षणावर व जनजागृतीसाठी किती खर्च करण्यात आला याबाबतची माहिती बाबनिहाय व वर्षनिहाय देण्यात आली नाही . त्यामुळे शासन निर्णयानुसार आपत्तकालीन विभागाने साहित्य खरेदीसाठी -60%, प्रशिक्षणासाठी- 25% व जनजागृतीसाठी -15% खर्च केल्याबाबतची प डताळणी करता आली नाही त्यामुळे विभागाने शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली किंवा नाही याबाबत भाष्य करता आले नाही.

5. विभागास प्राप्त साधनसामुग्री स्पेसिफिकेशन प्रमाणे असल्याबाबत व ती वापरण्यास योग्य असल्याबाबतचा शासकीय संस्थेचा अहवाल धारिकेत उपलब्ध नाही त्यामुळे खरेदी केलेली साधनसामुग्रीचा दर्जा व वापरण्यास योग्यतेबाबत भाष्य करता आले नाही.

6. कंत्राटदाराचा सन 2011-12 व 2012-13 या कालावधीमधील आयकर रिटर्न आयकर विभागास भरल्याबाबतचा तपशील धारिकेत उपलब्ध करुन दिला नाही त्यामुळे निविदा मंजूर करण्यापूर्वी पुरवठादाराने वर नमूद कालावधीचा आयकर रिटर्न आयकर विभागास सादर केल्याबाबतची खात्री संबंधित विभागाने केली ही बाब नियमास धरुन नाही.

7. निविदेमध्ये नमुद वस्तु पुरविण्यासाठी संबंधित कंत्राटदाराचे शॉप ॲक्ट लायसन्स धारिकेत नाही त्यामुळे कंत्राटदार अधिकृत विक्रेता असल्याबाबत खात्री करता आली नाही.

8. वृत्तपत्रातील जाहिरातीमध्ये सदर कामाची निविदा दि .13/05/2014 रोजी दु4.00 वाजेपर्यंत उघडण्यात येईल असे नमूद आहे . तथापि धारिकेमधील क्र.भिनिशमपा/आरोग्य/36/14,दि.21/05/2014 च्या पत्रान्वये दु .4.00 वाजेपर्यंत उघडण्यात येणार असल्याचे नमूद आहे . निविदा उघडण्यासाठीच्या दिनांक व वेळेमध्ये बदल केलेबाबतची कारणे धारिकेत नमूद नाही त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद दिनांकास व वेळेस निविदा न उघडण्याचे कारण विभागाने दिले नाही ही बाब योग्य नाही.

9. कंत्राटदाराचे साहित्यसामुग्री पुरवठयाचे इनव्हॉईस विहित नमुन्यात नाही ते Tax/Cash Invoice या विहित नमुन्यात नाही त्यावर नोंदणीक्रमांक व शिक्का नाही . साहित्यसामुग्रीचे इनव्हॉईस नियमाप्रमाणे विहित नमुन्यात असेल तरच महानगरपालिकेने त्याचे प्रदान करणे आवश्यक तथापि विभागाने तसे केले नाही सदरची बाब नियमबाहय आहे.

DPSMAWM7701 (Ref No : 108, Hmm No : 152)

## *49 नदियापार येथील खालसा मदरसा रामपाल तबेला जवळ गटार बांधणे या कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : बांधकाम विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 399650.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 399650.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 999.00/-

***एम.बी. प्रकरण क्र.129 व पान क्रमांक 99 वर आहे. निरीक्षण पथकास तपासणीकरीता उपलब्ध झालेली नाही. त्यामुंळे विहीत मुदतीत काम झाल्याची व शासन कर वसुल झाल्याची खात्री होत नाही. नगरविकास विभागाचे अधिसुचना दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.999/- वसुल केलेला नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये, कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करुन नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही. ठेकेदाराने कामावर आणलेल्या साहित्याची तपासणी महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता यांनी केल्याचा तपासणी अहवाल उपलब्ध नाही. तसेच कामावर साहित्य आणलेबाबतची चलने वाहतुकीची चलने नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.***

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील बांधकाम विभाग वित्तीय वर्ष 2014-15 मधील वार्ड क्रमांक 2 मधील निविदा नस्ती तपासली असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

कामाचे नांव- नदियापार येथील खालसा मदरसा रामपाल तबेला जवळ गटार बांधणेबाबत.

मक्तेदाराचे नांव- मे.बुबुरे ॲन्ड असो.भिवंडी

निविदा रक्कम- रु.399650/-

निविदा विक्री दिनांक- दैनिक सामना मध्ये दिनांक 3/9/14 जाहिरात दिली आहे.

निविदा विक्री दिनांक- 3/9/14 ते दि.11/09/14

निविदा स्विकृती दिनांक- 12/09/2014

निविदा उघडणे- 10/11/2014

प्रशासकिय मान्यता- प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील 35 कामांना दिनांक 20/02/14 रोजी झालेल्या प्रभाग समीती क्र.2 च्या सभेमध्ये प्रशासकिय मान्यता आहे.

प्रत्यक्ष काम सुरु- 25/03/2015

काम पुर्ण- 28/05/2015

कामाची मुदत- 25/03/2015 ते 24/06/2015

तांत्रिक मान्यता-429/20-02 -2015

खर्चाचा तपशिल प्रमाणक क्र.दिनांक व रक्कम- 9/15-01-2016

अर्थसंकल्पीय तरतूद व वर्ष- २ कोटी रुपये वर्ष 2014-15

कार्यादेश क्र. व दिनांक- 4066 दिनांक 25-03-2015

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील दस्ताएवजाची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.69 दिनांक 29/08/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय देणेत येत आहे.

1) नस्तीमध्ये चौथ्यांना फेर निविदा काढण्यात आल्या आहेत तथापि सविस्तर विवरण दिसुन येत नाही. वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याचे दिसुन येत नाही.

2) एम.बी. प्रकरण क्र.129 व पान क्रमांक 99 वर आहे. लेखापरिक्षणास तपासणीकरीता उपलब्ध झालेली नाही. त्यामुंळे विहीत मुदतीत काम झाल्याची व शासन कर वसुल झाल्याची खात्री होत नाही.

3) नगरविकास विभागाचे अधिसुचना दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.999/- वसुल केलेला नाही.

4) नमुना 133 मध्ये शहर अभियंता यांचा मुळ कामाचा पुर्णत्वाचा दाखला तयार केला. तथापि त्यावर दिनांक नमुद नाही.

5) काम करण्यापुर्वी गटार तुंबले होते व खराब झाले याचा पुरावा फोटो काढून नस्तीसोबत जोडलेला नाही.

6) सार्वजनिक बांधकाम नियमावली परिशिष्ट नियम 11 नुसार शहर अभियंता यांनी कामाची व मोजमापाची किमान 5% तपासणी करुन मोजमाप पुस्तिकेत दिनांकित अभिप्राय न नोंदविल्यामुळे

कामाचे गुणात्मक दर्जाबाबत खात्री पटत नाही.

7) नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 165 नुसार अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी तांत्रिक अधिकारी यांनी स्थाळाची पाहणी न करताच अंदाजपत्रक तयार केल्यामुळे वस्तुनिष्ठ अंदाजपक असल्याची खात्री पटत नाही.

8) सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये,कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करुन नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही.

9) ठेकेदाराने कामावर आणलेल्या साहित्याची तपासणी महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता यांनी केल्याचा तपासणी अहवाल उपलब्ध नाही. तसेच कामावर साहित्य आणलेबाबतची चलने, वाहतुकीची चलने नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.

10) महाराष्ट् नगरपालिका लेखा संहिता नियम क्र.19 नुसार प्रमाणकाद्वारे प्रदान करावयाच्या रक्कमामधून केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे आयकर/विमा/कामगार कल्याण उपकर/व्हॅट इ.रकमा कपात करण्यात आलेल्या असुन,त्या प्रत्यक्षात शासनाच्या खाती जमा केल्याबाबतची पूरक कागदपत्रे/पोच/चलनाच्या प्रती अभिलेख नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत. त्यामुळे सदर रकमा प्रत्यक्षात शासनास जमा झाल्याची खात्री होऊ शकली नाही. त्यामुळे रक्कम रु.399650/- आक्षेपित ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 41, Hmm No : 69)

## *50 प्रभाग क्र.25 गणेश नगर न्हावीपाडा अपार्टमेट,हनुमान सोसायटी,नासीर बिल्डींग जवळ गटार बसविणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : बांधकाम 01 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 416217.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 416217.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1041.00/-

***नगरविकास विभागाचे अधिसुचना दिनांक 06 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण***

***रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.1041/- वसुल केलेला नाही. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 165 नुसार अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी तांत्रिक अधिकारी यांनी स्थाळाची पाहणी न करताच अंदाजपत्रक तयार केल्यामुळे वस्तुनिष्ठ अंदाजपक असल्याची खात्री पटत नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये,कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करुन नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही.***

महानगरपालिका भिंवडी नि.शहर येथील बांधकाम विभाग येथील वित्तीय वर्ष 2014-15 मधील वार्ड क्रमांक 2 मधील निविदा नस्ती तपासली असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

कामाचे नांव- प्रभाग क्र.25 गणेश नगर न्हावीपाडा अपार्टमेट,हनुमान सोसायटी,नासीर बिल्डींग जवळ गटार बसविणे.मक्तेदाराचे नांव-मे.बुबुरे ॲन्ड असो.भिवंडी

निविदा रक्कम- (अंदाजपत्रकिय रक्कम)रु.393930/-

निविदा विक्री दिनांक- 27/06/2014 ते 03/07/2014

निविदा स्विकृती दिनांक- 05/07/2014

निविदा उघडणे- 14/07/2014 सकाळी 11.30

प्रशासकिय मान्यता- प्रभाग समिती क्र.2 च्या कार्यक्षेत्रातील 35 कामांना दिनांक 20/02/14 रोजी झालेल्या प्रभाग समीती क्र.2 च्या सभेमध्ये प्रशासकिय मान्यता आहे.

काम पुर्ण झाल्याचा दिनांक -19/05/2018

कामाची मुदत- 06/09/2014 ते 05/12/2014

तांत्रिक मान्यता- शहर अभियंता यांनी दिनांक 05/02/2014 यांची तांत्रिक मान्यता आहे.

खर्चाचा तपशिल प्रमाणक क्र. दिनांक व रक्कम- 845/14-09-2015 रक्कम रु.416217/- (पहिले व अंतिम देयक)

अर्थसंकल्पीय तरतूद व वर्ष- 12.79 कोटी सन 2014-15

कार्यादेश क्र. व दिनांक- क्र.2010/06-09-2014

डि.एस.आर.वर्ष- 2012-13

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील दस्ताएवजाची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.70 दिनांक 29/09/2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1. नस्तीमध्ये चौथ्यांना फेर निविदा काढण्यात आल्या आहेत. तथापि त्याप्रमाणे नोटींगमध्ये सविस्तर विवरण दिसुन येत नाही. वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याचे दिसुन येत नाही.
2. स्थायी समितीची मान्यता घेतल्याचे दिसुन येत नाही.
3. एम.बी. निरीक्षण पथकास तपासणीकरीता उपलब्ध झालेली नाही. त्यामुंळे विहीत मुदतीत काम

झाल्याची व शासन कर वसुल झाल्याची खात्री होत नाही.

4. नगरविकास विभागाचे अधिसुचना दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.1041/- वसुल केलेला नाही.
5. नमुना 133 मध्ये शहर अभियंता यांचा मुळ कामाचा पुर्णत्वाचा दाखला तयार केला. तथापि त्यावर दिनांक नमुद नाही.
6. काम करण्यापुर्वी गटार तुंबले होते व खराब झाले याचा पुरावा फोटो काढून नस्तीसोबत जोडलेले नाही.
7. नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 165 नुसार अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी तांत्रिक अधिकारी यांनी स्थाळाची पाहणी न करताच अंदाजपत्रक तयार केल्यामुळे वस्तुनिष्ठ अंदाजपक असल्याची खात्री पटत नाही.
8. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये,कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करुन नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही.
9. ठेकेदाराने कामावर आणलेल्या साहित्याची तपासणी महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता यांनी केल्याचा तपासणी अहवाल उपलब्ध नाही. तसेच कामावर साहित्य आणलेबाबतची चलने, वाहतुकीची चलने नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.
10. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता नियम क्र.19 नुसार प्रमाणकाद्वारे प्रदान करावयाच्या रक्कमामधून केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे आयकर/विमा/कामगार कल्याण उपकर/व्हॅट इ.रकमा कपात करण्यात आलेल्या असुन,त्या प्रत्यक्षात शासनाच्या खाती जमा केल्याबाबतची पूरक कागदपत्रे/पोच/चलनाच्या प्रती अभिलेख नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत.त्यामुळे सदर रकमा प्रत्यक्षात शासनास जमा झाल्याची खात्री होऊ शकली नाही. त्यामुळे रक्कम रु.416217/- आक्षेपित ठेवण्यांत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 50, Hmm No : 70)

### *51 प्रभाग समिती क्र.05 च्या कार्यक्षेत्रातील प्रभागातील 18 अंतर्गत रस्त्यांचे खराब झालेल्या पृष्ठभागाची पॅचवर्क पध्दतीने दुरुस्ती करण्याच्या कामामधील अनियमितता...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 10736326.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10736326.00/-

***Bituminous Macadum चा थर पूर्ण झाल्यानंतर दूबार Tack Coat करुन नंतरच Bituminous Carpet पसरविणे व त्यानंतर संपूर्ण रस्ता सिलकोट करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष झालेले डांबरीकरण व Patchwork चे काम तांत्रिक बाबीनुसार केल्याचे लेखापरीक्षणास दिसून येत नाही. तसेच डांबर साहित्य साईटवर आणल्याबाबतची रिफायनरी कडील चलने, त्याच बरोबर कामाच्या ठिकाणी 3 प्रतीत वर्क ओर्डर बुक ठेवलेले नाही. कामात झालेल्या बचत झाल्याने, मूळ प्रशासकीय मान्यतेत सुधारणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाली नाही.***

प्रभाग समिती क्र. 05 च्या कार्यक्षेत्रातील प्रभागातील 18 अंतर्गत रस्त्यांचे खराब झालेल्या पृष्ठभागाची पॅचवर्क पध्दतीने दुरुस्ती करण्याच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 10736326/- |
| २) | ठेकेदाराचे नांव | मे.व्ही.के.कन्स्ट्रक्शन्स्, उल्हासनगर |
| ३) | प्रशासकीय मंजूरी | मुलभूत सुविधा योजनेंतर्गत मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांची मंजूरी तथापि प्रत उपलब्ध नाही. |
| ४) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.15/02/2014 |
| ५) | निविदा उघडल्याची दिनांक | 19/03/2014 |
| ६) | निविदेचा कालावधी | 20/02/2014 ते 05/03/2014 |
| ७) | जाहिरात | दै.नवभारत दि.18/02/2014<br>दै.सकाळ दि. 18/02/2014 |
| ८) | निविदा स्वीकृती | 9866684/-(8.1% कमी दराची) |
| ९) | कार्यादेश | जा.क्र.224/2014, दिनांक 09/05/2014 |
| १०) | कामाची मुदत | कार्यादेश दिनांकापासून 90 दिवस |
| ११) | काम पूर्णत्वाचा दिनांक | उपलब्ध नाही. |
| १२) | मोजमाप पुस्तिका | 189, पान क्र.58,64,65,76 |
| १३) | प्रत्यक्ष खर्च तपशील | 1.पहिले धावते देयक रु.2150901/-<br>2.दुसरे धावते देयक रु.615504/-<br>3.तिसरे धावते देयक रु.2756642/- |

उपरोक्त कामाच्या उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीमध्ये खालील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.68 दि.29/08/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या प्रभाग समिती क्र.5 अंतर्गत 18 मुख्य

रस्त्यांचे पॅचवर्क पध्दतीने दुरुस्ती करणे या कामाच्या नस्तीची तपासणी करण्यात आली. प्रस्तूत कामाचे प्राकलन रक्कम रुपये 10736326/- चे तयार करण्यात आलेले असून, सदर प्राकलनाला प्राधिकृत तांत्रिक अधिकारी यांनी मंजूरी दिलेली आहे. प्रस्तूत कामाची मोजमाप नोंदवही क्र.189 पान क्र.58,64,65 व 76 वरील मोजमापे तपासण्यात आली असता, मुळच्या डांबरीकरणाच्या रस्त्यावर Tack Coat करणे, Tack Coat झाल्यानंतर Bituminous Macadum(50/75mm Thick) पसरविणे व त्याच्यावर Bituminous Carpet पसरविणेच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. तांत्रिक दृष्टीने छाननी केली असता, Bituminous Macadum चा थर पूर्ण झाल्यानंतर दूबार Tack Coat करुन नंतरच Bituminous Carpet पसरविणे व त्यानंतर संपूर्ण रस्ता सिलकोट करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष झालेले डांबरीकरण व Patchwork च्या कामाबाबत पडताळणी झाली नाही.

2. कंत्राटदाराने कामाचे बार चार्टस काम सुरु होण्यापूर्वी देणे आवश्यक होते. तथापि बार चार्टस आढळून आले नाहीत. या कामात Tack Coat करण्यासाठी रु.30/- प्रति चौ.मी प्रमाणे ठेकेदारास अदा करण्यात आले आहेत. परंतू दर पृथ:करण उपलब्ध नसल्याने दराची खात्री करता आली नाही.

3. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये, कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही.

4. सदर कामात डांबर कामाची प्रत नमूद केलेली नाही. तसेच डांबर साहित्य साईटवर आणल्याबाबतची रिफायनरी कडील चलने , त्याच बरोबर कामाच्या ठिकाणी 3 प्रतीत वर्क ऑर्डेर बुक ठेवलेले नाही.

5. अंदाजपत्रकीय परिमाण व प्रत्यक्ष केलेल्या कामाचे परिमाणाचे नमुना नंबर 132 मध्ये अहवाल सदर करणे बंधन कारक असतांना देखील सदर अहवाल सादर केल्याचे दिसून आले नाही.

6. प्रभाग क्र.5 च्या अंतर्गत रस्त्याच्या कामात झालेल्या बचत झाल्याने, मूळ प्रशासकीय मान्यतेत सुधारणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झाली नाही.

7. ठेकेदाराने करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कार्यादेश दिल्यापासून 90 दिवसात (पावसाळयाखेरीज) पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि पावसाळा संपल्यानंतर देखील ठेकेदाराने काम सुरु न केल्याने, महापालिकेकडून वेळोवेळी नोटिस दिल्यानंतर सदर ठेकेदाराने मुदतवाढ मागितल्याने, सदर कामास मुदतवाढ दि.31/03/2015 पर्यंत देण्यात आली. पर्यायाने फलनिष्प्त्तीक्होऊ शकली नाही.

8. मालमत्ता रजिस्टर (Road History Sheet) उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. जेणेकरुन सदर रस्त्यांच्या कामावर वारंवार खर्च होतो किंवा कसे ? याची खातरजमा करता आली नाही.

9. नगर विकास विभाग परिपत्रक क्र.जीईन 1009/1357/प्र.क्र.166 दिनांक 03/11/2003 कामाचा कामावरील कामगारांचा विमा अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% इतकी रक्कम शासकीय विमा निधी कडे जमा करणे आवश्यक असतांना , सदर रक्कम जमा करण्यात आलेली नाही.

10. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा,1952 मधील तरतूदीनुसार ठेकेदाराने कामावरील कर्मचाऱ्यांची नोंदणी करुन त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यांवर वर्गणी जमा करुन, त्याची यादी/तपशील ठेकेदाराने देयकासोबत जोडल्यानंतरच रकमेचे प्रदान करणे आवश्यक असतांनाही अशी कार्यवाही झालेली नाही.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

आक्षेपाधीन रक्कम रुपये 10736326/-

DGPSAAM7402 (Ref No : 77, Hmm No : 68)

## *52 वॉर्ड क्र.14(ब) येथे उमर मस्जिद पाठीमागे शौचालय बांधणे (6सीट) बाबतच्या कामातील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 9**

*लेखा शीर्ष : बांधकाम शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 496277.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 496277.00/-

***जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे मंजूरीपत्रातील अटीनुसार खर्चाचे विवरणपत्र पुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यंत पाठविण्यात आलेले नाही. निविदा उघडतांना सर्व निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी व अधिकारी यांना कळविणे आवश्यक असतांनाही निविदाधारकांना कळविण्यात आलेले नाही. काही साहित्य कमी/अधिक प्रमाणात वापरण्यात आलेले आहे. या बाबत अशा कमी/अधिक परिमाण वापरल्यापुष्टयर्थ स्पष्टीकरण आढळून आले नाही.***

म.न.पा. हददीतील वॉर्ड क्र.14(ब) येथे उमर मस्जिद पाठीमागे शौचालय बांधणे (6सीट) कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 496797/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | मे.बुबेरे & असोसिएटस्, भिवंडी |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | आमदार निधीअंतर्गत मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांची मंजूरी क्र. उपलब्ध करुन दिली नाही. |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.02/07/2014 |
| 5) | निविदेचा कालावधी | दि.01/08/2014 ते 11/08/2014 |
| 6) | जाहिरात | दै.नवशक्ती दि. 01/08/2014 |
| 7) | निविदा उघडल्याचा दिनांक | 12/08/2014 |
| 8) | निविदा स्वीकृती | 12/08/2014 अंदाजपत्रकीय दराने |
| 9) | कार्यादेश | क्र.बांध/1541/2014, दि.20/08/2014 |
| 10) | कामाची मुदत | कार्यादेश दिनांकापासून 60 दिवस |
| 11) | करारनामा | क्र.54 दि.16/08/2014 |

| | | |
|---|---|---|
| 11) | काम पूर्णत्वाचा दिनांक | 18/10/2014 (प्रत आढळून आली नाही) |
| 12) | मोजमाप पुस्तिका | क्र.203, पान क्र.1 ते 8 |
| 13) | प्रत्य्क्ष खर्च तपशील | १.पहिले व अंतिम धावते देयक रु.496277/- |
| 14) | देयकातील कपाती | सुरक्षा अनामत रु.9925/-, आयकर रु.9925/-, व्हॅट रु.24813/-, उपकर रु.4962/-, विमा रु.4962/- |
| 15) | निव्वळ प्रदान रक्कम | रुपये 441690/- |

1. उपरोक्त कामाच्या उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीमध्ये खालील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.76 दि.05/09/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे खालीलप्रमाणे लेखापरिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

2. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये,कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही. सदर कामात साहित्य साईटवर आणल्याबाबतची चलने आढळून आली नाहीत.

3. नगर विकास विभाग परिपत्रक क्र.जीईन 1009/1357/प्र.क्र.166 दिनांक 03/11/2003 कामाचा कामावरील कामगारांचा विमा अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% इतकी रक्कम रुपये 4963/- शासकीय विमा निधी कडे जमा करणे आवश्यक असतांना , सदर रक्कम जमा करण्यात आलेली नाही. सदर रक्कम वसुल करण्यात यावी.

4. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा,1952 मधील तरतूदीनुसार ठेकेदाराने कामावरील कर्मचाऱ्यांची नोंदणी करुन त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यांवर वर्गणी जमा करुन, त्याची यादी/तपशील देयकासोबत जोडलेला नाही.

5. जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे मंजूरीपत्रातील अटीनुसार खर्चाचे विवरणपत्र पुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यंत पाठविण्यात आलेले नाही.

6. करारनाम्यातील अटीनुसार कामावरील कामगारांचे वय 18 किंवा त्यापेक्षा अधिक आहे व ते काम करण्यास सक्षम आहेत याबाबत विभागाने तसे ठेकेदाराकडून प्रमाणपत्र घेतलेले नाही.

7. निविदा उघडतांना सर्व निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी व अधिकारी यांना कळविणे आवश्यक असतांनाही निविदाधारकांना न कळविता निविदा उघडण्यात आलेल्या आहेत..

8. मोजमाप पुस्तिका क्र.203 पान क्र.1 ते 8 वर ज्युनियर इंजिनियर व सिटी इंजिनियर यांनी कामाच्या दिनांकीत नोंदी न घेता काम पुर्ण झाल्यावर संपूर्ण कामाची नोंद एकाच वेळी केलेली असून, कामाच्या तपासणीच्या दिनांकीत स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

9. सदर मोजमाप पुस्तिकेत काही साहित्य् कमी/अधिक प्रमाणात वापरण्यात आलेले आहे. या बाबत सार्वजनिक बांधकाम नियम 227(अ)(1) अन्वये अतिरिक्त कामाचा / कामाचा जादा खर्च हा अगोदर करण्यात आलेल्या कामाच्या इतर निश्चितपणे होणाऱ्या बचतीतून भागविण्यात येतो, तेव्हा अतिरिक्त कामाच्या दरांच्या यादीमध्ये संबंधित बचतीचा विनिर्देश करण्यात यावा. तथापि नस्तीमध्ये अशा कमी/अधिक परिमाण वापरल्यापुष्टयर्थ स्पष्टीकरण आढळून आले नाही त्यामुळे लेखापरिक्षणात याबाबत खात्री करता आली नाही.

| Sr.No | Item | As per | As per M.B. | Used | Diff. Amt. |
|---|---|---|---|---|---|

| | | Estimate Qty.(Cmt.) | Qty.(Cmt.) | Qty.(Cmt) Diff. | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation | 5.75 | 24.60 | 18.85 | 2058 |
| 2 | Stone Masonary | 7.24 | 4.83 | (-) 2.41 | (-)6754 |
| 3 | Soling | 4.35 | 8.79 | 4.44 | 2951 |
| 4 | M 15 P.C.C. | 3.87 | 6.00 | 2.13 | 9431 |
| 5 | B.B.Masonary | 3.88 | 18.20 | 14.32 | 58610 |
| 6 | RCC Beam | 0.90 | Not Operated | (-)0.90 | (-)5545 |
| 7 | RCC Slab | 1.81 | Not Operated | (-)1.81 | (-)12935 |
| 8 | Tor Steel | 0.217 MT | Not Operated | (-)0.217 | (-)13995 |
| 9 | Sand Faced Plaster | 16.88 smt | 66.79 | 49.91 | 19128 |
| 10 | 12mm Thick Plaster | 98.88 smt | 292.49 | 193.61 | 29884 |
| 11 | Half Brick Masonary | 15.39 smt | 55.60 | 40.21 | 20055 |
| 12 | Terrace Water Proofing | 9.94 smt | Not Operated | (-)9.94 | (-)4780 |
| 13 | Water Proofing for wc & Bath | 6.48 smt | 17.32 | 10.84 | 26270 |
| 14 | W.C.Pan | 9 Nos. | 11 | 2 | 13671 |
| 15 | Ceramic Tiles(Dado) | 168.99 smt | 75.63 | 93.36 | (-)96263 |
| 16 | Ceramic Tiles (Flooring) | 6.48 smt | 13.20 | 6.72 | 6640 |
| 17 | Kotah Flooring | 7.10 smt | 26.41 | 19.31 | 17559 |
| 18 | Kotah for Skirting | 1.42 smt | Not Operated | (-)1.42 | (-)1349 |
| 19 | Door Shutter | 22.68 smt | 13.86 | (-)8.82 | (-)17735 |
| 20 | B.B.Chamber | 6 Nos. | 2 | (-)4 | (-)19883 |
| 21 | 150mm Dia SWG Pipe | 20.00 RMT | 18.00 | (-) 2.00 | (-)519 |
| 22 | 20mm Dia G.I.Pipe | 30.00 RMT | Not Operated | (-)30.00 | (-)6930 |
| 23 | 100mm Dia Iron Pipe | 20.00 RMT | Not Operated | (-)20.00 | (-)6762 |
| 24 | 90mm Dia PVC Pipe | 20.00 RMT | Not Operated | (-)20.00 | (-)10731 |
| 25 | 20mm Dia Stop Tap | 12.00 Nos. | Not Operated | (-)12.00 | (-)2621 |

सदर रुपये 496277/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 78, Hmm No : 76)

## *53 म.न.पा. हददीतील प्रभाग क्र.08 मधील दूसरा निजामपुरा, कुरेशीनगर, बागे फिरदोस मशीदच्या पाठीमागे तासा बावडीजवळ गटार आणि पेवर ब्लॉक लावुन रस्ता बांधणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष : बांधकाम शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 699079.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 699079.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 41945.00/-

***साहित्य साईटवर आणल्याबाबतची चलने आढळून आली नाहीत. मालमत्ता रजिस्टर (Road History Sheet) उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. जेणेकरुन सदर रस्त्यांच्या कामावर वारंवार खर्च होतो किंवा कसे? याची खातरजमा करता आली नाही. कार्यकंत्राट कराची बांधकाम मुल्याच्या 5% दराने रक्कम रुपये 34954/- कपात केलेली नाही. खर्चाचे विवरणपत्र पुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यंत पाठविण्यात आलेले नाही. ठेकेदाराचे आयकर भरल्याचे विवरणपत्र आढळून आले नाही. तथापि सदर ठेकेदारास कामाचे वाटप करण्यात आले आहे. पेवर ब्लॉक साठी Rate Analysis नस्तीमध्ये जोडलेले नाही. त्यामुळे त्यातील दरांबाबत खात्री करता आली नाही.***

म.न.पा. हददीतील प्रभाग क्र.08 मधील दूसरा निजामपुरा, कुरेशीनगर, बागे फिरदोस मशीदच्या पाठीमागे तासा बावडीजवळ गटार आणि पेवर ब्लॉक लावुन रस्ता बांधणे कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 699275/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | मे.हिंदुस्थान एंटरप्रायजेस |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | खासदार निधीअंतर्गत मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांची मंजूरी क्र.नियो/खास्थाविका/2013-14/ भिवंडी/2281 दि.30/10/13 |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.23/9/2013 |
| 5) | निविदेचा कालावधी | निविदा सूचना क्र. 27 दि.21/01/2014 ते 31/01/2014 |
| 6) | जाहिरात | दै.पुण्यनगरी दि. 22/01/2014 |
| 7) | निविदा उघडल्याचा दिनांक | 01/02/2014 |
| 8) | निविदा स्वीकृती | 07/02/2014 अंदाजपत्रकीय दराने |
| 9) | कार्यादेश | क्र.429/2014, दि.03/06/2014 |
| 10) | कामाची मुदत | कार्यादेश दिनांकापासून 90 दिवस |
| 11) | करारनामा | क्र.172/2013-14 |
| 11) | काम पूर्णत्वाचा दिनांक | 22/08/2014 |
| 12) | मोजमाप पुस्तिका | क्र.152, पान क्र.57 ते 61 |

| | | |
|---|---|---|
| 13) | प्रत्यक्ष खर्च तपशील | 1.पहिले व अंतिम धावते देयक रु.699079/- |

उपरोक्त कामाच्या उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीमध्ये खालील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.77 दि.05/09/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्याने लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामात साहित्य साईटवर आणल्याबाबतची चलने आढळून आली नाहीत.

2. मालमत्ता रजिस्टर (Road History Sheet) उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. जेणेकरुन सदर रस्त्यांच्या कामावर वारंवार खर्च होतो किंवा कसे ? याची खातरजमा करता आली नाही.

3. नगर विकास विभाग परिपत्रक क्र.जीईन 1009/1357/प्र.क्र.166 दिनांक 03/11/2003 कामाचा कामावरील कामगारांचा विमा अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% इतकी रक्कम शासकीय विमा निधी कडे जमा करणे आवश्यक असतांना , सदर रक्कम रुपये 6991/- जमा करण्यात आलेली नाही. सदर रक्कम जमा करण्यात यावी.

4. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा,1952 मधील तरतूदीनुसार ठेकेदाराने कामावरील कर्मचाऱ्यांची नोंदणी करुन त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यांवर वर्गणी जमा करुन, त्याची यादी/तपशील देयकासोबत जोडलेला नाही.

5. शासन अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार कार्यकंत्राट कराची बांधकाम मुल्याच्या 5% दराने रक्कम रुपये 34954/- कपात केलेली नाही. सदर रक्कम वसुल करण्यात यावी.

6. जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचे मंजूरीपत्रातील अट क्र.12 नुसार खर्चाचे विवरणपत्र पुढील महिन्याच्या 5 तारखेपर्यंत पाठविण्यात आलेले नाही.

7. ठेकेदाराचे आयकर भरल्याचे विवरणपत्र आढळून आले नाही. तथापि सदर ठेकेदारास कामाचे वाटप करण्यात आले आहे.

8. करारनाम्यातील अटीनुसार कामावरील कामगारांचे वय 18 किंवा त्यापेक्षा अधिक आहे व ते काम करण्यास सक्षम आहेत याबाबत विभागाने तसे ठेकेदाराकडून प्रमाणपत्र घेतलेले नाही.

9. निविदा उघडतांना सर्व निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी व अधिकारी यांना कळविणे आवश्यक असतांनाही निविदाधारकांना कळविण्यात आलेले नाही.

10. पेवर ब्लॉक साठी Rate Analysis नस्तीमध्ये जोडलेले नाही. त्यामुळे त्यातील दरांबाबत खात्री करता आली नाही.

11. मोजमाप पुस्तिका क्र.152 पान क्र.57 ते 61 वर ज्युनियर इंजिनियर व सिटी इंजिनियर यांनी कामाच्या दिनांकीत नोंदी न घेता काम पुर्ण झाल्यावर संपूर्ण कामाची नोंद एकाच वेळी केलेली असून, कामाच्या तपासणीच्या दिनांकीत स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

12. सदर मोजमाप पुस्तिकेत काही साहित्य् कमी/अधिक प्रमाणात वापरण्यात आलेले आहे. या बाबत सार्वजनिक बांधकाम नियम 227(अ)(1) अन्वये अतिरिक्त कामाचा / कामाचा जादा खर्च हा अगोदर करण्यात आलेल्या कामाच्या इतर निश्चितपणे होणाऱ्या बचतीतून भागविण्यात येतो, तेव्हा अतिरिक्त कामाच्या दरांच्या यादीमध्ये संबंधित बचतीचा विनिर्देश करण्यात यावा. तथापि नस्तीमध्ये अशा कमी/अधिक परिमाण वापरल्यापुष्टयर्थ स्पष्टीकरण आढळून आले नाही.

| Sr.No | Item | As per Estimate | As per M.B. Qty.(Cmt.) | Used Qty.(Cmt) Diff. | Diff. Amt. |
|---|---|---|---|---|---|

| | | Qty.(Cmt.) | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Excavation | 17.46 | 45.55 | 28.09 | 3067.43 |
| 2 | Transportation | 17.46 | 45.55 | 28.09 | 7338.51 |
| 3 | Soling | 14.04 | 19.96 | 05.92 | 3934.73 |
| 4 | PCC 1:2:4 | 1.04 | 2.30 | 01.26 | 5420.33 |
| 5 | Steel | 0.059 | 0.11 | 0.051 | 3065.80 |
| 6 | Chamber | 200 Kg. | 38 Kg. | (-)162 Kg. | (-) 10418.22 |
| 7 | RCC Slab | 1.25 | 1.55 | 0.3 | 2100.42 |
| 8 | Paver Block | 616.25 | 602.39 | (-)13.86 | (-) 14705.46 |

आक्षेपाधीन रुपये 699079/-
वसूलपात्र रुपये 41945/-

DGPSAAM7402 (Ref No : 79, Hmm No : 77)

## *54 प्रभाग क्र.39 फेणेगांव येथे काकतिया शाळा, साई सर्व्हिस सेंटर लगत सी.सी.गटार व पायवाट तयार करणे कामामधील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 9**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 391620.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 391620.00/-

| |
|---|
| ***साहित्याच्या बाबींच्या चाचणी मान्यताप्राप्त गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेतून करुन घेणे हे ठेकेदारास बंधनकारक असतानाही अशी चाचणी न करताच सहित्याचा वापर केला आहे. अंदाजपत्रकात Precast Lycra Finish interlocked Concrete Paving Block चे दर पृथ: करण जोडले नाही. कामामध्ये कमी/अधिक परिमाण वापरण्यात आले आहे. तथापि Excess-Saving Statment सोबत योग्य ते स्पष्टीकरण आढळले नाही. मोजमाप पुस्तिका क्र.220 पान क्र. 28 वर ज्युनियर इंजिनियर व सिटी इंजिनियर यांनी कामाच्या दिनांकीत नोंदी न घेता काम पुर्ण झाल्यावर संपूर्ण कामाची नोंद एकाच वेळी केलेली असून, कामाच्या तपासणीच्या तारीखवार स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. त्यामुळे कामाची नियमित तपासणी झाल्याबाबतची खात्री करता आली नाही. काम पुर्णत्वानंतरची छायाचित्रे जोडली नाहीत*** |

प्रभाग क्र.39 फेणेगांव येथे काकतिया शाळा, साई सर्व्हिस सेंटर लगत सी.सी.गटार व

पायवाट तयार करणे कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 400500/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | संतोषीमाता मजुर कामगार सहकारी संस्था |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | प्रभाग समिती बैठक ठराव क्र.18 दि.28/01/2013 |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.25/02/2013 |
| 5) | काम वाटप | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,ठाणे यांचा ठराव क्र.4 नुसार काम वाटप |
| 6) | कार्यादेश | क्र.प्र.स.क्र.3/106, दि.26/07/2013 |
| 7) | कामाची मुदत | 26/07/13 ते 25/10/13 पर्यंत |
| 8) | मोजमाप पुस्तिका | क्र. 220 पान क्र.28 |
| 8) | प्रत्यक्ष खर्च तपशील | 1.पहिले व अंतिम धावते देयक रु.391620/- |
| 9) | देयकातील कपाती | आयकर रु.7832/-, सुरक्षा अनामत रु.15664/-, व्हॅट रु.19581/-, विमा रु.3916/-कामगार कल्याण उपकर रु.3916/- |
| 10) | निव्वळ देय रक्कम | रुपये रु.340711/- |

उपरोक्त कामाच्या उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीमध्ये खालील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.115 दि.08/10/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्याने लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये तसेच करारनामा अट क्र.5 नुसार , कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही. तसेच करारनामा अट क्र. 6 नुसार साहित्याच्या बाबींच्या चाचणी मान्यताप्राप्त गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेतून करुन घेणे हे ठेकेदारास बंधनकारक असतानाही अशी चाचणी न करताच साहित्याचा वापर केला असून गुणवत्तापूर्वक काम झाल्याबाबत खात्री करता आली नाही.
2. सदर कामात साहित्य साईटवर आणल्याबाबतची चलने आढळून आली नाहीत.
3. अंदाजपत्रकीय परिमाण व प्रत्यक्ष केलेल्या कामाचे परिमाणाचे नमुना नंबर 132 मध्ये अहवाल सादर करणे बंधन कारक असतांना देखील सदर अहवाल सादर केल्याचे दिसून आले नाही.
4. काम पुर्णत्वानंतरची छायाचित्रे जोडली नाहीत त्यामुळे प्रत्यक्षात काम पुर्ण झाल्याबाबतची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.
5. अंदाजपत्रकात Precast Lycra Finish interlocked Concrete Paving Block चे दर पृथ:करण जोडले नाही. कामामध्ये कमी/अधिक परिमाण वापरण्यात आले आहे. तथापि Excess-Saving Statment सोबत योग्य ते स्पष्टीकरण आढळले नाही.
6. राष्ट्रीय लेखा संहितेत निर्देशित केल्यानुसार, प्रमाणकाव्दारे प्रदान करावयाच्या रकमांमधून केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे आयकर/विमा/कामगार कल्याण उपकर/व्हॅट इ. रकमा कपात करुन, त्या प्रत्यक्षात शासनाच्या खाती जमा केल्याबाबतची पूरक कागदपत्रे/पोच/ चलनाच्या प्रती अभिलेख

नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत. त्यामुळे सदर रकमा प्रत्यक्षात शासनास जमा झाल्याची खात्री होऊ शकली नाही.

7. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची ड चे नियम 1(2) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षरी नाही.

8. करारनाम्यातील अटीनुसार कामावरील कामगारांचे वय 18 किंवा त्यापेक्षा अधिक आहे व ते काम करण्यास सक्षम आहेत याबाबत विभागाने तसे ठेकेदाराकडून प्रमाणपत्र घेतलेले नाही.

9. मोजमाप पुस्तिका क्र.220 पान क्र. 28 वर ज्युनियर इंजिनियर व सिटी इंजिनियर यांनी कामाच्या दिनांकीत नोंदी न घेता काम पुर्ण झाल्यावर संपूर्ण कामाची नोंद एकाच वेळी केलेली असून, कामाच्या तपासणीच्या तारीखवार स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. त्यामुळे कामाची नियमित तपासणी झाल्याबाबतची खात्री करता आली नाही. सदर रक्कम रुपये 391620/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 80, Hmm No : 115)

## *55 प्रभाग समिती क्र.3 च्या कार्यक्षेत्रात ओसवालवाडी ते कामतघरपर्यंत रस्त्याची सुधारणा करणे मधील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 13**

*लेखा शीर्ष : मनपा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 7383635.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7383635.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 400.00/-

***मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार कमी घेतलेली मुद्रांक शुल्काची रक्कम रु.400/- शासन जमा करावी. शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.8.1.2007 नुसार बांधकाम साहित्य वापरण्यापुर्वी अशा साहित्याचे प्रयोगशाळा चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. परंतु असे अहवाल नस्ती सोबत नाहीत. त्यामुळे वापरण्यात आलेले साहित्य योग्य गुणवत्तेचे वापरण्यात आल्याची व त्यानुसार प्रदान केल्याची लेखापरीक्षणामध्ये खात्री करता आली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम 177 नुसार नमूना 133 मध्ये काम परिपूर्ण झाल्यानंतर बांधकाम विभागाच्या सक्षम प्राधिका-याकडून त्याबाबतचा काम पूर्णत्वाचा दाखला तयार करुन घेणे व त्यानंतर सदर लेखा संहितेतील नियम 174 (3) नुसार उर्वरीत 10 टक्के रकमेचे प्रदान आवश्यक आहे. असे असताना नियम 178 नुसार सदर काम पूर्ण झाल्याचा दाखला तयार न करताच नियमबाहयपणे कामाचे संपूर्ण प्रदान करण्यात***

***आलेले आहे. त्यामुळे रक्कम रु. 7383635/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.***

प्रभाग समिती क्र.3 च्या कार्यक्षेत्रात ओसवालवाडी ते कामतघरपर्यंत रस्त्याची सुधारणा करणेबाबतची निविदा नस्ती तपासली असता कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

कामाचे नांव-प्रभाग समिती क्र.3 च्या कार्यक्षेत्रात ओसवालवाडी ते कामतघरपर्यंत रस्त्याची सुधारणा करणे मधील अनियमितताबाबत

जाहिरात व प्रसिध्दी-दैनिक नवभारत मध्ये दिनांक 21-10-2014

दैनिक लोकसत्ता मध्ये दिनांक 22-10-2014

मनपाच्या वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्दी दिनांक 22-10-2014

प्रशासकिय मान्यता-महासभेचा ठराव क्र.23/10-04-2015 रक्कम रु.73,90,707 आहे.

तांत्रिक मान्यता-शहर अभियंता इटम क्र.224 सन 2014-15 दिनांक 11-08-2014 नुसार तांत्रिक मंजुरी आहे.

लेखाशिर्ष-रस्ते व पदपंथ दुरुस्ती

अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष-5.26 कोटी वर्ष 2015-16

पुरवठादाराचे नांव-यु.सी.जी.इंन्प्रा प्रायव्हेट लि.नवी मुंबई

कार्यादेश क्र.व दिनांक- सहा.आयुक्त (प्रशा) यांचे जा.क्र.366 दिनांक 21-05-2015

अदांजपत्रकिय रक्कम- रु.7834150

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.143 दिनांक 20/10/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षणाकडून अभिप्राय देणेत येत आहे.

1)कामाचे मोजमाप पुस्तिका तपासणीकरिता उपलब्ध करुन दिलेली नाही.

2) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार कमी घेतलेली मुद्रांक शुल्काची रक्कम रु.400/- संबधिताकडुन वसुल करुन शासन जमा करावी.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग क्र.विमास1098/प्र.क्र.28/98 दि.19/08/1998 अन्वये

राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या विविध योजनांतर्गत देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा विमा व्यवहार फक्त शासकीय विमा निधीकडे करणे आवश्ययक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

4)करारनामान्यातील अट क्र.9 नुसार कंत्राट मुल्याच्या 3 टक्के रक्कम रु.2,21,721/- तीन वर्षापर्यंत अतिरिक्त अनामत रक्कम म्हणुन ठेवण्यांत येईल. तथापि सदरची रक्कम काम पुर्ण झाल्यापासुन तीन वर्षापर्यंत ठेवल्याचे नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

5)दोष दायित्व कालावधी काम झाल्यापासुन तीन वर्षाचा निश्चित केलेला नाही. तसेच तीन वर्ष कालावधीत रोडचे काम नित्कृष्ठ झाले असल्यास ते स्वखर्चाने मक्तेदाराने दुरुस्त करावयाचे असते त्याप्रमाणे करारनामा करताना सदरची अट टाकणे आवश्यक होते. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. तसेच काम किती दिवसात पुर्ण करावयाचे आहे. याचा उल्लेख करारनाम्यामध्ये नमुद केलेला नाही.

6)महासभेचा ठराव क्र.23/10-04-2015 नुसार व शासन निधी रक्कम रु.73,90,707/- असतांना इस्टिमेटची रक्कम रु.7834150/- निश्चित केली.

7)नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 165 नुसार अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी तांत्रिक अधिकारी यांनी स्थळाची पाहणी न करताच अंदाजपत्रक तयार केल्यामुळे वस्तुनिष्ठ अंदाजपत्रक असल्याची खात्री पटत नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका परिच्छेद क्र.141 नुसार अंदाजपत्रक तयार करताना त्यामध्ये त्यानुषंगाने अहवाल तयार करणे, विनिर्देश, मोजमाप, परिमाणे, दर, नकाशे इ. बाबी तयार करणे व त्या सक्षम प्राधिका-याने तपासून स्वाक्षरीत करणे आवश्यक आहे. मात्र सदर कामामध्ये वरील बाबींसह तयार केलेले अंदाजपत्रक व बाबनिहाय दरांबाबतचे दर पृथ्थकरण अनुषंगिक कागदपत्रांसह नस्तीसोबत लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही.

8) शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.08.01.2007 नुसार बांधकाम साहित्य वापरण्यापुर्वी अशा साहित्याचे प्रयोगशाळा चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. परंतु असे अहवाल नस्ती सोबत नाहीत. त्यामुळे वापरण्यात आलेले साहित्य योग्य गुणवत्तेचे वापरण्यात आल्याची व त्यानुसार प्रदान केल्याची लेखापरीक्षणामध्ये खात्री करता आली नाही.

9)ठेकेदाराने कामावर आणलेल्या साहित्याची तपासणी महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता यांनी केल्याचा तपासणी अहवाल उपलब्ध नाही. तसेच कामावर साहित्य आणलेबाबतची वाहतुकीची चलने नस्तीमध्ये आढळून आली नाहीत.

10) राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता नियम क्र.12.82 (डी) खरेदीची बिले उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. बिले प्राप्त झाली नाही. त्यामुळे लेखापरीक्षणास साहित्य खरेदीची खात्री करता आली नाही.

11) साहित्याचे बाऊझर(ट्रक) किती आणले त्या बाऊझरचा क्रमांक व साहित्याची चलने दिनांकासहीत नस्तीसोबत जोडलेली नाहीत. त्यामुळे एकूण वापरलेल्या साहित्याची तपासणी करता आली नाही.

12)सदर कामातील Bituminous Carpet ची वाहतुकीची चलने, गाडी क्रमांक नस्तीत आढळून आली नाहीत. त्यामुळे याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

13)केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे आयकर/विमा/कामगार कल्याण उपकर/व्हॅट इ.रकमा कपात करण्यात आलेल्या असुन, त्या प्रत्यक्षात शासनाच्या खाती जमा केल्याबाबतची पूरक कागदपत्रे/पोच/चलनाच्या प्रती अभिलेख नस्तीसोबत आढळून आल्या नाहीत.

FDSJRDM6801 (Ref No : 83, Hmm No : 143)

## ***56 आमदार निधी अंतर्गत भिवंडी मनपा हददीत प्रभाग क्र.7 मध्ये डोलारे पेट्रोलपंप येथे बसस्टॉप उभारणे कामामधील अनियमितताबाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 240026.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 240026.00/-

***जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे यांना प्रशासकीय मंजूरीमधील अट क्र. 10 नुसार खर्चाचा मासिक अहवाल पाठविलेला नाही. आमदार निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामाचा फलक लावलेला नाही. काम सुरु होण्यापूर्वीची व नंतरची छायाचित्रे आढळून आली नाही. साहित्य साईटवर आणल्याबाबतची चलने आढळून आली नाहीत. काम गुणवत्तापूर्वक झाल्याबाबतचा दाखला आढळला नाही. मोजमाप पुस्तिका सादर केली नाही. थर्ड पार्टी तपासणी केलेली नाही. त्यामुळे काम पूर्ण झाल्याची खात्री करता आली नाही.***

आमदार निधी अंतर्गत भिवंडी मनपा हददीत प्रभाग क्र.7 मध्ये डोलारे पेट्रोलपंप येथे बसस्टॉप उभारणे कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 249000/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | दिलीप बी.धुमाळ, भिवंडी |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | जिल्हाधिकारी,ठाणे यांचे पत्र क्र.नियो/ आस्थाविका/प्रमा/टे-1/2018 दि.16/09/13 |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.30/07/2013 |
| 5) | निविदा | सुचना क्र.21 |
| 6) | करारनामा | क्र.113/2013-14 |
| 7) | कार्यादेश | क्र.प्र.स.क्र.1/2620, दि.31/01/2014 |
| 8) | कामाची मुदत | 31/01/14 ते 30/04/14 |
| 9) | प्रत्यक्ष खर्च तपशील | 1.पहिले व अंतिम धावते देयक रु.240026/- |
| 10) | देयकातील कपाती | आयकर रु.4801/-, सुरक्षा अनामत रु.9601/-, व्हॅट रु.12001/-, विमा रु.2400/-, कामगार कल्याण उपकर रु.2400/- |
| 11) | निव्वळ देय रक्कम | रुपये रु.208823/- |

उपरोक्त कामाच्या उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीमध्ये खालील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.116 दि. 08/10/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्याचे लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामात साहित्य साईटवर आणल्याबाबतची चलने आढळून आली नाहीत.
2. अंदाजपत्रकीय परिमाण व प्रत्यक्ष केलेल्या कामाचे परिमाणाचे नमुना नंबर 132 मध्ये अहवाल सादर करणे बंधन कारक असतांना देखील सदर अहवाल सादर केल्याचे दिसून आले नाही.
3. काम होण्यापूर्वीची व पुर्णत्वानंतरची छायाचित्रे जोडली नाहीत त्यामुळे प्रत्यक्षात काम पुर्ण झाल्याबाबतची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.
4. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची ड चे नियम 1(2) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षरी नाही.
5. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये तसेच करारनामा अट क्र.5 नुसार , कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही. तसेच करारनामा अट क्र. 6 नुसार साहित्याच्या बाबींच्या चाचणी मान्यताप्राप्त गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेतून करुन घेणे हे ठेकेदारास बंधनकारक असतानाही अशी चाचणी न करताच सहित्याचा वापर केला असून गुणवत्तापूर्वक काम झाल्याबाबत खात्री करता आली नाही.
6. मोजमाप पुस्तिका क्र.69 उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष वापरलेल्या परिमाणांची लेखापरिक्षणात तपासणी करता आली नाही.

सदर रक्कम रुपये 240026/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

***57 प्रभाग समिती क्र.1 च्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.18 मधील गोपाळनगर कापकणेरी येथील घर नं.401,394/95 जवळ फुटपाथवर लायक्राफिनिश पेवर ब्लॉक बसविणेबाबतच्या कामामधील अनियमितताबाबत (आमदार निधी अंतर्गत)***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : बांधकाम शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 498574.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 498574.00/-

***साहित्य साईटवर आणल्याबाबतची चलने आढळून आली नाहीत. जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे यांना प्रशासकीय मंजूरीमधील अट क्र. 10 नुसार खर्चाचा मासिक अहवाल पाठविलेला नाही. आमदार निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामाचा फलक लावलेला नाही. काम गुणवत्तापूर्वक झाल्याबाबतचा दाखला आढळला नाही. मोजमाप पुस्तिका सादर केली नाही. थर्ड पार्टी तपासणी केलेली नाही.***

आमदार निधी अंतर्गत प्रभाग समिती क्र.1 च्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.18 मधील गोपाळनगर कापकणेरी येथील घर नं.401,394/95 जवळ फुटपाथवर लायक्राफिनिश पेवर ब्लॉक बसविणे कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 499000/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | दुर्गेश वसंत पाटील, भिवंडी |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | जिल्हाधिकारी,ठाणे यांचे पत्र क्र.नियो/ आस्थाविका/प्रमा/टे-1/2811 दि.31/12/12 |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.30/10/2012 |
| 5) | काम वाटप | सुशिक्षित बेरोजगार अभियंता सवलती अंतर्गत अधीक्षक अभियंता,ठाणे(सा.बां.)मंडळ,ठाणे यांचे पत्र क्र.ठामं/अर्थ-1/सुबेअ/1001(2)/93 दि.15/02/13 |
| 6) | करारनामा | क्र.490 |
| 7) | कार्यादेश | क्र.प्र.स.क्र.1/टे.क्र.2/3957, दि.04/03/2013 |
| 8) | कामाची मुदत | 04/03/13 ते 31/08/13 |
| 9) | प्रत्यक्ष खर्च तपशील | १.पहिले व अंतिम धावते देयक रु.498574/- |
| 10) | देयकातील कपाती | आयकर रु.9971/-, सुरक्षा अनामत रु.19943/-, व्हॅट रु.24929/-, विमा रु.4986/-,कामगार कल्याण उपकर रु.4986/- दंड(137 दिवस) |

| | | |
|---|---|---|
| | | रु.6850/- |
| 11) | निव्वळ देय रक्कम | रुपये रु.426909/- |

उपरोक्त कामाच्या उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीमध्ये खालील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.117 दि.08/10/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन सादर न केल्यामुळे लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामात साहित्य साईटवर आणल्याबाबतची चलने आढळून आली नाहीत.

2. अंदाजपत्रकीय परिमाण व प्रत्यक्ष केलेल्या कामाचे परिमाणाचे नमुना नंबर 132 मध्ये अहवाल सादर करणे बंधन कारक असतांना देखील सदर अहवाल सादर केल्याचे दिसून आले नाही.

3. अंदाजपत्रकात Paver Block चे दर पृथ:करण जोडले नाही. कामामध्ये कमी/अधिक परिमाण वापरण्यात आले आहे. तथापि Excess-Saving Statment सोबत योग्य ते स्पष्टीकरण आढळले नाही.

4. जिल्हाधिकारी,ठाणे यांच्या प्रशासकीय मंजूरी अट क्र.10 नुसार खर्चाचा हिशोब स्वतंत्र ठेऊन, खर्चाचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविलेला नाही.

5. प्रशासकीय मंजूरी अट क्र. 20 नुसार कामाचा मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविलेला नाही.

6. प्रशासकीय मंजूरी अट क्र. 17 नुसार काम पूर्ण होताच कामाच्या दर्शनी भागावर आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामाचे नांव, वर्ष व खर्च तपशील असणारा फलक लावलेला नाही.

7. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची ड चे नियम 1(2) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षरी नाही.

8. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये तसेच करारनामा अट क्र.5 नुसार , कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही. तसेच करारनामा अट क्र. 6 नुसार साहित्याच्या बाबींच्या चाचणी मान्यताप्राप्त गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेतून करुन घेणे हे ठेकेदारास बंधनकारक असतानाही अशी चाचणी न करताच सहित्याचा वापर केला असून गुणवत्तापूर्वक काम झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

9. मोजमाप पुस्तिका क्र.48 उपलब्ध करुन दिली नाही.

10. त्रयस्थ संस्था तपासणी करुन घेतलेली नाही.

(आक्षेपाधीन रुपये रक्कम 498574/-).

DGPSAAM7402 (Ref No : 92, Hmm No : 117)

***58 प्रभाग क्र.45 ताडाळी येथे विकासशेठ चाळ लगत सी.सी.गटार व पायवाट तयार करणेबाबतच्या कामामधील अनियमितताबाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 495502.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 495502.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4955.00/-

***कामाचा व कामावरील कामगारांचा विमा अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% इतकी रक्कम रुपये 4955/- कपात करुन शासकीय विमा निधी कडे जमा केलेली नाही.साहित्य साईटवर आणल्याबाबतची चलने आढळून आली नाहीत. जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे यांना प्रशासकीय मंजूरीमधील अट क्र. 10 नुसार खर्चाचा मासिक अहवाल पाठविलेला नाही. आमदार निधी अंतर्गत करण्यात आलेल्या कामाचा फलक लावलेला नाही. काम गुणवत्तापूर्वक झाल्याबाबतचा दाखला आढळला नाही. मोजमाप पुस्तिका सादर केली नाही. थर्ड पार्टी तपासणी केलेली नाही.***

प्रभाग क्र.45 ताडाळी येथे विकासशेठ चाळ लगत सी.सी.गटार व पायवाट तयार करणेबाबतच्या कामामधील अनियमितताबाबत कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 497000/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | विवेक आर.पवार, नवी मुंबई |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | जिल्हाधिकारी,ठाणे यांचे पत्र क्र.नियो/ आस्थाविका/प्रमा/टे-1/2309 दि.06/11/13 |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.24/09/2013 |
| 5) | निविदा | सूचना क्र.33/13-14<br>कालावधी दि.17/2/14 ते दि.26/2/14 |
| 6) | करारनामा | क्र.46/14-15 |
| 7) | कार्यादेश | क्र.भिनिशमनपा/बांधकाम/1434, दि.14/08/2014 |
| 8) | कामाची मुदत | 14/08/14 ते 13/11/14 |
| 9) | प्रत्यक्ष खर्च तपशील | १.पहिले व अंतिम धावते देयक रु.495502/- |
| 10) | देयकातील कपाती | आयकर रु.9910/-, सुरक्षा अनामत रु.9910/-, व्हॅट रु.24775/-, कामगार कल्याण उपकर रु.4955/- |
| 11) | निव्वळ देय रक्कम | रुपये रु.445952/- |

उपरोक्त कामाच्या उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीमध्ये खालील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.118 दि.08/10/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन सादर न केल्यामुळे लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. नगरविकास विभाग परिपत्रक क्र.जीईन 1009/1357/प्र.क्र.166 दिनांक 03/11/2003 कामाचा व कामावरील कामगारांचा विमा अंदाजपत्रकीय रकमेच्या 1% इतकी रक्कम रुपये 4955/-

कपात करुन शासकीय विमा निधी कडे जमा केलेली नाही. सदर रुपये 4955/- वसूल करण्यात यावी.

2. अंदाजपत्रकात Paver Block चे दर पृथःकरण जोडले नाही. कामामध्ये कमी/अधिक परिमाण वापरण्यात आले आहे. तथापि Excess-Saving Statment सोबत योग्य ते स्पष्टीकरण आढळले नाही.

3. जिल्हाधिकारी,ठाणे यांच्या प्रशासकीय मंजूरी अट क्र.10 नुसार खर्चाचा हिशोब स्वतंत्र ठेऊन, खर्चाचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविलेला नाही.

4. प्रशासकीय मंजूरी अट क्र. 17 नुसार काम पूर्ण होताच कामाच्या दर्शनी भागावर आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या कामाचे नांव, वर्ष व खर्च तपशील असणारा फलक लावलेला नाही.

5. प्रशासकीय मंजूरी अट क्र. 20 नुसार कामाचा मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविलेला नाही.

6. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची ड चे नियम 1(2) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षरी नाही.

7. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये तसेच करारनामा अट क्र.5 नुसार , कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही. तसेच करारनामा अट क्र. 6 नुसार साहित्याच्या बाबींच्या चाचणी मान्यताप्राप्त गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेतून करुन घेणे हे ठेकेदारास बंधनकारक असतानाही अशी चाचणी न करताच सहित्याचा वापर केला असून गुणवत्तापूर्वक काम झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

8. कार्यादेशानुसार सदर काम तीन महिन्यात पूर्ण करावयाचे होते, सदर काम मात्र दोन महिन्यात(नस्तीत नमूद दि.10/10/14) पूर्ण झाल्याचे दिसून येते तरी काम गुणवत्तापूर्वक व दर्जेदार झाल्याची खात्री करता आली नाही.

9. मोजमाप पुस्तिका क्र.160 उपलब्ध करुन दिली नाही.

10. त्रयस्थ संस्था तपासणी करुन घेतलेली नाही.

सदर रक्कम रुपये 495502/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 93, Hmm No : 118)

## *59 भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत 18 मुख्य रस्त्यांचे पॅचवर्क पध्दतीने दुरुस्ती करणे कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 9**

*लेखा शीर्ष : बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 10761995.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10761995.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9800.00/-

***Bituminous Macadum चा थर पूर्ण झाल्यानंतर दूबार Tack Coat करुन नंतरच Bituminous Carpet पसरविणे व त्यानंतर संपूर्ण रस्ता सिलकोट करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष झालेले डांबरीकरण व Patchwork चे काम नित्कृष्ट झाले आहे. कामाच्या प्राकलनामध्ये B.B.M. पसरविणेची तरतूद प्रस्तावित नसतांना 2727.04 चौ.मी. ची मोजमापे नोंदवहीत घेतल्याचे दिसून आले. सदरच्या बाबीचे काम हे मूळ अंदाजपत्रकात नसल्याने अशा अतिरिक्त बाबींचे काम करणेपुर्वी सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम 217(अ)(1) नुसार पूर्वमान्यता घेवून करणे आवश्यक होते,तसेच सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम 228 नुसार तोंडी आदेशानुसार किवा मंजुरी मिळेल असे गृहीत धरून अतिरिक्त काम करणेचे नसताना पूर्वमान्यते शिवाय काम केल्याचे नस्तीवरून दिसून आले आहे. Bituminous Carpet ची वाहतुकीची चलने, गाडी क्रमांक नस्तीत आढळून आली नाहीत. एकूण 04 बाबींसाठीचे दर पृथ:करण जोडलेले नसल्याने लेखापरिक्षणात तपासणी करता आली नाही. या कामात Tack Coat करण्यासाठी रु.30/- प्रति चौ.मी प्रमाणे ठेकेदारास अदा करण्यात आले आहेत. परंतू दर पृथ:करण उपलब्ध नसल्याने दराची खात्री करता आली नाही. साध्या कागदावर करारनामा केला आहे.***

भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत 18 मुख्य रस्त्यांचे पॅचवर्क पध्दतीने दुरुस्ती करणेबाबतच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 10761995/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | M/s V.K.Constructions,Ulhasnagar |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | महासभा ठराव दि.13/02/2014 |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.15/02/2014 |
| 5) | निविदा | सूचना क्र.34/2013-14<br>दि.20/02/2014 ते दि.01/03/2014 |
| 6) | करारनामा | करारनामा उपलब्ध झाला नाही. |
| 7) | कार्यादेश | क्र.बांध/221/2014 दि.09/05/2014 |
| 8) | कामाची मुदत | कार्यादेशापासून 90 दिवस |
| 9) | प्रत्य्क्ष खर्च तपशील | पहिले धावते देयक रु.4072782/-<br>दूसरे धावते देयक रु.2824560/-<br>तिसरे व अंतिम देयक रु.573658/- |

उपरोक्त कामाच्या उपलब्ध करुन दिलेल्या नस्तीमध्ये खालील प्रमाणे अनियमितता दिसून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.142 दि.20/10/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन सादर न केल्यामुळे लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या प्रभाग समिती क्र.3 अंतर्गत 18 मुख्य्

रस्त्यांचे पॅचवर्क पध्दतीने दुरुस्ती करणे या कामाच्या नस्तीची तपासणी करण्यात आली. प्रस्तूत कामाचे प्राकलन रक्कम रुपये 10761995/- चे तयार करण्यात आलेले असून, सदर प्राकलनाला प्राधिकृत तांत्रिक अधिकारी यांनी मंजूरी दिलेली आहे. प्रस्तूत कामाची मोजमाप नोंदवही क्र.234 पान क्र.92 ते 95 वरील मोजमापे तपासण्यात आली असता, मुळच्या डांबरीकरणाच्या रस्त्यावर Tack Coat करणे, Tack Coat झाल्यानंतर Bituminous Macadum(50/75mm Thick) पसरविणे व त्याच्यावर Bituminous Carpet पसरविणेच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. तांत्रिक दृष्टीने छाननी केली असता, Bituminous Macadum चा थर पूर्ण झाल्यानंतर दूबार Tack Coat करुन नंतरच Bituminous Carpet पसरविणे व त्यानंतर संपूर्ण रस्ता सिलकोट करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष झालेले डांबरीकरण व Patchwork चे काम नित्कृष्ट झाले असल्याचे लेखापरिक्षणात स्पष्ट दिसून येते.

2. प्रस्तूत कामाच्या प्राकलनामध्ये B.B.M. पसरविणेची तरतूद प्रस्तावित नसतांना 2727.04 चौ.मी. ची मोजमापे नोंदवहीत घेतल्याचे दिसून आले. सदरच्या बाबीचे काम हे मूळ अंदाजपत्रकात नसल्याने अशा अतिरिक्त बाबींचे काम करणेपुर्वी सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम 217(अ)(1) नुसार पूर्वमान्यता घेवून करणे आवश्यक होते,तसेच सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम 228 नुसार तोंडी आदेशानुसार किवा मंजुरी मिळेल असे गृहीत धरून अतिरिक्त काम करणेचे नसताना पूर्वमान्यते शिवाय काम केल्याचे नस्तीवरून दिसून येते. त्यामुळे केलेला खर्च रक्कम रु.77,602 आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे. प्राकलनाव्यतिरिक्त झालेल्या एकूण कामास लेखापरिक्षणात मान्यता देता येत नाही. याबाबत साधार तांत्रिक खुलासा सादर करावा तोपर्यंत या कामावर झालेला एकूण खर्च रुपये 10761995/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

3. सदर कामातील Bituminous Carpet ची वाहतुकीची चलने, गाडी क्रमांक नस्तीत आढळून आली नाहीत. त्यामुळे याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

4. प्रस्तूत कामासाठी 277.41 घ.मी. इतके B.C. Concrete पुरवठा करुन पसविलेले आहे परंतू सदर साहित्याचे बाऊझर(ट्रक) किती आणले त्या बाऊझरचा क्रमांक व साहित्याची चलने दिनांकासहीत नस्तीसोबत जोडलेली नाहीत त्यामुळे एकूण वापरलेल्या साहित्याची तपासणी करता आली नाही.

5. सदर कामात रस्त्याची मूळ जाडी(Crush Thickness) नमूद केलेली नाही अंदाजपत्रकात नमूद केल्याची एकूण 04 बाबींसाठीचे दर पृथ:करण जोडलेले नसल्याने लेखापरिक्षणात तपासणी करता आली नाही. या कामात Tack Coat करण्यासाठी रु.30/- प्रति चौ.मी प्रमाणे ठेकेदारास अदा करण्यात आले आहेत. पंरतू दर पृथ:करण उपलब्ध नसल्याने दराची खात्री करता आली नाही.

6. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दिनांक 23/03/2005 अन्वये तसेच करारनामा अट क्र.5 नुसार , कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल (डांबर प्रत, खडी) प्राप्त करून नस्तीबध्द करणे आवश्यक आहे. तथापि असा अहवाल आढळून आला नाही.

7. मोजमाप पुस्तिका क्र.33 उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे त्यातील वापरण्यात आलेल्या परिमाणे लेखापरिक्षणात तपासता आली नाही.

8. साध्या कागदावर करारनामा केला असल्याचे दिसून आले आहे. ठेकेदाराकडून करारनामा मुद्रांक शुल्क रक्कम रुपये 9800/- वसूल करण्यात यावेत.

9. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची ड चे नियम 1(2) नुसार

स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षरी नाही.
सदर रक्कम रुपये 10761995/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 94, Hmm No : 142)

## *60 महानगरपालिका शाळेतील सन 2014-15 मध्ये विध्यार्थ्यांना गणवेश पुरविणेबाबत अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष : शिक्षण मंडळ महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6199920.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6199920.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 76000.00/-

***सन 2013-14 पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीबाबत शासन निर्णय दिनांक 2/01/1992 मधील परिशिष्ट- 5 (अ) (2) नुसार शासनाच्या अंगीकृत व्यसाय / घरमाग/ यंत्रमाग/ महाटेन्स महाराष्ट राज्य वस्त्र उदयोग महामंडळ यांचेकडे पत्र पाठवुन वस्तु खरेदीची प्रक्रिया पुर्ण करणे किंवा ना हरकरत प्रमाणपत्र प्राप्त करुन निविदा निविदा प्रक्रीया पुर्ण करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. विक्रीकराची रक्कम देयकातुन वसुल केलेली नाही. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.31,000/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी. मे.शेखर फॅब टेक्सस्टाईल भिवंडी यांनी दि.25/06/2014 पर्यंत गणवेशाचा पुरवठा करावयाचा होता तथापि मक्तेदाराने दि.26/08/2014 रोजी गणवेशाचा पुरवठा केलेला आहे. त्यामुळे 2 महीने माल उशीरा प्राप्त् झाला असल्याने करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार एकुण कंत्राट रक्कमेच्या अर्धा टक्क्याने रक्कम रुपये 40,000/- संबंधित मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावा. मुद्रांक शुल्काचीकमी रक्कम घेतल्यामुळे रक्कम रु.5,000/- वसुल करुन शासन जमा करण्यांत यावीत.***

वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये शिक्षण मंडळ भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील महानगरपालिका शाळेतील सन 2014-15 मध्ये विध्यार्थ्यांना गणवेश पुरविणेबाबतची निविदा नस्ती तपासली असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.
कामाचे नांव महानगरपालिका शाळेतील सन 2014-15 मध्ये विध्यार्थ्यांना गणवेश पुरविणेबाबत अनियमितताबाबत
जाहिरात व प्रसिध्दी दिनांक 26/08/2018 ई निविदा महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरुन प्रसिध्द

निविदा विक्री दिनांक दिनांक 21/08/2013 ते 23/08/2013

निविदा उघडण्याचा दिनांक 23/08/2013 दुपारी 4.00 वाजता

प्रशासकिय मान्यता दिनांक 04/02/2014

तांत्रिक मान्यता तांत्रिक मान्यता घेतल्याचे दिसुन येत नाही.

स्थायी समितीची मान्यता स्थायी समितीची मान्यता घेतल्याचे दिसुन येत नाही.

लेखाशिर्ष गणवेश खरेदी

अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष सन 2013-14 रक्कम रु.67 लाख

पुरवठादाराचे नांव मे.शेखर फॅब टेक्स भिवंडी

कार्यादेश क्र.व दिनांक भिनिशमनपा/शिमं/1719 दिनांक 14/02/2014

कामाचा कालावधी 14/02/2014 ते 25/06/2014

प्रमाणक क्रमांक व दिनांक 26 दि.27/06/2014, 61 दि.01/09/2014, 80 दि.15/09/14,
94 दि.01/11/14, 106 दि.04/12/2014

खर्चाची रक्कम रुपये(10,00,000/- + 6,00,000 +20,00,000/- +10,00,000/-+15,99,220/-)
रक्कम रु.61,99,920/-

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील दस्ताएवजाची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.65 दिनांक 27/08/2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1. सन 2013-14 पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीबाबत शासन निर्णय दिनांक 2/01/1992 मधील परिशिष्ट-5 (अ) (2) नुसार शासनाच्या अंगीकृत व्यसाय /घरमाग/यंत्रमाग/महाटेन्स महाराष्ट राज्य वस्त्र उदयोंग महामंडळ यांचेकडे पत्र पाठवुन वस्तु खरेदीची प्रक्रिया पुर्ण करणे किंवा ना हरकरत प्रमाणपत्र प्राप्त करुन निविदा निविदा प्रक्रीया पुर्ण करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.
2. निविदा काढण्यापुर्वी अंदाजपत्रकिय रक्कम (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजारातुन दरपत्रक मागवून त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे वाजवी दराची खात्री करता आलेली नाही.
3. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस 1088/(2512)/उद्योग 6 दि.2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.4 परिशिष्ट 8 मधील नामनिर्देशित संस्थांकडून गणवेशांचा नमूना तपासणी करुन घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.
4. साठा रजिष्टरवरुन मार्च 201४ ला गणवेशाचा साठा किती शिल्लक होता. तसेच वाटप केलेला साठा व मार्च 2015 अखेर शिल्लक साठा याची माहीती विवरणपत्रामध्ये भरुन साठा रजिष्टर लेखापरिक्षणास उपलब्ध् करुन दिलेले नाही.
5. महाराष्ट् विक्रीकर ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी इन गुडस इंव्हालंट इन एक्झुकीशन ऑप वर्क कंट्राट

कायदा 1985 नुसार नोंदनीकृत असल्यास 2 टक्के कर कपात करणे आवश्यक आहे. नसल्यास 5 टक्के कंट्राटकर कपात करावा. असे निर्देश आहेत. त्यानुसार विक्रीकराची रक्कम देयकातुन वसुल केलेली नाही. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.31,000/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी.

6. मे.शेखर फॅब टेक्सस्टाईल भिवंडी यांनी दि.25/06/2014 पर्यंत गणवेशाचा पुरवठा करावयाचा होता तथापि मक्तेदाराने दि.26/08/2014 रोजी गणवेशाचा पुरवठा केलेला आहे. त्यामुळे 2 महीने माल उशीरा प्राप्त् झाला असल्याने करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार एकुण कंत्राट रक्कमेच्या अर्धा टक्क्याने रक्कम रुपये 40,000/- संबंधित मक्तेदाराकडून वसूल करण्यात यावा.

7. स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 61,99,920/- आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

8. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 तसेच महसुल व वन विभाग अधिसुचना दिनांक 23/4/2006 अन्वये नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांचेकडील पत्र क्रमांक 12/कलम/ममुंशु/113/09दिनांक 20/7/2009 नुसार कार्य कंत्राटा सबधीत करारनामा करतांना रु.10 लक्षपर्यंतचा करारनामा 100 च्या मुद्रांकावर व पुढील प्रत्येक एका लाखावर 100 रु.जास्तीत जास्त 5 लक्ष पर्यंतच्या मुद्रांकावर करणे आवश्यक आहे. सबधीत ठेकेंदारास रु.61,99,920/- प्रदान करणेत आले आहे. सदर रक्कमेचा करारनामा करताना रु.5100/- चे मुद्रांक शुल्क रक्कमेवर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु रक्कम रु.100/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा केला असल्याने उर्वरित रक्कम रु.5,000/- वसुल करुन शासन जमा का करण्यात आली नाही.

FDSJRDM6801 (Ref No : 42, Hmm No : 65)

## *61 श्री एन आर बुकना वकील महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने शाळेचे रिट पिटीशन दाखल करणेस्तव रक्कम रु.100000 अदा करणेमधील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 100000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 100000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2000.00/-

***श्री एन आर बुकना वकील महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने शाळेचे 15 रिट पिटीशन सन 2007 पासुन मा.हायकोर्टामध्ये दाखल केलेले आहेत. आयकर अधिनियम 1961 कमल 194(सी) नुसार 2% प्रमाणे रक्कम***

***रु.2000/- सबंधिताकडून वसुल करण्यांत यावीत. तसेच उर्वरित प्रदान करिताना रक्कम रु.2500/- सबंधिताकडुन वसुल करण्यांत यावीत.***

श्री एन आर बुकना वकील महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने शाळेचे 15 रिट पिटीशन दाखल केलेले असुन प्रत्येकी रिटपिटीशनप्रमाणे 15 हजार प्रमाणे रक्कम रु. 225000/- होत असुन हायकार्टामध्ये सन 2007 पासुन सादर केलेले असुन रक्कम रु.225000/- लेखा विभागात सादर केलेले असुन निधी उपलब्ध नसल्यामुळे लेखा विभागाच्या सुचनेनुसार रक्कम रु.1 लाख अदा करणेस दिनांक 27/10/14 मंजुरी आहे. प्रमाणक क्र.103 दिनांक15-11-2014 रक्कम रु.1 लाख श्री बुकना यांना अदा केली आहे.

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील दस्ताएवजाची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.101 दिनांक 29/09/2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1) श्री एन आर बुकना वकील महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने शाळेचे 15 रिट पिटीशन सन 2007 पासुन मा हायकोर्टामध्ये दाखल केलेले आहेत. श्री बुकना यांना नियुक्ती करणेबाबतची मंजुरी तसेच महानगरपालिका ठराव नस्तीमध्ये दिसुन येत नाही. सदरचची नस्ती तसेच मंजुरीचे कागदपत्रे विभागाने लेखा परीक्षणास सादर केलेले नाही.

2) आयकर अधिनियम 1961 कमल 194(सी) नुसार 2% प्रमाणे रक्कम रु.2000/- सबंधिताकडून वसुल करण्यांत यावीत. तसेच उर्वरित प्रदान करिताना रक्कम रु.2500/- सबंधिताकडुन वसुल करण्यांत यावीत.

3) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार संबधितानी रक्कम रु.100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला नाही. तरी 100/- संबधिताकडुन शासन जमा करण्यांत यावी.

FDSJRDM6801 (Ref No : 46, Hmm No : 101)

## *62 भिवंडी निजामपूर शिक्षण मंडळ DCPS रोकडवही व बँक पासबुक व सदर रक्कम गुंतविणेतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष : प्राथमिक शिक्षण विभा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***वित्तीय वर्षे सन 2014-15 मध्ये फक्त दोन वेळा रक्कम रुपये 1,24,00,000/- व 60,00,000/- बँकेमध्ये मुदत ठेव म्हणून गुंतविण्यात आलेली आहे. सन 2014-15 मध्ये फक्त एकदाच व्याजाचे 60,746/- रक्कम जमा दर्शविलेली आहे. वेळीच रकमा जास्तीचे व्याजदर असलेल्या बँकेमध्ये गुंतविल्या असता जास्तीचे व्याज याद्वारे मिळाले असते. मोठया प्रमाणावर रकमा न गुंतविता शिल्ल्क ठेवल्याने महानगरपालिकेचे व्याजाद्वारे मिळणारे उत्पन्न बुडाले असून आर्थिक नुकसान झालेले आहे.***

भिवंडी निजामपूर शिक्षण मंडळ अंशदायी निवृत्ती वेतन योजनेची रोकडवही व बँक पासबुक (सन 2014-15) ची तपसणी केली असता खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत. तपासणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.73 दि.04/09/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. नोंखवही जमा-खर्च लिहिल्यानंतर शिल्लक अंकी व अक्षरी नमुद केलेल्या नाहीत.
2. रोकडवही पृष्ठे सक्षम प्राधिका-यांनी प्रमाणित केलेली नाहीत.
3. रोकडवहीवर मनपा शिक्षण मंडळ मोहोर (शिक्का) मारलेला नही.
4. बँकेमध्ये ठेव ठेवलेल्या रकमेची स्पष्टपणे नोंद घेतलेली नाही.(तपशील)
5. कर्मचा-यांची कोणत्या महीन्याची वर्गणी जमा केली ते रोकडवहीत नमुद नाही.
6. मासिक घोषवारा काढलेला नाही. बँक शिल्लकेबरोबर वार्षिक ताळमेळ घेण्यात आलेला नाही.
7. वित्तीय वर्षे सन 2014-15 मध्ये फक्त् दोन वेळा रक्कम रुपये 1,24,00,000/- व 60,00,000/- बँकेमध्ये मुदत ठेव म्हणून गुंतविण्यात आलेली आहे. सन 2014-15 मध्ये फक्त एकदाच व्याजाचे 60,746/- रक्कम जमा दर्शविलेली आहे. वेळीच रकमा जास्तीचे व्याजदर असलेल्या बँकेमध्ये गुंतविल्या असता जास्तीचे व्याज याद्वारे मिळाले असते. मोठया प्रमाणावर रकमा न गुंतविता शिल्ल्क ठेवल्याने महानगरपालिकेचे व्याजाद्वारे मिळणारे उत्पन्न् बुडाले असून आर्थिक नुकसान झालेले आहे.
8. महानगरपालिका शिक्षण मंडळाने अधिनियम 1947 च्या नियम 46 नमुना 86 नुसार विहित नमुन्यात गुंतवणूक नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.
9. मुंबई प्राथमिक अधिनियम 1947 च्या नियम 46 अन्वये सदर गुंतवणूक करुन गुंतवणूकी द्वारे मिळणारे व्याजाचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात आलेले नाहीत.
10. महानगरपालिका शिक्षण मंडळ यांनी नमुना 86 नुसार गुंतवणुक नोदवही व ठेवल्याने गुंतवणूक रक्कम कोणत्या दिनांकास संपली त्याचा व्याजदर बँकेचे नाव इत्यादी पडताळणी करता आली नाही.
11. महानगरपालिका शिक्षण मंडळाने फक्त दोनच बँकेमध्ये रक्कम गुंतविलेली आहे. वास्त्विक इतर राष्ट्रीयकृत बँकेकडून व्याजदर प्राप्त करुन घेवून जास्तीत जास्त व्याजदर देण्या-या बँकेमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

याबाबत संबंधित विभागास अर्धसमास क्रमांक 73 दि.04/09/2018 निर्गमित केला असून याबाबतचे अनुपालन अप्राप्त आहे.

DATSLMM7301 (Ref No : 53, Hmm No : 73)

## *63 नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची कार्यवाही केलेली नसलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : प्राथमिक शिक्षण विभा महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***महानगरपालिका शिक्षण मंडळाने सन 1.11.2005 नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या स्वतः च्या अंशदानाच्या (वर्गणी) रक्कम फक्त वसूल करुन बँकेमध्ये जमा केलेल्या आहेत. परंतु नियोक्त्याने जमा करावयाची अंशदानाची रक्कम महापालिकेने संबंधित कर्मचा-याच्या खात्यावर जमा केलेली नाही. त्यामुळे कर्मचा-याचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे संबंधीत कर्मचा-याच्या खात्यावर रक्कम जमा करुन योग्यती कार्यवाही करणे आवश्यक आहे.***

महानगरपालिका शिक्षण मंडळ, भिवंडी निजामपूर सन 2014-15 चे लेखापरिक्षणात नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची नस्ती रजिष्टर तपासले असता खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1.महानगरपालिका शिक्षण मंडळाने सन 1.11.2005 नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या स्वतःच्या अंशदानाच्या (वर्गणी) रक्कम फक्त वसूल करुन बँकेमध्ये जमा केलेल्या आहेत. परंतु नियोक्त्याने जमा करावयाची अंशदानाची रक्कम महापालिकेने संबंधित कर्मचा-याच्या खात्यावर जमा केलेली नाही. त्यामुळे कर्मचा-याचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे संबंधीत कर्मचा-याच्या खात्यावर रक्कम जमा करुन योग्यती कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2.परिभषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेत कर्मचा-याची शासन निर्णयानुसार स्तर -1 व स्तर -2 लागू असल्याने स्तर -1 मध्ये जमा करावयाचा व स्तर -2 मध्ये जमा करावयाच्या रकमा वेगळया आहेत याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3.परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन नियोक्ता हिस्सा रक्कम अद्याप पर्यंत किती येणे आहे या बाबत

लेखापरिक्षणास अवगत केलेले नाही. त्यामुळे नियोक्त्याने जमा करावयाचा अंशदान निवृत्ती वेतनाचा हिस्सा समजून आला नाही. त्यामुळे मनपा कर्मचा-यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

या बाबत संबंधित विभागास अर्धसमास क्रमांक 89 दि.18/09/2018 व्दारे विचारणा केली असता अनुपालन अप्राप्त आहे.

DATSLMM7301 (Ref No : 55, Hmm No : 89)

## *64 वित्तीय वर्ष 2014-15 मधील दर्पन अपसेट यांना दिलेल्या प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छपाईमधील अनियमिताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 628452.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 628452.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 48805.00/-

***आयकर अधिनियम 1961 कमल 194(सी) नुसार 2% प्रमाणे रक्कम रु.12569/- सबंधिताकडून वसुल करण्यांत यावीत. नगरविकास विभागाचे अधिसुचना दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.1571/- वसुल केलेला नाही. मक्तेदाराकडुन 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.31423/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार दर्पन अपसेट भिवंडी यांनी 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला नाही. तरी 100/- रक्कम मक्तेदाराकडुन वसुल करुन शासन जमा करण्यांत यावी. मालाचा पुरवठा दिनांक 28/02/2014 होणे आवश्यक असताना पुरवठा दिनांक 27/03/2014 ला झालेल आहे. त्यामुळे पुरवठा आदेशामध्ये नमुद असल्याप्रमाणे माल उशिरा प्राप्त अर्धा टक्का प्रमाणे रक्कम रु.3142/- मक्तेदाराकडुन वसुल करुन महानगरपालिकेच्या निधी मध्ये जमा करण्यांत यावी.***

शिक्षण विभागातील प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छपाईबातची तपासणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | वित्तीय वर्ष 2014-15 मधील दर्पन अपसेट यांना दिलेल्या प्रश्नपत्रिका व |

| | |
|---|---|
| | उत्तरपत्रिका छपाईमधील अनियमिताबाबत. |
| जाहिरात व प्रसिध्दी | ई निविदा मनपाच्या संकेतस्थळावरुन 27-11-2013 रोजी प्रसिध्द केली आहे. |
| निविदा विक्री दिनांक | 27-11-2013 ते 5-12-2013 |
| निविदा उघडण्याचा दिनांक | 6-12-2013 |
| प्रशासकिय मान्यता | मा.आयुक्त यांची दिनांक 28-01-2014 ची प्रशासकिय मान्यता आहे. |
| तांत्रिक मान्यता | -- |
| काम पुर्ण दिनांक | 27/03/2014 |
| लेखाशिर्ष | शिक्षण विभाग प्राथमिक |
| अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष | 28 लाख, 2013-14 |
| पुरवठादाराचे नांव | दर्पन अपसेट भिवंडी |
| कार्यादेश क्र.व दिनांक | प्रशासन अधिकारी यांचे कार्यादेश जा.क्र.भिनिशमनपा/शि.मं./1720 दिनांक 14-02-2014 |
| कामाचा कालावधी | 14/02/2014 ते 28/02/2014 |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 76/दिनांक 15-09--2014 |
| खर्चाची रक्कम रुपये | **628452** |

उपरोक्त नस्ती लेखापरीक्षणा दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 99 दि. 29/09/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) शासन निर्णय क्र.सि.एस.टी. सी.आर. 82/इ.2 दिनांक 5/05/1988 नुसार ५ लक्ष ते ५० लक्ष किंमतीच्या कामांच्या जाहिराती राज्यस्तरावरील एक तसेच जिल्हा स्तरावरील एक वृत्तपत्रात प्रसिध्दी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) आयकर अधिनियम 1961 कमल 194(सी) नुसार 2% प्रमाणे रक्कम रु.12569/- सबंधिताकडून वसुल

करण्यांत यावीत.

3) नगरविकास विभागाचे अधिसुचना दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.1571/- वसुल केलेला नाही.

4) विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्यांची अधिसुचना दि.4 एप्रिल 2012 नुसार ज्या ठेकेदाराने महाराष्ट्र शासनाकडे वॅटची नोंदणी केली नाही त्या ठेकेदाराकडून देयकाचे 5% वॅट वसुल करण्यात यावे असे कळविले आहे. तथापि सदर ठेकेदाराने वॅटची नोंदणी केली नसल्याने त्याचे देयकातून 5% वॅट कपात करणे आवश्यक असे निर्देश आहेत. वॅटची नोंदणी केल्याचे मक्तेदाराच्या उपप्रमाणकावर दिसून येत नाही. त्यामुळे 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.31423/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी.

5) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार दर्पन अपसेट भिवंडी यांनी 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला नाही. तरी 100/- रक्कम मक्तेदाराकडुन वसुल करुन शासन जमा करण्यांत यावी.

6) शासन निर्णय दिनांक 2/01/1992 मधील परिशिष्ट-5 नुसार साहित्याची छपाई करणेबाबत चर्णी रोड शासकिय प्रिन्टींग प्रेसकडुन पत्र पाठवुन प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका यांची छपाई करुन घेणे आवश्यक होते अथवा त्यांचेकडुंन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) मालाचा पुरवठा दिनांक 28/02/2014 होणे आवश्यक असताना पुरवठा दिनांक 27/03/2014 ला झालेल आहे. त्यामुळे पुरवठा आदेशामध्ये नमुद असल्याप्रमाणे माल उशिरा प्राप्त अर्धा टक्का प्रमाणे रक्कम रु.3142/- मक्तेदाराकडुन वसुल करुन महानगरपालिकेच्या निधी मध्ये जमा करण्यांत यावी.

8) साठा रजिष्टर लेखा परिक्षण पथकास तपासणीसाठी सादर केलेले नाही. ते सादर करण्यांत यावेत. तसेच विवरणपत्रामध्ये मार्च 2014 मध्ये प्रश्नपत्रीका व उत्तरपत्रिकेचा साठा किती शिल्लक होता. संपुर्ण वर्षामध्ये किती साहित्य वाटप केले तसेच मार्च 2015 ला किती साठा शिल्लक होता.

DATVRKM8002 (Ref No : 66, Hmm No : 99)

## *65 शिक्षण मंडळ येथील प्राथमिक शाळेकरिता लागणा-या वित्तीय वर्ष 2014-15 मधील प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छपाई मधील अनियमिताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 575000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 575000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2975.00/-

***पुरवठा आदेशामध्ये नमुद असल्याप्रमाणे माल उशिरा प्राप्त झाल्यामुळे करारनामामधील अटीनुसार अर्धा टक्का प्रमाणे रक्कम रु. 2875/- मक्तेदाराकडुन वसुल करावी. तसेच कमी घेतलेले मुद्रांक शुल्लकाची रक्कम रु.100/- शासन जमा करण्यांत यावीत.***

शिक्षण विभागातील प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छपाईबाबतच्या अभिलेख्याची तपासणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव - शिक्षण मंडळ येथील प्राथमिक शाळेकरिता लागणा-या वित्तीय वर्ष 2014-15 मधील प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छपाई मधील अनियमितता

जाहिरात व प्रसिध्दी- ई निविदा मनपाच्या संकेतस्थळावरुन 27-11-2013 रोजी प्रसिध्द केली आहे.

निविदा विक्री दिनांक- 27-11-2013 ते 5-12-2013

निविदा उघडण्याचा दिनांक- 6-12-2013

प्रशासकिय मान्यता- मा.आयुक्त यांची दिनांक 28-01-2014 ची प्रशासकिय मान्यता आहे.

लेखाशिर्ष- शिक्षण विभाग प्राथमिक

अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष- 28 लाख 2013-14

पुरवठादाराचे नांव- मे.दिपक टेडर्स भिवंडी

कार्यादेश क्र.व दिनांक- प्रशासन अधिकारी यांचे कार्यादेश जा.क्र.भिनिशमनपा/शि.मं./1720 दिनांक 14-02-2014

कामाचा कालावधी- 14/02/2014 ते 28/02/2014

प्रमाणक क्रमांक व दिनांक-50/दिनांक 21-08-2014

खर्चाची रक्कम- रुपये 575000

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.100 दिनांक 29/09/2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1) शासन निर्णय क्र.सि.एस.टी. सी.आर. 82/इ.2 दिनांक 05/09/1988 नुसार 5 लक्ष ते 50 लक्ष किंमतीच्या कामांच्या जाहिराती राज्यस्तरावरील एक तसेच जिल्हा स्तरावरील एक वृत्तपत्रात प्रसिध्दी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार मे दिपक टेडर्स भिवंडी यांच्याशी

100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला नाही. तरी 100/- रक्कम मक्तेदाराकडुन वसुल करुन शासन जमा करण्यांत यावी.

3) पुरवठा आदेशामध्ये नमुद असल्याप्रमाणे माल उशिरा प्राप्त झाल्यामुळे करारनामामधील अटीनुसार अर्धा टक्का प्रमाणे रक्कम रु. 2875/- मक्तेदाराकडुन वसुल करुन महानगरपालिकेच्या निधी मध्ये जमा करण्यांत यावी.

FDSJRDM6801 (Ref No : 82, Hmm No : 100)

## *66 1 ते 8 वी सहामाही प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका माध्यम मराठी उर्दु,तेलगु, हिन्दी,गुजराती व कन्नड छपाईमधील अनियमिताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 565000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 565000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 32588.00/-

***नगर विकास विभागाचे अधिसुचना दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.1413/- वसुल केलेला नाही. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.28250/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार मे दिपक टेडर्स भिवंडी यांनी 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला नाही. तरी 100/- रक्कम मक्तेदाराकडुन वसुल करुन शासन जमा करण्यांत यावी. पुरवठा आदेशामध्ये नमुद असल्याप्रमाणे माल उशिरा प्राप्त अर्धा टक्का प्रमाणे रक्कम रु.2825/- मक्तेदाराकडुन वसुल करुन महानगरपालिकेच्या निधी मध्ये जमा करण्यांत यावी.***

शिक्षण विभागातील 1 ते 8 वी सहामाही प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका माध्यम मराठी उर्दु,तेलगु, हिन्दी, गुजराती व कन्नड छपाईबातची तपासणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव- 1 ते 8 वी सहामाही प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका माध्यम मराठी उर्दु,तेलगु, हिन्दी,गुजराती व कन्नड छपाईमधील अनियमिताबाबत.

जाहिरात व प्रसिध्दी-ई निविदा मनपाच्या संकेतस्थळावरुन 27-11-2013 रोजी प्रसिध्द केली आहे.

निविदा विक्री दिनांक - 27-11-2013 ते 05-12-2013

निविदा उघडण्याचा दिनांक - 6-12-2013

प्रशासकिय मान्यता - मा.आयुक्त यांची दिनांक 28-01-2014 ची प्रशासकिय मान्यता आहे.

लेखाशिर्ष-शिक्षण विभाग प्राथमिक

अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष - 28 लाख 2013-14

पुरवठादाराचे नांव- मे.दिपक टेडर्स भिवंडी

कार्यादेश क्र.व दिनांक- प्रशासन अधिकारी यांचे कार्यादेश जा.क्र.भिनिशमनपा/शि.मं./1116 दिनांक 26-02-2014

कामाचा कालावधी - 26/02/2014 ते 15/03/2014

प्रमाणक क्रमांक व दिनांक - 113/दिनांक 18-12-2014

खर्चाची रक्कम रुपये - 565000

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.98 दिनांक 29/09/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय देणेत येत आहे.

1) शासन निर्णय क्र.सि.एस.टी. सी.आर. 82/इ.2 दिनांक 05/09/1988 नुसार 5 लक्ष ते 50 लक्ष किंमतीच्या कामांच्या जाहिराती राज्यस्तरावरील एक तसेच जिल्हा स्तरावरील एक वृत्तपत्रात प्रसिध्दी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) स्थायी समितीची मान्यता घेतल्याचे नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

3) नगर विकास विभागाचे अधिसुचना दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% स्थानिक संस्था कर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.1413/- वसुल केलेला नाही.

4) विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्ययांची अधिसुचना दि.4 एप्रिल 2012 नुसार ज्या ठेकेदाराने महाराष्ट्र शासनाकडे व्हॅटची नोंदणी केली नाही त्या ठेकेदाराकडून देयकाचे 5% व्हॅट वसुल करण्यात यावे असे कळविले आहे. तथापि सदर ठेकेदाराने व्हॅटची नोंदणी केली नसल्याने त्याचे देयकातून 5% वॅट कपात करणे आवश्यक. असे निर्देश आहेत. व्हॅटची नोंदणी केल्याचे मक्तेदाराच्या उपप्रमाणकावर दिसून येत नाही. त्यामुळे 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.28250/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी.

5) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 मे दिपक टेडर्स भिवंडी यांनी 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला नाही. तरी 100/- रक्कम मक्तेदाराकडुन वसुल करुन शासन जमा करण्यांत यावी.

6) शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परिशिष्ट-5 नुसार साहित्याची छपाई करणेबाबत चर्णी रोड शासकिय प्रिन्टींग प्रेसकडुन पत्र पाठवुन प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका यांची

छपाई करुन घेणे आवश्यक होते अथवा त्यांचेकडुंन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

7) पुरवठा पुरवठा आदेशामध्ये नमुद असल्याप्रमाणे माल उशिरा प्राप्त झाल्यामुळे करारनामामधील अटीनुसार अर्धा टक्का प्रमाणे दंडाची रक्कम रु.2825/- मक्तेदाराकडुन वसुल करुन महानगरपालिकेच्या निधी मध्ये जमा करण्यांत यावी.

FDSJRDM6801 (Ref No : 84, Hmm No : 98)

## *67 शालेय पोषण आहार योजना सन 2014-15 मधील अनुदान वाटपातील अनियमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 472319.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 472319.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9746.00/-

***मा.उच्च न्यायालयाचे अंतिम आदेश होईपर्यंत कोणत्याही महानगरपालिका क्षेत्रातील शाळामध्ये कार्यपध्दतीनुसार यापुर्वी नियुक्त केलेल्या यंत्रणामार्फत आहार शिजवुन देण्यांत यावा असे आदेश आहेत त्यानुसार कार्यालयाचे आदेश क्र.250/13-06-2014 अन्वये नवीन निविदा न काढता पुर्वीच्याच यंत्रणाला मुदतवाढ दिलेली आहे. तथापि सदर आदेशाच्या दोन्ही प्रती नस्तीमध्ये दिसुन येत नाही. तिन्ही पुरवठादारानी धनादेश स्विकारतानां मुद्रांक स्टॅम्पवर स्वाक्षरी केलेली नाही. तीन पुरवठादाराकडुन 100/- प्रमाणे एकूण रक्कम 300/- वसुल करुन शासन जमा करण्यांत यावी. आयकर अधिनियम 1961 कमल 194(सी) नुसार 2% प्रमाणे तीन्ही पुरवठादार यांचेकडुन रक्कम रु.9446/- वसुल करण्यांत यावीत.***

शिक्षण विभागातील शालेय पोषण आहार योजना सन 2014-15 मधील अनुदान वाटपाच्या नस्तीची तपासणी केली असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| इत्यादी | केन्द्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण दर |
|---|---|---|---|
| 1 ते 5 वी | 2.44 | 0.81 | 3.25 |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 ते 8 वी | 3.07 | 1.40 | 4.82 |

1 ते 8 विध्यार्थी यांना माहे सप्टेंबर.2014 मध्ये शाळेनां खालील प्रमाणे शालेय पोषण आहार तांदुळाचा पुरवठा केलेला आहे.

| पुरवठादाराचे नांव | 1 ते 5 वी लाभार्थी | दर | खर्चाची रक्कम |
|---|---|---|---|
| ख्वाजा गरीब नवाज महिला मंडळ | 28844 | 3.25 | 93743 |
| पाकिजा महिला मंडळ | 26725 | 3.25 | 86856 |
| भिमाबाई महिला मंडळ | 24561 | 3.25 | 79823 |
| | | | |
| पुरवठादाराचे नांव | 6 ते 8 वी लाभार्थी | दर | खर्चाची रक्कम |
| ख्वाजा गरीब नवाज महिला मंडळ | 17914 | 4.82 | 86345.48 |
| पाकिजा महिला मंडळ | 18184 | 4.82 | 87646.85 |
| भिमाबाई महिला मंडळ | 7864 | 4.82 | 37904.48 |

सदर बाबत उपरोक्त तिघांना प्रमाणक क्र.9/14-11-2014 नुसार खालील प्रमाणे रक्कम रु. 472319 प्रदान झालेले आहे.

1)ख्वाजा गरीब नवाज महिला मंडळ यांना रक्कम रु.180088/-

2)पाकिजा महिला मंडळ यांना रक्कम रु.174503/-

3)भिमाबाई महिला मंडळ यांना रक्कम रु.117728/-

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन

आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.105 दिनांक 29/09/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय देणेत येत आहे.

1)शाळा निहाय पटसंख्येची पडताळणी शालेय प्रभाग समिती भिवंडी यांचेकडुन पडताळुन त्याबाबतचे प्रमाणपत्र प्रशासन अधिकारी यांचेकडे पाठवतील. त्यानंतर त्याचे प्रदान करणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2)मा.उच्च न्यायालयाचे अंतिम आदेश होईपर्यंत कोणत्याही महानगरपालिका क्षेत्रातील शाळामध्ये कार्यपध्दतीनुसार यापुर्वी नियुक्त केलेल्या पुरवठादारामार्फत आहार शिजवुन देण्यांत यावा असे आदेश आहेत. त्यानुसार कार्यालयाचे आदेश क्र.250/13-06-2014 अन्वये नवीन निविदा न काढता पुर्वीच्याच पुरवठादारास मुदतवाढ दिलेली आहे. तथापि सदर आदेशाच्या दोन्ही प्रती नस्तीमध्ये दिसुन येत नाही. सदर आदेशाच्या प्रती पडताळणी पथकास सादर केलेल्या नाहीत.

3) पुरवठादारानी धनादेश स्विकारतानां मुदांक स्टॅम्पवर स्वाक्षरी केलेली नाही. सदरची बाब गंभीर स्वरुपाची आहे.

4)मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार सबंधित पुरवठादार यांनी  यांनी 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला नाही. तरी तीन्ही पुरवठादाराकडुन 100/- प्रमाणे एकूण रक्कम 300/- वसुल करुन शासन जमा करण्यांत यावी.

5)आयकर अधिनियम 1961 कमल 194(सी) नुसार 2% प्रमाणे पुरवठादार यांचेकडुन रक्कम रु.9446/ वसुल करण्यांत यावीत.

FDSJRDM6801 (Ref No : 86, Hmm No : 105)

## *68 शिक्षण मंडळ महानगरपालिका येथील नवीन शाळा दिनांक 15-08-2014 रोजी उदघाटन दिनी ग्रेनेडाईड प्लेट लावणेबाबतचे देयक अदा करणेमधील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 56149.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 56149.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3047.00/-

***प्रशासन अधिकारी यांचे मंजुरीने कार्यालयीन आदेश काढलेले नाही. मा.सभापती यांचे दिनांक 25-08-2014 च्या मंजुरीनुसार प्रदान करण्यांत आलेले आहे. नगरविकास विभागाचे दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.140/- वसुल केलेला नाही. विक्रीकराची रक्कम देयकातुन वसुल केलेली नाही. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.2807/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी. संबधित दुकानदार यांचेसोबत करारनामा केलेला नाही. याबाबत खुलासा सादर करावा. 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा न केल्यामुळे रक्कम रु.100/- शासनाचे नुकसान झालेले आहे.***

शिक्षण मंडळ महानगरपालिका येथील नवीन शाळा दिनांक15-08-2014 रोजी उदघाटन दिनी ग्रेनेडाईड प्लेट लावणेबाबतचे देयक अदा करणेबाबतचे कागदपत्रे तपासले असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

दिनांक 15-08-2014 रोजी महानगरपालिकेच्या 2 नवीन शाळेचे शाळा क्र.49 पोंगाव व शाळा क्र.42 कामतकर येथील शाळेतील इमारतीमध्ये ग्रेनाइड नेमप्लेट बसविणेकामी 61X31 ग्रेनाइड नेमप्लेट 2 नग रक्कम रु.56149/- खर्च झालेला असुन त्याचा प्रमाणक क्र 52/25-08-14 आहे. उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील दस्ताएवजाची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.85 दिनांक 07/09/2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षनाचे अभिप्राय देणेत येत आहे.

1)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची 'ड' प्रकरण 5, 2(2) नुसार दोन लाख रुपये पेक्षा कमी रकमेच्या कोणत्याही संविदेच्या निविदेची सुचना मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे शिक्षण मंडळाकडून कार्यवाही झालेली नाही.

2)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अनुसूची ड प्रकरण 5(3) नियम 2 अन्वये प्रत्येक संविदेचे यथायोग्य् पालन करण्यासाठी संबंधितांकडून प्रतिभूती मागविली पाहिजे त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3)प्रशासन अधिकारी यांचे मंजुरीने कार्यालयीन आदेश काढलेले नाही. मा.सभापती यांचे दिनांक 25-08-2014 च्या मंजुरीनुसार प्रदान करण्यांत आलेले आहे.

4)नगरविकास विभागाचे दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.140/- वसुल केलेला नाही.

5)महाराष्ट्र विक्रीकर ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी इन गुडस इंव्हालंट इन एक्झुकीशन ऑप वर्क कंत्राट कायदा 1985 नुसार नोंदनीकृत असल्यास 2 टक्के कर कपात करणे आवश्यक आहे. नसल्यास 5 टक्के कंत्राटकर कपात करावा. असे निर्देश आहेत. त्यानुसार विक्रीकराची रक्कम देयकातुन वसुल

केलेली नाही. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.2807/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी.

6)मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार संबधित दुकानदार यांचेसोबत 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा न केल्यामुळे सबंधित मक्तेदाराकडुन रक्कम रु.100/- वसुल करुन शासनास जमा करावी.

FDSJRDM6801 (Ref No : 98, Hmm No : 85)

## *69 दिनांक 15 आगष्ट 2014 स्वतंत्र दिनानिमित्य व दिनांक 26 जानेवारी 2015 प्रजासत्ताक दिनानिमित्य चॉकलेट खरेदी रक्कम रु.141300/- मधील अनियमिततताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 141300.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 141300.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 7618.00/-

***नगरविकास विभागाचे अधिसुचना दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.353/- वसुल केलेला नाही. रक्कम रु.5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.7065/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी. मे.आर पी डिस्ट्रीब्युटर्स भिवंडी, अर्पि डिस्ट्रीब्युटर्स भिवंडी यांनी 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा न केल्यामुळे रक्कम रु.200/- शासनाचे नुकसान झालेले आहे. पुरवठादार यांचेकडुन रक्कम रु.200/- वसुल करुन शासन जमा करावी.***

वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये शिक्षण मंडळ भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील दिनांक 15 आगष्ट 2014 स्वतंत्र दिनानिमित्य व दिनांक 26 जानेवारी 2015 प्रजासत्ताक दिनानिमित्य चॉकले खरेदी बाबतची निविदा नस्ती तपासली असता कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | दिनांक 15 आगष्ट 2014 स्वतंत्र दिनानिमित्य व दिनांक **26** जानेवारी 2015 प्रजासत्ताक दिनानिमित्य चॉकले खरेदीबाबत. |

| | |
|---|---|
| जाहिरात व प्रसिध्दी | खाजगी व्यवसायीकाकडुन कोटेशन मागविण्यांत आले होते. |
| लेखाशिर्ष | कार्यालयीन खर्च |
| अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष | सन 2014-15 रक्कम रु.5 लाख |
| पुरवठादाराचे नांव | 1)मे.आर पी डिस्ट्रीब्युटर्स भिवंडी 2) अर्पि डिस्ट्रीब्युटर्स भिवंडी |
| कार्यादेश क्र.व दिनांक | 1) प्रशासन अधिकारी यांचे कार्यादेश जा.क्र.654/दि.11-08-2014<br>2) उप आयुक्त यांचे कार्यादेश जा.क्र.1752/दि.23-01-2015 |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 1)प्रमाणक क्र.47/दि.11-08-2014 2) प्रमाणक क्र.129/दि.23-02-2015 |
| खर्चाची रक्कम रुपये | 1)रक्कम रु.72000/- 2) रक्कम रु.69300/- |

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.86 दिनांक 07/09/2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1) निविदा प्रक्रिया राबविलेली नाही.

2) नगरविकास विभागाचे अधिसुचना दिनांक 6 ऑगष्ट 2012 नुसार मक्तेदाराच्या कंत्राट मुल्यांच्या एकूण रक्कमेच्या 0.25% कपात करणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकातुन स्थानिक संस्था कर रक्कम रु.353/- वसुल केलेला नाही.

3) विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्यांची अधिसुचना दि.4 एप्रिल 2012 नुसार ज्या ठेकेदाराने शासनाकडे व्हॅटची नोंदणी केली नाही त्या ठेकेदाराकडून देयकाचे 5% व्हॅट वसुल करण्यात यावे असे कळविले आहे. तथापि सदर ठेकेदाराने व्हॅटची नोंदणी केली नसल्याने त्याचे देयकातून 5% व्हॅट कपात करणे आवश्यक आहे असे निर्देश आहेत. व्हॅटची नोंदणी केल्याचे मक्तेदाराच्या उपप्रमाणकावर दिसून येत नाही.विक्रीकराची रक्कम देयकातुन वसुल केलेली नाही. 5% प्रमाणे विक्रीकराची रक्कम रु.7065/- मक्तेदाराकडुन वसुल करुन शासनास जमा करावी.

4) मे.आर पी डिस्ट्रीब्युटर्स भिवंडी, अर्पि डिस्ट्रीब्युटर्स भिवंडी यांनी 100/- मुद्रांक शुल्कावर करारनामा न केल्यामुळे रक्कम रु.200/- शासनाचे नुकसान झालेले आहे. पुरवठादार यांचेकडुन रक्कम रु.200/- वसुल करुन शासन जमा करावी.

5) पटसंख्या शाळाप्रमाणे नमुद नाही. तसेच प्रत्येक शाळेला किती चॉकलेट वाटप करावयाचे आहे याबाबत कार्यालयीन आदेश प्रशासन अधिकारी यांनी निर्गमित केलेले नाही.

## *70 अग्निशमन दलातील गणवेश कापड तसेच वस्तु खरेदीबाबत अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष : अग्निशमन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 588000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 588000.00/-

***उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस 1088/(2512)/उद्योग.6 दि.2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.4 परिशिष्ट 8 मधील नामनिर्देशित संस्थांकडून गणवेशांचा नमूना तपासणी करुन घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. सन 2013-14 पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीबाबत शासन निर्णय दिनांक 2/01/1992 मधील परिशिष्ट-5 (अ) (2) नुसार शासनाच्या अंगीकृत व्यवसाय/ घरमाग/ यंत्रमाग/ महाटेन्स महाराष्ट राज्य वस्त्र उदयोग महामंडळ यांचेकडून कापड खरेदी करणेबाबत पत्र पाठवुन करणे आवश्यक होते. अथवा त्यांचेकडुंन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

अग्निशामक दल विभागातील तसेच वाहन विभागातील अग्निशामक दल गणवेश कापड तसेच वस्तु खरेदीबाबतची निविदा नस्ती वित्तीय वर्ष 2014-15मधील नस्ती तपासली असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

कामाचे नाव- अग्निशामक दल गणवेश कापड तसेच वस्तु खरेदीबाबत.

जाहिरात व प्रसिध्दी-अग्निशमक दल गणवेश कापड तसेच वस्तु खरेदीबाबत दै.सागर या वृत्तपत्रात दिनांक 01-03-2014 रोजी जाहीरात दिली.

निविदा विक्री दिनांक- दि 01-03-2014 ते 07-03-2014

निविदा स्विकारण्याची तारीख-13-03-2014 दुपारी 4.00

निविदा उघडण्याची तारीख-13-03-2014 दुपारी 4.00 उप आयुक्त यांच्या दालनात उघडण्यात आली आहे.

लेखाशिर्ष-अगिन्शमन दलाकडील अधिकारी व कर्मचारी यांना गणवेश व इतर साहित्य खरेदी

अर्थसंकल्पीय तरतूद व वर्ष-1000000 सन 2014-15

प्रशासकीय मान्यता- 09-05-2014

पुरवठादाराचे नाव- साईबाबा टेडर्स

कार्यादेश क्र.व दिनांक- उप आयुक्त (मुख्य) यांचे जावक क्र.23 दिनांक 15/05/2014

कामाचा कालावधी- 15/05/2014 ते 15/08/2014
खर्चाचा तपशिल प्रमाणक क्र. दिनांक व रक्कम-प्रमाणक क्र.2140 दिनांक 30-09-15 पार्ट पेमेंट रक्कम रु.588000/-

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील दस्ताएवजाची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.66 दिनांक 27/08/2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1) शासन निर्णय क्र.सि.एस.टी. सी.आर. 82/इ.2 दिनांक 5/09/1988 नुसार 5 लक्ष ते 50 लक्ष किंमतीच्या कामांच्या जाहिराती राज्यस्तरावरील एक तसेच जिल्हा स्तरावरील एक वृत्तपत्रात प्रसिध्दी करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

2) सन 2013-14 पुरुष सेवकांसाठी गणवेश खरेदीबाबत शासन निर्णय दिनांक 2/01/1992 मधील परिशिष्ट-5 (अ) (2) नुसार शासनाच्या अंगीकृत व्यवसाय/घरमाग/यंत्रमाग/ महाटेन्स महाराष्ट राज्य वस्त्र उदयोंग महामंडळ यांचेकडून कापड खरेदी करणेबाबत पत्र पाठवुन करणे आवश्यक होते. अथवा त्यांचेकडुंन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) निविदा काढण्यापुर्वी अंदाजपत्रकिय रक्कम (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजारातुन दरपत्रक मागवून त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे वाजवी दराची खात्री करता आलेली नाही.

4) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस 1088/(2512)/उद्योग 6 दि. 2 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र.8.4 परिशिष्ट 8 मधील नामनिर्देशित संस्थांकडून गणवेशांचा नमूना तपासणी करुन घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

5) ज्या अधिकारी व कर्मचा-याला गणवेशाचे कापड वाटप केलेले आहे. त्याची पोहोच घेतलेली नाहीत. त्यामुळे गणवेश वाटपाची खात्री पटत नाही. साठा रजिष्टरवरुन मार्च 2014 ला गणवेशाचा साठा किती शिल्लक होता. तसेच वाटप केलेला साठा व मार्च 2015 अखेर शिल्लक साठा याची माहीती लेखापरिक्षणास सादर केलेली नाही.

6) स्थायी समितीची मान्यता घेतल्याचे नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

FDSJRDM6801 (Ref No : 44, Hmm No : 66)

## *71 महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : मनपा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 135476.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 135476.00/-

***अग्निशमन विभागाने रक्कम रु.135476 महाराष्ट्र अग्निसुरक्षा निधीमध्ये जमा केल्याचे वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये दिसुन येत नाही.***

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीबाबत दस्ताएवजाची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.39 दिनांक 13/07/2018 नुसार खुलासा करण्यास कळविलेले असता याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय देणेत येत आहे.

नगर विकास शासन निर्णय क्रमांक अशसं 2009/प्र.क्र.230/नवी-20 दिनांक 12.03.2010 अन्वये राज्यातील महानगरपालिका यांना आपले कर्तव्य बजावतांना मृत्यु अथवा शारीरीक इजा विकलांगता (कायमस्वरुपी आणि अंशत:) आल्यास सानुग्रह अनुदान म्हणून मदत देण्यासाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधी स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्व नागरी स्थानिक संस्था तसेच विशेष नियोजन प्राधिकरणे यांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम 2006 या कलम 25 अन्वये स्थापन केलेल्या निधीमध्ये जमा होणा-या एकूण रक्कमेच्या 5% तरतूद प्रतिवर्षी राज्यस्तरावर स्थापन होणा-या महाराष्ट्र अग्निसुरक्षा सेवा कल्याण निधीमध्ये जमा करण्याचे आदेशित आहे. त्यानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त लेख्यावरुन जमा रु.2709526/- आढळून येते. त्यानुसार 2709526X5%=135476 इतकी रक्कम महाराष्ट्र अग्निसुरक्षा निधीमध्ये जमा केल्याचे वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये दिसुन येत नाही.

FDSJRDM6801 (Ref No : 47, Hmm No : 39)

## ***72 मनपा हददीत बगीच्यामध्ये ठिकठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बेंचेस बसविणेबाबतच्या कामातील अनियमितता***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष :उदयान महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 994289.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 994289.00/-

***उद्यान विभागाने ज्या ठिकाणी निधी खर्च केला आहे, अश्या सर्व मालमत्ता या महानगरपालिकेच्या/ उद्यानाच्या मालकीची असल्याचे सिध्द करणारे दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध होऊ शकले नाही. उदयानात बेंचेस बसविण्यासाठी महाराष्ट्र राज्य लघु उदयोग महामंडळाकडुन खरेदी न करता सदर बेंचेसची***

***खरेदी स्थानिक पुरवठादाराकडून केली असून शासन निर्णय उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांसंस1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 02/01/1992 मधील शासन आदेशाचे उल्लंघन झाले आहे. जडवस्तुसंग्रह नोंदवही उपलब्ध करुन दिली नाही त्यामुळे मालाचा पुरवठा झाल्याबाबत तपासणी करता आली नाही. प्रशासकीय मंजूरीमधील अट क्र..20 नुसार मासिक प्रगती अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडे पाठविलेला नाही.प्रशासकीय मंजूरी मधील अट क्र. 22 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला व उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी,ठाणे यांना सादर केलेले नाही. ठेकेदाराने टॅक्स इन्व्हॉईस सादर न करता केवळ लेटरहेडवर कामाच्या रकमेची मागणी केल्याचे दिसून आले असून, त्याआधारे प्रत्यक्ष प्रदान झाले किंवा कसे तसेच केव्हा प्रदान झाले याबाबतची प्रमाणके उपलब्ध करुन न दिल्याने तपासणी करता आली नाही.***

उद्यान विभागाच्या 2014-15 च्या लेखापरिक्षणात मनपा हददीत बगीच्यामध्ये ठिकठिकाणी ज्येष्ठा नागरिकांना बसण्यासाठी बेंचेस बसविणेबाबतच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 994289/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | मे.कमळ एन्टरप्रायजेस, भिवंडी |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | जिल्हाधिकारी,ठाणे क्र.नियो/आस्थाविका/प्रमा/ टि-1/1123 दिनांक 25/07/2014(आमदार निधी) |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.25/06/2014 |
| 5) | निविदा कालावधी | दि.20/08/2014 ते 06/09/2014 |
| 6) | जाहिरात | दै.कोकण सकाळ दिनांक 20/08/2014 |
| 7) | निविदा उघडल्याचा दिनांक | 06/09/2014 |
| 8) | कार्यादेश | क्र.दि.03/11/2014 रुपये 994289/- |
| 9) | कामाची मुदत | दि.03/11/2014 ते दि.03/02/2015 |
| 10) | करारनामा | क्र.607, दि.30/10/2014 |
| 11) | काम पूर्णत्वाचा दिनांक | उपलब्ध नाही. |
| 12) | जडवस्तुसंग्रह नोंदवही | उपलब्ध करुन दिली नाही. |
| 13) | प्रत्यक्ष खर्च तपशील | १.पहिले व अंतिम धावते देयक रु.994289/- प्रमाणक उपलब्ध झाले नाही. |

याबाबत अर्धसमास पत्र क्र.79 दि.05/09/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्याने खालीलप्रमाणे लेखापरिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत. सदर कामामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1. या कामासाठीचे प्राकलन, अंदाजपत्रक तसेच उद्यान विभागाने ज्या ठिकाणी निधी खर्च केला आहे, अश्या सर्व मालमत्ता या महानगरपालिकेच्या / उद्यानाच्या मालकीची असल्याचे सिध्द करणारे दस्तऐवज लेखा परीक्षणास अप्राप्त आहे

2. मनपा हददीत एकूण 43 उद्याने असून, त्यामध्ये बेंचेस बसविण्यासाठी महाराष्ट्र राज्य् लघुउद्योग विकास महामंडळ यांचेकडील 2013-14 च्या दरसूचीतील दरानुसार अंदाजपत्रक तयार

करण्यात आले आहे. शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दिनांक 02/01/1992 नुसार महाराष्ट्र राज्यातील लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सदर साहित्य महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ यांचेकडून खरेदी करणे बंधनकारक असतांना देखील, जाहिरातीव्दारे निविदा मागवून मे.कमळ एन्टरप्रायजेस,भिवंडी यांचेकडून बेंचेसची खरेदी करण्यात आली आहे. हे शासन आदेशाचे उल्लंघन असून, याबाबत योग्य तो खुलासा होणे आवश्यक आहे.

3. काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीमध्ये आढळून आला नाही.

4. प्रशासकीय मंजूरीमधील अट क्र..20 नुसार मासिक प्रगती अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडे पाठविलेला नाही.

5. प्रशासकीय मंजूरी मधील अट क्र. 22 नुसार काम पुर्णत्वाचा दाखला व उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी,ठाणे यांना सादर केलेले नाही.

6. करारनामा करतांना त्यावर स्थायी समिती सदस्यांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या नाहीत.

7. ठेकेदाराने टॅक्स् इन्व्हॉईस सादर न करता केवळ लेटरहेडवर कामाच्या रकमेची मागणी केल्याचे दिसून आले असून, त्याआधारे प्रत्यक्ष प्रदान झाले किंवा कसे तसेच केव्हा प्रदान झाले याबाबतची प्रमाणके उपलब्ध करुन न दिल्याने तपासणी करता आली नाही.

8. जडवस्तुसंग्रह नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात मालाचा पुरवठा झाल्यापुष्टयर्थ नोंदी तपासता आल्या नाहीत.

सदर खर्च रक्कम रुपये 994289/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे

DGPSAAM7402 (Ref No : 73, Hmm No : 79)

## *73 मनपाच्या कब्रस्तानामध्ये लाल मातीचा पुरवठा करणे बाबतच्या कामातील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष :उदयान महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 183180.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 183180.00/-

***उदयान विभागाने ज्या ठिकाणी महानगरपालिका निधी खर्च केला आहे, अश्या सर्व मालमत्ता या महानगरपालिकेच्या / उदयानाच्या मालकीची असल्याचे सिध्द करणारे दस्तऐवज उपलब्ध झाले नाही. लालमाती पुरवठा वाहनांचे लॉगबुक लेखा परीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.मोजमाप पुस्तिकेत विस्तृत आवश्यक त्या नोंदी नसल्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त परिणामाचे लेखा परीक्षण करता आले नाही. मनपा हददीतील 25 कब्रस्तानापैकी 09 कब्रस्तानात लाल मातीचा पुरवठा केल्याचे दिसून येते. तथापि उर्वरित ठिकाणच्या***

***कब्रस्तानात पुरवठा न करण्याबाबत साधार स्पष्टता होऊ शकली नाही. उदयान अधीक्षक व सिटी इंजिनियर यांनी कामाच्या दिनांकीत नोंदी न घेता काम पुर्ण झाल्यावर संपूर्ण कामाची नोंद एकाच वेळी केलेली असून, कामाच्या तपासणीच्या दिनांकीत स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत. ठेकेदाराने मजुरांना किमान वेतन कायदयाप्रमाणे धनादेशाने वेतन अदा केल्याबाबत नोंदवही, बँक स्क्रोल, भविष्य निर्वाह निधी, ESI च्या रकमा संबंधित खात्याकडे चलनाने भरणा केल्याबाबतची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.***

उदयान विभागाच्या 2014-15 च्या लेखापरिक्षणात मनपा च्या कब्रस्तानामध्ये लाल मातीचा पुरवठा करणे बाबतच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 183180/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | जय योगेश्वर मजूर कामगार सेवा संस्था |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | शहर अभियंता दि.03/02/2015 |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.03/02/2015 |
| 5) | दरपत्रके कालावधी | दि.10/02/2015 ते 17/02/2015 |
| 6) | जाहिरात | मनपा नोटिस बोर्ड दि. 10/02/2015 |
| 7) | निविदा उघडल्याचा दिनांक | 20/02/2015 |
| 8) | कार्यादेश | क्र.दि.25/03/2015 |
| 9) | कामाची मुदत | कार्यादेश दिनांकापासून 30 दिवस |
| 10) | करारनामा | 25/03/2015 |
| 11) | काम पूर्णत्वाचा दिनांक | उपलब्ध नाही. |
| 12) | मोजमाप पुस्तिका | क्र.35, पान क्र.32 ते 33 |
| 13) | प्रत्यक्ष खर्च तपशील | १.पहिले व अंतिम धावते देयक रु.183180/- प्रमाणक उपलब्ध झाले नाही. |
| 14) | देयकातील वजाती | स्वामित्वधन रु.18200/-, सुरक्षा अनामत रु.7327/-,व्हॅट रु.9159/-, उपकर रु.1832/-, विमा रु.1832/-, आयकर रु.3664/- |

याबाबत अर्धसमास पत्र क्र.80 दि.05/09/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्याने खालीलप्रमाणे लेखापरिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत. सदर कामामध्ये खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1. या कामासाठीचे प्राकलन,अंदाजपत्रक तसेच उदयान विभागाने ज्या ठिकाणी महानगरपालिका निधी खर्च केला आहे, अश्या सर्व मालमत्ता या महानगरपालिकेच्या / उद्यानाच्या मालकीची असल्याचे सिध्द करणारे दस्तऐवज लेखा परीक्षणास अप्राप्त आहेत.
2. लालमाती पुरवठा वाहनांचे लॉगबुक लेखा परीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.
3. मोजमाप पुस्तिकेत विस्तृत आवश्यक त्या नोंदी नसल्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त परिणामाचे लेखा परीक्षण करता आले नाही.

4. एकूण 02 वाहनाव्दारे 23 फेऱ्यात एकूण 260.36 Cmt. इतका लाल मातीचा पुरवठा झाल्याचे नस्तीमध्ये नमूद असून, मोजमाप पुस्तिकेत लाल माती पुरवठा एकूण 258 दर्शविला आहे. याबाबत खुलासा विभागाने केला नाही..

5. मनपा हददीत एकूण 25 कब्रस्ताने असून, नगरसेवक यांनी पत्राव्दारे वॉर्ड क्र.33(ब) मधील आसबीबी कब्रस्तान मध्ये 1 फुट मातीचा भरणा करुन मिळणेबाबत विनंती केली आहे. तदनंतर उद्यान अधीक्षक यांनी रु. 183180/- चे अंदाजपत्रक तयार केले आहे व मनपा हददीतील 25 कब्रस्तानापैकी 09 कब्रस्तानात लाल मातीचा पुरवठा केल्याचे दिसून येते. तथापि उर्वरित ठिकाणच्या कब्रस्तानात पुरवठा न करण्याबाबत साधार स्पष्टता होऊ शकली नाही.

6. ठेकेदार यांचा सार्वजनिक बांधकाम नोंदणी/ सहा.निबंधक,सहकारी संस्था नोंदणी प्रमाणपत्र आढळून आले नाही. पॅन कार्ड, व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र, आयकर रिटर्न, अनुभवाचा दाखला इ. आढळून आले नाही.

7. संबंधित ठेकेदाराने सदर कामात किती मजूर वापरले हे समजु शकले नाही. तसेच सदर ठेकेदाराचा मजूर पुरविण्यासाठी कामगार परवाना नस्तीत आढळला नाही. ठेकेदाराने मजुरांना किमान वेतन कायदयाप्रमाणे धनादेशाने वेतन अदा केल्याबाबत नोंदवही, बँक स्क्रोल, भविष्य निर्वाह निधी, ESI च्या रकमा संबंधित खात्याकडे चलनाने भरणा केल्याबाबतची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

8. मोजमाप पुस्तिका क्र.35 पान क्र.32 ते 33 वर उद्यान अधीक्षक व सिटी इंजिनियर यांनी कामाच्या दिनांकीत नोंदी न घेता काम पुर्ण झाल्यावर संपूर्ण कामाची नोंद एकाच वेळी केलेली असून, कामाच्या तपासणीच्या दिनांकीत स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

सदर रक्कम रुपये 183180/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 74, Hmm No : 80)

## *74 मनपा हददीतील सर्व कब्रस्तानामधील मान्सुनकाळात वाढलेले गवत काढून विल्हेवाट लावणेच्या कामामधील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :उदयान महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 828204.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 828204.00/-

***उदयान विभागाने ज्या ठिकाणी महानगरपालिका निधी खर्च केला आहे, अश्या सर्व मालमत्ता या महानगरपालिकेच्या / उद्यानाच्या मालकीची असल्याचे सिध्द करणारे दस्तऐवज लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही. कब्रस्तानातील गवत काढून त्याची कशा प्रकारे विल्हेवाट लावली याचा तपशील आढळून आला***

***नाही. मनपा हददीत एकूण 25 कब्रस्ताने असून, सर्वच कब्रस्तानातील गवत काढून विल्हेवाट लावलेबाबत साधार स्पष्टता होऊ शकली नाही. ठेकेदाराने मजुरांना किमान वेतन कायदयाप्रमाणे धनादेशाने वेतन अदा केल्याबाबत नोंदवही, बँक स्क्रोल, भविष्य निर्वाह निधी, ESI च्या रकमा संबंधित खात्याकडे चलनाने भरणा केल्याबाबतची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.सदर काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र आढळून आले नाही.***

उदयान विभागाच्या 2014-15 च्या लेखापरिक्षणात मनपा हददीतील सर्व कब्रस्तानामधील मान्सुनकाळात वाढलेले गवत काढून विल्हेवाट लावणेच्या कामाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये 830137/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | मे.बुबेरे & असोसिएटस, |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | आयुक्त मनपा |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.08/11/2013 |
| 5) | निविदा कालावधी | क्र.02/2013-14<br>दि.13/11/2013 ते 19/11/2013 |
| 6) | जाहिरात | दै.स्वराज्य ,दै.तोरण,भिवंडी दि.13/11/2013 |
| 7) | निविदा उघडल्याचा दिनांक | दि.20/11/2013 |
| 8) | कार्यादेश | क्र.उदयान/477/14 दि.17/01/2014 |
| 9) | कामाची मुदत | कार्यादेश दिनांकापासून 60 दिवस |
| 10) | करारनामा | क्र.उदयान-8 दि.09/01/2014 |
| 11) | काम पूर्णत्वाचा दिनांक | दि.17/03/2014 |
| 12) | मोजमाप पुस्तिका | क्र.225, पान क्र.38 ते 65 |
| 13) | प्रत्यक्ष खर्च तपशील | १.पहिले व अंतिम धावते देयक रु.828204/-<br>प्रमाणक उपलब्ध झाले नाही. |
| 14) | देयकातील वजाती | सुरक्षा अनामत रु33205/-, उपकर रु.8301.37/-, विमा रु.8301.37/-, आयकर रु.16602.74/- |

याबाबत अर्धसमास पत्र क्र .81 दि.05/09/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्याने लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1. या कामासाठीचे प्राकलन,अंदाजपत्रक तसेच उदयान विभागाने ज्या ठिकाणी महानगरपालिका निधी खर्च केला आहे , अश्या सर्व मालमत्ता या महानगरपालिकेच्या / उदयानाच्या मालकीची असल्याचे सिध्द करणारे दस्तऐवज लेखा परीक्षणास अप्राप्त आहे

2. कब्रस्तानातील गवत काढून त्याची कशा प्रकारे विल्हेवाट लावली सदर गवताची वाहतूक करुन नेमके कोणत्या ठिकाणी टाकण्यात आले तसेच वाहतुकीसाठी किती खर्च करण्यात आला तसेच सदर गवताची विक्री केली असल्यास त्यातून मिळालेले उत्पन्न याचा तपशील आढळला नाही.

3. मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन न दिल्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त परिमाणाचे लेखा परीक्षण

करता आले नाही.

4. प्रमाणक उपलब्ध करुन न दिल्याने प्रत्यक्षात प्रदान करण्यात आलेल्या रकमांची सत्यता पडताळता आली नाही.

5. मनपा हद्दीत एकूण 25 कब्रस्ताने असून, सर्वच कब्रस्तानातील गवत काढून विल्हेवाट लावलेबाबत साधार स्पष्टता होऊ शकली नाही.

6. संबंधित ठेकेदाराने सदर कामात किती मजूर वापरले हे समजु शकले नाही .तसेच सदर ठेकेदाराचा मजूर पुरविण्यासाठी कामगार परवाना नस्तीत आढळला नाही . ठेकेदाराने मजुरांना किमान वेतन कायदयाप्रमाणे धनादेशाने वेतन अदा केल्याबाबत नोंदवही , बँक स्क्रोल, भविष्य निर्वाह निधी, ESI च्या रकमा संबंधित खात्याकडे चलनाने भरणा केल्याबाबतची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.सदर काम समाधानकारकरित्या पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र आढळून आले नाही.

सदर रक्क्म रुपये 828204/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 75, Hmm No : 81)

## *75 मनपाच्या क्षेत्रातील धोकादायक झाडे छाटणेच्या कार्यवाहीसाठी साधनसामुग्री खरेदी करणेबाबतच्या कामामधील अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 07**

*लेखा शीर्ष :उदयान महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 78000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 78000.00/-

***दरसूची उपलब्ध करुन दिली नाही, महाराष्ट्र राज्य लघु उदयोग महामंडळाकडून खरेदी करण्यात आली नाही. साहित्याचे दर पृथ:करण करण्याबाबत साधार स्पष्टता झाली नाही. साहित्याच्या पुरवठयापुष्टयर्थ जडवस्तुसंग्रह नोंदवही उपलब्ध करुन दिले नाही त्यामुळे प्राप्त परिमाणांचे लेखापरिक्षण करता आले नाही. साहित्य वाजवी दर्जाचे व सुस्थितीत प्राप्त असल्याबाबत प्रमाणपत्र / तपासणी अहवाल प्राप्त झाला नाही. साहित्याची चलने, देयके प्राप्त झाली नाहीत.***

उदयान विभागाच्या 2014-15 च्या लेखापरिक्षणात मनपाच्या क्षेत्रातील धोकादायक झाडे छाटणेच्या कार्यवाहीसाठी साधनसामुग्री खरेदी करणेबाबतच्या कामामध्ये पुढील अनियमितता आढळून आल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1) | अंदाजपत्रकीय रक्क्म | रुपये 85325/- |
| 2) | ठेकेदाराचे नांव | मे.स्वाभिमान सुशिक्षित बेरोजगार सेवा |

| | | |
|---|---|---|
| | | सह.संस्था, भिवंडी |
| 3) | प्रशासकीय मंजूरी | शहर अभियंता मनपा |
| 4) | तांत्रिक मंजूरी | शहर अभियंता दि.09/03/2015 |
| 7) | कार्यादेश | क्र.उदयान/320/14 दि.04/09/2014 रु.78000/- |
| 8) | कामाची मुदत | कार्यादेश दिनांकापासून 07 दिवस |
| 9) | करारनामा | क्र.295/2014-15 दि.22/08/2014 |
| 10) | काम पूर्णत्वाचा दिनांक | दि.उपलब्ध नाही |
| 11) | जडवस्तुसंग्रह नोंदवही | क्र.16, पान क्र.42 |

याबाबत अर्धसमास पत्र क्र.96 दिनांक 24/09/2018 अन्वये विचारणा करुनदेखील अनुपालन प्राप्त न झाल्याने, खालीलप्रमाणे लेखापरिक्षणाचे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. सदर कामासाठीच्या एकूण 04 वस्तुंसाठी दरसूची वापरण्यात आलेली नाही. तथापि महाराष्ट्र राज्य लघु उदयोग महामंडळ यांचे कडून खरेदी न करता / त्यांचेकडील दर विचारात न घेता, बाजारभावाप्रमाणे दरपत्रके मागवून खरेदी करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात सदर साहित्य महाराष्ट्र राज्य लघु उदयोग महामंडळ यांचेकडे उपलब्ध आहे किंवा नाही याची खातरजमा न करता केवळ दरपत्रके मागविण्यात आलेली आहे. त्यामुळे शासन निर्णय, उदयोग,ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांसंस1088/(2512)/ उदयोग-6 दि.02/01/1992 च्या शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे.

2. सदर साहित्य खरेदी करण्यापूर्वी अंदाजपत्रक तयार करतांना, सदर वस्तुंचे दर पृथ:करण करुन अंदाजपत्रक तयार केले असून, सदर दर पृथ:करण करण्यापुष्टयर्थ साधार स्पष्टता झाली नाही.

3. सदर कामाच्या नस्तीवर मुख्य लेखापरिक्षक यांनी अंदाजपत्रकीय दर , दरसूचीप्रमाणे आहेत/बाजारभावाप्रमाणे आहेत या बाबत विभाग प्रमुखांनी स्वयंसष्ट अहवाल दयावा असे निर्देश दिले असतांना देखील तसा स्वयंस्पष्ट अहवाल न देता थेट दरपत्रकाव्दारे खरेदी केली असल्याने, खरेदी केलेल्या साहित्याचे दर वाजवी आहेत किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

4. सदर साहित्याची नोंद जडवस्तुसंग्रह नोंदवही क्र.16 मध्ये घेण्यात आल्याचे नमूद केले असून, त्यापुष्टयर्थ, जडवस्तुसंग्रह नोंदवही उपलब्ध करुन न दिल्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त परिमाणाचे लेखा परीक्षण करता आले नाही.

5. सदर साहित्याचा प्रत्यक्ष पुरवठा झाल्यापुष्टयर्थ डिलीव्हरी चलने, मालाची देयके उपलब्ध न झाल्यामुळे प्रत्यक्षात मालाची पुरवठा झाली किंवा नाही याची तपासणी करता आली नाही.

6. प्राप्त झालेले साहित्य सुस्थितीत ,योग्य दर्जाचे व मागणीनुसारच आहे किंवा कसे याचे प्रमाणपत्र तसेच त्रयस्थ संस्था तपासणी अहवाल आढळून आला नाही.

7. प्रमाणक उपलब्ध करुन न दिल्याने प्रत्यक्षात प्रदान करण्यात आलेल्या रकमांची सत्यता पडताळता आली नाही. सबब सदर रक्कम रुपये 78000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPSAAM7402 (Ref No : 76, Hmm No : 96)

## *76 महापालिकेच्या वाहनांकरीता लागणारे सुटे भाग खरेदी व दुरुस्ती कामांमधील खर्चातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :1 मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 7628000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7628000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4100.00/-

***महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 73 खंड(क) प्रकरण 5 मधील तरतुदी नुसार अपेक्षित खर्चाचा अंदाज तयार करुन एकत्रित रु.3000/- च्या वरील कामांच्या खर्चासाठी निविदा कार्यवाही करुन सुटे भाग व दुरुस्तीची कामे करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करणे, मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 34 व 63 नुसार विहीत रकमेच्या मुद्रांक पेपरवर प्रत्येक स्वतंत्र कामाबाबत विहीत रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असताना ते न केल्याने मुद्रांक शुल्कापोटी शासनाचे नुकसान झालेले आहे. वित्तीय अधिकार नियमपुस्तिका 1978 भाग पहिला उपविभाग दोन व शासन वित्त विभाग निर्णय क्र.विअप्र-10.8/प्र.क्र.70/2008/विनियम दिनांक 15 मे 2009 मधील वित्तीय शक्तींच्या नियम 69 मधील अधिकारांमध्ये असलेल्या अटीनुसार वाहनांची दुरुस्ती ही शासकीय अथवा महानगरपालिकेच्या कार्यशाळेत करणे आवश्यक आहे. मात्र ती कार्यशाळेत दुरुस्त न केल्याने त्यासाठी संबंधित यांत्रिक विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडून खर्च वाजवी असल्याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना ते घेण्यात आलेले नाही.***

वाहन विभागातील वित्तीय वर्ष 2014-15 चे देयक नोदवहीची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता दिसुन येत आहे.

1)महानगरपालिकेच्या वाहन विभागाकडून वाहन दुरुस्तीवर 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये एकूण 76.28 लाख इतका खर्च करण्यात आलेला आहे. सदर खर्च विचारात घेता, उपरोक्त कामांसाठी अपेक्षित खर्चाबाबतचा वार्षिक अंदाज तयार करुन त्यानुसार महानगरपालिका अधिनियम 1949 चा मुंबई अधिनियम क्र.59 मधील अनुसुची ड, प्रकरण-5 मधिल 2(1) मधील तरतुदीनुसार तसेच कलम 73 खंड (क) नुसार निविदा कार्यवाही करुन सुटे भाग व दुरुस्तीचे कामे करणे आवश्यक असताना ती करण्यात आलेली नाही. पर्यायाने वाहन विभागाच्या अशा एकाच प्रकारच्या कामांसाठी वर्षात झालेल्या एकत्रित रु.76.28 इतका खर्चासाठी महानगरपालिकेस निविदांद्वारे स्पर्धात्मक दरांचा लाभ झाला नाही.

2)उपरोक्त कामांसाठी मुंबई मुद्रांक शुल्क् अधिनियम 1958 मधील कलम 34 व 63 नुसार विहीत रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्य्क असतांना रक्कम रु.3000/- च्या वरील

प्रकरणामध्ये तथापि रक्कम रु.50000/- आतील वाहन दुरुस्ती च्या प्रकरणामध्ये करारनामे करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे उपरोक्त उपलब्ध करुन दिलेले 41 कामांचे आदेश व त्यानुसार केलेल्या कामांचे प्रदान विचारात घेता, मुद्रांक शुल्कापोटी शासनाचे रक्कम रु.4100/- चे नुकसान झालेले आहे. सबंधित पुरवठादार यांचेकडुन सदरची रक्कम वसुल करुन शासन जमा करावी. याशिवाय 2014-15 आर्थिक वर्षामध्ये अशा प्रकारच्या इतरही दिलेल्या कामांच्या करारनाम्यात मुद्रांक शुल्काचे नुकसान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3)महानगरपालिका अखत्यारितील वाहने वित्तीय अधिकार नियमपुस्तिका 1978 भाग पहिला,उपविभाग-दोन व शासन वित्त विभाग निर्णय क्र.विअप्र-10/ प्र.क्र.70/2008/ विनियम दि.15 मे 2009 मधील वित्तीय शक्तींचा नियम 69 मधील अधिकारांमध्ये असलेल्या अटीनुसार दुरुस्त करावयाची वाहने शासकीय अथवा महानगरपालिकेच्या कार्यशाळेत दुरुस्त करण्यात न आल्यास त्यासाठी संबंधित यांत्रिक विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडून खर्च वाजवी असल्याबद्दलचे प्रमाणित करुन घेणेची तरतूद आहे. असे असताना वर नमुद केल्याप्रमाणे एवढया मोठया प्रमाणावरील वाहन दुरुस्तीवर केलेल्या खर्चासाठी शासकीय कार्यशाळेतून अथवा शासनमान्य अधिकृत ठेकेदाराकडून वाहनांची दुरुस्ती न करता अथवा त्याबाबत संबंधित यांत्रिक विभागातील कार्यकारी अभियंता यांचे खर्चाचे वाजवी प्रमाणपत्र न घेता दुरुस्तीची कामे करुन घेऊन खर्च करण्यात आलेला आहे. तसेच याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 73 खंड (क) प्रकरण 5 मधील तरतूदीनुसार निविदा कार्यवाही न करता दरपत्रकाव्दारे सुटे भाग खरेदी तथा वाहन दुरुस्तीची कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्म्क दराचा झाला फायदा झाला नसल्याने 2014-15 या वर्षामध्ये “वाहन दुरुस्ती व सुटे भाग खरेदी” या शीर्षामधून केलेल्या खर्चाची रक्कम रु.76,28,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.103 दिनांक 29/09/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता विभागाने त्यांचे पत्र क्र.भिनिशमनपा/वाहन/314/18 दिनांक 29-10-2018 नुसार खुलासा सादर केलेला आहे. विभागाने सादर केलेला खुलासा सयुक्तीक नसल्यामुळे उपरोक्त आक्षेप कायम ठेवणेत येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 87, Hmm No : 103)

## *77 वाहन विभागातील वाहन क्र.एम.एच.04 एच 8898 दुरुस्ती मधील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 4**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

*लेखा शीर्ष : मनपा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 265000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 265000.00/-

***संबंधित यांत्रिक विभागातील कार्यकारी अभियंता यांचे खर्चाचे वाजवी प्रमाणपत्र न घेता वाहनाची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.***

वाहन विभागातीत वित्तीय वर्ष 2014-15 मधील वाहन दुरुस्तीबाबतची निविदा नस्ती तपासली असत त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | वाहन क्र.एम.एच.04 एच 8898 दुरुस्ती मधील अनियमितता |
| जाहिरात व प्रसिध्दी | दैनिक सागर ला दिनांक 17/01/2015 रोजी प्रसिध्द केली आहे. |
| प्रशासकिय मान्यता | मा.आयुक्त यांची दिनांक 12/01/2015 ची प्रशासकिय मान्यता आहे. |
| तांत्रिक मान्यता | वाहन व्यवस्थापक यांची 7/01/2015 ची मान्यता आहे. |
| लेखाशिर्ष | वाहन दुरुस्ती व सुटे भाग खरेदी |
| अर्थसंकल्पीय तरतुद व वर्ष | 50 लाख 2014-15 |
| पुरवठादाराचे नांव | श्री. मोटार गॅरेज भिवंडी |
| कार्यादेश क्र.व दिनांक | सहा.आयुक्त (प्रशासन ) यांचे जा.क्र.247 दिनांक 26-02-2015 |
| कामाचा कालावधी | 26-02-15 ते 25-03-15 |
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | 3438/दिनांक 23-03-2015 |
| खर्चाची रक्कम रुपये | 265000 |

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.122 दिनांक 09/10/2018 अन्वये खुलासा करण्यास कळविले असता याबाबत विभागाचे पत्र क्र.भिनिशमनपा/वाहन/314/18 दिनांक 29/10/2018 नुसार खुलासा सादर केलेला आहे. खुलासा समर्पक नसल्यामुळे खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय देणेत येत आहे.

1.निविदा काढण्यापुर्वी (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजारातुन दरपत्रक मागवून त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे वाजवी दराची खात्री करता आलेली नाही.

2. यांत्रिक विभागातील कार्यकारी अभियंता यांचे खर्चाचे वाजवी प्रमाणपत्र न घेता वाहनाची दुरुस्ती करण्यात आलेला आहे.

3.जाहिरात देतांना कामाचा तपशिल खर्चनिहाय देणे आवश्यक होता. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

4.उपप्रमाणकावर पेड अँड कॅन्सल लिहीलेले नाही. तसेच कार्यालय प्रमुखाने खर्च वाजवी व योग्य झालेला आहे असे प्रमाणपत्र उपप्रमाणकावर नोंदविलेले नाही.

FDSJRDM6801 (Ref No : 99, Hmm No : 122)

## *78 अ)शालेय जिल्हास्तरिय क्रिडा स्पर्धा 2014-15 करीता स्पर्धेच्या ठिकाणी मंडप, स्टेज, टेबल खुर्च्या पुरविणे बाबत अनियमितता ब) राज्यस्थरीय बुध्दीबळ स्पर्धा सन 2014-15 करिता टेबल खुर्च्या, साऊंड सिस्टीम गादी सेट व पिण्याचे पाणी पुरविणे बाबत अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : क्रिडा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 355785.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 355785.00/-

***महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 73 खंड(क) प्रकरण 5 मधील तरतुदीनुसार निविदा प्रक्रीया राबविली नाही. निविदा काढण्यापुर्वी (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजारातुन दरपत्रक मागवून त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे वाजवी दराची खात्री करता आलेली नाही.***

अ) क्रिडा विभागातील शालेय जिल्हास्त्रिय क्रिडा स्पर्धा 2014-15 करीता स्पर्धेच्या ठिकाणी मंडप, स्टेज, टेबल खुर्च्या पुरविणे बाबतची नस्ती तपासली असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | शालेय जिल्हास्तरिय क्रिडा स्पर्धा 2013-14 करीता स्पर्धेच्या ठिकाणी मंडप, स्टेज,टेबल खुर्च्या पुरविणे बाबत |

| | |
|---|---|
| जाहिरात व प्रसिध्दी | दि.26/08/2014 रोजी मनपा संकेतस्थळावर कोटेशन नोटीस प्रसिध्दी केली. |
| लेखाशिर्ष | क्रिडा |
| अर्थसंकल्पीय तरतूद व वर्ष | वीस लाख- 2014-15 |
| प्रशासकीय मान्यता | उप आयुक्त क्रिडा यांची दि.19/03/15 ची मान्यता |
| पुरवठादाराचे नाव | माधवी मुरलीधर मुंढे |
| कार्यादेश क्र.व दिनांक | सहा.आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग) यांचे जा.क्र.71 दि.10/04/2014 |
| कामाचा कालावधी | 01/09/2014 ते 31/12/2014 |
| खर्चाचा तपशिल प्रमाणक क्र. दिनांक व रक्कम | प्रमाणक क्र.3056 दि.08/12/15 रक्कम रु.199755 |

ब) क्रिडा विभागातील शालेय जिल्हास्तरिय क्रिडा स्पर्धा 2014-15 करीता स्पर्धेच्या ठिकाणी मंडप, स्टेज, टेबल खुर्च्या पुरविणे बाबतची नस्ती तपासली असता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | राज्यस्थरीय बुध्दीबळ स्पर्धा सन 2014-15 करिता टेबल खुर्च्या,साऊंड सिस्टीम गादी सेट व पिण्याचे पाणी पुरविणे बाबत. |
| लेखाशिर्ष | क्रिडा |
| अर्थसंकल्पीय तरतूद व वर्ष | 2015-16 विस लाख |
| प्रशासकीय मान्यता | मा.आयुक्त यांची दिनांक 26/09/2013 ची प्रशासकिय मान्यता आहे. |
| पुरवठादाराचे नाव | माधवी मुरलीधर मुंढे |
| कार्यादेश क्र.व दिनांक | क्रिडा अधिकारी यांचे कार्यादेश क्र.76/2013 दिनांक 08/10/2013 |
| कामाचा कालावधी | दिनांक 09/10/2013 ते 11/10/2013 तीन दिवस |
| खर्चाचा तपशिल प्रमाणक क्र. दिनांक व रक्कम | 3057/दिनांक 08/12/2015 रक्कम रु.156030 |

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.119 दिनांक 08/10/2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

1. महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 73 खंड (क) प्रकरण 5 मधील तरतुदीनुसार निविदा प्रक्रीया राबविली नाही. करुन मंडप भाडयाने घेणे या कामावर सन 2014-15 या आर्थिक वर्षात रक्कम रु.355785 झालेला आहे. दरपत्रके मागवुन वेगवेगळे कार्यादेश देऊन कामाचे तुकडीकरण करुन खर्च करण्यांत आलेला आहे. नियमाचे उल्लघन झालेले आहे.

2. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मतंसं/नस्ती-2012/प्र.क्र.273/39 दिनांक 16/01/2013 नुसार 3 लाखावरील खरेदीसाठी ई निवीदा काढलेली नाही.

3. निविदा काढण्यापुर्वी (अपसेट प्राईज) बाजार मुल्य काढलेले नाही. बाजारातुन दरपत्रक मागवून त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. तसे न केल्यामुळे वाजवी दराची खात्री करता आलेली नाही.

4. मंडप कॉन्ट्रक्टर यांच्या उपप्रमाणक क्रमांक 174 दिनांक नमुद नाही. तसेच पेड अँन्ड कॅन्सल उपप्रमाणकावर लिहीलेले नाही. तसेच खर्च योग्य व वाजवी असून ज्या कामासाठी खर्च झालेला आहे ते बरोबर आहे. असे प्रमाणपत्र उपप्रमाणकावर नमुद केलेले नाही. त्यामुळे रक्कम रु. रु.355785 आक्षेपीत ठेवण्यात येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 88, Hmm No : 119)

## *79 क्रिडा विभागाकडून संबंधितांना विविध कारणांसाठी देण्यात आलेल्या अग्रीमांचे समायोजन प्रलंबित असल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष : क्रिडा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 65550.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 65550.00/-

***श्री.सुरेंद्र खिसमतराव, क्रिडा अधिकारी यांचे नावे प्रमाणक 2125 दि.5/11/2014 अन्वये रु.37556 प्रमाणक क्र.1574 दि.17/09/2014 अन्वये रक्कम रु.27000 प्रमाणक क्र.1406 दि.23.08.2013 अन्वये रु.65000 व प्रमाणक क्र.1259 दि.31.07.2013 अन्वये एकूण रु.64550 अग्रीमाचे लेखापरीक्षण कालावधीपर्यंत समायोजन करण्यात आलेले नाही. तसेच मुंबई वित्तिय नियम 1959 नियम 142 नुसार अग्रीमाचे समायोजन अथवा वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.***

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत क्रिडा विभागाकडून 2014-15 या वित्तीय वर्षाकरीता खाली नमूद केल्यानुसार विविध कारणांसाठी संबंधित खात्याच्या खाते प्रमुखांचे नावे नमुना नं.22 अन्वये रकमा आहरीत करुन त्या अग्रीम स्वरुपात अदा करण्यात आलेल्या आहेत. सदर अग्रीम रकमांचे अनुषंगाने नमुना नं. 22 अन्वये प्रदान केलेल्या देयकांची तपासणी केली आहे.

1.प्रमाणक क्र.1574 दि.17/09/2014 अन्वये रक्कम रु.27000 इतके अग्रीम नमुना नं.22 मध्ये देयक तयार करुन महानगरपालिका क्रिडा स्पर्धा 2013-14 पंचाचे मानधन अदा करणे बाबत श्री.सुरेंद्र खिसमतरास, क्रिडा अधिकारी यांचे नावे अदा करण्यात आल्याची नोंद सदर देयकावर घेण्यात आली आहे. मात्र सदर अग्रीमाव्दारे प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची प्रमाणके सादर करुन त्याचे समायोजन लेखापरीक्षण कालावधीपावेतो करण्यात

आलेले नाही.

2.प्रमाणक क्रमांक 2125 दि.5/11/2015 अन्वये रु.37550 इतके अग्रीम नमुना क्र. 22 मध्ये देयक तयार करुन 2014-15 या वर्षाकरीता पंपाचे मानधन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, कुस्तीमॅट, टेम्पो भाडे, मजुर भाडे अदा करणे करिता श्री.सुरेंद्र खिसमतराव, क्रिडा अधिकारी यांचे नावे अग्रीम स्वरुपात करण्यात आलेले आहे. सदरचे प्रदानासाठी नमुना नं.22 वर तयार केलेल्या अग्रीम देयकावर तत्कालीन संबंधीत मुख्य लेखापरीक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच उप आयुक्त यांच्या अग्रीम देयक मंजूरीबाबतच्या स्वाक्षरी नाहीत व सदर खर्चाचे समायोजन आवश्यक आहे. तसेच वरील सर्व प्रकारच्या अग्रीम देयकांवर लेखाशीर्ष नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष खर्च कोणत्या वर्षाच्या तरतूदीमधून व कोणत्या शीर्षामधून करण्यात आलेला आहे.

3. मुंबई वित्तिय नियम नुसार 142 नियम 1959संबंधित अग्रीम धारकाकडून पहिल्या अग्रीमाचे समायोजन झाल्याशिवाय दुसरे अग्रीम देऊ नये तसेच देण्यात आलेले अग्रीमाचे विशिष्ट वित्तीय वर्षामध्ये समायोजन करणे आवश्यक आहे. असे असतांना एकाच वित्तीय वर्षामध्ये वरील नमूद एकाच कर्मचा-यास त्याच्याकडे पहिल्या अग्रीमाचे समायोजन प्रलंबित असताना वेगवेगळया कारणास्तव अनेक वेळा अग्रीम स्वरुपात रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत. प्रलंबित अग्रीमाचे समायोजन झाले नसल्यास करावयाच्या वसुलीबाबत सदर नियमावलीमध्ये कार्यपध्दती ठरवून देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधितांकडून वरील प्रलंबित अग्रीमांचे समायोजन झाले नसल्यास अग्रीम वसुलीबाबत विभागाचे स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे. याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास तपासणीसाठी उपलब्ध करण्यात आलेली नाही. त्यामुळे वरील अ.क्र. 1 ते 2 येथील अग्रीम देयकांव्दारे केलेला एकूण खर्च रक्कम रु.64550 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-15 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.102 दिनांक 29/09/2018 नुसार खुलासा करण्यास कळविलेले असता याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम करण्यात येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 96, Hmm No : 102)

## *80 श्री.रविंद्र बुधाजी थोरात,सफाई कामगार यांचे वेतन निश्चितीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***चौथ्या वेतन आयोगात सफाई कर्मचाऱ्याची वेतन निश्चित करताना वेतनामध्ये दि.1/1/1973 रोजीचे महागाई वेतन रु.112/- मुळ वेतनामध्ये अधिक (+) केले त्यामुळे वेतन निश्चिती चुकीची झाली परिणामी संबंधित कर्मचाऱ्यास जादा वेतन अदा केल्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झाले. सदर जादा दिलेले महागाई वेतनामुळे संबंधितांच्या वेतन निश्चितीमध्ये त्रुटी निदर्शनास आल्या असुन सदर कर्मचाऱ्यांस झालेल्या अतिप्रदानाची रक्कमेची वसुली करणे आवश्यक आहे.***

सामान्य प्रशासन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या सेवापुस्तकामधील श्री.रविंद्र बुधाजी थोरात, सफाई कर्मचारी यांचे सेवा पुस्तक तपासले त्यांची नियुक्ती दि.1/1/1991 रोजी सफाई कामगार या पदावर 60-5-100-8-180 या वेतनश्रेणीमध्ये झाली आहे. सदर वेतनश्रेणीमध्ये सुधारणा होऊन 100-8-140-10-200-15-275-20-375 मध्ये त्यांची वेतन निश्चिती करण्यात आली. चौथ्या वेतन आयोगामध्ये सदरचे वेतनश्रेणीत सुधारणा होऊन रु.750-12-870-दरो-14-940 मध्ये संबंधित कर्मचाऱ्याचे वेतन निश्चित करण्यात आले. सदर वेतन निश्चितीबाबत निदर्शनास आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास क्र.147 दि.23/10/2018 रोजी देण्यात आले तथापि लेखापरीक्षण कालावधीपर्यंत सदर अर्धसमासाचे अनुपालन प्राप्त झाले नाही. त्यामुळे लेखापरीक्षण पथक आपले अभिप्राय खालीलप्रमाणे नोंदवित येत आहे.

1) श्री.रविंद्र बुधाजी थोरात, सफाई कर्मचारी यांची नियुक्ती दि.1/1/1991 रोजी झाली असताना त्यांच्या चौथ्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती करताना सदर वेतनामध्ये दि.1/1/1973 रोजीचे महागाई वेतन रु.112/- हे कोणत्या प्राधिकारान्वये तथा आदेशान्वये मुळ वेतनामध्ये अधिक (+) केले याबाबतचे संदर्भ उपलब्ध करुन दिले नाही त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याची वेतन निश्चिती चुकीची करण्यात आली आहे.

2) अ.क्र.1 मध्ये नमुद केल्याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्याच्या वेतननिश्चिती दरम्यान वेतनामध्ये दि.1/1/1973 रोजीचे महागाई वेतन रु.112/- अधिक (+) केल्यामुळे त्यांचे सेवापुस्तकामध्ये दि.1/1/1997 रोजी दर्शविण्यात आलेले वेतन रु.822/- एवढे चुकिचे निश्चित झाले आहे यासंदर्भामध्ये विभागास अर्धसमासन्वये विचारणा करण्यात आली होती तथापि याबाबत विभागाने कोणताही संयुक्तिक खुलासा केला नाही त्यामुळे सदर कर्मचाऱ्याचे चौथ्या वेतन आयोगामधील वेतनश्रेणी रु.750-12-870-दरो-14-940 मधील किमान टप्प्यावर वेतन निश्चित करण्याऐवजी रु.822/- एवढया वेतनावर केल्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यास जादा प्रदान झाले असुन सदर अतिप्रदानाची वसुली भूतलक्षी प्रभावाने करण्यात यावी.

3) सेवापुस्तकामध्ये चौथ्या वेतन श्रेणीमधील दक्षता रोध टप्प्याची नोंद सेवा पुस्तकामध्ये नोंदविणे आवश्यक आहे तथापि दक्षता रोध टप्पा पार केल्याबाबतीची नोंद सेवापुस्तकामध्ये आढळून आली नाही ही बाब योग्य नाही.

DPSMAWM7701 (Ref No : 111, Hmm No : 147)

***81 शहरविकास विभागातील अर्थसंकल्पामध्ये दर्शविण्यात आलेल्या खर्चाच्या रक्कमेतील त्रुटीबाबत तसेच निष्कासन कारवाई दरम्यान घेण्यात आलेल्या पोलीस संरक्षणावर करण्यात***

***आलेला खर्चाची पूर्तता न करणेबाबत व लेखापरीक्षण कालावधीमध्ये आवश्यक अभिलेख उपलब्ध करुन न देणेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष : अनधिकृत बांधकामावरील महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 820138.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 820138.00/-

***शहरविकास विभागाकडून पोलिस संरक्षण या लेखाशीर्षाखाली करण्यात आलेल्या खर्चाची पूर्तता पोलीस विभागास करण्यात आली नाही. तसेचे अर्थसंकल्पामध्ये दर्शविणेत आलेला प्रत्यक्ष खर्च व लेजर लेख्यांमध्ये दर्शविणेत आलेल्या खर्चामध्ये तफावत निदर्शनास आली. शहरविकास विभागाने लेखापरीक्षण दरम्यान संबंधित विभागाने आवश्यक अभिलेख उपलब्ध करुन दिले नाही.***

शहरविकास विभागाकडून पोलिस संरक्षण या लेखाशीर्षाखाली करण्यात आलेल्या खर्चाची पूर्तता पोलीस विभागास करण्यात आली नाही. संबंधित विभागाचा अर्थसंकल्पामध्ये दर्शविणेत आलेला प्रत्यक्ष खर्च व लेजर लेख्यांमध्ये दर्शविणेत आलेल्या खर्चामध्ये तफावत निदर्शनास आली आहे. तसेच लेखापरीक्षण दरम्यान संबंधित विभागाने आवश्यक अभिलेख उपलब्ध करुन न दिल्यामुळे शहरविकास विभागास परीच्छेद क्र.30, 31 व 32 दि. 05/07/2018 रोजी देण्यात आले तथापि अद्यापर्यंत सदर परीच्छेदांचे अनुपालन प्राप्त झाले नाही याबाबत लेखापरीक्षण पथक आपले अभिप्राय खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

1. शहरविकास विभागाने माहे नोव्हेंबर-2014 व जानेवारी-2015 रोजी अनधिकृत बांधकाम निष्कासित करताना पोलिस संरक्षण घेतले सदर सवेसाठी पोलीस विभागाने दिनांक 15/11/2014 प्रमाणक क्रमांक ACT/14-15/2353 रक्कम रुपये 14615/- व दिनांक 9/1/2015 प्रमाणक क्रमांक ACT/14-15/3203 रक्कम रुपये 14913/- या बाबतचे देयक विभागास दिले तथापि शहरविकास विभागाने संबंधित पोलिस स्टेशन यांना एकूण रु.29528/- एवढी रक्कम अदा केली नाही त्यामुळे शासनास सदरची रक्कम जमा झाली नाही ही बाब योग्य नाही.

2. आर्थिक वर्ष सन 2014-15 व सुधारीत 2015-16 अर्थसंकल्पीय पुस्तकामध्ये अतिक्रमण तोडफोड उपकरणे खरेदी व इतर खर्च लेखाशीर्षाखाली रक्कम रु. 17,28,000 एवढा खर्च दर्शविण्यात आला आहे. तथापि लेजरमधील डिमॉलीशन लेखाशिर्षांतर्गत एकुण खर्च रक्कम रु.8,99,382/- एवढी रक्कम दिसून येते आहे. त्यामुळ एकूण खर्च रक्कमेपैकी रु.828618/- एवढया रक्कमेने कमी दिसत आहे. खर्चाची रक्कम लेजर खात्यात कमी दर्शविल्या बाबत विभागाने तपशील सादर केला नाही त्यामुळे अर्थसंकल्पामध्ये दर्शविण्यात आलेला खर्च व प्रत्यक्ष केलेला खर्च याबाबतची खात्री करता आली नाही. वास्तविक प्रत्यक्ष करण्यात आलेल्या

खर्चाच्या नोंदी अर्थसंकल्पामध्ये करणे आवश्यक आहे तथापि विभागाने तसे केले नाही.

3. अनधिकृत बांधकामे निष्कासीत करण्यासाठी दिनांक 04/09/2014 रोजी कंत्रांटदार एम.बी.राज यांची रक्कम रुपये 29018/-150008/- व दि. 01/10/2014 रोजी कंत्रांटदार श्री.गणेशकृपा यांची रुपये 611584/- चे प्रदानासंबंधातील धारीका व रकमांचा तपशिल व त्यासंबंधितील सर्व आवश्यक धारिका (निविदा ॲग्रीमेंट धारीकेसह) प्रदानासंबंधातील धारीका शहरविकास विभागाने उपलब्ध करुन न दिल्यामुळे सदरची रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

4. सन 2014-15 मध्ये अनधिकृत बांधकामे निष्कासनावर झालेला खर्च व संबंधित बांधकाम केलेल्या इसमाकडून वसूल करण्यात आलेल्या रकमेचा तपशिल आवश्यक त्या अभिलेख्यासह विभागाने उपलब्ध करुन न दिल्यामुळे याबाबत अभिप्राय नोंदविता आले नाही.

5. शहरविकास विभागाने भू-लेखापरिक्षण (Land Audit) करण्याची यंत्रणा उच्चस्थरिय समिती गठीत केल्याचा समितीचा तपशिल व त्यांनी केलेल्या भू-लेखा परिक्षणाचा अहवाल उपलब्ध करुन दिला नाही त्यामुळे याबाबत भाष्य करता आले नाही.

6. शहरविकास विभागाने सन 2014-15 या कालावधीतील निष्कासित बांधकामे फी वसूली प्रलंबित रकमेची माहीती./आकडेवारी विवरणपत्र. व महानगरपालिका अधिनियम कलम 267-अ नुसार अनधिकृत बांधकाम अस्तित्वात असे पर्यंत त्यावर शास्तीसह मालमत्ता कराची आकारणी केल्याबाबतचा तपशील आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर केले नाही त्यामुळे याबाबत भाष्य करता आले नाही.

7. विभागाने सरकारी जागा, वन विभागाची जागा, मनपा आरक्षित जागा व सार्वजनिक जागेत आढळून आलेली अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणे व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची तपशिलावार माहिती आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर केली नाही त्यामुळे याबाबत भाष्य करता आले नाही.

8. अतिक्रमण कारवाई अंतर्गत वसूल करण्यात आलेला दंड तसेच इतर महसूली जमेची लेखा परिक्षण कालावधीतील चलनांच्या प्रती उपलब्ध करुन न दिल्यामुळे याबाबत भाष्य करता आले नाही.

DPSMAWM7701 (Ref No : 121, Hmm No : 30)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

-------------------- निरंक -------------------

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *82 महानगरपालिका मंडई ते वीर तानाजी चोक या रस्त्यावर स्ट्रीट लाईट ,पोल फिटींग व्यवस्था करणे व खराब झालेले पोल काढणे, पोल फिटींग, केबल बदली करणेकामातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 04**

*लेखा शीर्ष : विदयुत महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 325998.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 50992.00/-

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 अनुसूची – ड चे नियम 2(1) नुसार सदर काम निविदा मागवून करणे आवश्यक असतांना नियमबाह्यपणे निविदा न मागविता करण्यात आले आहे. माल/साहित्य पुरवठा केल्याची पावती व चलण जोडलेले नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म.2 दि.22/03/2005 नुसार ठेकेदाराने कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्याची चाचणी शासकीय संस्थाकडून करून घेतलेली नाही. काम पूर्ण करतांना मूळ पूर्वगणक पत्रकापेक्षा जादा बाबी केल्या आहेत. त्यास सक्षम अधिकार्याची परवानगी घेतलेली नाही. रक्कम रुपये 50992/- वसूलपात्र आहे.***

महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या विदयुत विभागाने महानगरपालिका मंडई ते वीर तानाजी चौक हा रस्ता गणपती उत्सवातील महत्वाचा मार्ग असल्याने सदर रस्त्यावरील स्ट्रीट लाईट,पोल फिटींग व्यवस्था करणे व खराब झालेले पोल, फिटींग,केबल बदली करणे इ. कामासाठी सन 2009-2010 च्या सी.एस.आर. दरानुसार अंदाजपत्रक तयार केले असुन रक्कम रु.325928/- च्या खर्चास मा. उपआयुक्त यांनी दि. 27/08/2010 रोजी मान्यता दिली आहे.

लेखाशीर्ष – रस्त्यावरील दिवाबत्ती

वार्षिक तरतूद रु. – 3 कोटी

कामासाठी तरतूद – 325928/-

तांत्रिक मान्यता – कार्यकारी अभियंता,विदयुत विभाग

ठेकेदार- हायटेक कन्स्ट्रक्शन ग्रुप, नवी मुंबई.

कामाचे आदेश - विदयुत विभाग दि.15/09/2010

कामाची मुदत - 120 दिवस

प्रमाणक क्र. दिनांक व रक्कम – 1517, 28/07/2014, रुपये 300083/-

विदयुत विभागाने महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी खराब झालेले विदयुत पोल बदलणे, जुने फिटींग

व दिवे बदलणे ,जुनी केबल बदलणे, हायमास्ट दिवांची व्यवस्था करणे, नवीन विदयुत पोल टाकणे ई. कामे करणेसाठी जिल्हा दरसूचीनुसार अंदाजपत्रके तयार करून महानगरपालिकेच्या रस्त्यावरील दिवाबत्तीच्या त्रिवार्षिक निगा व देखभाल करणेसाठी प्रभाग समिती निहाय नियुक्त ठेकेदाराकडून कामे करून घेतली आहे. सदरचे काम प्रभाग समिती क्र. 5 मध्ये येत असल्याने नियुक्त ठेकेदार हायटेक कन्स्ट्रक्शन ग्रुप, यांना काम देण्यात आले. कामाची नस्ती व प्रमाणक यांची तपासणी करून अर्धसमास पत्र क्र. 7 दि. 15/05/2018 रोजी निर्गमित केले असता विभागाचे उत्तर प्राप्त झाले नाही.

1.विभागाने उपरोक्त काम प्रभाग क्र. 5 मधील ठेकेदार हायटेक कन्स्ट्रक्शन ग्रुप यांच्यासोबत रस्त्यावरील दिवाबत्तीच्या निगा व दुरुस्तीच्या कामासाठी केलेल्या त्रिवार्षिक करारनाम्यातील शर्त क्र.27 नुसार निविदा न मागविता करून घेतली आहे.सदर करारनाम्यातील शर्त क्र.27 मध्ये निगा व दुरुस्तीच्या कामाव्यतिरिक्त प्रभागात नव्याने पोल फिटींग ई. विदयुत कामे करावयाची असल्यास अंदाजपत्रक दराने करारनामा करून कार्यादेश देवून सदर काम त्यांचेकडून करून घेता येतील असे नमूद आहे. काम तातडीने करण्याची असल्याने सदर ठेकेदाराला अंदाजपत्रकीय दराने कार्यादेश देवून काम करण्यात आले आहे.परंतु महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5 अनुसूची – ड चे नियम 2(1) नुसार सदर काम निविदा मागवून करणे आवश्यक असतांना नियमबाह्यपणे निविदा न मागविता करण्यात आले आहे.

2.सदर कामाच्या नस्ती मध्ये माल/साहित्य पुरवठा केल्याची पावती व चलण जोडलेले नाही. त्यामुळे माल/साहित्य किती व कुठून खरेदी केले याची खातरजमा करता येत नाही.

3 शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर-34/सा-4/5999 दि.8.1.2007 नुसार बांधकाम साहित्य वापरण्यापुर्वी अशा साहित्याचे प्रयोगशाळा चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. परंतु असे अहवाल नस्ती सोबत नाहीत. त्यामुळे वापरण्यात आलेले साहित्य योग्य गुणवत्तेचे वापरण्यात आल्याची व त्यानुसार प्रदान केल्याची लेखापरीक्षणामध्ये खात्री करता आली नाही.

4. काम पूर्ण करतांना मूळ पूर्वगणकपत्रकापेक्षा जादा बाबी केल्या आहेत. जादा बाबी करणे पूर्वी विभागातील सक्षम अधिकारी यांचे कडून लेखी परवानगी घेऊन काम करणे आवश्यक आहे. परंतु विभागातील सक्षम अधिकारी यांची परवानगी न घेता कामामध्ये वाढ केली आहे.

खालील बाबीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | तपशिल | निविदेतील संख्या | निविदा दर | रक्कम रु. | एकूण वापर संख्या | रक्कम रु. | जादा वापर संख्या | जादा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | c. c founde-tion | 8 | 1904 | 15232 | 11 | 20944 | 3 | 5712 |
| 2 | Earthing | 8 | 742 | 5936 | 11 | 8162 | 3 | 2226 |
| 3 | 8.5 meter pole | 8 | 8831 | 70648 | 10 | 88310 | 2 | 17662 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3.50*25sqmm cable | 100 | 196 | 19600 | 172 | 33712 | 72 | 14112 |
| 5 | Hpsvfiting 250 w | 8 | 3186 | 25488 | 11 | 3186 | 3 | 9558 |
| 6 | Hpsv lamp 250 w | 8 | 574 | 4592 | 11 | 6314 | 3 | 1722 |
| एकूण जादा रक्कम रुपये -50992/- | | | | | | | | |

आक्षेपाधीन रक्कम रु. 325998/- एकूण वसूलपात्र रक्कम रु.50992/-

DATPKCM7101 (Ref No : 1, Hmm No : 07)

## *83 महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी हायमास्ट बसविणेच्या कामातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 05**

*लेखा शीर्ष : विदयुत आमदार व खासदार निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1198974.00/-

***महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची- ड चे नियम 1(2) नुसार ठेकेदाराबरोबर करारनामा करतांना महापालिकेतील 2 स्थायी समिती सदस्यांची करारावर स्वाक्षरी घेतलेली नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.2004/प्र.क्र.109/रा.म. 2 दि. 22/03/2005 नुसार ठेकेदाराने कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्याची चाचणी शासकीय संस्थाकडून करून घेतलेली नाही. कामासाठी माल/साहित्य पुरवठा केल्याची पावती व चलन जोडलेले नाही. त्यामुळे माल/साहित्य कुठे व कधी खरेदी केले याची खातरजमा करता आली नाही.***

अ) महानगरपालिका हद्दीतील गणेश मंदीर न्हावीपाडा येथे हायमास्ट बसविणे.

महानगरपालिका हद्दीतील गणेश मंदीर न्हावीपाडा येथील गणपती मंदीर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना व स्थानिक जनतेला रात्री अंधुक प्रकाशामुळे व्यवस्थित दिसत नसल्याने तेथे हायमास्ट बसविणेसाठी मा. आमदारांनी, आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम 2013-2014 च्या निधीतून मा. जिल्हाधिकारी यांना शिफारस केली असून मा .जिल्हाधिकारी यांनी दि.13/08/2013 रोजी रु.599000/- च्या उपरोक्त कामास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

लेखाशीर्ष - मा.आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम

प्रशासकीय मान्यता - मा.जिल्हाधिकारी दि. 13/08/2013

तांत्रिक मान्यता - कार्यकारी अभियंता (विदयुत) पत्र क्र. 20 दि.12/07/2013

कामासाठी अंदाजित खर्च रु.- 599000/-

निविदा प्रसिद्धी वर्तमानपत्र - दै. वृतमानस

ठेकेदार - मे.एस.एन. इलेक्ट्रिकल्स व इंजिनिअरिंग, भिवंडी

कामाचे आदेश- इले.जावक क्र.786 दि.24/01/2014

कामाचा कालावधी- 2 महिने

प्रमाणक क्र. दिनांक व रु. - 4414, 02/02/2015 रु. 540982/-

ब) वार्ड क्र. 7 अ येथील पटेल नगर बदर मस्जिद जवळ हायमास्ट पोल बसविणे

खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत महानगरपालिका हद्दीती ल प्रभाग समिती -1 अंतर्गत वार्ड क्र. 7 अ येथील पटेल नगर बदर मस्जिद जवळ हायमास्ट पोल बसविणे करीता जिल्हाधिकारी यांचेकडुन पत्र प्राप्त झाले असून तांत्रिक मान्यतेसह महापालिकेकडून रु .599974/- चा प्रस्ताव सादर केला असता जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यतेसह आर्थिक मंजुरी मिळाली आहे.

लेखाशीर्ष - खासदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम

प्रशासकीय मान्यता - जिल्हाधिकारी, ठाणे दि.12/08/2013

तांत्रिक मान्यता - कार्यकारी अभियंता (विदयुत)दि.07/06/2013

कामासाठी खर्च रु.- 599974/-

निविदा प्रसिद्धी वर्तमानपत्र - दै. वृतमानस

ठेकेदार - मे.एस.एन. इलेक्ट्रिकल्स व इंजिनिअरिंग, भिवंडी

कामाचे आदेश- इले.जावक दि.23/01/2014

कामाचा कालावधी- 2 महिने

प्रमाणक क्र. दिनांक व रु. - 3691, 11/12/2014 रु. 531804

सदर कामाची निविदा नस्ती व प्रमाणक यांची तपासणी करून अर्धसमास पत्र . क्र. 9 दिनांक 15/05/2018 रोजी निर्गमित केले असता विभागाचे उत्तर प्राप्त झाले नाही.

याबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. गणेश मंदीर न्हावीपाडा तसेच वार्ड क्र . 7 अ येथील पटेल नगर बदर मस्जिद जवळ हायमास्ट पोल बसविणेपूर्वी अस्तित्वात असलेले सदर जागेवरील स्ट्रीट लाईट पोल खरा ब व जीर्ण झालेले व नादुरुस्त असल्याचे फोटो नस्ती सोबत जोडलेले नाहीत . त्यामुळे काम सुरु करणेपूर्वीचा व काम पूर्ण झाल्याचा स्थळाचा वास्तववादी पुरावा विभागाकडे नाही.
2.सदर कामासाठी 3 निविदा आल्या असून दि .30/10/2013 रोजी उघडल्या आहे. 4 अधिकारी व 3 ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे असे सदर पत्रकावरील नमूद नावावरून दिसून येते . परंतु फक्त कार्यकारी अभियंता (विदयुत), व वित्त व लेखा अधिकारी हे उपस्थित असल्याचे त्यांच्या स्वाक्षरी वरु न दिसून येते. इतर 2 अधिकारी व 3 ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या अनुपस्थित निविदा उघडल्या असून सदर पत्रावर उप आयुक्त यांनी स्वाक्षरी केली आहे. दि. 28/11/2013 रोजी मा.आयुक्तांनी निविदा उघडण्यापूर्वी सर्वांना कळविणे योग्य झाले असते असा शेरा नस्तीमध्ये नमूद आहे . निविदा उघडण्यापूर्वी सर्व निविदा समितीतील सद स्यांना तसेच ठेकेदार किंवा त्यांच्या प्रतिनिधीनां कळविणे आवश्यक आहे . निविदा समितीतील सदस्य अनुपस्थित का होते याचे कोणतेही पत्र नस्तीसोबत नसल्याने निविदा उघडतांना अनियमितता झालेली आहे.
3.उपरोक्त निविदाधारंका बरोबर केलेल्या करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांची स्वाक्षरी,नाव व दिनांक नमूद नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण 5 अनुसूची- ड चे नियम 1(2) नुसार ठेकेदारा बरोबर करारनामा करतांना महापालिकेतील 2 स्थायी समिती सदस्यांची करारावर स्वाक्षरी होणे आवश्यक आहे . फक्त नगरसचिव यांची स्वाक्षरी झालेली आहे तसे च महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे दिसून येत नाही.
4.महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र .2004/प्र.क्र.109/रा.म. 2 दि. 22/03/2005 नुसार ठेकेदाराने कामावर वापरण्यात येणाऱ्या साहि त्याची चाचणी शासकीय संस्थाकडून करून घेणे आवश्यक आहे .परंतु नस्ती सोबत साहित्य चाचणी अहवालाची प्रत जोडलेली नसल्याने कामासाठी वापरण्यात आलेले साहित्य योग्य होते याची खातरजमा करता आली नाही.
5.सदर कामाच्या नस्ती मध्ये कामासाठी माल /साहित्य पुरवठा केल्याची पावती व चलण जोडलेले नाही. त्यामुळे माल/साहित्य कुठे व कधी खरेदी केले याची खातरजमा करता आली नाही.
आक्षेपाधीन रक्कम रु.1198974/-

DATPKCM7101 (Ref No : 3, Hmm No : 09)

***84 महानगरपालिकेच्या क्षेत्रातील महानगरपालिकेच्या पथदिव्यांची त्रैवार्षिक निगा व दुरुस्ती सर्व साहित्य, यंत्रसामुग्री व मनुष्यबळासह करणेबाबत अभिलेख सादर करण्याबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : विद्युत महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

***महानगरपालिकेच्या क्षेत्रातील महानगरपालिकेच्या पथ दिव्यांची त्रैवार्षिक निगा व दुरुस्ती सर्व साहित्य, यंत्रसामुग्री व मनुष्यबळासह करणेबाबत अभिलेख सादर करण्यात आले नाहीत.***

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील महानगरपालिकेच्या पथ दिव्यांची त्रैवार्षिक निगा व दुरुस्ती सर्व साहित्य, यंत्रसामुग्री व मनुष्यबळासह करणेकरीता (कालावधी 2011-2012 ते 2013-2014) प्रभाग निहाय निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांचा कालावधी दि.17/10/2011 ते 25/10/2011 असा होता. सदर कालावधीमधील पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने फेर निविदा मागविण्यात आल्या. फेरनिविदांचा कालावधी दि.04/11/2011 ते दि.15/11/2011 असा होता. निविदा कार्यवाही पूर्ण होऊन निविदे अंर्तगत पात्र ठरलेल्या निविंदाकारांच्या निवि दांना स्थायी समिती ठराव क्र.22 दिनांक 03/01/2012 नुसार मान्यता देण्यात आली. सदर देखभाल व सेवा कराराचा कंत्राट कालावधी दिनांक 12/03/2012 ते दिनांक 11/03/2015 असा होता. कंत्राट, निविदा व कराराच्या अनुषंगाने विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार खालील माहि ती लेखापरीक्षणास सादर करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 04 दि. 23/04/2018 अन्वये विभागास माहिती व खुलासा करण्यास कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत माहीती व खुलासा सादर करण्यात आली नाही . त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) अट क्र.4 बंद दिव्यांची नियमित पाहाणीसाठी नेमण्यात आलेल्या कर्मचा -यांने लिहीलेला लेखापरीक्षण कालावधीमधील अहवाल (कालावधी दि.01/04/2014 ते दि.31/03/2015)

2) अट क्र.5 नुसार महापालिकेच्या कार्यालयात येणा -या तक्रारी स्विकारण्याकरीता कंत्राटदाराने प्रभाग कार्यालये तसेच महापालिका मुख्यालयात नेमण्यात आलेल्या कर्मचा -यांचा हजेरीपट व इतर उपस्थिती अभिलेख (कालावधी दि.01/04/2014 ते दि.31/03/2015)

3) अट क्र.6 नुसार रात्री पाहाणी केल्यानंतर चालू /बंद दिव्यांचा महापालिकेत दररोज सादर केलेला अहवाल (कालावधी दि.01/04/2014 ते दि.31/03/2015)

4) अट क्र.7 नुसार प्रभाग समिती कार्यालयात ठेवण्यात आलेल्या तक्रारींच्या नोंदींची व निवारणाची नोंदवही (कालावधी दि.01/04/2014 ते दि.31/03/2015)

5) अट क्र.8 नुसार कंत्राटदाराने स्ट्रिट लाईट विज मीटर रीडींगचे दर महिन्याच्या शेवटी महानगर पालिकेत मीटर पॅनलनुसार सादर केलेला अहवाल. (कालावधी दि.01/04/2014 ते दि.31/03/2015)

6) अट क्र.10 नुसार प्रत्येक स्ट्रिट लाईटला आर्थिंग आहे किंवा नाही याबाबत महापालिकेस सादर केलेला मासिक अहवाल. (कालावधी दि.01/04/2014 ते दि.31/03/2015)

7) अट क्र.18 (क) नुसार पोलला दरवर्षी रंग देण्याचा व क्रमांकित करण्याबाबतचा अभिलेख उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

8) अट क्र.33 नुसार कंत्राटदाराने महापालिकेस सादर केलेला दैनंदिन कामाचा अभिलेख (कालावधी दि.01/04/2014 ते दि.31/03/2015)

9) दि.01/04/2014 ते दि .31/03/2015 या कालावधीमध्ये उपरोकत सेवाकराराच्या अनुषंगाने कंत्राटदारास प्रदान करण्यात आलेल्या देयकांचा तपशील

10) वित्तिय वर्ष 2014-2015 मध्ये कंत्राटदारास प्रदान करण्यात आलेल्या देयकांमधून 12.36 यादराने कपात करण्यात आलेल्या सेवाकराचा तपशील सादर करण्यात आलेला नाही.

DMEMRMM6801 (Ref No : 9, Hmm No : 04)

## *85 जंतुनाशक,दुर्गंधीनाशक व फवारणीनाशक खरेदीतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष : घनकचरा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2000000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 100000.00/-

***निविदाधारकाकडे किटकनाशक साठविणे व वितरीत करणे बाबतचा सक्षम प्राधिकरणाचा ग्राह्य परवाना नाही. निविदाधारंकाकडे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा अंतर्गत व्यवसायाची नोंदनी केल्याचे प्रमाणपत्र नसल्याणे 1.04.2012 पासून 5% कार्यकंत्राट कर कपात करणे आवश्यक आहे. प्रदानाची रक्कम रु.2000000/- आहे. रु.2000000/- च्या 5% रक्कम रु.100000/- वसूलपात्र आहे. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र किंवा कंपनी नोंदणी प्रमाणपत्र नस्तीत नाही. निविदाधारंकाकडे उत्पादक कंपनी अथवा त्यांचे अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची- ड चे नियम 1(2) नुसार ठेकेदारा बरोबर करारनामा करतांना महापालिकेतील 2 स्थायी समिती सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना घेतलेली नाही. महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविले नाही.***

महानगरपालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागामार्फत शहरातील दैनंदिन सार्वजनिक स्वच्छतेची कामे केली जातात. नागरिकांचे सार्वजनिक आरोग्य अबाधित ठेवणे करीता शहर क्षेत्रात फवारणीसाठी जंतुनाशक, डासनाशक, तसेच दुर्गंधीनाशक औषध खरेदी करणे आवश्यक असल्याने 2013–2014 या वर्षात निविदा मागविण्यात आल्या होत्या.

लेखाशीर्ष- जंतुनाशके व इतर वस्तू खरेदी

वार्षिक तरतूद रु. – 1.50 कोटी

अंदाजपत्रकीय खर्च रु.-1,29,28,500

प्रशा. मान्यता- मा. आयुक्त दि.12/06/2013

वित्तीय मान्यता- मा.स्थायी समिती ठराव क्र. 03 दि.12/11/2013

खालील न्यूनत्तम पात्र निविदाधारक यांना औषधे पुरविण्याचे काम देण्यात आले होते त्यांना खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आलेआहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | रक्कम रु | वजाती | निव्वळ देय रक्कम रु. | प्रमाणाक क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | रमेश ॲग्रोकेम कॉर्पोरेशन | 1000000/- | 20000/- | 980000/- | 3242<br>5/03/2015 |
| 2 | डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | 1000000/- | 20000/- | 980000/- | 3241<br>5/03/2015 |

उपरोक्त औषधे खरेदीची नस्ती व प्रमाणकांची तपासणी करून अर्धसमास पत्र क्र.17दि.21/06/2018 रोजी निर्गमित केले असता विभागाचे उतर प्राप्त झाले नाही. याबाबत खालील अनियमितता आहे.

1.करारनाम्यातील अट व शर्त क्र. 2 नुसार निविदाधारकाकडे किटकनाशक साठविणे व वितरीत करणे बाबतचा सक्षम प्राधिकरणाचा ग्राह्य परवाना असला पाहिजे. तो नस्तीत नसल्याने निविदाधारक अधिकृत परवानाधारक नसतांनाही त्यांना मालाचा पुरवठा करण्याचे काम दिले आहे.

2.निविदाधारंकाकडे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा अंतर्गत व्यवसायाची नोंदनी केल्याचे प्रमाणपत्र नस्ती सोबत नाही. ठेकेदार हा महाराष्ट्र विक्रीकर ट्रान्सफर ऑफ प्रॉपटी इन गुड्स इंव्हाल्ड इन एक्झूकिशन ऑफ वर्क्स कंत्राट कायदा 1985 नुसार नोंदणीकृत असल्यास 2% कार्य कंत्राट कर कपात करणे आवश्यक आहे. व सदर नोंदणी नसल्यास 1.04.2012 पासून 5% कार्यकंत्राट कर कपात करणे आवश्यक आहे. सदर प्रदाना ची रक्कम रु. 2000000/- आहे. रु. 2000000/- च्या 5% रक्कम रु.100000/- वसूलपात्र आहे.

3.मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र किंवा कंपनी नोंदणी प्रमाणपत्र नस्तीत नाही. पुरवठादार करत असलेल्या मालाचा पुरवठा नोंदणी प्रमाणपत्र नसतांना अनधिकृतपणे करत आहे. तरीही महानगरपालिकेने उपरोक्त पुरवठादारांना मालाचा पुरवठा करण्याचा ठेका दिला आहे.

4. करारनाम्यातील अट व शर्त क्र. 3 नुसार निविदाधारंकाकडे उत्पादक कंपनी अथवा त्यांचे अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र नस्ती सोबत नाही.त्यामुळे पुरवठा केलेला माल अधिकृत कंपनीचा तसेच चांगल्या प्रतीचा होता याबाबतखात्री होत नाही.

5.उपरोक्त निविदाधारंका बरोबर केलेल्या करारनाम्यावर स्थायी समिती सदस्यांची स्वाक्षरी,नाव व दिनांक नमूद नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची- ड चे नियम 1(2) नुसार ठेकेदारा बरोबर करारनामा करतांना महापालिकेतील 2 स्थायी समिती सदस्यांची करारावर स्वाक्षरी होणे आवश्यक आहे. फक्त नगरसचिव यांची स्वाक्षरी झालेली आहे तसेच महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविले नाही.

6.निविदाकारांनी पुरवठा केलेली औषधे यांचे चलन व विभागाची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध केली नसल्याने निविदाकारांकडुन मालाचा पुरवठा झाला याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही.
7. निविदाधारकांकडे मागील दोन वर्षातील 2011-2012, 2012-2013 या वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र नस्तीत नाही. भारतीय आयकर कायदा 1961 नुसार व्यावसायिकाने प्रत्येक वर्षात उत्पन्नाचे आयकर मुल्यांकन प्रमाणपत्र आयकर विभागाकडून प्राप्त करून घ्यायचे आहे. परंतु संबधित नस्तीत निविदाधारकांचे मागील दोन वर्षाचे आयकर मुल्यांकन प्रमाणपत्र नसतांना निविदाधारकास ठेका देण्यात आला आहे.
8. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पी.यू.1000/73/2003/34- दि.01/05/2001 मधील जोडपत्र अ 5 (क) नुसार सदर निविदांचे मूल्य लक्षात घेता ब वर्तमानपत्रा सोबत एका साप्ताहिकात जाहिरात देणे आवश्यक होते.कामाची जाहिरात फक्त दैनिक लोकमत मध्ये दिलेली आहे.सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.
वसूलपात्र रक्कम रु. 100000/- , आक्षेपाधीन रक्कम रु. 2000000/-

DATPKCM7101 (Ref No : 4, Hmm No : 17)

## *86 महानगरपालिका हद्दीतील छोटे मोठे नाले पावसाळ्यापूर्वी सफाई करणे कामातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 15**

*लेखा शीर्ष : घनकचरा मनपा निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4140835.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 93473.00/-

***महापालिका निविदा समितीतील इतर सदस्यांना निविदा उघडतांना कळविलेले नाही. भारतीय आयकर कायदा 1961 नुसार ठेकेदाराकडून 2013-2014 या वर्षातील आयकर भरल्याचे मुल्यांकन प्रमाणपत्र घेतलेले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची- ड चे नियम 1(2) नुसार ठेकेदारा बरोबर करारनामा करतांना महापालिकेतील 2 स्थायी समिती सदस्यांची करारावर स्वाक्षरी घेतलेली नाही. महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (ड) नुसार स्थायी समितीस संविदाकेल्यापासून 15 दिवसात कळविले नाही. विक्रीकर नोंदणी नसल्यास 1.04.2012 पासून 5% कार्यकंत्राट कर कपात करणे आवश्यक आहे. सदर कंत्राटा ची रक्कम रु.1869467/- आहे. रु.1869467 च्या 5% रक्कम रु. 93473/- वसूल केलेली नाही. महा.शासन सा. बां. वि. नियमावली परिशिष्ट 14 नुसार प्रभाग समिती क्र. 5 मधील ठेकेदार शिवनमर्देश्वर म.का.स.संस्था यांचे नोंदणी वर्गवारीचे प्रमाणपत्र शा.निर्णय सा.बा.वि.पत्र. का. एलबी/1098 /प्र.क्र.164 इमा-2 दि. 11/01/2000 नुसार काम घेण्याची पात्रता रु.7.50 लाख आहे. महापालिकेने सदर ठेकेदारास रु.2202046/- चे***

***काम दिले असून काम देण्याच्या पात्रतेचे उल्लंघन केलेले आहे.***

महानगरपालिका हद्दीतील छोटे मोठे नाले पावसाळ्यापूर्वी सफाई करणे गरजेचे असल्याने प्रभाग समिती क्र.1 ते 5 मधील कामांचा अंदाज घेऊन प्रभागातील अंदाजित खर्चानुसार दि. 01/03/2014 ई-निविदा मागविल्या होत्या. दि.10/03/2014 रोजी प्राप्त झालेल्या निविदा दि 18/03/2014 रोजी उघडण्यात आल्या. प्राप्त निविदा दर हे अंदाजित दरापेक्षा खूपच जास्त असल्यामुळे (50% जास्त) संबधित निविदाकार यांना वाटाघाटीसाठी बोलाविले. त्यांनी अंदाजित दरानुसार काम करण्यास नकार दिला. फेर ई-निविदा दि.25/04/2014 रोजी प्रसिद्ध करून दि.02/05/2014 पर्यंत मागविण्यात आल्या व दि.03/05/2014 ला निविदा उघडल्या असता खालील न्यूनत्तम निविदाधारक पात्र झाले आहेत.

| प्रभाग समिती क्र. | निविदाधारकाचेनाव | मनपाचे अंदाजित दर | प्राप्त निविदा दर | दर मधील फरक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| प्र.स. क्र.1, भाग- 1 | दिलीप धुमाळ | 1155435/- | 1155435/- | नाही | ----- |
| प्र. स. क्र.1, भाग- 2 | शिवनमर्देश्वर म.का.स.संस्था | 2292820/- | 2292820/- | -- | नस्ती उपलब्ध नाही. |
| प्र. स. क्र. 2 | मे. प्रिन्स इन्फ्रा. | 2232478/- | 2232478/- | नाही | ----- |
| प्र. स. क्र. 3 | मे.बुबेरे अँड असोसिएट | 1869467/- | 1869467/- | नाही. | ----- |
| प्र. स. क्र. 4 | मे.बुबेरे अँड असोसिएट | 1848015/- | 1848015/- | -- | नस्ती उपलब्ध नाही. |
| प्र. स. क्र. 5 | शिवनमर्देश्वर म.का.स.संस्था | 2202046/- | 2202046/- | नाही | ---- |

मा. आयुक्त यांनी वरील कामांच्या निविदेस दि. 06/05/2014 रोजी मान्यता दिली आहे.

याबाबत कामाची निविदा नस्ती तपासुन अर्धसमास पत्र क्र.18 दि.21/06/2018 रोजी निर्गमित केले असता उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालील अनियमितता आहेत.

1.उपरोक्त कामाच्या निविदा उघडतांना निविदा समितीतील सदस्य उप-आयुक्त(मुख्यालय) उपस्थित असल्याचे कागदपत्रावरील स्वाक्षरी वरून दिसते. परंतु इतर सदस्य उप-आयुक्त (आरोग्य),मुख्यलेखापरीक्षक, विधी अधिकारी तसेच ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी अनुपस्थित असल्याचे निविदा उघडल्याच्या दिनांकाच्या कागदपत्रावरून दिसते. महापालिका निविदा समितीतील इतर सदस्यांना निविदा उघडतांना मौखिक किंवा लेखी पत्र देवून कळविणे आवश्यक होते किंवा त्यांच्या अनुपस्थितीचे कारण नमूद केल्याचे पत्र नस्तीत नसल्याने निविदा उघडणेच्या कार्यवाही पासून इतर सदस्यांना दूर ठेवण्यात आले आहे.

2.प्रभाग समिती क्र.3 मधील काम करणाऱ्या ठेकेदाराचे नस्तीसोबत आयकर भरल्याचे मुल्यांकन प्रमाणपत्र 2010-2011 चे आहे. काम 2014-2015 या वर्षातील आहे. भारतीय आयकर कायदा 1961 नुसार ठेकेदाराकडून

2013-2014 या वर्षातील आयकर भरल्याचे मुल्यांकन प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते. सदर प्रमाणपत्र नस्ती सोबत नसतांनाही निविदाधारकास ठेका दिला आहे.

3. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण 5 अनुसूची- ड चे नियम 1(2) नुसार ठेकेदारा बरोबर करारनामा करतांना महापालिकेतील 2 स्थायी समिती सदस्यांची करारावर स्वाक्षरी होणे आवश्यक आहे. फक्त नगरसचिव यांची स्वाक्षरी झालेली आहे. तसेच महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 ( ड) नुसार स्थायी समितीस संविदा केल्यापासून 15 दिवसात कळविल्याचे दिसून येत नाही.

4. करारनाम्यातील अट व शर्त क्र. 8 नुसार कामावरील कामगारांचे वय 18 किंवा त्यापेक्षा जास्त आहे व काम करण्यास सक्षम आहेत याबाबत विभागाने ठेकेदाराकडून तसे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

5. करारनाम्यातील अट व शर्त क्र.9 नुसार ठेकेदाराने कामावरील कामगारांना सुरक्षासाधने ( उदा.गमबुट हातमोजे,मास्क) पुरविणे बंधनकारक आहे. ठेकेदाराने सुरक्षासाधने पुरविल्याचे पत्र नस्ती सोबत जोडलेले नसल्यानेठेकेदाराने कामावरील कामगारांना सुरक्षासाधने पुरविल्याची खात्री होत नाही.

6.करारनाम्यातील अट व शर्त क्र.16 नुसार दैनंदिन पुरविलेल्या साधन सामुग्रीचे चलन (पोचपावती) संबधीत आरोग्य निरीक्षकाने प्रमाणित केल्याचे प्रमाणपत्र नस्ती सोबत नाही. कामावर दैनंदिनसाधन सामुग्री पुरविली जात होती याबाबत खातरजमा होत नाही.

7.प्रभाग समिती क्र. 3 चे ठेकेदार यांचे विक्रीकर नोंदणी चे प्रमाणपत्र 2003 सालातील आहे. अद्यावत विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले नाही.ठेकेदार हा महाराष्ट्र विक्रीकर ट्रान्सफर ऑफ प्रॉपटी इन गुड्स इंव्हाल्ड इन एक्झूकिशन ऑफ वर्क्स कंत्राट कायदा 1985 नुसार नोंदणीकृत असल्यास 2% कार्य कंत्राट कर कपात करणे आवश्यक आहे. व सदर नोंदणी नसल्यास 1.04.2012 पासून 5% कार्यकंत्राट कर कपात करणे आवश्यक आहे. सदर कंत्राटा ची रक्कम रु.1869467/- आहे. रु.1869467 च्या 5% रक्कम रु. 93473/- वसूल केलेली नाही.

8. नाले सफाई बाबतचे संबधित स्वच्छता निरीक्षक यांच्याकडील नोंद रजिस्टर उपलब्ध झालेले नाही.नालेसफाई चे काम सुरु झाल्यानंतर रोज किती काम झाले याबाबतची दैनंदिन नोंद, नोंदवही मध्ये घेतली पाहिजे.परंतु अशी कार्यवाही झालेली नाही.

9. प्रभाग समिती क्र.3 मधील कामाचा काम पूर्णत्वाचा दाखला नस्ती सोबत नाही. स्वच्छता निरीक्षकांनी दिलेल्या काम पूर्ण झाल्याच्या अहवालानंतर काम पूर्णत्वाचा दाखला ठेकेदाराला विभाग प्रमुखाकडून दिला पाहिजे काम पूर्णत्वाचा दाखला नस्ती सोबत नसल्याने काम ठेकेदाराने पूर्ण केल्याची खात्री होत नाही.

10. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पी.यू.1000/73/2003/34- दि.01/05/2001 मधील जोडपत्र अ 5 (क) नुसार सदर निविदांचे मूल्य लक्षात घेता ब वर्तमानपत्रा सोबत एका साप्ताहिकात जाहिरात देणे आवश्यक होते.कामाची जाहिरात फक्त दैनिक लोकमत मध्ये दिलेली असल्याने सदर शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

11. महा.शासन सा. बां. वि. नियमावली परिशिष्ट 14 नुसार प्रभाग समिती क्र. 5 मधील ठेकेदार शिवनमर्देश्वर म.का.स.संस्था यांचे नोंदणी वर्गवारीचे प्रमाणपत्र शा.निर्णय सा.बा.वि.पत्र. का. एलबी/1098 /प्र.क्र.164 इमा-2 दि. 11/01/2000 नुसार काम घेण्याची पात्रता रु.7.50 लाख आहे. महापालिकेने सदर ठेकेदारास रु.2202046/- चे

काम दिले असून काम देण्याच्या पात्रतेचे उल्लंघन केलेले आहे.

12. प्रभाग समिती क्र.1 भाग-1, विभाग प्रमुख यांनी ठेकेदार श्री. धुमाळ यांना नालेसफाईचे काम गुणवत्तापूर्वक व समाधानकारक केले आहे असे काम पूर्ण केल्याचे दाखल्यात नमूद आहे परंतु सदर दाखल्यावर विभाग प्रमुख यांची स्वाक्षरी व तारीख नमूद नसल्याने अधिकृतपणे ग्राह्य मानता येत नाही.

13. काम सुरु करण्यापूर्वी कामाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो नस्तीसोबत जोडलेले नसल्याने काम सुरु करण्यापूर्वीचा व् काम पूर्ण झाल्यानंतरचास्थळ पुरावा याबाबत लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही.

14.प्रभाग समिती क्र.4 व प्रभाग समिती क्र.1 भाग 2 च्या कामाची नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नसल्याने सदर ठेकेदारांनी नालेसफाई चे काम केले याबाबत खात्री होत नाही. रक्कम रु.4140835/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

15.प्रभाग समिती क्र.1 ते 5 च्या नालेसफाई कामाच्या मुळ देयकांची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नसल्यामुळे सदर ठेकेदारांना 2014-2015 या आर्थिक वर्षात किती रकमेचे प्रदान केले गेले याबाबत खात्री झाली नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु. 4140835/-

वसूलपात्र रक्कम रु. 93473/-

DATPKCM7101 (Ref No : 5, Hmm No : 18)

## *87 प्रभाग समिती क्र. 1 ते 5 च्या कार्यक्षेत्रातील कचरा गोळा करणे व उचलणे तसेच इतर स्वच्छता विषयक कामासाठी डंपर/जेसीबी/घंटागाडी/ट्रक्टर ट्राली पुरविण्याच्या कामातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : घनकचरा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 45500.00/-

***मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 मधील तरतुदीनुसार रु.10 लाखापर्यंत रु.100 व रु. 10 लाखाचे वरील प्रत्येकी लाख रुपये किंवा त्याचे भागास रु.100 व अधिकतम रु. 5 लाख मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही झालेली नसल्यामुळे रक्कम रु.45500/- वसूलपात्र आहे.***

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने प्रभाग समिती क्र. 1 ते 5 मध्ये कचरा गोळा करणे व उचलणे तसेच

इतर स्वच्छता विषयक कामासाठी डंपर/जेसीबी/घंटागाडी/ट्रक्टर ट्राली व मजूर पुरविण्याबाबत विविध ठेकेदारांबरोबर करार केलेला आहे. संबधित ठेकेदारांची नस्ती व करारनामे तपासुन अर्धसमास क्र.19दि. 21/06/2018 निर्गमित केले असता विभागाचे उतर प्राप्त झाले नाही.याबाबत खालीलअनियमितता आहे.

1.खालील ठेकेदारांकडून मुद्रांक शुल्क कमी आकारल्याचे दिसते. ते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | मनपा कार्यादेश दि. व कालावधी | वाहन | संख्या | दर* दिवस | एकूण रक्कम रु. | मुद्रांक शुल्क घेतलेली रक्कम रु. | मुद्रांक शुल्काची एकूण रक्कम रु. | मुद्रांक शुल्क वसूलपात्र रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आशापुरा टुर्स & ट्र्व्हल्स प्रभाग समिती क्र. 2 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | डंपर<br>घंटा-गाडी | 1<br>4 | 2567* 200<br>1152* 200 | 1435000/- | 100/- | 600/- | 500/- |
| 2 | मे. लासानी एंटरप्राय-जेस प्रभाग समिती क्र. 2 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी | 1 | 6750* 200 | 1350000/- | 100/- | 500/- | 400/- |
| 3 | मे. मोनिका एंटरप्राय-जेस प्रभाग समिती क्र. 2 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15पर्यंत. दिवस-200 | घंटा-गाडी<br>डंपर<br>ट्रकट-र ट्रोली | 4<br>5 | 1152* 200<br>2567* 200 | 3488600/- | 100/- | 2600/- | 2500/- |
| 4 | मे.संजय कन्स. प्रभाग समिती क्र. 2 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी<br>डंपर | 1<br>4 | 6750* 200<br>2567* 200 | 3403600/- | 100/- | 2600/- | 2500/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | मे. जयश्रीरा-म ट्रान्सपोर्ट प्रभाग समिती क्र. 2 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी डंपर | 1<br>3 | 6750* 200<br>2567* 200 | 2890000/- | 100/- | 2000/- | 1900/- |
| 6 | मे.प्रिती एंटरप्रा-यजेस प्रभाग समिती क्र. 2 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी डंपर | 1<br>5 | 6750* 200<br>2567* 200 | 3917000/- | 100/- | 3100/- | 3000/- |
| 7 | मे.श्री लखन बा. गायकवाड प्रभाग समिती क्र. 2 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15पर्यंत. दिवस-200 | मजूर | 36 | 297* 200 | 2138400/- | 100/- | 1300/- | 1200/- |
| 8 | मे. जयतारा मा एंटरप्रायजेस प्रभाग समिती क्र. 4 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी डंपर | 1<br>5 | 6750* 200<br>2567* 200 | 3917000/- | 100/- | 3100/- | 3000/- |
| 9 | मे. साईबाबा ट्रान्सपोर्ट प्रभाग समिती क्र. 4 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | घंटागाडी | 7 | 1152* 200 | 1612800/- | 100/- | 800/- | 700/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | मे.सागर बासन<br>प्रभाग समिती क्र. 4 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15पर्यंत. दिवस-200 | घंटागाडी डंपर<br>ट्रकटर ट्रोली | 6<br><br>1 | 1152* 200<br><br>2567* 200 | 1895800/- | 100/- | 1000/- | 900/- |
| 11 | मे.कुणाल रमाकांत माळी<br>प्रभाग समिती क्र. 4 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसीबी<br><br>डंपर | 2<br><br>4 | 6750* 200<br><br>2567* 200 | 4753600/- | 100/- | 3900/- | 3800/- |
| 12 | मो. आसिफ खान<br>प्रभाग समिती क्र. 4 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी | 1 | 6750* 200- | 1350000/- | 100/- | 500/- | 400/- |
| 13 | मे.लक्ष्मी नारायण एंटरप्रायजेस<br>प्रभाग समिती क्र. 3 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी | 1 | 6750* 200 | 1350000/- | 100/- | 500/- | 400/- |
| 14 | मे. कुऱ्हाडे हरिश्चंद्र<br>प्रभाग समिती क्र. 3 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | डंपर<br><br>जेसी-बी | 4<br><br>1 | 2567* 200<br>6750* 200 | 3403600/- | 100/- | 2600/- | 2500/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 | मे.खुशी अर्थ-मुव्हर्स<br>प्रभाग समिती क्र. 3 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी | 1 | 6750∗ 200 | 1350000/- | 100/- | 500/- | 400/- |
| 16 | मे.मदनइंटरप्रायझेस<br>प्रभाग समिती क्र. 3 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | घं्टा-गाडी<br>डंपर | 1<br>2 | 1152∗ 200<br>2567∗ 200 | 1257200/- | 100/- | 400/- | 300/- |
| 17 | मे.श्री.अनिरुध्द जाधव<br>प्रभाग समिती क्र. 1 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | मजुर | 42 | 297∗ 200 | 2494800/- | 100/- | 1600/- | 1500/- |
| 18 | मे.शिव नर्मदेश्वर म.का.स.सं.<br>प्रभाग समिती क्र. 1 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी | 1 | 6750∗200 | 1350000/- | 100/- | 500/- | 400/- |
| 19 | मे.खुशी इंटरप्रायझेस<br>प्रभाग समिती क्र. 1 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी<br>डंपर<br>घंटा-गाडी | 1<br>6<br>5 | 6750∗200<br>2567∗200<br>1152*200 | 5582400/- | 100/- | 4700/- | 4600/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 20 | मे.श्री. गुरुदेव- दत्त मजुर का.सह. सं. प्रभाग समिती क्र. 1 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी<br>डंपर | 1<br>3 | 6750∗200<br>2567∗200 | 2890200/- | 100/- | 2000/- | 1900/- |
| 21 | मे.शिव नर्मदेश्वर म.का.स.सं. प्रभाग समिती क्र. 5 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी<br>डंपर | 1<br>5 | 6750∗200<br>2567∗200 | 3917000/- | 100/- | 3100/- | 3000/- |
| 22 | मे.जय भवानी ट्रान्सपोर्ट प्रभाग समिती क्र. 5 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी<br>डंपर | 1<br>1 | 6750∗200<br>2567∗200 | 1863400/- | 100/- | 1000/- | 900/- |
| 23 | मे.साहील ॲग्रोकंन्स्ट्र. प्रभाग समिती क्र. 5 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | घंटा-गाडी | 9 | 1152∗200 | 2073600/- | 100/- | 1200/- | 1100/- |
| 24 | मे.प्रीती इंटरप्रायझेस प्रभाग समिती क्र. 5 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/14 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी<br>डंपर | 1<br>4 | 6750∗ 200<br>2567∗ 200 | 3403600/- | 100/- | 2600/- | 2500/- |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 25 | मे.केतन आर. पवार<br>प्रभाग समिती क्र. 5 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | ट्रक्टरट्रॉली<br><br>डंपर | 1<br><br>3 | 2567∗200<br><br>2567∗200 | 2053600/- | 100/- | 1200/- | 1100/- |
| 26 | मे.देवेंद्र शिवबा कोळी<br>प्रभाग समिती क्र. 5 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी<br><br>डंपर | 1<br><br>3 | 6750∗200<br><br>2567∗200 | 2890200/- | 100/- | 2000/- | 1900/- |
| 27 | मे.आशापुरा टुर्स अँड ट्रव्हल्स्<br>प्रभाग समिती क्र. 5 | 09/01/15 कालावधी 09/01/15 ते 31/03/15 पर्यंत. दिवस-80 | घंटा-गाडी | 18 | 1152∗80 | 1658880/- | 100/- | 800/- | 700/- |
| 28 | मे.अर्नव इंटरप्रायझेस<br>प्रभाग समिती क्र. 5 | 12/09/14 कालावधी 12/09/14 ते 31/03/14 पर्यंत. दिवस-200 | जेसी-बी<br><br>घंटा-गाडी | 1<br><br>5 | 6750∗200<br><br>1152∗200 | 2502000/- | 100/- | 1700/- | 1600/- |
| एकूण वसूलपात्र रक्कम 45500/- | | | | | | | | | |

महानगरपालिकेने उपरोक्त तक्त्यातील ठेकेदारांसोबत कामाबाबत करार केला असून कामाचा कालावधी दि.12/09/2014 ते 31/03/2015 हा आहे. या कालावधीत कामासाठी वापरण्यात येणारे वाहन, मजूर यांना करारनाम्यातील ठरलेल्या दरानुसार रक्कम अदा केली जाणार असतांना त्याप्रमाणे वाहन, मजूर व उपरोक्त कालावधीची गणना करून मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक होते.मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 चे कलम 34 मधील तरतुदीनुसार रु.10 लाखापर्यंत रु.100 व रु.10 लाखाचे वरील प्रत्येकी लाख रुपये किंवा त्याचे भागास रु.100 व अधिकतम रु. 5 लाख मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे.परंतु अशी कार्यवाही झालेली नसल्यामुळे शासनाचे रक्कम रु.45500/-चे नुकसान झाले आहे. तसेच उर्वरित ठेकेदारांचे वाहन, मजूर व कालावधीची गणना करून मुद्रांक शुल्क आकारण्यात

यावे.
वसूलपात्र रक्कम रु. 45500/-

DATPKCM7101 (Ref No : 6, Hmm No : 19)

## *88 करमुल्यांकन विभागा कडील मालमत्ता व पाणीपट्टी कराच्या थकबाकीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : करमुल्यांकन मनपा निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 1172058656.00/-

***थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधिल प्रकरण 8 कराधान नियम 42 ते 48 नुसार कारवाई न केल्याने वसुलीचे प्रमाण कमी (31.44) होऊन महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात घट झाली आहे. करमुल्यांकन विभागाने मालमत्ता कराचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2004 मधिल तरतुदीनुसार विहित केलेल्या नमुन्यात ठेवलेले नाही.***

भिवंडी-निजामपुर महानगरपालिकेच्या अधिनस्त असलेल्या प्रभाग समिती कडील मालमत्ता व पाणीपट्टी कराची वर्ष 2014-2015 अखेर खालीलप्रमाणे मोठ्या प्रमाणावर थकित रक्कम असल्याचे पावती पुस्तक,चलन, रोखवही व अभिलेखे यांची तपासणी केली असता दिसून येते. याबाबत खालील प्रमाणे अर्धसमास निर्गमित केले आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | अर्धसमास क्र. | दिनांक | थकीत रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग समिती क्र.1 | 20 | 22/06/2018 | 407781460/- |
| 2 | प्रभाग समिती क्र.2 | 21 | 22/06/2018 | 236160135/- |
| 3 | प्रभाग समिती क्र.3 | 22 | 25/06/2018 | 146505113/- |
| 4 | प्रभाग समिती क्र.5 | 23 | 25/06/2018 | 109643439/- |
| 5 | प्रभाग समिती क्र.4 | 24 | 26/06/2018 | 170433264/- |

तसेच करमुल्यांकन विभागाकडील संकलित जमा रकमेचे अभिलेखे तपासले असता 2014-2015 अखेर खालीलप्रमाणे मालमत्ता व पाणीपट्टी कराची थकबाकी महानगरपालिकेस येणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | थकीत रक्कम रु. |
|---|---|---|
| 01 | सन 2013-2014 ची थकबाकी मागणी | 1245006633 |
| 02 | सन 2014-2015 ची चालू मागणी | 464592642 |

| | | |
|---|---|---|
| 03 | एकुण मागणी | 1709599275 |
| 04 | सन 2013-2014 मध्ये थकबाकी वसूल | 275745078 |
| 05 | सन 2014-2015 ची चालू मागणी वसूल | 261795541 |
| 06 | एकुण वसूल | 537540619 |
| 07 | सन 2013-2014 अखेर थकबाकी पैकी बाकी | 969261555 |
| 08 | सन 2014-2015 ची मागणी पैकी बाकी | 202797101 |
| 09 | एकुण बाकी | 1172058656 |

1.करमुल्यांकन विभाग यांनी लेखापरिक्षणास सादर केलेल्या अभिलेख्यानुसार वर्ष 2014-2015 करीता मालमत्ता कराची एकुण मागणी रक्कम रूपये 1709599275/- इतकी असून एकुण वसूली रूपये 537540619/- आहे. तर एकुण थकबाकी रक्कम रूपये 117205840619/- इतकी दर्शविली आहे. म्हणजेच वसूलीची टक्केवारी सुमारे 31.44% आहे. तर थकबाकीची टक्केवारी 68.56% आहे. यावरून असे दिसून येते की, एकंदरीत वसुलीचे प्रमाण फारच कमी आहे. थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधिल प्रकरण 8 कराधान नियम 42 ते 48 नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे,लिलाव करणे तसेच कर आकारणी प्रकरणा बाबत मोजमापे घेवुन हरकती मागवून,बिले वेळेवर न पाठविल्याने आकारणी/मागणी करणे इ.सारखी कामे महानगरपालिका कर विभागाने त्या त्या वित्तीय वर्षात वेळीच केलेली नाहीत. कर वसूली संदर्भात अशी कारवाई न केल्याने वसुलीचे प्रमाण कमी होऊन महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात घट झालीआहे.

2. करमुल्यांकन विभागाने मालमत्ता कराचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2004 मधिल तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी करवाई झालेली नाही.
1.वसूली नोंदवही ( नमूना सर्वसाधारण 11) 2. दैनिक वसूली गोषवारा ( नमूना सर्वसाधारण 12) 3. मागणी नोंदवही ( नमूना सर्वसाधारण 20) 4. मागणी बिल नोंदवही ( नमूना सर्वसाधारण 21) 5. बिलांचे गोषवारा विवरणपत्र ( नमूना सर्वसाधारण 22) 6. नोटीस फी, वारंट फी व् इतर नोंदवही ( नमूना सर्वसाधारण 23) 7. नोटीस फी, वारंट फी व् इतर गोषवारा विवरणपत्र (नमूना सर्वसाधारण 24) 8. परतावा ,remission व write off नोंदवही (नमूना सर्वसाधारण 25) 9. परतावा व remission गोषवारा विवरणपत्र (नमूना सर्वसाधारण 26) 10. काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे ( नमूना सर्वसाधारण 26) तसेच याव्यतिरिक्त 11.summary statement of bills raised ( नमूना P & OT -1) 12. summary statement of demand adjustment raised (नमूना P & OT – 2) 13. summary statement of year wise, head wise collection of property & other taxes (नमूना P & OT – 3) 14. summary statement of refunds & permission (P & OT- 4) 15. वाढ व् घट नोंदवही.

याबाबत अर्धसमास क्र. 27 दिनांक 28/06/2018 रोजी निर्गमित केला असता विभागाचे उतर प्राप्त झाले नाही.

वसूलपात्र रक्कम रु.1172058656/-

DATPKCM7101 (Ref No : 7, Hmm No : 27)

## *89 मालमत्ता कर व इतर कर यांचे सुधारित कर निर्धारण झालेले नसल्याने होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष : कर मुल्यांकन परिवहन निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 129 नुसार महानगरपालिकेने दर पाच वर्षांनी मालमत्ता कराच्या करयोग्य मूल्यात सुधारणा करुन एकत्रित मालमत्ता कराची स्वतंत्र आकारणी करणे आवश्यक असून सदरच्या कर रक्कमाबाबत कलमातील तरतुदीप्रमाणे संबंधित मालमत्ता धारकाकडून कर वसूल करणे आवश्यक आहे. मात्र दि.16-12-2001 पासून महानगरपालिका अस्तित्वात येवूनही महानगरपालिकेने मालमत्ता करात सुधारीत आकारणी न केल्याने महानगरपालिकेस वाढीव व अपेक्षीत उत्पन्नापासून वंचित राहावे लागले आहे. वास्तविक सदर कालावधीत शहरात मोठया प्रमाणत इमारतीत वाढ होऊनही मालमत्ता कर बारा वर्षापासूनच्या प्रचलित दराने आकारण्यात येत असल्याने त्याचा विपरीत परिणाम महानगरपालिकेचे आर्थिक अत्पन्नावर झालेला असल्याचे लेखापरीक्षणात आढळून आलेले आहे.***

महानगरपालिका भिवंडी सन 2014-15 चे लेखापरीक्षणाचे वेळी कर संकलन विभागाने पुरविलेल्या माहीतीनुसार मालमत्ता कर व इतर कर यांची मागील कर आकारणी सन 2001-02 मध्ये झाली. आजतागायत सुधारित करण्यात आली नाही. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 129 नुसार महानगरपालिकेने दर पाच वर्षांनी मालमत्ता कराच्या करयोग्य मूल्यात सुधारणा करुन एकत्रित मालमत्ता कराची स्वतंत्र आकारणी करणे आवश्यक असून सदरच्या कर रक्कमाबाबत कलमातील तरतुदीप्रमाणे संबंधित मालमत्ता धारकाकडून कर वसूल करणे आवश्यक आहे. मात्र दि.16-12-2001 पासून महानगरपालिका अस्तित्वात येवूनही महानगरपालिकेने मालमत्ता करात सुधारीत आकारणी न केल्याने महानगरपालिकेस वाढीव व अपेक्षीत उत्पन्नापासून वंचित राहावे लागले आहे . वास्तविक सदर कालावधीत शहरात मोठया प्रमाणत इमारतीत वाढ होऊनही मालमत्ता कर बारा वर्षापासूनच्या प्रचलित दराने आकारण्यात येत असल्याने त्याचा विपरीत परिणाम महानगरपालिकेचे आर्थिक अत्पन्नावर झालेला असल्याचे लेखापरीक्षणात आढळून आलेले आहे.

2) अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण 8 मधील नियम 7अ नुसार उचित कारणे नमूद करुन मा.आयुक्त हे मालमत्ता कर कधीही सुधारीत करु शकतील अशी तरतूद असतांना याबाबत योग्य त्या कार्यवाहीत महानगरपालिकेने उदासीनता दाखविल्यानेच उत्पन्नाच्या प्रमुख स्त्रोतात वाढ होऊ शकली

नाही.

3) अधिनियमातील कलम 99 नुसार महानगरपालिकेचे मंजुरीचे अधीन राहून शहरातील नवनिर्मित इमारतीच्या एकत्रित मालमत्ता कराबाबत सुधारीत दराने आकारणी करुन उत्पन्नात भरीव वाढ नगरपालिकेस करता आली असती मात्र कलमात नमूद केल्याप्रमाणे उचित कार्यवाही झाली नाही.

4) उपरोक्त कलम 99 मधील तरतुदीनुसार त्या वर्षातील माहे फेब्रुवारी महिन्यातील 20 तरखेला किंवा त्यापूर्वी सुधारित कर आकारणी करुन मालमत्ता कर निश्चित करणे आवश्यक आहे. मात्रा सन 2013-2014 अखेर पर्यंत याबाबत सुधारित दराने मालमत्ता कराची आकारणी न करणे व त्यानुसार मालमत्ता कर वसूल न करण्याची अनियमितता झाली आहे.

5) महानगरपालिकेने विहित नमुन्यात ठेवावयाच्या कर आकारणी मागणी नोंद वहया संगणीकृत असल्याचे सांगण्यात आले तथापि त्याची छापील प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे विभागाने पुरविलेली मागणी वसूली थकबाकी ची माहिती अचूक असल्याची खात्री करता आली नाही. तरी नोंद वहया उपलब्ध करुन व नोंदी समक्ष अधिका-याकडून साक्षांकित करणेत याव्यात व पूर्तता लेखापरीक्षणास सादर करावी.

6) कर वसूलीची टक्केवारी अतिशय कमी म्हणजेच 31.44% टक्के इतकीच आहे. त्यात वाढ होणे आवश्यक आहे.

DATVRKM8002 (Ref No : 61, Hmm No : 59)

## *90 सि.टी.एस. क्र.4360ए मौजे निजामपूर येथील आमिर मोहंमद आमिन आबुजी यांच्या सादर केलेल्या विकास कामाच्या प्रस्तावातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : नगर रचना महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 329784.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 329784.00/-

***स्थानिक संस्था कर अधिनियम 27 उपनियम 4 नुसार सदर इमारत बहुमजली असल्याने 2198.56 X 150 = 329784 इतकी रक्कम वसूल करुन शासन खाती जमा करावी. अग्निशमन विभागाच्या जा.क्र.भिनिशमनपा/अग्नि/312/015 दिनांक 09/10/2015 नुसार इमारतीची उंची 15 मी.पेक्षा उंच असल्याने NBC/Part iv/1983 (सुधारीत 2005) नुसार आग प्रतिबंधक उपाययोजनेच्या नियमाखाली येते त्या नुसार इमारतीमध्ये ऑटॉमॅटीक फायर लिफ्ट बसविणे आवश्यक होते. उदवाहन प्रमाणपत्राची पडताळणी करता प्रमाणपत्र क्र.146101 हे उद्वाहन विना अग्निशमन यंत्रणा बसविण्यात आले आहे.***

सि.टी.एस. क्र.4360ए मौजे निजामपूर येथील आमिर मोहंमद आमिन आबुजी यांनी सादर केलेल्या विकास प्रस्तावांतर्गत एकूण विंग ”ए” तळमजला+ सात मजले, विंग “बी” तळमजला (वाणिज्यिक)+ चार मजले व विंग ”सी” तळमजला (वाणिज्यिक)+ चार मजले असा प्रस्ताव सादर केला होता. सदर बांधकामांतर्गत आढळून आलेल्या अनियमितता बाबत अर्धसमास पत्र क्र.11 दि.21/05/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) सि.टी.एस. क्र. 4360 या भुखंडाचे एकूण क्षेत्रफळ 4483.70 चौ.मी. इतके आहे. विंग "ए” करीता भुखंडाची मोजणी करताना त्रिकोणीय पध्दतीनुसार (Traingular Method) नुसार भुखंडाचे क्षेत्रफळ 4312.62 चौ.मी. इतके दर्शविण्यात आले. तसेच विंग "बी” करीता भुखंडाची मोजणी करताना त्रिकोणीय पध्दतीनुसार (Traingular Method) नुसार भुखंडाचे क्षेत्रफळ 4559.10 चौ.मी. इतके दर्शविण्यात आले. या दोन्हीमध्ये 246.48 चौ.मी. इतका फरक आहे. याबाबत सविस्तर खुलासा केलेला नाही.

2) भुखंडाचे क्षेत्रफळ 4483.70 चौ.मी. इतके असताना 12 मी. रुंद विकास रस्त्यासाठी एकूण 984.74 चौ.मी. इतके क्षेत्र आरक्षित होते. तसेच उदयानासाठी 660 चौ.मी. इतके क्षेत्र असे एकूण 1644.74 चौ.मी. क्षेत्र आरक्षित होते. इमारत “ए” चे बांधकाम पूर्ण झाल्यावर एकूण 1644.74 चौ.मी. क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत केल्याचे दिसून येत आहे. तद्नंतर विंग “बी” चे बांधकाम करताना वाढीव क्षेत्रफळानुसार सदर आरक्षण 12 मीटर रस्त्यासाठी 1050.61 चौ.मी. तसेच उदयानासाठी 799.69 चौ.मी. असे एकूण 1850.22 चौ.मी. इतके वाढलेले आहे. त्यामुळे वाढीव 205.48 चौ.मी. इतके क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही विकासकाने केली नाही.

3) विंग “बी व सी” करीता वापरण्यात आलेले बांधकाम क्षेत्र हे 2198.56 चौ.मी. इतके असून त्यास विभागाने बांधकाम परवानगी क्र.नरवि1980 दि.09/12/2011 नुसार परवानगी दिली होती. स्थानिक संस्था कर अधिनियम 27 उपनियम 4 नुसार सदर इमारत बहुमजली असल्याने 2198.56X 150 =329784 इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

4) अग्निशमन विभागाच्या जा.क्र.भिनिशमनपा/अग्नि/312/015 दिनांक 09/10/2015 नुसार इमारतीची उंची 15 मी.पेक्षा उंच असल्याने NBC/Part iv/1983 (सुधारीत 2005) नुसार आग प्रतिबंधक उपाययोजनेच्या नियमाखाली येते. त्या नुसार इमारतीमध्ये ऑटॉमॅटीक फायर लिफ्ट बसविणे आवश्यक होते. उदवाहन प्रमाणपत्राची पडताळणी करता प्रमाणपत्र क्र.146101 हे उदवाहन स्वयंचलित अग्निशमन यंत्रणा न बसविता बसविले आहे.

DMEMRMM6801 (Ref No : 11, Hmm No : 11)

## *91 विकास योजना आरखडा ( 2003 ते 2023 ) नुसार आरक्षित केलेल्या जागांच्या भूसंपादनाची कार्यवाही केली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : नगर रचना महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महानगरपालिकेने एकूण 255 आरक्षित क्षेत्रापैकी 248 क्षेत्रे (क्षेत्रफळ 167.85 हेक्टर) ताब्यात घेतली नाहीत. महाराष्ट्र नगररचना अधिनियम-1966 मधील कलम 26 (2) अन्वये संपादित केलेल्या आरक्षणावर बांधकाम, रस्ता डांबरीकरण, सिमा भिंत यासाठी येण्याऱ्या खर्चाची 20 टक्के तरतूद अर्थसंकल्पात करणे बंधनकारक आहे. परंतु तशी तरतूद केल्याचे बजेट नोंदवहीत दिसून आले नाही.***

महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील विकास योजना आराखडा तपासाला असता एकूण 287 आरक्षण क्षेत्र असून त्यापैकी 255 क्षेत्रे महापालिकेसाठी आरक्षित करण्यात आलेले आहेत व उर्वरित 32 क्षेत्रे इतर संस्थासाठी (राज्य व केंद्र शासन, संस्था, एन.जी.ओ) आरक्षित करण्यात आलेली आहेत. महापालिकेसाठी आरक्षित करण्यात आलेल्या 255 क्षेत्रासाठी व आरक्षित रस्त्यांच्या संपादन व विकासासाठी एकूण 1142.30 कोटी रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. तपासणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र. 13 दि. 23/05/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. विकास योजना आराखडा तपासाला असता महानगरपालिकेने एकूण 255 आरक्षित क्षेत्रापैकी (क्षेत्रफळ 209.94 हेक्टर) 7 क्षेत्रे (8.39 हेक्टर) संपादन करून पूर्ण विकसित केले. तर 17 आरक्षित क्षेत्रे (क्षेत्रफळ 9.75 हेक्टर) संपादन केले असून विकसित करणे बाकी आहे व TDR द्वारे 37 आरक्षित क्षेत्रे (क्षेत्रफळ 23.95 हेक्टर) संपादन केले आहे. महानगरपालिकेने एकूण 255 आरक्षित क्षेत्रापैकी 248 क्षेत्रे (क्षेत्रफळ 167.85 हेक्टर) ताब्यात घेतली नाहीत. महाराष्ट्र नगररचना अधिनियम-1966 चे कलम 127 अन्वये विकास योजना मंजूर होऊन ती अंमलात आल्यापासून 10 वर्ष कालावधीत जर नियोजन/समुचित प्राधिकरणाने सार्वजनिक आरक्षणाची भूसंपादनाची कार्यवाही केली नाही तर जमीन मालक सबंधित प्राधिकरणावर खरेदी सूचना नोटीस बजावू शकतो अशी नोटीस बजावल्यानंतर सबंधित प्राधिकरणामार्फत 6 महिन्यात भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षणे आपोआप रद्द होतात अशी तरतूद आहे.
2. नगर विकास विभाग मुंबई शासन निर्णय क्र. टीपीएस- 3692/11732/नवी-11 दि. 3/6/1994 अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका महानगरपालिकेला 2003 पासून अंमलबजावणीचे आदेश आहेत. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने एकूण 255 आरक्षणे क्षेत्राच्या संपादनासाठी र.रु. 466.84 कोटी जागा मालकांना अदा करून जागा ताब्यात घेणे आवश्यक होते तसेच रक्कम रुपये 675.46 आरक्षित रस्त्यांच्या( लांबी 72.50) संपादनासाठी संबधित जागा मालकांना अदा करून जागा ताब्यात घेवून त्यांचा विकास करणे आवश्यक होते.
3. महाराष्ट्र नगररचना अधिनियम-1966 मधील कलम 26 (2) अन्वये संपादित केलेल्या आरक्षणावर बांधकाम, रस्ता डांबरीकरण, सिमा भिंत यासाठी येण्याऱ्या खर्चाची 20 टक्के तरतूद

अर्थसंकल्पात करणे बंधनकारक आहे. परंतु तशी तरतूद केल्याचे बजेट नोंदवहीत दिसून आले नाही.

| फेज | आरक्षित क्षेत्रे | जागा संपादनाची रक्कम (कोटी ) |
|---|---|---|
| 2003-2008 | 55 | 88.77 |
| 2008-2013 | 62 | 89.45 |
| 2013-2018 | 56 | 88.815 |
| 2018-2023 | 66 | 199.811 |
| आरक्षित रस्त्यांच्या संपादन व विकासासाठी (रस्ता लांबी 72.50 ) | | 675.46 |
| | | 1142.30 |

उपरोक्त तक्त्यांनुसार 255 जागांसाठी र.रू. 1142.30 कोटी एवढ्या रक्कमेची तरतूद करण्यासाठी महापालिकेने कोणतेही प्रयोजन केलेले दिसून येत नाही.
उपरोक्त माहितीवरून असे दिसते की लेखापरीक्षण दिनाकापर्यंत म्हणजेज साधारणता 14 वर्षात महापालिकेने 3% जागेचेही सार्वजनिक वापरासाठी संपादन केलेले नाही. जागा ताब्यात घेवून त्यांचा विकास न केल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात नागरिक पायाभूत सोयी सुविधा पासून वंचित राहिल्याचे दिसून येत आहे.

DATVRKM8002 (Ref No : 62, Hmm No : 13)

## *92 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात योग्य ठिकाणांवर एकूण 1225 चौ.फुटाच्या क्षेत्रफळात होर्डींग उभारुन जाहिरात करण्याच्या कार्यवाहीमध्ये झालेल्या अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष : परवाना मंडई महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 381000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 381000.00/-

***उक्त ठेका तीन वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात आला आहे. त्यामुळे त्रैवार्षिक अंदाजित उत्पन्न रु.3,81,000/- इतके होत आहे. यास्तव निविदा प्रक्रिया राबविणे अनिवार्य असताना केवळ वार्षिक उत्पन्न गृहित धरुन दरपत्रके मागविण्यात आली आहे. जाहिरातींच्या कंत्राटासाठी महापालिकेने चुकीच्या पध्दतीने दरपत्रके मागवून कार्यवाही केली असल्याने वरील सर्व आक्षेपांचा खुलासा होईपर्यंत तीन वर्ष कंत्राट कालावधीची रक्कम रु.3,81,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.***

महापालिकेच्या जाहीरात परवाना विभागांतर्गत भिवंडी निजामपूर शहर महापालिका क्षेत्रातील जाहीरातयोग्य ठिकाणांवर एकूण **1225** चौ.फुटांच्या क्षेत्रफळात होर्डींग उभारुन जाहीरात करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली होती. सदर कार्यवाहीमध्ये झालेल्या अनियमिता बाबत अर्धसमास पत्र क्र.**25** दि.**22/06/2018** अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| **1** | दरपत्रक प्रसिध्दी दिनांक | **03/11/2014** |
| **2** | दरपत्रक कालावधी | **03/11/2014** ते **13/11/2014** |
| **3** | दरपत्रके प्राप्त | **03** |
| **4** | कार्यादेश क्र. | भिनिशमनपा/परवाना/जा.वि./**696/2014** दिनांक **14/11/2014** |
| **5** | कालावधी | दि.**01/12/2014** ते दि.**30/11/2017** |

**1)** भिवंडी निजामपूर शहर महापालिका क्षेत्रामध्ये जाहीरातीसाठी फलक उभारुन त्यावर जाहिरातीसाठी भाडयाने देणेबाबत संपूर्ण महानगर पालिका क्षेत्रामध्ये सर्वेक्षण करणे आवश्यक होते. उपलब्ध अभिलेख्यावरुन सदर सर्वेक्षण करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

**2)** जाहीरातींव्दारे महापालिकेचे अपेक्षित वार्षिक उत्पन्न रु.**1,27,000/-** इतके ठरविण्यात आले आहे. परंतू याबाबत कोणतीही आधारभूत कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

**3)** उक्त ठेका तीन वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात आला आहे. त्यामुळे त्रैवार्षिक अंदाजित उत्पन्न रु.**3,81,000/-** इतके होत आहे. यास्तव निविदा प्रक्रिया राबविणे अनिवार्य असताना केवळ वार्षिक उत्पन्न गृहित धरुन दरपत्रके मागविण्यात आली आहे.

**4)** दरपत्रके मागविताना सदर ठेका तीन वर्षांच्या कालावधीसाठी असल्याबाबत कोठेही नमूद करण्यात आलेले नाही.

**5)** दरपत्रके संगणकीय प्रणालीवर प्रसिध्द केल्याचे तसेच वृत्तपत्रांमध्ये जाहिराती देण्यात आल्याचे अभिलेख आढळून आले नाहीत. तसेच दरपत्रके स्थानिक सूचना फलकांवर लावण्यात आल्याबाबत कोणतीही छायाचित्रे अभिलेखात आढळून आली नाहीत.

**6)** दरपत्रकांमध्ये स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत तसेच आयकर विभागाचा दाखला

सादर करण्याबाबत नमूद करण्यात आले असूनही दरपत्रके धारकांनी केवळ सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र तसेच आयकर ओळखपत्र दरपत्रकांबरोबर सादर केले आहे. व विभागाने कोणतीही शहानिशा न करता दरपत्रके ग्राहय ठरविली आहेत.

**7)** उच्चतम दरपत्रकधारक मे.गॅलॅक्सी ॲडव्हर्टायझिंग यांनी रु. **1,35,500/-** इतक्या रकमेचा वार्षिक देकार सादर केला असून त्यांना दिनांक **14/11/2014** रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आला आहे. कार्यादेश निर्गमित करण्यात आल्यानंतर ठेकेदारांने दिनांक **23/12/2014** च्या पत्रानुसार निश्चित केलेल्या चार जागांवर नागरीक अडथळे करुन जाहिराती उभारण्यास मनाई करीत असल्याचे नमूद करुन सदर जागांव्यतिरीक्त अन्य तीन ठिकाणी एकूण **900** चौ.फुट जागेबाबत मागणी केली आहे. याबाबत ठेकेदाराने नागरीक अडथळे करुन मनाई करीत असल्याबाबत कोणतेही कागदोपत्री पुरावे जोडले नाहीत. तसेच प्रशासनाने कोणतीही शहानिशा न करता सदर ठिकाणे बदलून अन्य ठिकाणी जाहिरात फलक उभारण्याबाबत दि.**29/12/2014** नुसार परवानगी दिली आहे.

**8)** ठेकेदाराने दिनांक **23/12/2014** च्या पत्राव्दारे दरपत्रकांमध्ये नमूद केलेल्या **1225** चौ.फु. जागांच्या ऐवजी नवीन तीन ठिकाणी **900** चौ.फु. जागांची मागणी केली असून प्रशासनाने सुधारीत आदेशान्वये **1200** चौ.फु. जागा दिली असून ठेकेदाराच्या सोईनुसार सदर कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येते.

**9)** मे.गॅलेक्सी यांना देण्यात आलेल्या ठेक्याच्या अनुषंगाने त्यांनी थकीत ठेवलेली रु. **1,61,938/-** इतकी रक्कम महापालिकेने क्र.भिनिशमनपा/जा.वि./**333/2017** दिनांक **29/08/2017** नुसार नोटीस देऊन भरणा करण्याचे निर्देश दिले होते. सदर रक्कम भरणा केल्याबाबत कोणतेही अभिलेख उपलब्ध नाही.

**10)** जाहिरातींच्या कंत्राटासाठी महापालिकेने चुकीच्या पध्दतीने दरपत्रके मागवून कार्यवाही केली असल्याने वरील सर्व आक्षेपांचा खुलासा होईपर्यंत तीन वर्ष कंत्राट कालावधीची रक्कम रु. **3,81,000/-** आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DMEMRMM6801 (Ref No : 14, Hmm No : 25)

## *93 भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील शिवाजी चौक येथील प्लॉवर बेडवर सुशोभिकरण करुन जाहिरात करणे व कोंबडापाडयाकडे जाणा-या प्लॉवर बेडवर ट्रायव्हिजन लावण्याच्या कार्यवाहीमध्ये झालेल्या अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 9**

*लेखा शीर्ष : परवाना मंडई महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 96096.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 96096.00/-

***दरपत्रकांमध्ये स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत तसेच आयकर विभागाचा दाखला सादर***

***करण्याबाबत नमूद करण्यात आले असूनही दरपत्रके धारकांनी केवळ सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र तसेच आयकर ओळखपत्र दरपत्रकांबरोबर सादर केले आहे. व विभागाने कोणतीही शहानिशा न करता दरपत्रके ग्राहय ठरविली आहेत. जाहिरातींच्या कंत्राटासाठी महापालिकेने चुकीच्या पध्दतीने दरपत्रके मागवून कार्यवाही केली असल्याने वरील सर्व आक्षेपांचा खुलासा होईपर्यंत तीन वर्ष कंत्राट कालावधीची रक्कम (प्रथम वर्ष रु.26400, व्दितीय वर्ष रु.31680 व तृतीय वर्ष रु.38016) एकूण रु.96096/- इतकी रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.***

महापालिकेच्या जाहीरात परवाना विभागांतर्गत भिवंडी निजामपूर शहर महापालिका क्षेत्रातील शिवाजी चौक येथील प्लॉवर बेडवर सुशोभिकरण करुन जाहीरात करणे व कोंबडापाडयाकडे जाणा-या प्लॉवर बेडवर ट्रायव्हिजन लावण्याची कार्यवाही करण्यात आली होती. सदर कार्यवाहीमध्ये झालेल्या अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र.**29** दि.**22/06/2018** अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| **1** | दरपत्रक प्रसिध्दी दिनांक | **25/03/2014** |
| **2** | दरपत्रक कालावधी | **25/03/2014** ते **03/04/2014** |
| **3** | दरपत्रके प्राप्त | **03** |
| **4** | कार्यादेश क्र. | भिनिशमनपा/परवाना/जा.वि./**137/2014** दिनांक **03/05/2014** |
| **5** | कालावधी | दि.**01/05/2014** ते दि.**30/04/2017** |

**1)** भिवंडी निजामपूर शहर महापालिका क्षेत्रामध्ये जाहीरातीसाठी फलक उभारुन त्यावर जाहिरातीसाठी भाडयाने देणेबाबत संपूर्ण महानगर पालिका क्षेत्रामध्ये सर्वेक्षण करणे आवश्यक होते. उपलब्ध अभिलेख्यावरुन सदर सर्वेक्षण करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

**2)** जाहीरातींव्दारे महापालिकेचे अपेक्षित वार्षिक उत्पन्न रु. **24,000/-** इतके ठरविण्यात आले आहे. परंतू याबाबत कोणतीही आधारभूत कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

**3)** दरपत्रके मागविताना सदर ठेका तीन वर्षांच्या कालावधीसाठी असल्याबाबत कोठेही नमूद करण्यात आलेले नाही.

**4)** दरपत्रके संगणकीय प्रणालीवर प्रसिध्द केल्याचे तसेच वृत्तपत्रांमध्ये जाहिराती देण्यात आल्याचे अभिलेख आढळून आले नाहीत. तसेच दरपत्रके स्थानिक सूचना फलकांवर लावण्यात आल्याबाबत कोणतीही छायाचित्रे अभिलेखात आढळून आली नाहीत.

**5)** दरपत्रकांमध्ये स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्राची प्रत तसेच आयकर विभागाचा दाखला सादर करण्याबाबत नमूद करण्यात आले असूनही दरपत्रके धारकांनी केवळ सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र तसेच आयकर ओळखपत्र दरपत्रकांबरोबर सादर केले आहे व विभागाने कोणतीही शहानिशा न करता दरपत्रके ग्राहय ठरविली आहेत.

**6)** दरपत्रके मागविताना निश्चित केल्यानुसार कंत्राटदाराने शिवाजी चौक तसेच कोंबडपाडयाकडे जाणा-या रस्त्याच्या प्लॉवर बेडचे सुशोभिकरणाची कार्यवाही केली असल्याचे अभिलेख लेखापरीक्षणास आढळून आले नाही.

**7)** कंत्राटदारास दरवर्षी **20** टक्के वाढीने तीन वर्षासाठी ठेका देण्यात आलेला आहे. सदर टक्केवारी कशा प्रकारे निश्चित करण्यात आले याबाबत कोणतेही स्पष्टीकरण करण्यात आलेले नाही.

**8)** जाहीरातीचा अधिकार ठेंकेदारांस दिलेबाबत दि.**2.3.2016** रोजी मा. स्थायी समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्त यांनी दि.**09.03.2016** रोजीच्या बोलावण्यात आलेल्या व बैठकी नुसार सर्व जाहीरात ठेकेदारांचे कार्यादेश रदद करण्याच्या सुचना देण्यात येऊनही सदर कंत्राट कालावधी संपुष्टात येईपर्यंत ठेका सुरु ठेवण्यात आला होता.

**9)** जाहिरातींच्या कंत्राटासाठी महापालिकेने चुकीच्या पध्दतीने दरपत्रके मागवून कार्यवाही केली असल्याने वरील सर्व आक्षेपांचा खुलासा होईपर्यंत तीन वर्ष कंत्राट कालावधीची रक्कम (प्रथम वर्ष रु.**26400,** व्दितीय वर्ष रु.**31680** व तृतीय वर्ष रु.**38016)** एकूण रु.**96096/-** इतकी रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DMEMRMM6801 (Ref No : 15, Hmm No : 29)

## *94 शिक्षण मंडळ येथील शालेय पोषण आहार योजनेमधी वित्तीय वर्ष 2014-15 मधील रोखवहीतील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***शालेय पोषण आहार योजनेच रोखवही प्रत्येक दिवशी लिहलेली नाही. टंकलिखीत केलेली प्रत चिटकवलेली आहे. त्यामध्ये संपुर्ण वर्षामध्ये 12 महिन्याच्या 12 नोंदी आहे. वास्तविक रोखवही दररोज नियमित लिहीलेली पाहिजे. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. युनियन बँक ऑफ इंडीयाच्या पासबुक मध्ये वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये जमा व खर्चाचा व्यवहार झालेला आहे. पासबुकमध्ये खर्च रक्कम रु.3,37,20,360/- असुन जमा रक्कम रु.3,37,53,594/- असुन मार्च 2015 ला शिल्लक रक्कम रु.33243/- आहे. तरी संपुर्ण वर्षामध्ये प्रत्येक दिवसाप्रमाणे रोखवही नोंदवुन प्रत्येक महिन्याच्या अखेर मासिक गोषवारा काढुन तो बँक पासबुक प्रमाणे तयार करुन रोखवही व बँकेतील पासबुकमधील फरकाचे कारण प्रत्येक मासिक गोषवारामध्ये नमुद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.*** |

वित्तीय वर्ष 2014-15 मधील शिक्षण मंडळ भिवंडी येथील शालेय पोषण आहार योजनेची रोखवहीची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.104 दिनांक 29/09/2018 अन्वये अनुपालन मागविला असता करण्यास कळविले असता याबाबत विभागाने अनुपालन सादर केलेला नाही. त्यामुळे खालील अनियमितता झाले बाबत दिसून येत आहे.

महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 98 प्रमाणे ज्या अधिका-यांना रोख रक्कम स्विकारणे व हाताळण्याचे व्यवहार करणे आवश्यक आहे. अशा करिता पुढील नियमाचे पालन केलेले नाही.

1) शालेय पोषण आहार योजनेच रोखवही प्रत्येक दिवशी लिहलेली नाही. टंकलिखीत केलेली प्रत चिटकवलेली आहे. त्यामध्ये संपुर्ण वर्षामध्ये 12 महिन्याच्या 12 नोंदी आहे. वास्तविक रोखवही दररोज नियमित लिहीलेली पाहिजे. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही

2) युनियन बॅक ऑफ इंडीयाच्या पासबुक मध्ये वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये जमा व खर्चाचा व्यवहार झालेला आहे. पासबुकमध्ये खर्च रक्कम रु.3,37,20,360/- असुन जमा रक्कम रु.3,37,53,594/- असुन मार्च 2015 ला शिल्लक रक्कम रु.33243/- आहे. तरी संपुर्ण वर्षामध्ये प्रत्येत दिवसाप्रमाणे रोखवही नोंदवुन प्रत्येक महिन्याच्या अखेर मासिक गोषवारा काढुन तो बँक पासबुक प्रमाणे तयार करुन रोखवही व बँकेतील पासबुकमधील फरकाचे कारण प्रत्येक मासिक गोषवारामध्ये नमुद करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

FDSJRDM6801 (Ref No : 45, Hmm No : 104)

## *95 शिक्षण मंडळातील उपप्रमाणके रदद /विरुप न करणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***शिक्षण मंडळ भिवंडी येथे वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये एकही उप प्रमाणके विरुप केलेले नाही.***

वित्तीय वर्ष 2014-15 मधील दस्ताएवजाची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.61 दिनांक 24/08/2018 बाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे.

मुंबई शाळा मंडळ लेखासंहिता 1953 मधील नियम 7(5), महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियत 42 (3), महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम 55 तसेच महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 291 प्रमाणे उपप्रमाणकांचा लबाडीने वापर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी ज्या खर्चाचे प्रदान

झाले आहे असे प्रत्येक उप प्रमाणकावर रबरी शिक्क्याच्या सहाय्याने किंवा लाल शाईने पृष्ठांकन करुन रीतसर रदद करणे (विरुप) आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक महिन्याच्या शेवटी प्राधिकृत अधिका-याने (प्रशासन अधिकारी) आस्थापना खर्चाच्या बिलाखेरीज महिन्यातील सर्व बिले तपासुन खर्च योग्य त-हेने प्रमाणित करण्यांत आला असून उप प्रमाणके दुस-या कोणत्याही मागणी पृष्ठयर्थ वापरता येणार नाहीत. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये शिक्षण मंडळ भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील लेखा परिक्षण केले असता असे निदर्शनात आले कि एकही उप प्रमाणके विरुप केलेले नाही.

FDSJRDM6801 (Ref No : 49, Hmm No : 61)

## *96 कार्यालयीन वृत्तपत्रे खरेदी करताना झालेल्या अनियमितते बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : प्राथमिक शिक्षण विभा शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1435.00/-

***वित्तीय अधिकारी नियम पुस्तीका 1978 भाग-1 उपविभाग-2 अनु.क्र.43 नियम क्र.140 अन्वये वृत्त्पत्रे खरेदी केलेली नाहीत. वास्तविक उपरोक्त् वित्तीय अधिकार नियम पुस्तीकेमधील नियमानुसार एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्र खरेदी करता येते.परंतु कार्यालयाने एकुण 6 वृत्तपत्रे खरेदी केलेली आहेत.***

वित्तीय अधिकारी नियम पुस्तीका 1978 भाग-1 उपविभाग-2 अनु.क्र.43 नियम क्र.140 अन्वये वृत्त्पत्रे खरेदी केलेली नाहीत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शिक्षण मंडळ वृत्त्पत्रे खरेदी नस्ती तपासली असता उपलब्ध उपप्रमाणके माहे नोव्हे ते डिसेंबर 14 चे वृत्तपत्रे बिले तपासली असता कार्यालयाने 6 वृत्तपत्रे खरेदी केल्याचे दिसून येते. वास्तविक उपरोक्त वित्तीय अधिकार नियम पुस्तीकेमधील नियमानुसार एक मराठी व एक इंग्रजी वृत्तपत्र खरेदी करता येते.परंतु कार्यालयाने एकुण 6 वृत्तपत्रे खरेदी केलेली आहेत. याबाबत कार्यालयास 6 वृत्त्पत्रे आवश्यक असल्याबाबतचा खुलासा केलेला नाही. उपलब्ध बिले अनुक्रमे डिसेंबर2014 रु.720/- व नोव्हेंबर2014 रु.715/- अशी आहेत. इतर महीन्याची बिले नस्तीमध्ये उपलब्ध नसल्याने सदर दोन महिन्याची रक्कम रु.1435/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

याबाबत संबंधित विभागास अर्धसमास क्रमांक 72 दि.04/09/2018 निर्गमित केला असून याबाबतचे अनुपालन अप्राप्त आहे.

DATSLMM7301 (Ref No : 52, Hmm No : 72)

## *97 शिक्षण मंडळातील वित्तीय वर्ष 2014-2015 मधील रोखवहीतील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 98 प्रमाणे ज्या अधिका-यांना रोख रक्कम स्विकारणे व हाताळण्याचे व्यवहार करणे आवश्यक आहे. अशा करिता नियमाचे पालन करणे आवश्यक असताना तसे झाले नाही. पासबुकमधील माहे मार्च 2015 चे अखेर शिल्लकेवर बँक व्यवस्थापकाने स्वाक्षरीने शिल्लक नोंदविणे आवश्यक असताना नगर परिषद लेखासंहिता 1971 नियम 24 मध्ये तरतुद असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.***

वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये शिक्षण मंडळ भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील रोखवहीची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळुन येते.

अ) 1) राष्ट्रीय लेखा सहिता (NMAM) च्या प्रकरण 30 मध्ये ताळमेळ प्रक्रिया नमुद केली आहे. त्यानुसार ताळमेळ प्रक्रिया खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे. त 30.5 नुसार बँक ताळमेळ प्रक्रिया निश्चित केली असुन रोखवही (Form GEN-1) व बँक पासबुक यांचा ताळमेळ तक्ता क्र.30.2 मध्ये दरमहा करणे आवश्यक आहे व फरकाचा तपशिल नमुद करणे आवश्यक आहे. तथापि शिक्षण मंडळ भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथे अशा प्रकारची कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

ब) महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 98 प्रमाणे ज्या अधिका-यांना रोख रक्कम स्विकारणे व हाताळण्याचे व्यवहार करणे आवश्यक आहे. अशा करिता पुढील नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

1) रोखवही चालु करण्यापुर्वी त्या रोखवहीतील 1 ते 100 पाने असुन त्याबाबतचे प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखांनी सुरवातीच्या पृष्ठावर नमुद केलेले नाही. उपरोक्त नियमाचे उल्लघन झालेले आहे.

2) रोख रक्कमेचे सर्व व्यवहार करण्यात आल्याबरोबर रोखवहीमध्ये नमुद करावे लागेल व प्रत्येक नोंद तपासण्यात आल्याची खुण कार्यालय प्रमुख ती अनुप्रमाणित करेल.

3) रोखवही ही नियमितपणे पुर्ण करण्यात येवून तिची संपूर्णपणे तपासणी करण्यांत आलेली पाहिजे. कार्यालय प्रमुख हे रोखवहीतील बेरजेची स्वत: पडताळणी करील व त्यावर आपली आध्याक्षरी करेल.

4) प्रत्येक महिन्याच्या अखेरीस कार्यालय प्रमुख रोखवहीतील रोख शिल्लकेची पडताळणी करेल.व पडताळणी केली असल्याची सही व तारीख असलेले प्रमाणपत्र नोंदविल. असे प्रमाणपत्र नोंदविते वेळी आढळलेली शिल्लक रक्कम अंकामध्ये व अक्षरामध्ये नोंदविल. तसेच ही रक्कम रोखपुस्तकात दर्शविलेल्या अंतिम शिल्लकेशी बरोबर जुळत असेल तर तसे स्पष्टपणे नमुद करेल.

5) कॅशबुक लिहताना एखादया नोंदीमध्ये चुक झाल्यास किंवा ती बदलण्याची आवश्यकता असेल तर नोंदविलेल्या आकडयातच खाडाखोड किंवा उपरी लेखक न करता अशा नोंदीवर फक्त एकच रेष ओढून त्या शेजारीच योग्य ती नोंद घेण्यांत यावी व अशा प्रकारची प्रत्यक्ष दुरुस्ती कार्यालय प्रमुखाने दिनांकीत आद्याक्षरीने अनुप्रमाणित करावी.

रोखवही लिहीताना उपरोक्त नियमाचे पालन केलेले नाही.

क) इतर अनियमितता खालील प्रमाणे आहे.

1) रोखपाल यांनी प्रत्येक महिन्यात रोख वही व बँक विवरण यांचे महिनाअखेर ताळमेळ घेत असताना धनादेश महिन्याअखेर अदा केले तथापि ते त्या महिन्यात वटलेले नाही. त्यामुळे बँकेतील शिल्लल व रोखवहीतील शिल्लकेमध्ये तफावत आढळून येत आहे. तथापि रोखपाल यांनी अशा धनादेशाचा तपशिल धनादेशाचा दिनांक नमुद केलेला नाही. त्यामुळे कालबाहय धनादेशाचा तपशिल समजुन येत नाही.

2) पासबुकमधील माहे मार्च 2015 चे अखेर शिल्लकेवर बँक व्यवस्थापकाने स्वाक्षरीने शिल्लक नोंदविणे आवश्यक असताना नगर परिषद लेखासंहिता 1971 नियम 24 मध्ये तरतुद असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

उपरोक्त बाबत वित्तीय वर्ष 2014-2015 मधील अभिलेख्याची पडताळणी केली असता आढळुन आलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 84 दिनांक 07/09/2018 नुसार खुलासा करण्यास कळविलेले असता याबाबत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे वरील आक्षेप कायम करण्यात येत आहे.

FDSJRDM6801 (Ref No : 97, Hmm No : 84)

## ***98 शिक्षण मंडळातील वित्तीय वर्ष 2014-15 मधील अतिरिक्त तेलगु शिक्षकाबाबत व श्री. उपेद्रं लक्ष्मीपती संबारी, प्रशिक्षित पदवीधर यांना समन्वयक तथा सहाय्यक प्रशासनाधिकारी म्हणुन कार्यभार सांभाळणे कामी नियुक्तीबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष : शिक्षण विभाग प्राथमि महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***30 सप्टेंबर 2012 च्या पटसंख्येनुसार तसेच कार्यालयीन जा. क्र. 2157 दिनांक 12-04-2014 नुसार 11 तेलगु माध्यम शिक्षक अतिरिक्त ठरले. सदर शिक्षकाना मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांनी समायोजन किंवा मा. आयुक्त यांचे आदेशानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनावर समायोजन होईपर्यंत तातपुरत्या स्वरुपात मा. उपसंचालक/ अथवा शासनाचे यांचे आदेश होईपर्यंत इतर कार्यालयीन काम देणे आवश्यक आहे. या प्रकारे कार्यवाही झालेली नाही.श्री. संबारी हे कार्यभार संभाळत असलेले पद विस्तार अधिकारी समकक्ष आहे. त्या पदाप्रमाणे त्यांच्या आवश्यक असलेल्या अर्हता असलेली परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. श्री. संबारी यांना सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक संवर्ग परिक्षा उत्तीर्ण नसतांना त्या पदाचा कार्यभार शिक्षण जा.क्र. 330 दिनांक 15/06/2015 नुसार उत्तीर्ण होण्याच्या अधीन राहून नियुक्ती देण्यांत आलेली आहे. तरी या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.***

वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये शिक्षण मंडळ भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील आस्थापना मधील अभिलेख्याची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळुन येते.

1. 30 सप्टेंबर 2012 च्या पटसंख्येनुसार तसेच कार्यालयीन जा. क्र. 2157 दिनांक 12-04-2014 नुसार 11 तेलगु माध्यम शिक्षक अतिरिक्त ठरले. त्याबाबत महालेखापाल कार्यालयाने वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये आक्षेप नोंदविलेला आहे. वित्तीय वर्ष 2014-15 मध्ये 11 तेलगु माध्यमाचे शिक्षक अतिरिक्त आहेत. सदर शिक्षकांना शाळेमध्ये कोणत्याही प्रकारचे काम नसुन याबाबत शिक्षण मंडळाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. तरी सदर शिक्षकाना मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांनी समायोजन किंवा मा. आयुक्त यांचे आदेशानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनावर समायोजन होईपर्यंत तातपुरत्या स्वरुपात मा. उपसंचालक/ अथवा शासनाचे यांचे आदेश होईपर्यंत इतर कार्यालयीन काम देणे आवश्यक आहे. या प्रकारे कार्यवाही झालेली नाही. याबाबत लेखापरीक्षणास खुलासा सादर करावा.

2. शिक्षण मंडळ भिवंडी सर्वसाधारण सभा ठराव क्र. 250 दिनांक 19-06-2014 तसेच विषय क्र. 22 नुसार श्री

उपेद्रं लक्ष्मीपती संबारी, पदवीधर प्रशिक्षित तथा समन्वयक यांना सहाय्यक प्रशासन अधिकारी पदाचा कार्यभार सोपविणेबाबत असुन ठरावानुसार सदरचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत ठरावामध्ये नमुद आहे. मा. आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेला सक्षम प्राधिकारी ( नगर सचिव तथा नियंत्रण अधिकारी ) यांचे आदेश जा.क्र. 330 दिनांक 15-06-2015 नुसार श्री उपेद्रं लक्ष्मीपती संबारी, समन्वयक तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी यांना कोणतेही आर्थिक लाभ न देता शासनाच्या अंतिम मान्यतेच्या अधिन राहुन कामकाज सांभाळणे कामी नियुक्ती देण्यांत आलेली आहे. शासनाचे पत्र क्र.एस.एस.ए./2012/प्र.क्र.1(159)/प्रशि.4 शालेय शिक्षण विभाग मंत्रालय दिनांक 03/04/2012 संदर्भीय पत्रानुसार नुसार प्रशासन अधिकारी यांचे प.त्र. क्र.मनपाशिम /215/ 2012-13 नुसार श्री. संबारी यांना दिनांक 27/04/2012 पासुन शिक्षण मंडळ भिवंडी येथील कार्यालयात समन्वयक म्हणुन काम पाहण्याकरिता नियुक्त केले आहे. तसेच श्री. संबारी यांना नियमित वेतनाव्यतिरिक्त अन्य कोणताही मोबदला किंवा इतर भत्ते देय होणार नाही. मा. उपायुक्त (मुख्यालय) प.त्र. जा.क्र.भिनिशमनपा/शि.वि./2016-17/1019 दिनांक 25/10/201 नुसार श्री. संबारी यांना प्रशासन अधिकारी यांच्या अर्जित रजा / अनुपस्थितीत सन 2012-13 पासून कार्यभार देण्यात आल्याचे नमूद आहे.

श्री. संबारी हे कार्यभार संभाळत असलेले पद विस्तार अधिकारी समकक्ष आहे. त्या पदाप्रमाणे त्यांच्या आवश्यक असलेल्या अर्हता असलेली परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. श्री. संबारी यांना सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक संवर्ग परिक्षा उत्तीर्ण नसतांना त्या पदाचा कार्यभार शिक्षण जा.क्र. 330 दिनांक 15/06/2015 नुसार उत्तीर्ण होण्याच्या अधीन राहून नियुक्ती देण्यांत आलेली आहे. तरी या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. या बाबत खुलासा करण्यात यावा.

DATVRKM8002 (Ref No : 122, Hmm No : 166)

## *99 महानगरपालिका बालवाडीतील मुलांना पौष्टिक आहार म्हणून बिस्कीट खरेदीतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 9**

*लेखा शीर्ष : महिला व बालकल्याण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 609184.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 609184.00/-

***महानगरपालिकेच्या शाळेतील बालवाडी वर्गातील मुलांना पोष्टीक आहार म्हणून बिस्किट पुरविणेच्या स्विकृत***

***निविदेतील प्रियदर्शनी बचतगट यांचा व्यवसाय मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 नमुना (ड) (महाराष्ट्र दुकान व संस्था नियम 1961 च्या नियम 6 अन्वये) सरकारमान्य धान्य दुकान असा आहे. (दि.1/12/2009 रोजीचे नोंदणी प्रमाणपत्र) तसेच The Bombay Public trust ACT1950 schedule VII(vide Rule 17(1) च्या नोंदणी प्रमाणपत्रामध्ये त्यांचा व्यवसाय केरोसीन, ग्रेन्स, पामऑईल यांची विक्री व अन्न व औषध प्रशासनाच्या नोंदणी प्रमाणापत्रावर शालेय पोषण आहार असा व्यवसाय नमुद केलेला आहे. सेल्स टॅक्स नोंदणी प्रमाणपत्रावर Form B (see Rule 5(1)) वर Food item व form 102 (see Rule 9) वर Nature of business imports, works contract असा व्यवसाय नमुद केलेले आहे. तरीही निविदा मंजुर केलेली आहे. त्यामुळे योग्य पुरवठादाराची निवड करण्यात आलेली नाही.***

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र .संकीर्ण -2005/प्र.क्र.255/05/नवि-20, मंत्रालय मुंबई-32 दि. 8 नोव्हेंबर 2010 नुसार मनपाने महानगरपालिकेच्या बालवाडीमधील एकुण 1210 मुलांना पौष्टिक आहार म्हणून गुड डे बिस्किटचा पुडा पुरविलेला आहे . सदर खरेदीची नस्ती तपासली असता खालील अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1. महानगरपालिकेच्या शाळेतील बालवाडी वर्गातील मुलांना पोष्टीक आहार म्हणून बिस्किट रविणेच्या स्विकृत निविदेतील प्रि यदर्शनी बचतगट यांचा व्यवसाय मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 नमुना (ड) (महाराष्ट्र दुकान व संस्था नियम 1961 च्या नियम 6 अन्वये) सरकारमान्य धान्य दुकान असा आहे . ( दि.1/12/2009 रोजीचे नोंदणी प्रमाणपत्र )तसेच The Bombay Public trust ACT1950 schedule VII(vide Rule 17(1) च्या नोंदणी प्रमाणपत्रामध्ये त्यांचा व्यवसाय केरोसीन, ग्रेन्स, पामऑईल यांची विक्री व अन्न व औषध प्रशासनाच्या प्रमाणापत्रावर शालेय पोषण आहार असा व्यवसाय नमुद केलेला आहे. सेल्स टॅक्स Form B (see Rule 5(1)) वर Food item व form 102 (see Rule 9) वर Nature of business imports, works contract असा व्यवसाय नमुद केलेले आहे. तरीही निविदा मंजुर केलेली आहे . त्यामुळे योग्य पुरवठादाराची निवड करण्यात आलेली नाही . सदर निविदेमध्ये अधिकृत विक्रेते किंवा उत्पादक आवश्‍ क होते अधिकृत विक्रेते नसतांना निविदा मंजुर करण्यात आलेली आहे.

2. कार्यादेश दिनांक 20.11.2014 रोजी देण्यात आला होता त्यानुसार तेव्हापासून बिस्कीट वाटप करण्यास सुरुवात करणे आवश्यक असतांना प्रत्यक्षात सुरुवात दि .24/11/2014 पासून केलेली असल्याने 4 दिवस उशीराने सुरुवात केलेली आहे. करारनाम्यातील अट प्रमाणे प्रति दिवस 100 रुपये प्रमाणे दंड आकारणी केलेली नाही.(हा दंड खुपच अत्यल्प आहे)

3. स्विकृत निविदाकाराने प्रति बिस्कीट पुडा दर 4.85/-(कमी दर ) दिलेला आहे . त्यानंतर त्याच्याशी वाटाघाटी करुन दर आणखी कमी करणे आवश्यक होते.

4. उद्योग ऊर्जा कामगा र विभाग शा .नि.क्र. मुलेसा 2008/प्र.क्र.272/ उद्योग 04/ दि.24.11.2008 नुसार 5 ते 50 लक्ष पर्यंतच्या खर्चाच्या निविदा जाहिरात राज्यस्तरावरील मराठी / हिंदी वृत्तपत्रात देणे आवश्यक असताना जाहिरात केवळ दैनिक तरुण भारत मुंबई आवृत्ती या वृत्तपत्रामध्ये दिलेली आहे.

5. शाळाकडून प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची प्रत्येक महिन्याची एकुण उपस्थिती बेरीज संबंधीत

शाळांनी पेन्सिलने नमुद केलेली आहे. पक्क्या शाईने नमुद केलेली नाही.

6. बालवाडी शिक्षकांनी दिलेल्या प्रमाणपत्रावर वाटप सुरुवात दिनांक नमुद नाही.(13 शाळांच्या)

7. वाढीव विद्यार्थी संख्येस मा .आयुक्तांची मान्यता घेण्यात आलेली नाही . दि.22/08/2013 च्या टिपण्णी मध्ये विद्यार्थी संख्या 1200 (सन 2013-14 मध्ये) नमुद केलेली आहे . तसेच 4/9/2013 च्या टिपण्णी विद्यार्थी संख्या 1210 (4 सप्टेंबर 2013 अखेर ) नमुद केलेली आहे. तसेच सन 2014-15 मध्ये (सप्टेंबर 2014 अखेरची) एकुण 24 बालवाडीतील एकुण विद्यार्थी 1458 दर्शविली आहे. (विद्यार्थी संख्या 248 ने वाढलेली आहे.)

8. सदर बिस्किटच्या पुडयाचे दर बाजार भावाशी सुसंगत असल्याचे प्रमाणपत्र नस्तीमध्ये नाही . खरेदी केलेल्या बि स्किट पुडयाचे वजन ठरविण्यात आलेले नाही . निविदेत केवळ लहान बिस्किटचा पुडा असा उल्लेख केलेला असल्याने किती वजनाचा लहान बिस्किटचा पुडा देण्यात आलेला आहे. याची खात्री होत नाही.

9. सदर कामाचा खर्च 5 लाखापेक्षा जास्त असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(ड) अन्वये स्थायी समितीची मंजुरी घेतलेली नाही.

याबाबत संबंधित विभागास अर्धसमास क्रमांक 88 दि.18/09/2018 निर्गमित केला असून याबाबतचे अनुपालन अप्राप्त आहे.

DATSLMM7301 (Ref No : 54, Hmm No : 88)

## *100 महानगरपालिका पूर्व प्राथमिक शाळेतील बालवाडी विद्यार्थ्यांना शाळेचे दप्तर खरेदी करुन पूरविणेत झालेल्या अनियमितते बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 13**

*लेखा शीर्ष : महिला व बालकल्याण महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 360250.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 360250.00/-

***सदर खरेदीबाबत निविदेची जाहिरात दैनिक प्रहार या वृत्तपत्रात देण्यात आलेली आहे. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दि.31/08/2009 मधील क्र.12 नुसर जाहिरात ज्या एका कामाचे मुल्य रुपये 25 लाखापर्यंत आहे. अशी जाहिरात एका क वर्ग दैनिक व एक साप्ताहिक या प्रमाणे देणे आवश्यक आहे. या प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक होते. परंतु या निविदेची जाहिरात केवळ देनिक प्रहार या एकाच वृत्तपत्रात दिली आहे. सबब उपरोक्त शासन निर्णयाचे पालन झालेले नाही. या निविदेसाठी निविदा कालावधी 04/01/2014 ते 13/01/2014 एकुण 10 दिवस इतका देण्यात आलेला आहे. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांरवस 1088/(2512)/उद्योग-6 दि:02/01/1992 च्या शासन निर्णयातील अनु. 8.3(अ)***

***नुसार निविदा भरण्यासाठी किमान तीन आठवडे इतका कालावधी आवश्यक असतांना हा कालावधी कमी देण्यात आलेला आहे. वरील दोन्ही कारणांमुळे स्पर्धात्मक दराचा लाभ होऊ शकला नाही.***

लेखापरिक्षण वर्षे :- 2014-15

लेखाशिर्ष :- महिला व बाल कल्याण मनपा निधी

अनियमितता कलम :- 9 ड

महानगरपालिका पूर्व प्राथमिक शाळेतील बालवाडीतील (एकुण् 1310) विद्यार्थ्यांना सन 2013-14 या शैक्षणिक वर्षासाठी दप्तराच्या पुरवठयासाठी दै.प्रहार या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार पात्र निविदाकारांकमधून मे.ओम साई इंटरप्रायझेस रक्षाज या किमान दर असलेल्या निविदाकारास न्युनत्तम दराबाबत वाटाघाटी करण्यास बोलविण्यात आले.

या बाबतच्या प्राप्त संचिकेचे लेखापरिक्षण केले असता पुढील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | महानगरपालिका पूर्व प्राथमिक बालवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेचे दप्तर खरेदी करुन पुरविणे |
| निविदा सुचना | 4 जानेवारी 2014 |
| प्रशासकिय मान्यता | मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.5 दि.30/08/2015 व मा.महासभा ठराव क्र.47 दि.30/08/2013 |
| दराची निश्चिती | प्रति नग 275X1310=360250 |
| लेखाशिर्ष | लेखाशीर्ष:- महिला व बालकल्याण तरतुद 1 कोटी 72 लाख 921 हजार<br>प्रस्ताविक खर्च 512000+640000=1152000 शिल्लक 160,60,0000/- |
| वर्तमानपत्र | दै.प्रहार |
| निविदा कालावधी | दि.04/01/2014 ते 13/01/2014 |
| प्रदान रक्कम | 2,57,250 |

1. उपरोक्त निविदेची जाहिरात दैनिक प्रहार या वृत्तपत्रात देण्यात आलेली आहे . सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र .जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दि.31/08/2009 मधील क्र .12 नुसर जाहिरात ज्या एका कामाचे मुल्य रुपये 25 लाखापर्यंत आहे अशी जाहिरात एक क वर्ग दैनिक व एक साप्ताहिक या प्रमाणे देणे आवश्यक आहे . या प्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक होते . परंतु या निविदेची जाहिरात केवळ देनिक प्रहार या एकाच वृत्तपत्रात दिली आहे . सबब उपरोक्त शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

2. या निविदेसाठी निविदा कालावधी 04/01/2014 ते 13/01/2014 एकुण 10 दिवस इतका देण्यात आलेला आहे . उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र .भांरवस 1088/(2512)/उद्योग-6 दि.02/01/1992 च्या शासन निर्णयातील अनु . 8.3(अ) नुसार निविदा भरण्यासाठी किमान तीन आठवडे इतका कालावधी आवश्यक असतांना हा कालावधी फक्त 10 दिवस

देण्यात आलेला आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ होऊ शकला नाही.

3. निविदा प्रक्रियेमध्ये पुरवठादाराची पत तसेच इतर आवश्यक बाबींचा (उदा.वार्षिक उलाढाल मर्यादा, निविदेतून माघार घेतल्यास निविदा अनामत रक्कम जप्त करणे वगैरे ) उल्लेख निविदेत नसल्यामुळे योग्य क्षमतेचे निविदाकार स्पर्धेत आल्याचे दिसून येत नाही.

4. मा.महासभा ठराव क्र.47 दि.30/08/2013 ची प्रत नस्तीमध्ये आढळून आली नाही.

5. जाहिर निविदेत व निविदा नस्तीत खरेदी करण्यात येणा -या मालाची ठराविक गुणवत्ता व दर्जा याबाबतचा उल्लेख नाही . निविदाकारांनी सादर केलेले दर हे प्रत्येक निविदाकारांच्या स्वत :च्या नमुन्यानुसार नमुद केलेले आहेत. प्राप्त निविदाकारांचे त्यांच्या नमुन्यानुसार दर नमुद केल्यामुळे एका समान गुणवत्तेसाठी दरात स्पर्धा घेऊ शकली नाही . तसेच निविदाकाराने मालाचा पुरवठा केल्यावर सदर मालाची निवि दा प्रकियेच्या वेळी सादर केलेल्या नमुन्याच्या तुलनेत गुणवत्ता तपासणी झाली नाही.

6. म.शा.उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा .नि.क्र.भांखस 1088/ ( 2512)/उद्योग-6 दि.02/01/1992 मधील 8.4 नुसार चिन्हांकित (BIS इ.) नसलेल्या वस्तीची खरेदी करताना खरेदीदार विभाग स्व त:च एखाद्या वस्तुच्या दर्जाविषयी तपासणी करु शकत नसेल अशा वेळी मालाच्या दर्जाविषयी त्रयस्थ संस्थाकडून प्रमाणपत्रे , पुरवठापुर्व तपासणी करुन घेणे बंधनकारक आहे . याकरिता निविदा काढताना वस्तूची तपासणी ज्या संस्थेद्वारे करावयाची आहे त्या त्रयस्थ संस्थेचे नाव यां चा उल्लेख संबंधित खरेदी अधिका-याने करणे आवश्यक आहे.

7. पुरवठा केलेल्या मालाच्या (दप्तराची बॅग) दर्जा विषयीची तपासणी पुरवठा दाराने व्हिक्टोरिया जुबिली टेक्निकल इंस्टीटयुट माटुंगा रोड मुंबई 19 यांच्या कडून केलेली आहे. परंतु 2.1.1992 च्या शासन निर्णयामध्ये सदर संस्थेकडून अभियांत्रिकी प्लॅस्टीक व अभियांत्रिकी उत्पादने तपासून मिळतात. त्यामुळे उपरोक्त् शासन निर्णयाप्रमाणे विहीत केलेल्या संस्थेकडून तपासणी केलेली नसल्याने उपरोक्त तपासणी बाबत शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

8. कार्यालयाच्या 20.06.2013 रोजीच्या टिप्पणी मध्ये महानगरपालिकेमध्ये महिला व बालकल्याण समिती गठित नसल्याचे नमुद केलेले आहे . व म.शा.राजपत्रक असाधारण भाग चार मे 21,2011/वैशाख 31 शके 1933 आर.एन.आय.एम.ए.एच.बी.आय.एल./2009/35530 नुसार कोणीतीही समिती किंवा विशेष समिती कोणत्याही वेळी गठित नसे ल तेव्हा प्रस्तावास खर्च महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली करता येईल असे नमुद केले आहे व दि .28/11/2013 रोजीच्या मान्य टिप्पणी मध्ये बालवाडीतील मुलांना शाळेचे दप्तर पुरविणे कामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळून महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.5 दि.30.08.2012 व मा.महासभा ठराव क्र. 47 दि.20.11.2013 रोजी ठराव प्राप्त झाले असे नमुद केलेले आहे. याबाबत लेखापरिक्षणास खुलासा केलेला नाही.

9. खरेदी केलेल्या मालाचे दर बाजार भावानुसार वाजवी असल्याचे कशाच्या आधारे निश्चित करण्यात आले. याबाबत लेखा परिक्षणास माहिती देण्यात आलेली नाही.

10. खरेदी केलेल्या दप्तर साहित्य लाभार्थी नावाची यादी नस्तीसोबत नाही.

11. पुरवठा करावयाचे परिमाण टेंडर मध्ये 1210 नमुद केलेले आहे. व ठरावमध्ये 1310 नमुद केलेले आहे.

12. मनपाने पुरवठादाराने माल पुरविल्यानंतर शासन मान्य प्रयोग शाळेतून पुरवठा केलेला माल गुणवत्ता व दर्जा नुसार योग्य असल्याचे तपासणी करुन घेतलेले प्राप्त नस्तीवरुन आढळून आले

नाही.(नगरसचिव कार्यालय टिप्पणी दि.20.062014)

13. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील आदेशान्वये महानगरपालिकेची रुपये 200,000 वरील सर्व कामे ई निविदा पध्दतीने करणेकामी निर्देश असल्याने बालवाडीतील मुलांना दप्तर ई निविदेद्वारे दर मागवून खरेदी करणे योग्य राहिल या मंजुर टिप्पणी नुसार कार्यवाही झाल्याचे प्राप्त नस्तीवरुन आढळून आले नाही.

याबाबत संबंधित विभागास अर्धसमास क्रमांक 92 दि.18/09/2018 निर्गमित केला असून याबाबतचे अनुपालन अप्राप्त आहे.

DATSLMM7301 (Ref No : 56, Hmm No : 92)

## *101 ग्रंथालय विभागातील विविध भाषेची वर्तमानपत्रे, साप्ताहिके मासिके, व दिवळी अंक खरेदी बाबत झालेल्या अनियमितते बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : ग्रंथालय महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 569109.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 569109.00/-

***महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भारवस 1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय मुंबई-क दिनांक 2/1/1992 च्या शासन निर्णयातील 8.3 (ह) मधील पुनर्प्रत्ययी आदेश बाबत मार्गदर्शक तत्वाचे अनुपालन करण्यात आलेले नाही.***

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या ग्रंथालय विभागाने विविध भाषेची वर्तमानपत्रे,साप्ताहिके, मासिके व दिवाळी अंक यासाठी सन 2014-15 मध्ये रक्कम रुपये 569109 एवढा खर्च केलेला आहे.

महानगरपालिकेच्या मुख्यालयात व विविध वाचनालयात वाचनालय जा.क्र.2/ 2013-14/ दि.6.52013 अन्वये मे.महाराष्ट् स्टॉल मंडई यांनी साप्ताहिके, मासिके यावर 5% सुटीने तर वृत्त्पत्रावर कोणतीही सुट न देता वृत्त्पत्रे व मासिके दि.31/3/2014 पर्यंत या मुदतीच्या दिनांका पर्यंत पुरविली होती. परंतु दिनांक 19/03/2014 च्या टिप्पणीनुसार सन 2014-15 साठी आचार संहिता असल्यामुळे त्यांना माहे एप्रिल, मे 2014 या दोन महिन्यासाठी पुर्वी प्रमाणे वृत्तपत्रे व मासिके पुरविणे साठी जा.क्र.भि.नि.श.मनपा/ग्रंथालय/29/13-14दिनांक 17/04/2014 नुसार कार्यादेश देण्यात आले.

दि.5.6.2014 रोजीच्या कार्यालयीन टिप्पणीनुसार आदर्श आचार संहिता लागू असल्यामुळे 31/05/2014 पर्यंत प्रस्तावास मान्यता न मिळाल्यामुळे उर्वरीत कालावधीसाठी निविदा काढू न शकल्याने व भाग 4 जून

2014 रोजी प्रस्तावास मान्यता मिळाल्याने पुन्हा 30 जून 2014 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

याबाबत सदर नस्तीमध्ये खालील त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

1. जा.क्र.1 भि.नि.श.मनपा/डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय/47/2014 दि.12/09/2014 नुसार पुन्हा निविदेची प्रक्रीया होई पर्यंत माहे जुलै ते डिसेंबर 2014 पर्यंत पुर्वीच्या दराने वाचन साहित्य पुरविण्यास मुदतवाढ देण्यात आली. माहे जाने 2015 ते मार्च 2015 या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबतचा कार्यादेश,मुदतवाढ प्रस्ताव नस्तीमध्ये नाही.

2. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भारवस 1088/(2512)/उद्योग-6 मंत्रालय मुंबई-क दिनांक 2/1/1992 च्या शासन निर्णयातील 8.3 (ह) मधील पुनर्प्रत्ययी आदेश बाबत मार्गदर्शक तत्वाचे अनुपालन केल्या बाबत खुलासा केलेला नाही.

3. वार्षिक टेंडर मागविणेबाबतची कार्यवाही वार्षिक टेंडरची मुदत संपण्यापुर्वी पुरेशा कालावधीत सुरु करण्यात आलेली नाही. एका स्वरुपाच्या कामावर होणारा खर्च दोन लाखापेक्षा जास्त असेल तर मुंबई महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसुची ड मधील प्रकरण पाच प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4. माहे जाने 2015 ते मार्च 2015 या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबतचा कार्यादेश,मुदतवाढ प्रस्ताव नस्तीमध्ये नाही.

5. वार्षिक टेंडरला मुदतवाढ देताना करार केला नसल्याने मुद्रांक शुल्काचे नुकसान झालेले आहे.

6. ग्रंथालय विभागाने पुस्त्कांच्या साठयांची परिगणना लेखापरिक्षण वर्ष सन 2014-15 पुर्वी व नंतर कधी केलेली आहे. याबाबतच्या माहितीची नस्ती लेखापरिक्षणास सादर केलेली नाही.

7. महानगरपालिकेचे ग्रंथालय विभाग सभासदाकडून सभासद वर्गणी रु.20/- प्रती महिना अनामत रु.100/- व प्रवेश फी रु.5/- याप्रमाणे सभासद फी आकारत असून याबाबतच्या ठरावाची नस्ती लेखापरिक्षणास सादर केलेली नाही.

याबाबत संबंधित विभागास अर्धसमास क्रमांक 93 दि.18/09/2018 निर्गमित केला असून याबाबतचे अनुपालन अप्राप्त आहे.

DATSLMM7301 (Ref No : 57, Hmm No : 93)

## *102 महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियमाप्रमाणे वृक्ष प्राधिकरण समिती गठीत केली नसल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष :उद्यान महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

***महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियमाप्रमाणे वृक्ष प्राधिकरण समिती गठीत केलेली नाही. सन 2013-14 ते 2017-18 या 5 वर्षाच्या कालावधीसाठी समिती अस्तित्वात नव्हती.***

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियम 3(1) अन्वये कमीत कमी 5 आणि जास्तीत जास्त 15 व्याक्तिंची एक वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम 1975 च्या नियमाप्रमाणे ठेवलेल्या दप्तराची तपासणी केली असता नियम क्र.4(1) अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक प्रत्येक महिन्यात मा. अध्यक्ष ठरवतील अशा ठिकाणी व वेळी घेण्यात येणे आवश्यक आहे. सदर वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठका दर महिन्याला होणे आवश्यक आहे. परंतु उद्यान विभागाने ठेवलेल्या दप्तराची तपासणी केली असता सन 2013-14 ते 2017-18 पर्यंत वृक्ष प्राधिकरण समिती गठीत झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. सबब नियमाचे उल्लंघन झाले आहे. साधरणता 5 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी समिती अस्तित्वात नव्हती. या बाबत लेखापरीक्षणास संयुक्तीक अनुपालन सादर करण्याबात अर्धसमास पत्र क्र.163 दि. 05/11/2018 अन्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही.

DATVRKM8002 (Ref No : 63, Hmm No : 163)

## *103 पाणीपुरवठा व बांधकाम विभागाने जंगम मालमत्ता नोंदवही न ठेवणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 01**

*लेखा शीर्ष : पाणी पुरवठा/बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***पाणी पुरवठा मलनिस्सारण विभाग व बांधकाम अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जंगम मालमत्ता नोंदवही अदयावत न ठेवल्यामुळे जंगम मालमत्तेबाबत पडताळणी न झाले बाबत.***

महानगरपालीका वित्तीय वर्ष 2014-2015 चे लेखापरीक्षण केले असुन या आर्थिक वर्षाअखेर पाणी पुरवठा मलनिस्सारण विभाग व बांधकाम अंतर्गत अभिलेख्याची पडताळणी केली असता नगरपालिका लेखा संहिता 1971 चे

नियम 144 नुसार पाणीपुरवठा व बांधकाम विभागाने आपल्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिकेच्या सर्व चल/अचल साधनसामग्री, साहित्य, वस्तु उदा. पाईपालाईन, सलयुज हॉल, इंधन मोटारी, विदयुतपंप, विविध यंत्रसामग्री, जलशुध्दीकरण यंत्र,फर्निचर,जनरेटर,पंखे,संगणक,कपाटे,वाहने इत्यादी विविध प्रकारच्या जंगम साहित्याची नोंद नमुना क्रमांक 114 मध्ये विहीत नमुन्यात नोंदी वेळोवेळी नोंदविणे आवश्यक असतांना विभागाने नियमानुसार नोंदी घेतलेल्या नाही यामुळे सन मार्च 2015 अखेर विभागाकडे असलेल्या जंगम मालमत्तेतील साहित्य प्रकार, नग, खरेदी कालावधी, किंमत, वापर करणारी यंत्रणा, अधिकारी /कर्मचारी नांव, साहित्य सदयस्थिती नोंद, वापर ठिकाण इत्यादी बाबींची अचुकता नोंदवही न ठेवल्या मुळे पडताळणी करता आली नाही.

वरील नमुद नियमानुसार विहीत नमुन्यात जंगम मालमत्ता नोंदवही अदयावत ठेवणे आवश्यक असून आपल्या कार्यक्षेत्रात विविध प्रकारनिहाय पानावर स्वतत्र नोंदी घेवून नियमातील तरतुदीप्रमाणे नियमीत वर्ष समाप्तीनंतर सदर मालमत्ता सुस्थितीत व वापरयोग्य असल्याचे सक्षम प्राधिकारी यांनी पडताळणी केलेले प्रमाणपत्र नोंदवहीस नोंदविणे आवश्यक असून अशी जंगम मालमत्ता नोंदवही अनुपालन कामी उपलब्ध करण्यात यावी. उपयोगात न येणारे साहित्य/ यंत्रसामग्री/ वाहन बंद स्थितीत असलेले/पडून असलेले निर्लेखन करुन रक्कम शासनखाती भरणा करण्यात यावी. विभागाने यापुर्वी योग्य ती कार्यवाही केलेली नाही. तरी, जंगम मालमत्ता नोंदवही परिरक्षीत करुन अदयावत मालमत्तेच्या नोंदीसह सक्षम प्राधिकारी यांचे कडून प्रमाणित करुन अनुपालन दर्शविणे बाबत अर्धसमास क्र. 109 दिनांक 05/10/2018 अन्वये पाणीपुरवठा विभागास व अर्धसमास क्र.110 दिनांक 05/10/2018 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत काहीही खुलासा करण्यात आला नाही.

DATVRKM8002 (Ref No : 67, Hmm No : 108)

## *104 दिर्घकाळापासून प्रलंबित अग्रीम 4.51 कोटीचे समायोजन न झाल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 45111443.00/-

***मनपाच्या विविध कामांसाठी/ प्रयोजनांसाठी विविध संस्था/ कार्यालये/ कर्मचारी यांना अग्रीम देण्यात आलेले असून, सदर अग्रीम रकमांचे दिर्घकाळापासून अग्रीम समायोजन झालेले नाही. विभागाने वेळोवेळी आढावा न घेतल्यामुळे मनपा निधीतुन देण्यात आलेल्या रुपये 45111443 प्रलंबित अग्रीम दिसून आले आहे.***

महाराष्ट्र महानगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्र.189 नुसार मनपाकडून विविध कामांसाठी अग्रीम देण्यात येतात. अशा रकमांचा हिशोब फॉर्म क्र.147 मध्ये ठेवण्यात येतो. सदर नोंदवहीमध्ये मागील वर्षापर्यंत प्रलंबित असणाऱ्या रकमा, चालु वर्षात देण्यात आलेले अग्रीम त्यातुन

समायोजन झालेल्या अग्रीमाचा रकमा नोंदविण्यात येतात व या रकमा जोपर्यंत पूर्ण समायोजित होत नाहीत तो पर्यंत अशा रकमांचा हिशोब ठेवावा लागतो. साधारणपणे अशा अग्रीम रकमांचा वेळोवेळी आढावा घेऊन त्यांचे समायोजन करुन अशा रकमा मनपा निधीकडे वर्ग करणे आवश्यक असते. मनपाच्या सदर नोंदवहीची तपासणी केली असता खालीलप्रमाणे प्रलंबित अग्रीमे दिसून आली आहेत.

| अ.क्र. | अग्रीमाचा प्रकार | मागील प्रलंबित रक्कम | चालु वर्षात दिलेले अग्रीम | एकूण अग्रीम रक्कम | समायोजित झालेले अग्रीम | एकूण प्रलंबित अग्रीम 31/3/15 अखेर | कोणत्या वर्षापासून प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मनपा कर्मचारी | 10930834 | 17067885 | 27998719 | 3264650 | 24734069 | सन 78-79 पासून |
| 2 | ठेकेदार | 9092938.78 | 0 | 9092938.78 | 0 | 9092938.78 | सन 61-62 पासून |
| 3 | भुखंड खरेदी | 4040375.83 | 0 | 4040375.83 | 0 | 4040375.83 | सन 72-73 पासून |
| 4 | वाहनचालक | 121006.70 | 0 | 121006.70 | 0 | 121006.70 | सन 84-85 पासून |
| 5 | वकील फी | 755140 | 0 | 755140 | 0 | 755140 | सन 73-74 पासून |
| 6 | शासकीय कार्यालये | 1762427.70 | 0 | 1762427.70 | 0 | 1762427.70 | सन 54-55 पासून |
| 7 | औषध खरेदी | 4605485 | 0 | 4605485 | 0 | 4605485 | सन 83-84 पासून |
| | एकूण (रुपये) | 31308208 | 17067885 | 43376093 | 3264650 | 45111443 | |

तथापि या प्रलंबित अग्रीमाचा लेखा विभागाकडून वेळोवेळी आढावा घेतला गेला नाही. त्यामुळे दिर्घकाळापासून रकमा अडकल्या आहेत. तरी सदर रकमा वसूल करण्यात याव्यात. याबाबत अर्धसमास

पत्र क्र.130 दि.10/10/2018 अन्वये विचारणा करता, विभागाकडून दि. 12/10/2018 रोजीच्या अनुपालनात समर्पक खुलासा सादर करण्यात आला नाही.
वसूलपात्र रक्कम रुपये 45111443/-

DGPSAAM7402 (Ref No : 71, Hmm No : 130)

## *105 महापालिकेच्या विविध खात्यातील संगणकीकृत रोखडवही व बँक स्टेटमेंट मधील तफावती बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 23679698.00/-

***महाराष्ट्र नगरपालिका लेखासहिता1971 चे नियम 51(1) व (3) नुसार तसेच राष्ट्रीयनगरपालिका लेखा नियमावली 2003 चेनियम 29.3.1,29.3.2 नुसार रोखेवही रोजच्या रोज बंद न करणे, प्रत्येक महिना अखेर तसेच वर्षा अखेर बँक ताळमेळ न घेणे, विकास निधीच्या रोखवही नुसार वर्षा अखेर बँकेतील शिल्लक ही रोखवहीत नमुद वर्षा अखेर शिल्लकेपेक्षा रु. 23679698/- ने कमी आहे.***

महापालिकेच्या विविध **बँक** खात्याबाबत ठेवलेल्या संगणकीकृत रोख वहया व बँक स्टेटमेंट यांची तपासणी केली असता वर्षाअखेर तसेच दरमहा बँक ताळमेळ घेण्यात आला नसल्याचे दिसून आले. या बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | खात्याचे नाव | बँक खाते क्र.<br>बँकेचे नाव | संगणकीकृत रोखवही प्रमाणे अखेरची शिल्लक | बँक स्टेटमेंट प्रमाणे अखेरची शिल्लक | तफावत |
|---|---|---|---|---|---|
| 1. | आमदार निधी | इंडीयन बँकA/c No. 898834910 | 25407220 | 33640212 | 8232992 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2. | अनामत खाते | युनियन बँकA/c No. 320402010750289 | 12814623.50 | 11443125.34 | 1371498.16 |
| 3. | नागरी दलीत वस्ती सुविधा | सेंट्रल बँक ऑफ इंडीया A/c No. 149437715 | 10370789 | 16503632.82 | 6132843.82 |
| 4. | मुलभूत सोयी सुविधा | बँक ऑफ महाराष्ट् A/c No. 20133852149 | 4508949 | 4590182 | 81283 |
| 5. | अल्पसंख्यांक निधी | एक्सीस बँकA/c No. 591010100044299 | 1431476 | 1499610 | 68134 |
| 6. | रोड फंड | बँक ऑफ महाराष्ट् A/c No. 20133864711 | 4535820.01 | 4689877.01 | 154057 |
| 7. | 13 वा वित्त् आयोग निधी | बँक ऑफ महाराष्ट् A/c No. 60062419193 | 52896181 | 55836441 | 2940260 |
| 8. | पेन्शन फंड | सेंट्रल बँक ऑफ इंडीया A/c No. 1494375297 | 849565.12 | 1016226.12 | 166661 |
| 9. | प्रॉव्हिडंट फंड | युनियन बँकA/c No. 320401010012005 | 15794444.56 | 11262475.61 | 4531968.95 |

विभागाने फक्त संगणकीकृत रोखवही ठेवलेली आहे. महानगरपालिका लेखा नियमावली 2003 नियम 29.3.1(अ) नुसार तसेच 5-34 नुसार रोखवही रोजच्या रोज बंद करणे मासिक, वार्षिक गोषवारा काढणे याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

महानगरपालिका लेखा नियमावली 2003 नियम 29.3.2(अ) नुसार प्रत्येक महिना अखेर बँकेमध्ये शिल्लक रकमांचा रोखवही प्रमाणे शिल्लक रकमेचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियमावलीचा नियम 307 मध्ये ताळमेळ घेण्याची पध्द्त व याबाबतचा विहित नमुना क्र.3002 सुध्दा देण्यात आला आहे व नियम 534 नुसार विभाग प्रमुखाने असा बँक ताळमेळ प्रमाणित करणेचा आहे. तथापि अशा प्रकारे नियमानुसार

कार्यवाही करण्यात न आल्याने रोखवही व बँक स्टेटमेंटच्या रकमातील तफावतीची कारणे समजली नाहीत.

विभागास याबाबत अर्धसमास क्रमांक 135 दिनांक 11/10/2018 रोजी अर्धसमास पत्र निर्गमित करण्यात आले होते. विभागाचे अनुपालन अप्राप्त् आहे.

DATSLMM7301 (Ref No : 107, Hmm No : 135)

## *106 मुदतबाह्य व न वटलेल्या धनादेशाची रक्कम मनपा फंडात विलंबाने जमा घेतल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***महानगर पालिकेने दि.31/3/2015 अखेर न वटलेले धनादेश व मुदत बाह्य धनादेशांची यादी/ नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आली परंतु सदर यादीमध्ये धनोदशाचा क्रमांक व धनादेश निर्गमित केल्याचा दिनांक नसल्याने सदर धनादेश कोणत्या कालावधीचे आहेत ते समजून आले नाही. मुदतबाह्य व न वटलेल्या धनादेशाची रक्कम विलंबाने जमेस घेण्यात आलेली आहे. विभागाने सन 2016-17 मध्ये 31.3.2015 अखेरच्या मुदतबाह्य न वटलेल्या धनादेशांच्या रक्कमा जमेस घेतल्या आहेत. सदर मुदतबाह्य न वटलेल्या धनादेशापोटी महानगरपालिकेवर रु.3742594/- एवढया रकमेचे दायित्व् आहे.***

नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम क्रमांक 46 (5)नुसार कोणताही धनादेश आहरण केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी अनुज्ञेय असणार नाही. आणि हा कालावधी संपलेनंतर आदात्याने असा धनादेश आहर्त्याच्या स्वाक्षरीनिशी पुन्हा विधीग्राहय करवून घेण्यासाठी परत पाठविणे जरुरीचे असेल व असा मुदतबाह्य धनादेश पुर्नविधीग्राहय केल्याची टीप सामान्य रोकडवहीतील मूळनोंदी समोर लिहीणे आवश्यक आहे. याप्रमाणे कार्यवाही केल्याचे लेखापरिक्षणास अवगत करण्यात आलेले नाही. तसेच लेखाशाखेने न वटलेल्या व मुदतबाह्य धनादेशापोटी महानगरपालिकेवर 3742594/- एवढया रकमेचे दायित्व आहे. न वटलेल्या मुदतबाह्य धनादेशांची 31 मार्च2015 अखेरची माहिती लेखापरिक्षणास खालील

स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

| 31 मार्च 2015 अखेर न वटलेल्या धनादेशाचा क्रमांक व दिनांक | बँकेचे नाव/धनादेश देणा-याचे नाव | धनादेशाची रक्कम |
|---|---|---|

विभागास याबाबत दि.11/10/2018 रोजी अर्धसमास पत्र क्रमांक 136 निर्गमित करण्यात आले होते. विभागाने दि.25/10/2018 रोजी विलंबाने अनुपालन सादर केले असून त्यामध्ये 31.3.2015 अखेर न वटलेल्या धनादेश व मुदतबाहय धनादेशांच्या यादीमध्ये धनादेश क्रमांक व त्याचा दिनांक याची माहिती न देता खाते क्रमांक व रक्कम दिलेली आहे. तसेच न वटलेले व मुदतबाहय धनादेश 31.3.2015 अखेरचे आहेत. व दि.18/04/2017 रोजी मनपा फंडात जमा घेण्यात आलेले आहे असे कळविले आहे. धनादेशाचा क्रमांक व दिनांक यादीमध्ये नमुद नसल्याने सदरचे धनादेश कोणत्या कालावधीचे आहेत ते समजुन आले नाही. मुदतबाहय व न वटलेल्या धनादेशाची रक्कम विलंबाने जमेस घेण्यात आल्यामुळे रक्कम रु.3742594 लेखाबाहेर राहिली आहे. सदर विलंबाच्या समर्थनाबाबत विभागाने खुलासा केलेला नाही. सदर रकमेचा वापर इतर खर्चाच्या बाबीकरता करता आला नाही. विभागाने सन 2016-17 मध्ये 31.3.2015 अखेरच्या मुदतबाहय न वटलेल्या धनादेशाची रक्कम जमेस घेतली आहे.

विभागाने कळविलेल्या माहिती नुसार

(1) जनरल फंड पेंडींग धनादेश रक्कम रुपये 575115/-

(2) एस्क्रो खाते पेंडींग धनादेश रक्कम रुपये 1059801/-

(3) पेन्शन फंड पेंडींग धनादेश रक्कम रुपये 1508546/-

(4) प्रॉ.फंड पेंडींग धनादेश रक्कम रुपये 172952/-

(5) अनामत खाते पेंडींग रक्कम रुपये 426180/-

एकुण- 3742594/-

न वटलेल्या व मुदतबाहय धनादेशापोटी 31.3.2015 अखेर महानगरपालिकेवर रु.3742594/- एवढया रकमेचे दायित्व आहे.

DATSLMM7301 (Ref No : 113, Hmm No : 136)

## *107 कार्यकंत्राट कराची रक्कम शासनास जमा न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : लेखा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 228921.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 228921.00/-

| |
|---|
| ***शासन अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार नोंदणीकृत ठेकेदाराकडून कार्यकंत्राट कराची बांधकाम मुल्याच्या 2% दराने व नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदाराकडून 5% दराने रक्कम रुपये कपात करुन सदर रक्कम ज्या महिन्यात जमा झाली असेल त्याच्या पुढील महिन्याच्या 21 तारखेपर्यंत विक्रीकर विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडे चलनाने जमा करणे बंधनकारक असतांनाही रक्कम रु.228921/- विलंबाने शासनजमा केलेली असून , शासन आदेशाचे पालन झालेले नाही.*** |

विक्रीकर कायदा व शासन अधिसूचना दिनांक 04/04/2012 नुसार नोंदणीकृत ठेकेदाराकडून कार्यकंत्राट कराची बांधकाम मुल्याच्या 2% दराने व नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदाराकडून 5% दराने रक्कम कपात करुन सदर रक्कम ज्या महिन्यात जमा झाली असेल त्याच्या पुढील महिन्याच्या 21 तारखेपर्यंत विक्रीकर विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडे चलनाने जमा करणे बंधनकारक आहे. मनपाकडे सन 2014-15 मध्ये रक्कम रु.13413907/- इतकी कार्यकंत्राट कपात करण्यात आलेला असून त्यापैकी रक्कम रुपये 228921/- ही दिनांक 21/10/2014 पर्यंत भरणे आवश्यक असतांना विलंबाने म्हणजेच दिनांक 31/03/2015 रोजी भरलेली असून शासन आदेशाचे पालन झालेले नाही. याबाबत विभागास अर्धसामास पत्र क्र 127 दि.10/10/2018 निर्गमित करण्यात आले होते. विभागाच्या दि.12/10/2018 च्या अनुपालनात याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

DATSLMM7301 (Ref No : 120, Hmm No : 127)

## *108 मिळकत विभागातील महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तांची विहीत नोंदवहीत नोंदी न केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष : मिळकत महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| ***मनपा मालकीच्या जमिनी व इमारती भाडयाने दिल्याबाबतची नमुना 81 मधील नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.स्थावर मालमत्ता नोंदवही नमूना-128 मध्ये महानगरपालिकेच्या सर्वच मालमत्तांची नोंद घेतली गेलेली*** |

***नाही मा.आयुक्तांच्या आदेशानुसार मिळकत विभागाकडे स्थावर मालमत्तेची नोंद झाल्याशिवाय देयकांचे प्रदान करु नये असे आदेश असतांनाही, आदेशाचे उल्लंघन करुन इतर विभागांकडून परस्पर देयकांचे प्रदान करण्यात आलेले आहे. त्यामुळे लेखापरिक्षण दिनांकापर्यंत नेमक्या किती स्थावर मालमत्ता मनपाच्या मालकीच्या आहेत हे विभागास सांगता आलेले नाही.***

2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणा साठी मनपाच्या मिळकत विभागाने स्थावर मालमत्ता नोंदवही नमूना-128 व जमीन नोंदवही नमुना-129 या नोंदवहया उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. मनपा, भिवंडी यांचे आदेश क्र.आस्था./4257 दिनांक14.3.2005 नुसार मनपा मिळकत विभाग अस्तित्वात आला असुन महाराष्ट्र नगरपरिषदा लेखा संहीता 1971 मधील नियम 155 नुसार नियोजन प्राधिकरणासाठी घेतल्या जाणा-या जमिनीच्या नोंदीसाठी नमुना 129 व मनपा स्थावर मालमत्ता नोंदी नमुना 128 मध्ये घेण्यात येतात. या बाबत अर्धसमास पत्र क्र.156 दि.29/10/2018 अन्वये विचारणा केली असता, विभागाकडील क्र. मिळकत/34 दि.25/10/2018 रोजीचे अनुपालन विचारात घेऊन लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहीता नियम1971 मधील नियम110(1) नुसार मनपा मालकीच्या जमिनी व इमारती भाडयाने दिल्याबाबतची नमुना 81 मधील नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार महानगरपालिकेच्या 714 मिळकती असून, क्षेत्रफळ 344 एकर आहे. त्यापैकी 46 एकर जागा अदयाप महानगरपालिकेच्या नांवावर झालेली नाही. मिळकतींच्या काही प्रकरणी मूळ अभिलेख उदा. खरेदीखत प्रकरणी मोबदला पावती, सूची क्र.2, दस्त गोषवारा भाग-1 व भाग-2 प्रत उपलब्ध नसल्याने व काही जागा आदिवासी व न्यायप्रविष्ठ असल्याने मनपाच्या नांवावर झालेल्या नाहीत.

3) स्थावर मालमत्ता नोंदवही नमूना-128 मध्ये महानगरपालिकेच्या सर्वच मालमत्तांची नोंद घेतली गेलेली नाही. आयुक्त,मनपा यांचे आदेश क्र.आस्थापना/4257, दि.14/03/2005 अन्वये, मनपाच्या सर्व विभागांकडून खरेदी / ताब्यात घेण्यात आलेल्या सर्व मालमत्तांची ,जमिनीच्या नोंदी मिळकत विभागाकडील नोंदवहीत त्वरीत करण्यासाठी संबंधित विभागाने आवश्यक तो तपशील/कागदपत्रे मिळकत विभागाकडे सुपूर्द करावीत. त्याचप्रमाणे यापुढे कोणतेही अंतिम देयक अदा करण्यापूर्वी सदरची मालमत्ता, नोंदवहीत योग्यरित्या व अचूक तपशीलासह नोंदल्याचा शेरा मिळकत विभागाकडून प्राप्त झाल्यानंतरच अंतिम देयक अदा करणेत यावे. या आदेशाप्रमाणे कार्यवाही न झाल्यास संबंधितांना निलंबित करुन खातेनिहाय कार्यवाही करणेत येईल असे आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार मिळकत विभागाकडे इतर विभागाकडून प्राप्त होणाऱ्या सर्व स्थावर मालमत्तांच्या नोंद संबधित नोंदवहीत घेण्यात

आलेल्या आहेत. तथापि मनपाचे काही विभाग (उदा.बांधकाम) मिळकत विभागाकडे नोंदी घेण्यासाठी नस्ती पाठवत नसल्याचे दिसून आले आहे तसेच स्थावर मालमत्तेची नोंद , नोंदवहीत नोंदविलेचा शेरा नसतांना देखील देयकांचे सर्रास प्रदान करण्यात येत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे मनपाच्या सर्वच स्थावर मालमत्तांची नोंद, नोंदवहीत झालेली नाही. म्हणजेच मिळकत विभाग व इतर विभाग यांचेमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून आले आहे. तसेच मनपाच्या एकूण मिळकतींचे सर्वेक्षण लेखापरिक्षण दिनांकापर्यंत झालेले नाही. अशा बाबीमुळे लेखापरिक्षण दिनांकापर्यंत नेमक्या किती स्थावर मालमत्ता मनपाच्या मालकीच्या आहेत हे विभागास सांगता आलेले नाही.

DGPSAAM7402 (Ref No : 95, Hmm No : 156)

## *109 आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मंजूर करतांना अतिप्रदान झाल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष : आस्थापना महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***शासन परिपत्रक,वित्त् विभाग क्र.वेपुर 1209/प्र.क्र.69/सेवा-9, दिनांक 05/05/2010 नुसार सहाव्या वेतन आयोगातील वेतनवाढ मंजूर करतांना अतिप्रदान झाले आहे.***

शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.वेपुर 1209/प्र.क्र.69/सेवा-9, दिनांक 05/05/2010 नुसार सहाव्या वेतन आयोगातील वेतनवाढ मंजूर करतांना, वेतनवाढीची येणाऱ्या रकमेत एक रुपयापेक्षा कमी पैसे येत असतील तर ती मागील दहाच्या पटीत तसेच एक रुपयापेक्षा जास्त् रक्क्म येत असेल तर ती पुढील दहाच्या पटीत पूर्णांकीत करणे आवश्यक आहे. मनपाच्या आस्थापना विभागातील निवडक मूळ सेवापुस्त्के तपासली असता पुढील प्रमाणे वेतनवाढीच्या रकमांचे अतिप्रदान झालेले आहे.

कर्मचाऱ्याचे नांव : श्रीमत शितल प्रदिप शेलार, सफाई कामगार

नियुक्ती दिनांक : 02/06/2006, वेतनबॅन्ड : रु.4440-7440, ग्रेड वेतन रु.1300/-

| दिलेले वेतन | | प्रत्यक्षात अनुज्ञेय वेतन | |
|---|---|---|---|
| वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये | वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये |
| 01/07/2011 | 5380+1300 | 01/07/2011 | 5380+1300 |

| | | | |
|---|---|---|---|
| 01/07/2012 | 5590+1300 | **01/07/2012** | **5580+1300** |
| 01/07/2013 | 5800+1300 | 01/07/2013 | 5790+1300 |
| 01/07/2014 | 6020+1300 | 01/07/2014 | 6010+1300 |
| 01/07/2015 | 6240+1300 | 01/07/2015 | 6230+1300 |
| 01/07/2016 | 6470+1300 | 01/07/2016 | 6460+1300 |
| 01/07/2017 | 6710+1300 | 01/07/2017 | 6700+1300 |
| 01/07/2018 | 6950+1300 | 01/07/2018 | 6940+1300 |

वरील प्रकरणी दिनांक 01/07/2012 रोजी वेतनवाढीची रक्कम रु.200.40 येते त्यानुसार वेतनवाढीची रक्कम रुपये 200/- ऐवजी रु.210/- मंजूर केली असल्याने अतिप्रदान झाले आहे. तरी फेर वेतननिश्चिती करुन अतिप्रदानाची परिगणना करुन संबंधितांकडून रक्कम वसूल करावी व उपरोक्त् त्रुटी इतर कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील दुरुस्त करुन वरील प्रमाणे कार्यवाही करुन लेखापरिक्षणास अनुपालन विहीत कालावधीत सादर करण्यात आलेले नाही.

DATSLMM7301 (Ref No : 117, Hmm No : 107)

## *110 मनपा कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :आस्थापना महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

***रजा लेखा पुर्ण नसल्यामुळे संबंधीत कर्मचा- याने त्याच्या खात्यावर रजा शिल्लक नसतांना रजा घेतली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधीत कर्मचा- यास अत्तापर्यंत वेतन अदा केलेले असल्याने जादा प्रदानाची शक्यता नाकारता येत नाही. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 नुसार प्रति महिना 2.5 दिवसाप्रमाणे रजा जमा करणे आवश्यक असून, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.***

आस्थापना विभागाच्या निवडक मूळ सेवापुस्तकाची तपासणी केली असता खालील प्रकरणी अनियमितता आढळून आल्या आहेत.

अ) कर्मचाऱ्याचे नांव : श्रीमती सुमन जगन्नाथ गायकवाड, सफाई कामगार

नियुक्ती दिनांक : 06/03/1990

वेतनबॅन्ड : रु.4440-7440 ग्रेड वेतन रु.1600/-

1. रजेचा लेखा सन 2010 पासून लिहीलेला नाही. त्यामुळे सदर कर्मचा-यांनी अद्यापपर्यंत किती रजा घेतलेली आहे व त्याच्या खात्यावर किती रजा शिल्लक आहे. याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. तसेच रजा लेखा पुर्ण नसल्यामुळे संबंधीत कर्मचा-याने त्याच्या खात्यावर रजा शिल्लक नसतांना रजा घेतली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधीत कर्मचा-यास अत्तापर्यंत वेतन अदा केलेले असल्याने जादा प्रदानाची शक्यता नाकारता येत नाही.

दिनांक 01/6/11 ते दिनांक 20/06/11 रोजीची रजा संबंधीत कर्मचा-याच्या लेख्यातून वजा केलेली नाही.

2. सदर कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात सहावा वेतन आयोगाच्या नोंदी व विवरणपत्र जोडलेले असून, त्यावर विभागाच्या/मनपाच्या अधिकाऱ्यांची स्वाक्षऱ्या नाहीत. तथापि त्यानुसार आजअखेर वेतन काढण्यात येत आहे.

3. सदर वेतन निश्चिती मनपाच्या मुख्य् लेखापरिक्षक यांचकडून पडताळणी करुन त्यानंतरच वेतन काढणे आवश्यक असून तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच बहुतांशी प्रकरणांमध्ये अशाच प्रकारे वेतन काढण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

4. सेवापुस्तकातील सेवाभिलेख प्रमाणित करण्यात आलेले नाहीत.

ब) कर्मचाऱ्याचे नांव : मोहम्म्द अरीफ सय्यद साहब अन्वरी, सफाई कामगार

नियुक्ती दिनांक : 21/07/2012

वेतनबॅन्ड : रु.4440-7440 ग्रेड वेतन रु.1300/-

5. सदर कर्मचाऱ्याची नियुक्ती दिनांक 21/07/2012 रोजी झाली असून, त्यांच्या खाती दिनांक 21/07/12 ते दिनांक 31/12/12 या कालावधीसाठी एकूण 15 दिवस अर्जित रजा जमा करण्यात आली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 नुसार प्रति महिना 2.5 दिवसाप्रमाणे 12.5 दिवस रजा जमा करणे आवश्यक असून, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6. सेवापुस्तकातील सेवाभिलेख प्रमाणित करण्यात आलेले नाहीत.

7. नामनिर्देशन नोंदी सेवापुस्तकात घेण्यात आलेली नाहीत.

याबाबत संबंधीत विभागास अर्धसमास पत्र क्र.157 दि.5.11.2018 अन्वये खुलासा विचारला असता विभागाने उशिराने दि.6.12.2018 रोजी अनुपालन सादर केलेले असून याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे.

अर्धसमास पत्रातील श्रीमती सुमन गायकवाड यांच्या बाबतच्या आक्षेपाबाबत मुद्दा क्र.1 नुसार रजा लेखापूर्ण केल्याचे नमुद केलेले आहे व प्रत्यक्षात जादा प्रदान झाले नसल्याचे नमुद केलेले आहे व आक्षेपातील मुद्दा क्र.2 बाबत संबंधीत अधिका-याच्या स्वाक्षरिकरीता सेवापुस्तक प्रस्तावित असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु याप्रित्यर्थ अनुपालनासोबत सेवापुस्तकाचा संबंधीत पृष्ठाच्या छायांकित प्रती सादर केलेल्या नाहीत. तसेच श्री. अन्सारी यांच्या बाबतच्या आक्षेपातील मुद्दा क्र.3 बाबत चुकीच्या रजेच्या परिगणनेबाबत सुधारित नोद घेतल्याचे व रजा लेखा पूर्ण केल्याचे व सेवाअभिलेख प्रमाणित करुन नामनिर्देशनाच्या नोंदी कर्मचा-याने अर्ज दिल्यानंतर घेण्यात येईल असे नमुद केलेले असून प्रत्यक्षात नोंदीच्या सेवापुस्तकातील पृष्ठाच्या छायांकित

प्रती अनुपालनासोबत नाहीत.

DATSLMM7301 (Ref No : 118, Hmm No : 157)

## *111 कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना मंजूर केल्यानंतरच्या वेतननिश्चितीमधील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : आस्थापना महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेपुर1109/प्र.क्र.24/सेवा-3, दिनांक 9 जुन 2009 अन्वये पदोन्तीच्या संधी उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यास योजनेचा लाभ मिळाल्यानंतर, त्यास प्रत्यक्ष् पदोन्नतीच्या पदाचा वेतन बँड मंजूर करण्यात यावा. या वेतनबँड मधील वेतन, संबंधित कर्मचाऱ्यास योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी अनुज्ञेय असलेल्या वेतन बँड मधील वेतन व ग्रेड वेतनावर 3 टक्के वेतनवाढ देऊन (ही रक्कम दहाच्या पटीत नसल्यास ती दहाच्या पटीत घेऊन) निश्चित करण्यात यावे. अशी तरतूद असून, आस्थापना विभागाच्या निवडक मूळ सेवापुस्तकाची तपासणी केली असता खालील प्रकरणी योजनेचा लाभ मिळाल्यानंतर पदोन्तीच्या अनुषंगाने (काल्पनिक वेतनवाढ) न देता वेतन निश्चिती करण्यात आलेले आहे***

शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेपुर1109/प्र.क्र.24/सेवा-3, दिनांक 9 जुन 2009 अन्वये पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यास योजनेचा लाभ मिळाल्यानंतर, त्यास प्रत्यक्षपदोन्नतीच्या पदाचा वेतन बँड मंजूर करण्यात यावा. या वेतनबँड मधील वेतन, संबंधित कर्मचाऱ्यास योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी अनुज्ञेय असलेल्या वेतन बँड मधील वेतन व ग्रेड वेतनावर 3 टक्के वेतनवाढ देऊन (ही रक्कम दहाच्या पटीत नसल्यास ती दहाच्या पटीत घेऊन) निश्चित करण्यात यावे. अशी तरतूद असून, आस्थापना विभागाच्या निवडक मूळ सेवापुस्तकाची तपासणी केली असता खालील प्रकरणी योजनेचा लाभ मिळाल्यानंतर पदोन्न्तीच्या अनुषंगाने (काल्पनिक वेतनवाढ) न देता वेतन निश्चिती करण्यात आलेले आहे. वित्त विभाग शा.नि.क्र.वेतन1109/प्र.क्र.43/सेवा-3/दि.31.8.2009 नुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

१) कर्मचाऱ्याचे नांव : कृष्णा मोतीराम आळशी, सफाई कामगार

नियुक्ती दिनांक : 19/01/1996 वेतनबँड : रु.4440-7440 ग्रेड वेतन रु.1300/-

| दिलेले वेतन | | प्रत्यक्षात अनुज्ञेय वेतन | | शेरा |
|---|---|---|---|---|
| वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये | वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 01/07/2007 | 6280+1300 | 01/07/2007 | 6280+1300 | |
| 01/01/2008 | 6280+1450 | 01/01/2008 | 6510+1450 (1600) | पदोन्न्तीच्या अनुषंगाने एक काल्पनिक वेतनवाढ घेऊन येणारे वेतन |
| 01/07/2008 | 6520+1450 | 01/07/2008 | 1600+1450 (1600) | |

२) कर्मचाऱ्याचे नांव : श्रीम.सविता धोत्रे, सफाई कामगार

नियुक्ती दिनांक : 01/07/1995 वेतनबँड : रु.4440-7440 ग्रेड वेतन रु.1300/-

| दिलेले वेतन | | प्रत्यक्षात अनुज्ञेय वेतन | | शेरा |
|---|---|---|---|---|
| वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये | वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये | |
| 01/07/2006 | 6060+1300 | 01/07/2006 | 6060+1300 | |
| 01/07/2007 | 6280+1300 | 01/07/2007 | 6280+1300(1600) | पदोन्न्तीच्या अनुषंगाने एक काल्पनिक वेतनवाढ घेऊन येणारे वेतन |
| 01/07/2007 | 6280+1450 | 01/07/2007 | 6510+1450(1600) | |

३) कर्मचाऱ्याचे नांव : श्रीम.प्रकाश सदु साळवी, सफाई कामगार

नियुक्ती दिनांक : 01/07/1995 वेतनबँड : रु.4440-7440 ग्रेड वेतन रु.1300/-

| दिलेले वेतन | | प्रत्यक्षात अनुज्ञेय वेतन | | शेरा |
|---|---|---|---|---|
| वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये | वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये | |
| 01/07/2006 | 6060+1300 | 01/07/2006 | 6060+1300 | |
| 01/07/2007 | 6280+1300 | 01/07/2007 | 6280+1300(1600) | पदोन्न्तीच्या अनुषंगाने एक काल्पनिक वेतनवाढ घेऊन येणारे वेतन |
| 01/07/2007 | 6280+1450 | 01/07/2007 | 6510+1450(1600) | |

४) कर्मचाऱ्याचे नांव : श्रीम.अनिल कृष्णा डोंगरे, सफाई कामगार

नियुक्ती दिनांक : 01/07/1995 वेतनबँड : रु.4440-7440 ग्रेड वेतन रु.1300/-

| दिलेले वेतन | | प्रत्यक्षात अनुज्ञेय वेतन | | शेरा |
|---|---|---|---|---|
| वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये | वेतनवाढ दिनांक | वेतन रुपये | |
| 01/07/2006 | 6060+1300 | 01/07/2006 | 6060+1300 | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 01/07/2007 | 6280+1300 | 01/07/2007 | 6280+1300(1600) | पदोन्न्तीच्या अनुषंगाने एक काल्पनिक वेतनवाढ घेऊन येणारे वेतन |
| 01/07/2007 | 6280+1450 | 01/07/2007 | 6510+1450(1600) | |

तसेच उपरोक्त त्रुटी इतर कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील दुरुस्त करुन वरील प्रमाणे कार्यवाही करुन लेखापरिक्षणास अनुपालन सादर करावे.

याबाबत संबंधीत विभागास अर्धसमास पत्र क्र.161 दि.5.11.2018 नुसार खुलासा विचारला असता विभागाने विलंबाने दि.6.12.2018 रोजी अनुपालन सादर केलेले असुन त्याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

शा.नि.क्र.वेतन/109/प्र.क्र.43/सेवा-3 दि.31.08.2009 नुसार पदोन्नतीच्या अनुषंगाने एक काल्पनिक वेतन वाढ देऊन वेतन निश्चिती करणे आवश्यक असताना तशी वेतनवाढ न देता वेतननिश्चिती केलेली आहे व त्याप्रमाणे फरकाची रक्कम अदा करण्यात येईल असे अनुपालन सादर केलेले आहे. अनुपालनासोबत सुधारीत वेतननिश्चिती आदेशाची व पुढील कार्यवाहीच्या छायांकित प्रती इ. सादर करण्यात आलेल्या नाहीत.

DATSLMM7301 (Ref No : 119, Hmm No : 161)

## ***112 निलंबित कर्मचारी, न्यायालयीन प्रविष्ठ प्रकरणे, आश्वासित प्रगती योजना व जातपडताळणी बाबतची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध न केल्या बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2014-2015**

**No. of Irregularities: 12**

*लेखा शीर्ष : आस्थापना महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

| |
|---|
| ***अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या आश्वासित प्रगती योजनेनुसार दिलेल्या वेतनवाढी तसेच निलंबित केलेल्या कर्मचाऱ्याच्या संदर्भात माहिती मागविण्यात आली होती परंतु त्याबाबत आस्थापना विभागाकडून याबाबतची माहीती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.*** |

भिवंडी निजामपूर शहर मनपा सामान्य प्रशासन विभागाने खालील बाबींची माहिती लेखा परीक्षणास त्वरित उपलब्ध करून देण्याबाबत विभागास अर्धसामास पत्र क्र 124 दि.10/10/2018 निर्गमित करण्यात आले होते. याबाबत विभागाने कोणताही खुलासा केलेला नाही.

